
# नगर वाचनालय सातारा




## १२५ वर्षांची वाटचाल

१८५३ • १९७८

विनय राजोपाध्ये

# नगर वाचनालय सातारा

[ सातारा जिल्हा मुक्तद्वार ग्रंथालय ]

★

१२५

## वर्षांची

## वाटचाल

१८५३ ते १९७८

# स्मरणिका समिती

## सदस्य

१) श्री. विलासराव बा. पाटील

२) श्री. हरिभाऊ आपटे

३) श्री. वि. श्री. दामले

४) श्री. सुरेश चं. पळणिटकर

५) श्री. अ. कृ कुलकर्णी

६) श्री. पां. वि खांडेकर

७) प्रा द. ता. भोसले

८) श्री. संभाजीराव पाटणे

९) श्री. श्री. बा. आचार्य

१०) श्री. अ. बा. वाळिंबे

---

मुखपृष्ठ :— विनय राजोपाध्ये

मुखपृष्ठ छपाई : — किर्लोस्कर प्रेस, पुणे ९.

ठसे :— मावळा चित्रमुद्रा, किर्लोस्कर प्रेस


मुद्रणस्थळ :— विमा मुद्रक आणि प्रकाशक लि. सातारा

मुद्रक आणि प्रकाशक :— कार्यवाह, रौप्यमहोत्सव समिती, नगर वाचनालय, सातारा.

## अर्पणपत्रिका :


राष्ट्रगुरु समर्थ रामदास व छत्रपति श्री शिवराय यांच्या पुण्यस्मृतीस
सादर समर्पण





" मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा "

आमचे कृपाछत्र :



कै. श्रीमंत छत्रपति प्रतापसिंह महाराज भोसले

# तेथे कर अमुचे जुळती !

कै. श्री. छत्रपती
सगुणाबाई राणीसाहेब उर्फ आईसाहेब यांनी
इमारतीसह खाजगी ग्रंथ संग्रहाचे दान करून
वाचनालयाची मुहूर्तमेढ रोविली
त्यांच्या स्मृतीस आदरांजली.

In memory
of
Valuable Services
rendered by
Late Arther J. R.

' पाठक भवना 'चे स्फूर्तिस्थान



कै. रा. ब. वि. ना. पाठक

# शतकोत्तर रौप्यमहोत्सव समारंभ



उद्घाटक


य. वि. चंद्रचूड
सरन्यायाधीश
सर्वोच्च न्यायालय, भारत सरकार



अध्यक्ष

बा. न. देशमुख
सरन्यायाधीश
मुंबई उच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य

# स्मरणिका व ग्रंथप्रदर्शन समारोह



उद्घाटक


नामदार लालकृष्ण अडवाणी
माहिती व नभोवाणी मंत्री, भारत सरकार



अध्यक्ष

ना. हशु अडवाणी
नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

# विस्तारित इमारतीची कोनशिला समारंभ



अनावरण

खासदार य. ब. चव्हाण



अध्यक्ष

नामदार शरदराव पवार

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# सत्कार समारंभ



मुख्य पाहुणे

उद्योगपति श्रीमान शेठ लालचंद हिराचंद



अध्यक्ष

ना. प्रतापराव भोसले
ग्रामीण विकास, पुनर्वसन राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

# संदेश :

Vice President
INDIA,
New Delhi.
Nov. 30, 1978.

I am glad to learn that Commemoration Volume is being released on the 23rd December, 1978, on the occassion of completion of 125th years of useful existence by "Nagar Wachanalaya Satara." I send my best wishes to the Library on the happy occassion

**B. D. Jatti.**

१५ डिसेंबर १९७८

नगर वाचनालयाची वाटचाल १२५ वर्षांची झाली ही गोष्ट सातारचे नागरिकांस भूषणावह आहे सार्वजनिक वाचनालये या आधुनिक लोकशिक्षणाच्या शाळा आहेत. वाचनालयाचे सुस्थितीवरोन व किती सभासद फायदा घेतात यावरून शहराची सांस्कृतिक पातळी मोजणेस हरकत नाही. त्याबद्दल सातारा शहराने उच्चांक मिळविला आहे.

वाचनालयाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो व अधिकाधिक लोकांना त्याचा फायदा होवो ही सदिच्छा.

बा. न. देशमुख.
मुख्य न्यायमूर्ती
मुंबई उच्च न्यायालय.

सातारा नगर वाचनालयाचा शतकोत्तरी महोत्सव २३ डिसेंबर १९७८ रोजी संपन्न होत आहे ही खरोखरच एक भूषणावह आणि आनंददायी घटना आहे. समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेत वाचनालयाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. सर्वसामान्य लोकांना स्वत: पुस्तके विकत घणे शक्य नसते. नागरिकांची वाचनाची ही गरज भागविण्याच्या कामी सातारा नगर वाचनालय उत्तम सेवा बजावीत आहे. वाचनालयाकडून नागरिकांची उत्तरोत्तर उपयुक्त सेवा घडो अशी सदिच्छा व्यक्त करून शतकोत्तरी महोत्सवास मी सुयश चिंतितो.

श्री. शरद पवार
मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य मुंबई. ४०० ०३२

# संदेश :

सातारा नगर वाचनालयाचे स्थापनेस १२५ वर्षे होत असल्याने आपण शतकोत्तरी महोत्सव येत्या २३ डिसेंबरला साजरा करीत आहात हे वाचून आनंद वाटला. हा शताब्दि महोत्सव भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती माननीय श्री. य. वि. चंद्रचूड यांचे शुभहस्ते होत आहे हे या महोत्सवाचे खास वैशिष्टच मानावे लागेल. शैक्षणिक, सामाजिक राजकीय व सांस्कृतिक जीवनांत सातारा नगर वाचनालयाने मोलाची भर घातली आहे हीअतिशय अभिमानाची बाब आहे. सातारा जिल्ह्यांत या वाचनालयाने सतत ज्ञानाचा नंदादीप अखंड तेवत ठेवला आहे ही कौतुकास्पद गोष्ट आहे व यासाठी वाचनालयाचे अध्यक्ष व त्यांचे इतर साथीदार धन्यवादास पात्र आहेत. या शतकोत्तर महोत्सवानिमित्त आपण एक स्मरणिका प्रकाशित करीत आहात ही उचितच गोष्ट होय.

या संस्थेच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवास समक्ष उपस्थित राहण्यासाठी आपण मला निमंत्रण पाठविले त्या बद्दल मी आपला आभारी आहे. संस्थेच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवास व स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

श्री. शि. वि. पाटील.
अध्यक्ष,
महाराष्ट्र विधानसभा,

सातारा नगर वाचनालयाच्या स्थापनेस १२५ वर्षे होत असून या निमित्ताने या वाचनालयाच्या इमारतीची योजना बाल-विभाग, अभ्यासिका तसेच बंदिस्त सभागृहासारख्या विषयक उपक्रमही हाती घेण्यात येणार आहेत ही घटना केवळ साताऱ्याच्याच सामाजिक जीवनात नव्हे तर अखिल भारतातील गौरवास्पद घटना आहे.

साताऱ्या सारख्या साधारणतः ग्रामीण भागातल्या वाचनालयास १२५ वर्षे पूर्ण होतात ही घटना ग्रामीण भागातील जनतेतही शिकण्याची, वाचण्याची इच्छा प्रबळ होऊ शकते त्याचे द्योतक आहे. अन्य प्रगती पथावर असलेली वाचनालयें हे आदर्श उदाहरण डोळ्यासमोर ठेवतील याची मला खात्री वाटते. साताऱ्याच्या सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग बनलेल्या वाचनालयाचा असाच उत्कर्ष होवो आणि ज्ञान प्रसाराचे कार्य असेच चालू राहो अशा शुभेच्छा व्यक्त करून महोत्सवास सुयश चिंतितो.

गजाननराव गरुड
विधानसभा उपाध्यक्ष
नागपूर.

सातारा नगर वाचनालयाचे स्थापनेस १२५ वर्षे होत असून त्याचा शतकोत्तर महोत्सव २३ डिसेंबरला होणार असल्याचे वाचून आनंद वाटला. सातारा नगर वाचनालय जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करीत आहे. सदर महोत्सवाचे निमित्ताने वाचनालयाने इमारत वाढीची योजना आखून वाढीव जागेत अभ्यासिका, बालविभाग इत्यादि अत्यावश्यक बाबींचा समावेश करण्यांत आला आहे, ही गोष्ट वाचनालयाचे प्रगती दर्शविते. आपल्या नगर वाचनालयाची अशीच प्रगती होत राहो ही शुभेच्छा.

उत्तमराव ल. पाटील.
महसूल, पुनर्वसन मंत्री,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

## संदेश :

दिनांक २३ डिसेंबर १९७८ रोजी सातारा नगर वाचनालयाचे स्थापनेस १२५ वर्षे पूर्ण होत असून शतकोत्तरी महोत्सव भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रचूड यांच्या शुभहस्ते होत असल्याचें वाचून समाधान वाटते. नगर वाचनालयाने आजपर्यंत लोक जीवनांत सर्व प्रकारच्या ज्ञान प्रसाराचे कार्य केले आहे याची कल्पना आली. तसेच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनांतही प्रगतीपर कार्य केले हे वाचून आनंद वाटला. या निमित्तानें वाचनालयाच्या इमारत वाढीची योजना संकल्पीत होत आहे हा एक स्तुत्य उपक्रम असून त्याची आज गरजच आहे वाचनालय हे एक ज्ञानपीठ व ज्ञानवाढीचें भांडार आहे. आयोजित शतकोत्तरी महोत्सव सर्व प्रकारे उत्तम रीतीने व यथासांग पार पडो. शतकोत्तर महोत्सवास व तद्निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस शुभेछा.

श्री. सुशीलकुमार शिंदे.
कामगार व पर्यटन मंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय.
मुंबई – ४००० ३२

आपल्या नगर वाचनालयास १२५ वर्षे झाल्याबद्दल चा समारंभ येत्या दि. २३ डिसेंबरला साजरा होत असून त्या निमित्ताने एक स्मरणिकाही प्रकाशित होत आहे हे वाचून आनंद वाटला. सार्वजनिक वाचनालयांना महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जन-जीवनात आगळे एक स्थान आहे. ही चळवळ सतत वाढत रहावी आणि जनसामान्यापर्यंत पोहोचवावी म्हणून आपल्या वाचनालयानेही मोठी कामगिरी केली आहे. अशा या आपल्या वाचनालयाच्या १२५ वर्धापनदिनानिमित्त मी आपणा सर्व कार्यकर्त्यांना धन्यवाद देतो व ज्ञानप्रसाराचे हे कार्य असेच वाढत राहो, ही सदिच्छा व्यक्त करतो. समारंभास व स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

श्री. भाऊसाहेब सुर्वे.
गृहनिर्माण व तुरुंग मंत्री
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय मुंबई. ४०० ०३२

सातारा जिल्ह्याचे विविध क्षेत्रातील वैशिष्ट्य दर्शविणारी स्मरणिका प्रकाशित करीत आहात व सदर शतकोत्तरी महोत्सवाचे उद्घाटन येत्या २३ डिसेंबरला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती माननीय य. वि. चंद्रचूड यांचे हस्ते होणार आहे हे वाचून आनंद वाटला. आपल्या सदर शतकोत्तरी महोत्सवास अधिकाधिक शैक्षणिक, सामाजिक राजकीय व सांस्कृतीक कार्य करण्यास प्रेरणाशक्ती मिळो अशी मी प्रार्थना करतो.

श्री. छेदीलाल गुप्ता.
वन, दारुबंदी व उत्पादन शुल्क मंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

सातारा नगर वाचनालयाचे स्थापनेस १२५ वर्षे पूर्ण होत असून या महिन्यात वाचनालयाचा शतकोत्तरी महोत्सव साजरा होत आहे हे वाचून आनंद वाटतो. सातारा नगर वाचनालयाने गेल्या सव्वाशे वर्षात ज्ञानप्रसार, ग्रंथप्रेम, इत्यादी बाबत भरीव कामगिरी केली असून जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात मोलाची भर घातली आहे. शतकोत्तरी महोत्सवाचे निमित्ताने नगर वाचनालयाने इमारत विस्तार, बालविभाग, अभ्यासिका, सभागृह इत्यादी बाबत अनेकविध प्रगतीपर योजना आखल्या असून शहरातील ग्रंथप्रेमी व दानशूर लोकांच्या सहकार्याने त्या यशस्वी होतील असा मला विश्वास वाटतो. शतकोत्तरी महोत्सवाच्या निमित्ताने सातारा नगर वाचनालयास अधिकतर प्रगतीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा.

श्री. प्रतापराव भोसले
ग्रामविकास, पुनर्वसन राज्यमंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२

## संदेश :

सातारा नगर वाचनालयाला यावर्षी १२५ वर्षे पूर्ण होत असून त्या निमित्त वाचनालयाचा शतकोत्तरी महोत्सव साजरा होत असल्याचे समजल्यावर आनंद झाला. वाचनालये ज्ञानप्रसाराच्या प्रक्रियेत फार मोलाची कामगिरी करीत असतात. सातारा नगर वाचनालयाने ही कामगिरी अव्याहतपणे गेली १२५ वर्षे केली आहे. याबद्दल संस्थेचे अभिनंदन करीत असतानाच वाचनालयाच्या प्रगतीबद्दल सुयश चिंतीतो.

शिवाजीराव पाटील
राज्यमंत्री,
पाटबंधारे ( सिंचनक्षेत्र विकास प्रधिकरणासह )
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

नगर वाचनालय हे गेली १२५ वर्ष आपल्या ओंजळीतील फुले उधळीत असून त्यांचा सुगंध संपूर्ण महाराष्ट्रभर पसरवीत आहे. व हे सुगंध अजूनही टिकून आहे यातच त्याच्या खऱ्या यशाचे प्रतिक आहे. हे कस्तूरी मृग असेच टिकून रहावे नव्हेतर यापेक्षाही त्याचा ज्ञानरुपी सुगंध संपूर्ण महाराष्ट्राला नव्हेतर भारताला देण्यास त्यास अधिकाधिक फलप्राप्ती होवो हीच शुभेच्छा.

लालचंद हिराचंद


ग्रंथालय म्हणजे संस्कृतिचे मोलाचे केन्द्र होय. साताऱ्याचे हे सव्वाशे वर्षे कार्यरत असलेले नगर वाचनालय म्हणजे सातारा नगरीचे भूषण होय. त्याचा सतत विकास होवो हेच या प्रसंगी चिंतीतो.

अनंत काणेकर.
मुंबई.

सातारा नगर वाचनालयास १२५ वर्षे पूर्ण होत आहेत ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. ग्रंथालय हे पुस्तकांचेच नुसते घर नसते. ते नगरीतील सांस्कृतिक जीवनाचे व वैचारिक पोषणाचे केंद्र असते. मी आपल्या ग्रंथालयास व उत्सवास सतत उत्कर्षाच्या शुभकामना व सदिच्छा पाठवितो.

नरहर कुरुंदकर.


## विद्यमान वास्तू



## संकल्पित वास्तू



अंतरंग :



वृत्रपत्र विभाग



संग्रहालय व वाचनालय




उपनगर केन्द्र
पोवईनाका, सातारा

# विद्यमान अध्यक्ष — उपाध्यक्ष




विद्यमान अध्यक्ष


मनोहर गंगाधर भागवत
B. A. LL. B.

विद्यमान उपाध्यक्ष

विलासराव पाटील
B. A. LL. B.



शतसांवत्सरिक महोत्सव समिती



माजी कार्यकारी मंडळ ( १९३९ )



## विद्यमान कार्यकारी मंडळ

अध्यक्ष – श्री. मनोहर गं. भागवत
बी. ए., एल्एल्. बी.

उपाध्यक्ष – ,, विलासराव बा. पाटील
बी. ए. एल्एल्. बी.

कार्यवाह – ,, श्री. म. मराठे

कार्यवाह – ,, चिं. रा. वेलणकर

कार्यकारिणी सभासद –

श्री. श्री. बा. आचार्य
,, अ. बा. वाळिंबे बी. एस्सी. बी. एड्.
,, वि. ल. चाफेकर बी. ए. (ऑनर्स)
,, चं. ना. तांबे
,, ना. ज. सोमण
,, र. ना. बोंद्रे एम्. कॉम.
,, वि. दि. वाघ एम. ए. बी. पी. एड्.
,, मं. मु. सबनीस
,, श्री. शं. साठे (स्वीकृत) बी. ए., एल्.एल्. बी.
डॉ. वि. रा. पेंढारकर (स्वीकृत) एम. बी. बी. एस्.
ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य (पदसिद्ध)
नगर पालिका प्रतिनिधी : नियुक्त केला नाही

हिशेब तपासनीस –

श्री. मा. गं. भागवत बी. कॉम बी. ए., एल्एल्. बी.
एफ. सी. ए., चार्टर्ड अकौंटंट

## शतकोत्तर रौप्यमहोत्सव समिती

| | |
|---|---|
| श्री. म. गं. भागवत, बी. ए. एल्एल्., बी. | अध्यक्ष |
| श्री. वि. बा. पाटील, बी. ए. एल्एल्., बी. | उपाध्यक्ष |
| श्री. रा. ना. गोडबोले | अध्यक्ष निधी समिती |
| श्री. श्री. बा. आचार्य | कार्यवाह |
| श्री. अ. बा. वाळिंबे, बी. एस्सी. बी. एड्. | कार्यवाह |
| श्री. चं. ना. तांबे | खजिनदार |
| श्री. र. ना. बोंद्रे, एम्. कॉम्. | सभासद |
| श्री. वि. दि. वाघ, एम्. ए. बी. पी. एड्. | सभासद |
| श्री. मं. मु. सबनीस डि. सी. ई. | सभासद |

## शतकोत्तर रौप्य महोत्सव

### निधी समिती

श्री. रा. ना. तथा बन्याबापू गोडबोले — अध्यक्ष
,, चं. ना. तांबे — कोषाध्यक्ष
,, म. गं. तथा मनोहरपंत भागवत
,, आमदार छत्रपती अभयसिंहराजे भोसले
,, किसन महादेव उर्फ आबासाहेब वीर
,, बाबूराव घोरपडे, अध्यक्ष जि. प. सातारा
,, विलासराव पाटील
डॉ. वि. रा. पेंढारकर
श्री. आप्पासाहेब साठये
,, पी. जी. उर्फ नानासाहेब भागवत
,, :चंद्रकांत देवी
,, पुरुषोत्तम कासट
,, भगवानदास गो. गुजर
,, राजाभाऊ दोशी
डॉ. हरिभाऊ कुलकर्णी
श्री. व्यंकटराव भोसले
,, एम. एन. कांगो
,, शिवाजीराव देसाई
,, सुरेश चं. पळणीटकर
,, अनंतराव कृ. कुलकर्णी
,, बापूसाहेब मिरजकर
डॉ. उमेशचंद्र तावडे
श्री. हरीभाऊ आपटे
,, रमेश शाणभाग
,, राजाभाऊ कोटणीस
,, अप्पासाहेब निगडीकर
,, मधुकाका गोडबोले
,, गुलाबभाई बागवान
,, आप्पासाहेब पाटील
डॉ. अनिल आप्पासाहेब पाटील

# प्रमुख कार्यकर्ते, ग्रंथपाल व इतर सेवक

| सेवकांचे नाव | हुद्दा |
| --- | --- |
| श्री. सं. वि. नाईक | ग्रंथपाल |
| ,, ह. भा. गोळवलकर | सहाय्यक ग्रंथपाल |
| ,, अ. श्री. वाघ बी. कॉम. | अकौन्टस् क्लार्क |
| ,, बा. वि. साठये | लेखनिक |
| ,, अ. अ. वैद्य | शिपाई |
| ,, द. वा. बांबाडे | शिपाई |
| ,, प्र. वि. गुजर बी.ए. (ऑनर्स) बी. लिब. एस्सी | सहाय्यक ग्रंथपाल |
| ,, अ. ह. निकम बी. ए. | लेखनिक |
| ,, स. ज्ञा. चोरगे बी. ए. (ऑनर्स) | लेखनिक |
| ,, श्री. रा. वारूंजीकर | शिपाई |

## काही ग्रंथपाल

श्री. अनंतराव महाजनी
,, के. ल. काशीकर
,, चितळे
,, गो. कृ. दामले
,, अ. म. देव
,, अ. गो. कापरे
,, गो. भा. साने
,, श्री. द. जोशी
,, श्री. वा. वि. नरगुंदे
,, कृ. र. वाळिंबे
,, बा. ग. देवधर
,, वि. गो. इनामदार

## इतर काही सेवक

श्री. वि. वि. कोटणीस
,, वि. बा. कुलकर्णी
,, सी. गो. आपटे
,, ह. ज. देशपांडे
,, ना. म. सामक
,, गो. रा. पानसे
,, श्री. रा. आगटे
,, र. रा. देऊसकर
,, लेले
,, म. द. गद्रे
,, वि. रा. पालेकर
,, गो. ग. लखपती
,, सु. न. ठुसे
,, वि. बा. जोशी
,, ग. कृ. लखपती
,, कु. नीला कुलकर्णी
,, श. द. पंडितराव
,, चं. वा. जोगळेकर
,, गं. ल. शेंडे
,, अ. गो. लिमये
सौ. अ. गो. घोलप
श्री. नं. ग. दिक्षीत
,, भा. खं. कुलकर्णी
,, प्र. ग. असनीकर
,, वि. गु. कुलकर्णी
,, दि. कृ. प्रभुणे
,, दि. कृ. वाळिंबे
,, अ. कृ. वाळिंबे
,, सु. बा. ढवळे
,, के. पी. कुलकर्णी


# महाराष्ट्र साहित्य परिषद
## शाखा सातारा

द्वारा–नगरवाचनालय, सातारा.


### कार्यकारी मंडळ

| | |
| --- | --- |
| श्री. म. गं. भागवत बी. ए. एल् एल्. बी. | अध्यक्ष |
| ,, सुरेश पळणीटकर | उपाध्यक्ष |
| ,, प्रा. द. ता. भोसले एम. ए. पी. एचडी. | उपाध्यक्ष |
| ,, वि. दि. वाघ एम. ए. बी. पी. एड्. | कार्यवाह |
| ,, श्री. बा. आचार्य | कार्यवाह |
| ,, कु. सुहासिनी पाटील बी. ए. | कार्यवाह |
| ,, तारळेकर आ. सि. एम. ए. एम. एड्. | सभासद |
| ,, पाटणे. सं स. एम. ए. बी. एड. | सभासद |
| ,, खांडेकर सु. सि. एम. ए. एम. एड्. | सभासद |
| ,, रमेश कुलकर्णी | सभासद |
| ,, सौ. कादंबरी देशमुख बी. ए. | सभासद |
| ,, जे. बी. पाटील एम. ए. बी. एड्. | सभासद |
| ,, पिटके मा. ह. | सभासद |
| ,, कु. सुरेखा गुंडाळे एम. ए. | सभासद |


## विद्यमान कार्यकारी मंडळ




## इमारत निधी समिती



माजी सेवकवर्ग ( १९५३ )



विद्यमान सेवकवर्ग



# अध्यक्ष व उपाध्यक्ष

## अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. रा. ग. सोमण | १९३२ ते १९४० |
| ,, त्रि. रा. खर्शीकर | १९४१ ते १९४४ |
| ,, श्री. वि. जोशी | १९४५ ते १९४६ |
| ,, शं. ह. साठे | १९४७ ते १९५३ |
| ,, शं. वि. भिडे | १९५४ ते १९५७ |
| ,, शि. दा. लिमये | १९५८ ते १९६० |
| ,, रा. स. ढवळे | १९६१ ते १९६३ |
| ,, प्रा. दि. मो. हातवळणे | १९६४ ते १९६५ |
| ,, रा. ना. गोडबोले | १९६६ ते १९६८ |
| ,, म. गं. भागवत | १९६९ ते |

## उपाध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. म. कृ. दांडेकर | १९३२ ते ४० |
| ,, श्री. वि. जोशी | ३२ ते ३९, ४७ ४९ |
| ,, श्री. वि. भिडे | ३२ ते ४३ |
| ,, वि. रा. खर्शीकर | ४० |
| ,, कृ. दा. लिमये | ४१ ते ४३ |
| ,, स. वि. करंदीकर | ४१,४२–४४,४७ ते ४९ |
| ,, ल. गो. मेहेंदळे | ४३ |
| ,, दि. ह. पंडित | ४४ ते ४६ |
| ,, द. बा. सरवटे | ४५ ते ४६ |
| ,, रा. स. चुनेकर | ४५ |
| ,, द. रा. कुलकर्णी | ४५ |
| ,, वा. के. वाघ | ४६ |
| ,, ना. रा. आपटे | ४७ ते ४९ |
| ,, द. रा. चितळे | ४८ |
| ,, ना. ज. सोमण | ४९ |
| ,, तु. य. राजेभोसले | ५० ते ५३ |
| ,, मो. रा. वाळिंबे | ५४ |
| ,, डॉ. द. ना. गोखले | ५५ ते ५८ |
| ,, बॅ. पी. जी. पाटील | ५९ ते ६० |
| ,, प्रा. दि. मो. हातवळणे | ६१ ते ६३ |
| ,, वि. भा. वैद्य | ६४ ते ६५ |
| ,, प्रा. दा. सि. देसाई | ६६ ते ६८ |
| ,, ग. ना. जोशी | ६९ ते ७० |
| ,, वि. श्री. दामले | ७१ ते ७५ |
| ,, श्री. व्यं. भोसले | ७६ |
| ,, विलासराव पाटील | ७७ |

# कार्याध्यक्ष व कार्यवाह

## १९४० सालानंतरचे कार्याध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. दि. ह. पंडित | १९४१ ते ४२ |
| ,, द. वा. सरवटे | १९४३ |
| ,, ज. के. रानडे | १९४४ |
| ,, रा. अ कुंभोजकर | १९४५ |
| ,, स. वि. करंदीकर | १९४६ |
| ,, अ. कृ. कुलकर्णी | १९४७ |
| ,, मो. रा. वाळंबे | १९४७,५१,५२, ते ५५ |
| ,, शं. श्री. पंडित | १९४९ |
| ,, व. वि. अध्यापक | १९५० |
| ,, सि. दि. जोशी | १९५६ |
| ,, ग. वा. करंदीकर | १९५७ ते ५९ |
| ,, भा. वि. कुबेर | १९५८ |
| ,, रा. शं. दातार | १९६० ते ६१ |
| ,, बा. वि. भिडे | १९६२ |

## १९३२ पासूनचे कार्यवाह

| | |
|---|---|
| श्री. वा. कृ. चोळकर | १९३२ |
| ,, एम. आर. राजोपाध्ये | १९३२ |
| ,, रा द. पाटणकर | १९३३ ते ३५ |
| ,, बा. के. वाघ | १९३३ |
| ,, एस. के. सोहनी | १९३४ |
| ,, वा. नृ. गजेन्द्रगडकर | १९३५ ते ४२ |
| ,, ग. म. पुरोहित | १९३६ |
| ,, पां के. कोल्हटकर | १९३६ |
| ,, स. वि. करंदीकर | १९३७ ते ३८ |
| ,, का. म. देशपांडे | १९३७ |
| ,, व. द. पाटणकर | १९३८ |
| ,, ज. रा. राजोपाध्ये | १९३९ ते ४० |
| ,, मा. दि. कुलकर्णी | १९३९ |
| ,, कृ. दा. लिमये | १९४० |
| ,, दा अ. पंडित | १९४१ ते ४३ |
| ,, गो. ज. फणसळकर | १९४१ ते ४६,४७ |
| ,, श्री. रा. आचार्य | १९४३ ते ४४ |
| ,, वि. गं. आराध्ये | १९४४ |
| ,, अ. कृ. कुलकर्णी | १९४५ ते ४६ |
| ,, मो. रा. वाळंबे | १९४५ |
| ,, बा. वि. भिडे | १९४७ ते ५४,६६,६७ |
| ,, श्री. बा. आचार्य | १९४८ ते ५२, ५४,७८ |
| ,, श्री. म. मराठे | १९६१ ते ६३, ७०,७१,७८ |
| ,, वि. भा. वैद्य | १९५५ ते ५६,६८,६९ |
| ,, वि. ल. चाफेकर | १९५७ ते ६० |
| ,, अ. श्री. भडकमकर | १९६४ ते ६५ |
| ,, अ. बा. वाळिंबे | १९७२ ते ७८ |
| ,, चिं. रा. वेलणकर | १९७८ |

## आजीव सदस्य

श्री. अ. रा. गोडबोले
सौ. वासंती ठोसर
श्री. व्ही. के. कुलकर्णी
,, वा. ग. जोशी
,, भा. पां. शालगर
,, अ. खं. देशपांडे
डॉ. एच. एस. व्होरा
सौ. इंदिराबाई खाडिलकर
श्री. मु. चिं. कुलकर्णी
,, वाय. एन. जुवेकर
,, चिं. रा. वेलणकर
,, र. रा. कुलकर्णी
,, वि. ब. परदेशी
,, श्री. बा. आचार्य
,, वि. मु. दाबके
,, प्र. रा. अनगळ
,, कि. वि. गुजर
,, अशोक बा. वाळिंबे
,, अ. पु. लेले
,, मं. मु. सबनीस
,, वि. श्री. मराठे
,, सु. सु. उपाध्याय
,, रा. ना. गोडबोले
,, न. ग. देवी
,, ल. ना. भागवत
,, ह. रं. कुलकर्णी
,, एस्. पी. श्रीवास्तव

श्री. व. शं. नरगुंदे
,, चं. चिं. वेलणकर
,, छो. वा. दोशी
,, ज. मु. जोशी
,, क. अ. जोशी
सौ. इंदूमती प्र. हर्षे
श्री. भगवानदास गुजर
,, वा. ह. खाडिलकर
सौ. मीरा ब. हर्षे
श्री. प्र. वि. पवार
,, मा. गं. भागवत
,, मो. ना. तांबे
,, श्री. चिं. कुलकर्णी
,, वि. ल. चाफेकर
,, सोहोनी वि. सि.
,, गो. वि. अभ्यंकर
,, प्र. ह. देशमुख
,, श्री. ए. आगटे
,, चं. ना. तांबे
,, शि. ग. साळुंखे
,, म. गं. भागवत
,, प्रवीण म. जोशी.
,, प्र. चं. माजगावकर
,, मु. र. कोल्हटकर
, मा. द. देशपांडे
,, गं. गो. गोडबोले

## संस्था आजीव सदस्य

१. मा. प्राचार्य, धनजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा
२. मा. प्राचार्य, सायन्स कॉलेज, सातारा
३. मा. मुख्याध्यापक, महा. सयाजीराव विद्यालय, सातारा
४. मा. प्राचार्य, महात्मा फुले अध्यापक विद्यालय, सातारा
५. मा. प्राचार्य, ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा
६. मा. मुख्याध्यापिका, भीमाबाई आंबेडकर कन्याशाळा सातारा
७. मा. प्राचार्य, आझाद कॉलेज ऑफ एज्यु. सातारा
८. मा. मुख्याध्यापक, अप्पासाहेब कल्याणी विद्यालय, कॅप, सातारा
९. मा. प्राचार्य, छत्रपती शिवाजीमहाविद्यालय, सातारा.
१०. मा. प्राचार्य, जिजामाता अध्यापिका विद्यालय, सातारा.

## २५ वर्षांहून जास्त काळ सभासद

श्री. आचार्य श्री. बा.
,, भागवत एम. जी.
डॉ. खडके य. रा.
श्री. अभ्यंकर श्री. मा.
सौ. आगाशे सु. श्री.
डॉ. पटवर्धन म. ह.
श्री. किरपेकर गो. रा.
,, जोशी सि. दि.
,, वेलणकर चिं. रा.
,, चाफेकर वि. ल.
,, कुबेर भा. वि.
,, देशपांडे अ. खं.

श्री. वैद्य व्ही. बी.
,, भिडे भा. वा.
,, धुमाळ मा. मा.
,, टिळे स. वि.
सौ. साठे वि. व.
श्री. अवचट र. द.
,, मंत्री भा. द.
,, ठकार वि. का.
,, सोहनी वि. सि.
,, भागवत श्री. शं.
,, गोडबोले रा. ना.

# माजी कार्यकारिणीचे सभासद

श्री. वि. मो. भिडे
,, वि. ना. पाठक
,, वा. ग. चिरमुलें
,, ब. श्री. सहस्त्रबुद्धे
,, द. रा. चितळे
,, रा. रा. काळे
,, कृ. शं. दिक्षित
,, ना. चि. केळकर
,, ना. कृ. आगाशे
,, ग. हि. देवी
,, ल. ब. मुतालिक
,, कृ. नी. कडूसकर
,, ग. ब. फणसळकर
,, वि. ना. मुतालिक
,, सी. ग. देवधर
,, ब. रा. जोगळेकर
,, र. पां. करंदीकर
,, पां. ग. डोंगरे
,, श्री. ग. गाडगीळ
,, वि. ब. भिडे
,, ल. कृ. जोशी
,, बा. कृ. चोळकर
,, ल. मा. आपटे
,, बा. ग. घाणेकर
,, ना. वा. महाजनी
,, द. ना. फडणीस
,, श्री. वि. जोशी
,, नी. वा. घाणेकर
,, नाथ घाणेकर
,, शं. वि. भिडे
,, नी. वा. ओक

श्री. कृ. के. कोल्हटकर
,, ल. ग. मेहेंदळे
,, वा ना. मुतालिक
,, वा. कृ. तांबे
,, रा. र. पंडितराव
,, ना. कृ. दांडेकर
,, वा. ग. फडणीस
,, वा. ना. देशपांडे
,, वा. वा. गोवईकर
,, वि. ल. प्रभुणे
,, रा. गो. राजोपाध्ये
,, ह. रा. रहाळकर
,, वि. स. बखले
,, कृ. ग. जोशी
,, स. बा. गाडगीळ
,, शं. रा. हातवळणे
,, गं. गो. नेने
,, गो. रा. गुजर
,, ना. ग. गाडगीळ
,, ग. रा. पै
,, ग. पां. आपटे
,, ना. पां. आपटे
,, कृ. पां. लिमये
,, कृ. पां. कुलकर्णी
,, रंगाचार्य रड्डी
,, नृ. बा. गजेंद्रगडकर
,, के. बा. गजेंद्रगडकर
,, ब. ना. कोल्हटकर
,, गो. वि. तुळपुळे
,, वि. ना. कुंभार
,, श्री. रा. पारसनीस

श्री. रा. ना. गोडबोले
,, अ. रा. कुलकर्णी
,, वा. नृ. गजेंद्रगडकर
,, श्री. सी. नाफड
,, अ. कृ. कुलकर्णी
,, वा. वा. आगाशे
,, शं. श्री. पंडित
,, व. वि. अध्यापक
,, य. बं. कुलकर्णी
,, श. शं. गोखले
,, ह. ल. एकबोटे
,, शं. द. श्रोत्री
,, वि. त्रि. भट
,, रा. सं. बारवडे
सौ. आशाताई देशपांडे
श्री. दा. अ. पंडित
,, भा. वा. डांगे
प्रा. द. ता. भोसले
श्री. अ. अ. देशपांडे
,, न. ल. गाडगीळ
,, ह. ग. इनामदार
,, सि. दी. जोशी

श्री. रा. ग. कुंभोजकर
,, वि. रा. दातार
,, वि. सी. सोनी
,, मो. रा. वाळंबे
,, अ. धो. बागवान
,, ग. गं. एरंडे
,, धों. ग. दाते
,, श्री. मा. अभ्यंकर
,, ह. रा. कुलकर्णी
,, म. अ. चावरे
,, भा. वि. कुबेर
,, द. कृ. आपटे
,, ग. वा. करंदीकर
,, र. वि. देशपांडे
,, अ. श्री. भडकमकर
,, वि. म. पंडित
प्रा. सं. सा. भोसले
सौ. मीराबाई हर्षे
श्री. ज. म. बापट
,, दि. मो. हातवळणे
सौ. उषा कोल्हटकर

# देवचि ते मज वास्तव



कवि यशवंत

( जाति : दासी )

आहे मी बळशाली, मी कर्तबगार, धीट
क्रमितों ह्या विश्वासे बेगुमान वाट नीट
परि येती काही क्षण – मधमाशा घोंगावत
गमते तै ढळते की पायाखालील वीट

गांगरुनी मन जाते आणि पाय लटपटती
स्पष्ट होय मिटलेली माझी ही मूठ रिती
मी न धीट बळशाली, मी दुबळा भीरू किती
निकराचे ते क्षण मज जाणवून हे देती

भिरभिरती नेत्र तदा माझे मृगशावकसे
शोधाया काहि कुठे आडोसा का गवसे
भेवडावणारे क्षण तेच मला चालविती
पोचविती त्या ठायीं जेथ उभे धीरमती

धीरमती ते न कुणीं वज्रकाय मूर्तिमंत
ग्रंथचि ते ज्यांत उभे सिद्धहस्त सुकवि संत

× × × ×

होनांनी भरलेले रांजण हे हाताशीं
मायेने गोंजारूनि घेणारे पोटाशी
हतबलास नेणारे धरुनी हे बोटांशी
धीरांची सोबत हे करणारे पाठीशी

कोणी न ह्या श्रेष्ठींच्या दाराशी चपराशी
दाम-दंड लागतो न भिडवाया अर्जाशी
केव्हाही कोणाचे कसलेही गाऱ्हाणे
ऐकुनि हे श्रेष्ठ घेति सादर कनवाळुपणे

गरगरतो पूर अनुल्लंघ्य पुढें यमुनेचा ?
तो दुभंग होईल हो ज्यांची श्रवताच ऋचा
घाली थैमान सिंधु, ज्यांचा ऐकून बोल–
ऋजुतेने पोचवील मिरवित सुखरूप पैल

ते द्रष्टे, ते प्रतिभावंत कवी, संत थोर
वाङ्मोहन रूपाने जागृत हे मजसमोर

× × × ×

क्षेत्रीं वा राउळांत का श्रमणें देवास्तव
ह्या गाथा, ग्रंथराज, देवचि हे मजवास्तव.

# संकल्पित वास्तू

—महेंद्र चव्हाण
आर्कीटेक्ट

सध्याचे जे वाचनालय आहे, त्या जागेचा विस्तार करून दोन वेगवेगळ्या ऑफिसेस्‌साठी जागेची सोय केलेली आहे. वाचनालयाचे प्रवेशद्वार हे आकर्षक व विलोभनीय बनवलेले आहे. प्रसाधनगृहांची सोय निरनिराळी केली आहे. त्याचा पुरुष व स्त्री वर्गाला सोईस्कर फायदा मिळू शकेल. सांस्कृतिक हॉलकडे जाणारे, मिटींग हॉल, बालविभाग, भगिनी विभाग व वाचनालयात जाणारे लोक, यांच्या प्रवेशासाठी अडचण निर्माण होऊ नये याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले गेले आहे.

पहिल्या मजल्यावर जो मीटींग हॉल आहे त्या हॉलचा विस्तार हा पहील्या हॉलपेक्षा जास्त प्रमाणात आहे, शिवाय ह्या हॉल मध्ये एकदम बऱ्याच लोकांना प्रवेश करता येईल अशा दृष्टीकोनातून सोईस्कर वाट ठेवली आहे. समाप्ती नंतर लोकांना बाहेर जाण्यासाठी दुसरा मार्ग केला गेला आहे. त्याच प्रमाणे हॉलमध्ये प्रवेशासाठी असलेली जी वाट आहे त्या वाटेने लोक आले तर बसलेल्या आतील लोकांना अडथळा होणार नाही, यासाठी प्रवेश गॅलरी खास बनवली गेली आहे.

या हॉलची रचना संपूर्ण चौकोनाच्या कर्णावर रचीत केली आहे. त्यामुळे त्या हॉलमध्ये लोकांची बसण्याची क्षमता जास्त आहे. हॉलमध्ये असणाऱ्या स्टेजवर कार्यक्रमाच्या वेळी येणाऱ्या प्रमुख पाहुण्यांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार आहे. त्यांना प्रेक्षकांच्या रांगेतून वाट काढत यावे लागणार नाही. शिवाय ह्या हॉलमध्ये बैठकीच्या व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून बाल्कनीची बांधणी केली आहे. त्याची क्षमता २५० ते २७० पर्यंत आहे. अशा प्रकारे एकंदर त्या हॉलमध्ये १००० लोकांची उंचावर बसण्याची सोय होऊ शकते.

पहिल्या मजल्यावर हॉलसाठीं प्रसाधनगृहांची सोय पुरुष व स्त्री वर्गाला स्वतंत्र योजली आहे. ह्या हॉलसाठी खास 'आवाज घुमू नये' ह्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले गेले आहे. ह्याच मजल्यावर लहान मुलांच्या वाचनासाठी बालविभाग व महिलांच्या वाचनासाठी स्वतंत्र भगिनी विभागाची सोय केली आहे.

दुसऱ्या मजल्यावर ज्या ठिकाणी सांस्कृतीक हॉलची, बाल्कनी येते त्याच्या समांतर अंतरावर एक मोठा मिटींग हॉल व ऑफिसची सोय ठेवली आहे. हॉलला जाण्यासाठी जो जिना वापरला आहे तो गोलाकार असून संपूर्ण काचेचा आहे त्याचा उपयोग सांस्कृतीक हॉलच्या प्रवेश लॉबीमधे उजेड येण्यासाठी होतो. दुसऱ्या शब्दात जिन्याचाच खिडकी म्हणून वापर केला आहे.

इमारतीच्या पश्चिमेकडील बाजूला कोठेही खिडकी नाही. हेच या वाचनालयाच्या इमारतीचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

पश्चिमेकडे जी खिडकी नसलेला भाग आहे तो भाग वर उचलून त्याच्या आतून रस्ता ठेवला आहे.

अशा सुखसोयींनी युक्त अशी वास्तु तयार झालेवर सर्वांना खचितच आल्हाददायक ठरेल याची मला खात्री वाटते.

# आमचे आर्किटेक्ट

श्री. चं. ना. तांबे.

एका सुप्रभाती फोन वाजला आणि पलीकडून आवाज आला, हॅलो, मी आर्किटेक्ट चव्हाण बोलतोय.

मला वाटले, प्रसिद्ध आर्किटेक्ट शशीकांत चव्हाण आहेत म्हणून मी त्याना नगर वाचनालयाचे इमारती संबंधी सर्व माहिती दिली.

फोन बंद करण्यापूर्वी ते म्हणाले, आता आपणास वेळ असेल तर मी येऊ कां ? मी म्हटले या जरूर या आणि फोन बंद झाला. थोड्या वेळाने एक पोरसवदा व्यक्ती नमस्कार करून अदबीने माझेपुढे उभी.

मी विचारले, काय पाहिजे ?

" अहो मी आर्किटेक्ट महेंद्र चव्हाण ...... "

मी आश्चर्याने पाहातच राहिलो, कारण वय अगदी लहान, साधारण नीटस पोशाख आणि विशेष म्हणजे अगदी आपुलकीचे अदबीने बोलणे आणि वक्तशीर काम.

मी सहजच माहिती म्हणून विचारले, तेव्हा समजले, केवळ चोविस वयाचे हे आर्किटेक्ट पुण्याच्या अभिनव कला महाविद्यालयाचे विद्यार्थी होत. त्यांची शालेय आणि महाविद्यालयीन करीअर एक हुशार व आदर्श विद्यार्थी म्हणूनच वाखाणली गेली आहे. इतकेच काय पण महाविद्यालयांत असताना वॉटरटँक विषयीच्या अखिल भारतीय स्पर्धेत श्री. चव्हाण यांनी पहिले पारितोषीक मिळविले आहे.

आपल्या नगर वाचनालयाचे काम स्विकारतांना त्यांनी मनाशी अशी खूणगाठ बांधली आहे एक मॉडेल म्हणून या वास्तूकडे लोकांनी पहावे.

असे आहेत आमचे आर्किटेक्ट श्री. महेंद्र चव्हाण.



श्री महेंद्र चव्हाण
आर्किटेक्ट आणि इंटीरीअर डिझाईनर.
सातारा.

# नगर वाचनालय सातारा १२५ वर्षांची वाटचाल

— श्री. वा. आचार्य.

' परमेश्वराने निसर्ग निर्माण केला खरा पण मानवाने गावे वसविली ' या आंग्लोक्तीप्रमाणे चोहोंबाजूनी गिरी मंडळाने वेढलेल्या या पहाडी साताऱ्यास सौन्दर्य व संस्कृती याचें बीजारोपण प्रथम कोणी केले असेल तर ते कै. प्रतापसिंह महाराजांनीच. आज या इतिहासप्रसिद्ध स्थळी वावरताना लहानमोठ्या बऱ्याच इमारतीचा उगम याच राज्याच्या कारकिर्दीत झाला. जुना राजवाडा, महारदऱ्याचा तलाव, नळ टाकून केलेली पाण्याची सोय, जुने जलमंदिर, ( हल्लीची नगरपरिषद इमारत ), यवतेश्वर, मंगलाई व सज्जनगडावरील रामदास स्वामी वगैरेंनी अजिंक्यताऱ्यावर उतरणीवर वसलेल्या या नगरच्या सौंदर्यात व भव्यतेत जशी भर टाकली तशीच मराठी, इंग्रजी, संस्कृत, वैदिक ज्योतिष, मुद्रण व व्यायाम इत्यादि विद्या व कलांना प्रोत्साह देणाऱ्या संस्था स्थापून त्याना राजवाड्याच्या परिसरात इमारती देऊन जनतेच्या बौद्धिक प्रगतीकडे विशेष लक्ष दिले. या बौद्धिक प्रवृत्तीला हातभार लावण्याच्या त्यांच्या भावनेतच आपल्या वाचनालयाचा जन्म झाला आहे.

प्रारंभीची दीडएक तपाची प्रतापसिंहाची कारकीर्द शांततेची व भरभराटीची झाली पण ' जनपद हितकर्ता राज्यते पार्थिवेन ' या न्यायाने हा स्वाभिमानी, कर्तव्यदक्ष, कर्तबगार राजा त्यावेळच्या राज्यकर्त्यांना सलू लागला. पोर्तुगाल सरकारची मदत घेऊन इंग्रजांविरुद्ध कट केल्याचा आरोप ठेवून १५ सप्टेंबर १८३९ रोजी प्रतापसिंहांना पदच्युत करण्यात आले व ' त्यांचें बंधू शहाजी उर्फ आप्पासाहेब यांना गादीवर बसविण्यात येऊन त्यांचे नावाने राज्यकारभार सुरू झाला (आप्पासाहेबानी जवळजवळ नऊ वर्षे राज्यकारभार) केला. त्यानीही आपल्या कारकीर्दीत नवा राजवाडा, सिव्हिल हॉस्पिटल, नवे जलमंदिर, अनेक रस्ते अशा सार्वजनिक हिताच्या बऱ्याच गोष्टी केल्या. १८४८ साली अप्पासाहेब वारले व त्यानंतर इंग्रजानी साताराचे राज्य खालसा केले.

**नगर वाचनालयाचा उगम :**

या दोन दुर्दैवी भावांच्या कारकीर्दीत साताऱ्यात ज्या अनेक लोकोपयोगी संस्था जन्मास आल्या व वाढीस लागल्या त्यातच आपली ' नगर वाचनालय ' ही एक संस्था होय. प्रतापसिंहांनी अनेक विद्या व कला याना प्रोत्साहन दिल्याचे वर आलेच आहे. ग्रंथसंचनाचा त्यांना छंद होता. त्यांनी स्वतःचे म्हणून एक ग्रंथालय सुरू केले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांनी त्याची जोपासना केली. या ग्रंथालयात देशोविदेशी वर्तमानपत्रे येत. मात्र आरंभी या संग्रहाचा लाभ काही थोड्या व्यक्तींनाच मिळे. श्रीमंत आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांनी हे खाजगी वाचनालय लोकोपयोगासाठी म्हणून ते ज्या जागेत होते त्या जागेसह जनतेच्या स्वाधीन केले असा स्पष्ट उल्लेख गॅझेटिअरमध्ये आहे. " This library own's a nice building which was given to it by the widowers of Shahaji, the Last Raja of Satara. " एका राजवाड्यातील ग्रंथसंग्रह जनतेच्या स्वाधीन ज्या दिवशी झाला तोच दिवस म्हणजे आपल्या वाचनालयाचा जन्म दिवस म्हणून मानावयास हरकत नाही. निश्चित तारीख जरी अद्याप उपलब्ध नसली तरी श्री. हातवळणे यांच्या " सातारा शहराचे वर्णन " या पुस्तकात आपल्या वाचनालयाबद्दल जो स्पष्ट उल्लेख आहे त्यावरून निदान इ. स. १८५३ पासून हे ग्रंथालय जनतेकरिता खुले करण्यांत आले. व त्याचा उल्लेख ' वाचनालय ' म्हणून स्पष्टपणे करण्यात आला. श्री. हातवळणे लिहितात —

" ही लायब्ररी १८५३ चे सुमारास स्थापन झाली. त्यावेळेस लष्करात एक लायब्ररी स्थापन करण्यात आली होती. ज्या सदगृहस्थांनी लायब्ररी स्थापन केली त्यापैकी माजी कमिशनर आजिलबीसाहेब हे प्रमुख होते. या कामी रावबहादूर विष्णू मोरेश्वर भिडे यांनी फारच खटपट केली. हल्लीची लायब्ररीची जागा नगारखान्याकरिता बांधलेली होती. जोपर्यंत प्रस्तुतच्या इमारतीत लायब्ररी आहे तोपर्यंत ती जागा तिची आहे. ही इमारत एक मजली असून चव्हाटयावर आहे. "

आमचे हे वाचनालय इ. स. १८५३ साली अस्तित्वात होते या बद्दलचा दुसरा बळकट पुरावा आपणास मिळतो. Bombay Gazetteer Deccan–Satara या ग्रंथातील ११ व्या प्रकरणात ( पृष्ठे ४१४–४१५ वर ) साताऱ्यातील वाचनालयावर एक स्फुट आहे. त्यात असे म्हटले आहे. " या जिल्ह्यात दोन ग्रंथालये व ६ वाचनालये आहेत. ही दोन ग्रंथालये सातारा व महाबळेश्वर येथे असून वाचनालय आहे. कराड, मालकम पेठ, तासगांव, विटे, व वाई या सहा ठिकाणी आहेत. खुद्द १८५२ साली सातारा शहरात दोन ग्रंथालयें असून त्यातील एकाचे नाव "सातारा सिटी लायब्ररी" व दुसऱ्याचे ' स्टेशन लायब्ररी ' असे आहे "

" स्टेशन लायब्ररीचा " अर्थ सातारा स्टेशनवरील वाचनालय असा असावा. त्यावेळच्या रेसिडेंटचे शहराबाहेर जिथे त्याचें वास्तव्य असे त्या भागाला ' स्टेशन ' म्हणत ! पुढे यालाच कँप असे म्हणू लागले. फेब्रु. १८६६ मध्ये या दोन्हीही ग्रंथालयाचें एकत्रीकरण करण्यात येऊन त्याला सातारा सिटी जनरल लायब्ररी ( Satara City General Library ) असे नामाभिदान प्राप्त झाले. १८६६ पूर्वी याच वाचनालयास ( Native General Library ) ' नेटिव जनरल लायब्ररी' असे नाव होते. "

गॅझटियरमध्ये आणखी एके ठिकाणी असा उल्लेख आढळतो– " The Liabrary is at the South–East Corner of Bhavani Square. "

आज नगर वाचनालयाची इमारत ज्या ठिकाणी आहे त्याच ठिकाणी स्वतःच्या मालकीची अशी पहिली वास्तु होय. मात्र

खाली वाचनालय व वर व्याख्यानहॉल ही सातान्यातील लायब्ररीची योजना इतर असंख्य वाचनालयांना आदर्शभूत आहे. संस्था शताधिक वर्षांची आहे. ज्ञानसंवर्धन करणारी ही पवित्र संस्था गंगेप्रमाणे नित्य आदरणीय स्थितीत कार्य करीत राहो.

४ मे १९५९ — रा. चिं. श्रीखंडे

सध्याच्या वास्तुपैकी दक्षिणेच्या व पश्चिमेच्या भागात ही इमारत बैठी व बंगलेवजा अशी होती असे दिसते. त्याच वास्तूत थोडे फेरफार करून गुजराण करण्यात आली. प्रारंभी इमारतीला दोन दालने होती. उत्तरेकडील दालनापुढे पश्चिमाभिमुख असे छोटेसे पोर्च होते; व त्या दालनापुढे छोटी बाग होती. दक्षिणेकडील दालनाला दक्षिणाभिमुखी प्रवेशद्वार होते.

बडोद्याचे श्री. गोविंद बाबाजी जोशी नावाचे ' सरकारी, भाषण करणारे " असा उल्लेख असणारे एक गृहस्थ दक्षिणेस प्रवास करीत आले होते, त्यानी ' माझे प्रवासाची हकिगत ' या नावाचा एक ग्रंथ १८९६ साली प्रसिद्ध केला. त्यात त्यानी आपल्या प्रवासाच्या रोजनिशीतून त्यापूर्वीच्या तीस वर्षापूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती याचे वर्णन केले आहे.

दि. १० ऑक्टोबर १८७० साली सातान्यास त्यांचा मुक्काम होता. त्यावेळच्या त्यांच्या रोजनिशीत येथील नगर वाचनालयाला उद्देशून त्यानी एक परिच्छेद लिहिला आहे. त्यात ते म्हणतात :–

"सातारा येथे पाहण्यासारखी ठिकाणे येथील राजवाडा, लायब्ररी, जलमंदिर इत्यादि होत. मी लायब्ररीत गेलो होतो. तेथील लायब्ररी जशी चांगले स्थितीत आहे तशी मुंबई खेरीज करून दुसरे ठिकाणी क्वचितच असेल. येथे सामान इतके पोक्त आहे की, ज्याची जशी मर्जी असेल तशी बसण्याची सोय, खुर्ची, कोच, बांक शिवाय अलीकडील दालनात मराठीशाहीप्रमाणे गाद्या तक्के इत्यादि वाचण्याचे ठिकाणी असून मध्यभागी टेबल, भोवताली बांके, त्या पलीकडे कोच आणि त्या पलिकडे भिंतीस काचेची कपाटे, दर भिंतीस दोनप्रमाणे, त्यात नाना तऱ्हेचा पुस्तके नीट ठेवलेली आहेत. लायब्ररीचे घराभोंवताली लहानसा बाग अशी शोभा आहे. इतका दरमहा खर्च कसा चालतो याचा शोध करणे राहिला. या लायब्ररीचा ऑनररी सेक्रेटरी तेथील सिव्हिल डॉक्टर आहे. लायब्ररीस होमन्यूज, लंडन टाईम्स, शिवाय टाईम्स इत्यादि इंग्रजी व मराठीही वर्तमान पत्रें मुख्य मुख्य अशा येतात"

वाचनालयाबद्दल गॅझेटियरमध्ये पुढील उल्लेख आढळतो :

" In 1882–1883 the number of subscribers was 107 and subscriptions amounted to about 88 ( Rs. 880 ). At present ( 1883 ) the Library has 1761 English, Marathi and Sanskrit books, including the two English dailies of Bombay. The Library takes eighteen English and twelve Marathi papers and pamphlets.

वाचनालयाची ही परिस्थिती इ. स. १९०५ पर्यंत अशीच होती. त्यानंतर वाचनालयाचे पुन्हा नामांतर झाले.

### व्हिक्टोरिया लायब्ररी :

१९०१ साली व्हिक्टोरिया राणीच्या निधनानंतर तिचे एखादे भव्य व सुंदर स्मारक कलकत्त्यास करावे असा विचार ठरला व त्याप्रमाणे सर्व प्रांतातून व जिल्ह्यांतून फंड जमविण्यास सुरवात झाली. तीच लाट सातान्यास येऊन पोचली. शनिवार दि. २८ सप्टेंबर १९०१ रोजी सायंकाळी ५॥ वाजतां म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यात शहरवासी लोकांची सभा भरली होती. अध्यक्षस्थान मि. जे. डी. सी. एटकिन्स कलेक्टर जिल्हा सातारा ह्यांनी स्वीकारले होते. त्यावेळी महाराणी व्हिक्टोरिया यांचे स्मरण चिरकाल राहण्याकरिता सातारा शहरात त्यांच्या नावाने एक स्मारक करावे व त्या स्मारकाकरिता वर्गणीने जी रक्कम वसूल होईल ती ' सातारा सिटी जनरल लायब्ररी ' ची इमारत योग्यरीतीने दुरुस्त करण्याच्या कामाला लावावी व त्या इमारतीला या पुढे " सातारा व्हिक्टोरिया लायब्ररी " हे नाव द्यावे असे ठरले. त्याप्रमाणे २२०० रुपयाचा फंड जमा करण्यात आला. त्यातील दोनशे रुपये कलकत्त्याच्या फंडाकडे पाठवून दोन हजार रुपयांचा विनियोग वाचनालयाकडे करण्याचे ठरले, पण इमारतीस चार हजार रुपये खर्च येणार असा अंदाज करण्यात आला. व तळमजल्याची इमारत वाचनालयासाठी बांधण्याचे ठरले.

### श्री. जे. आर. आर्थर हॉल :

सभा, संमेलने, चर्चा वगैरेसाठी एक सार्वजनिक हॉल आपल्या शहरी असावा अशी कितीतरी दिवसांची जनतेची इच्छा होती. या तिच्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याच्या दृष्टीने हा काल थोडा अनुकूल ठरला. सातान्यास जे अनेक युरोपिअन अधिकारी येऊन गेले त्यांत श्री. जे. आर. आर्थर हे विशेष लोकप्रिय ठरले. ते १८६५ ते १८७६ पर्यंत कलेक्टर हुद्यावर होते. त्याच्या निवृत्तीनंतर त्यांचे एखादे स्मारक करावे या हेतूने अनेक संस्थानिक व त्यांच्या हितचिंतकांनी ४००० रुपयांचा फंड जमा केला व राजवाड्यापुढील मोकळ्या पटांगणांत त्यांचे एकादे स्मारक करण्याचे ठरले. पण त्यावेळच्या राणीने त्यांस हरकत घेतली म्हणून ती कल्पना तशीच पडून राहिली. त्यानंतर वाचनालयाच्या दुसऱ्या मजल्यावर एक प्रशस्त सभागृह बांधण्याचे कल्पना निघून सन १८७६ च्या सुमारास श्री. जे. आर. आर्थर यांच्या नावे जमविलेला ४००० रुपयाचा फंड जो तसाच पडून राहिला होता तो मिळवावा व सदर सभागृहास "श्री. जे. आर. आर्थर हॉल" असे संबोधण्यात यावे असे ठरले. सदर फंडाचे त्यावेळी हात असलेले एक विश्वस्त श्रीमंत मुधोजी नाईक निंबाळकर फलटणकर यांच्या सौजन्याने ते पैसे मिळू शकले. हे चार हजार रुपये व वाचनालयाचे जवळ असलेले चार हजार रुपये असे आठ हजार रुपये खर्चून हल्लीची टुमदार दुमजली इमारत बांधण्यात

आली. या इमारतीच्या तळमजल्यात असलेल्या "सातारा सिटी जनरल लायब्ररीचे" नामांतर "व्हिक्टोरिया लायब्ररी" मध्ये करण्यात आले. वरच्या सभागृहाला "आर्थर हॉल" असे नाव देण्यात आले.

या इमारतीचे उद्घाटन दि. ७ ऑगस्ट १९०५ साली करण्यात आले. ही इमारत बांधली जात असता हे वाचनालय तात्पुरते जुन्या राजवाड्याच्या इमारतीमध्ये जेथे रेशनिंग ऑफिस होते त्या भागाच्या तळमजल्यात असलेल्या म्युनिसिपल मराठी शाळेच्या जागेत नेण्यात आले होते. "आर्थर हॉलचे" उद्घाटन करण्याचे वेळी श्री. जे. आर. आर्थर यांचे चिरंजीव श्री. एस. आर. आर्थर हे साताऱ्याचे कलेक्टर होते. त्यांच्याच प्रोत्साहनाने पूर्वीचे अपूर्ण राहिलेली स्मारकाची कल्पना पुरी करण्यात आली. राजवाड्यासमोर पटागणांवरील इंबल्याशा बागेत एका सुंदर कारंज्याची स्थापना करून 'आर्थर जलछत्र' या नावाने ते स्मारक १९०६ साली पुरे करण्यात आले. या छोट्याशा बागेला 'आर्थर बाग' असे म्हणत—अलीकडे त्याचे नामांतर होऊन त्यास 'जवाहर बाग' असं लोक संबोधू लागले आहेत.

**पाठक हॉल :**

आर्थर हॉलचा उपयोग सर्व प्रकारच्या सभा व व्याख्याने यासाठीं करावयाचा असे ठरले होते. त्याप्रमाणे एक तपभर तसे कार्य चालू होते. सन १९१९–२० च्या सुमारास राजकीय वातावरण बदलले त्याचे पडसात त्या वेळच्या सभा संमेलनातून उमटू लागले. श्री. जे. आर. आर्थर यांचे चिरंजीव श्री. एस. आर. आर्थर हे यावेळी अबकारी कमिशनर या हुद्यावर होते. आपल्या वडिलांचे स्मारक गृहात इंग्रत राजवटीच्या विरोधी चर्चा चालावी हे त्याना रुचले नाही व सदर हॉलचे नाव बदलण्याची सूचना त्यानी त्या हॉलची व्यवस्था पहाण्यासाठी नेमलेल्या आर्थर हॉल समितीला केली. याच सुमारास सार्वजनिक कार्यात विशेष कळकळीने लक्ष घालणारे रा. ब. वि. ना. पाठक हे नुकतेच वारले होते. त्यांचे नाव सदर सभागृहास देण्याचे ठरवून 'आर्थर हॉलचे' नामांतर "पाठक हॉल"मध्ये झाले. या स्मारकासाठी कै. पाठकांच्या वारसांनी दिलेल्या या २०० रुपयातून सदर सभागृहास फरशी, लाकडी छत दुसरा जिना, बैठकीसाठी खुर्च्या वगैरे सुधारणा करण्यात येऊन ते सभागृह अद्ययावत करण्यात आले. 'पाठक हॉल'ची व्यवस्था सुरुवातीला एका वेगळ्या समिती कडे असे. सदर हॉलची मालकी वाचनालयाचीच असल्यामुळे वेगळी नेमलेल्या समितीने आपली समिती बरखास्त करण्याचा निर्णय घेतला व १९४५ साली हॉलची व्यवस्था नगर वाचनालयाकडे आली.

**पुन्हा नामांतर 'नगर वाचनालय' :**

या वाचनालयाचे नाव १९३८ सालापर्यंत 'व्हिक्टोरिया लायब्ररी' असेच होते. १९३७ साली कॉंग्रेसने अधिकारग्रहण केल्यानंतर देशभर वेगळेच चैतन्य नांदू लागले. त्याचा परिणाम वाचनालयाचे नावावर होऊन १९३८ पासून "व्हिक्टोरिया लायब्ररी" "नगर वाचनालय" या नावाने आपले वाचनालय ओळखले जाऊ लागले.

> वाचनालयाचा लाभ सर्वांना घेता यावा या उद्देशाने करण्यात आलेल्या योजना महत्त्वाच्या आहेत. इतकी जुनी संस्था, इतकी वर्षे चांगली चालली हे सद्भाग्य. पुढील काळात तर तिचे महत्त्व वाढेलच.
>
> ६–१२–५९ — शि. ल. करंदीकर

**मध्यंतरीच्या घडामोडी :**

१) वाचनालयाच्या पूर्वेस दक्षिणामुख असलेले वाचनालयाचे मालकीचे एक दुकान मोडकळीस आले होते. ८०० रुपये खर्च करून ते फिरून बांधण्यात आले.

२) वाचनालयातील दोन प्रशस्त दालने अपुरी पडू लागल्याने वाचनालयाच्या पूर्वेस असलेली श्री. ह. श्री. महाजनी यांचे मालकीची जागा विकत घेऊन या दोन्ही दालनाला पूर्वाभिमुख अशी दोन दारे पाडण्यात आली व पलीकडील मोकळी जागा बंदिस्त करण्यात येऊन वाचकांना उघड्यावर बसून वाचनाची सोय करण्यात आली.

३) वाचनालयाचे नियमाचे पुस्तक इंग्रजीत असे. ते नियम बदलून व त्यात योग्य दुरुस्त करून १९४५ साली मराठी नियम अमलात आणले.

४) वाचनालयाने व्याख्यानमालेच्या रुपाने प्रथम एक वार्षिक ज्ञान सत्र सुरू केले होते पण जनतेच्या सोईच्या दृष्टीने व विद्वान व उत्तम वक्ते मिळण्याचे दृष्टीने त्या पद्धतीत बदल करून सतत वर्षभर मधून मधून निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत व्याख्याने चालू करण्यात आली. अद्यापही असा उपक्रम चालू आहे.

५) सार्वजनिक कार्य करण्यासाठी हौस असणारे होतकरू तरुण वाचनालयाच्या निवडणुकीत भाग घेऊ लागल्याने तेथे एक प्रकारचे चैतन्य नांदू लागले. दरसाल वार्षिक साधारण सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, व कार्यकारी मंडळापैकी चार सभासद यांची निवडणूक होते.

**जिल्हा वाचनालयात रुपांतर :**

मुंबई सरकारचे भूतपूर्व पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर यांच्या प्रेरणेने ग्रंथालय चळवळ सुरू झाली. १९३९ साली मुंबई सरकारने एक ग्रंथालय विकास समिती नेमली होती. तिच्या काही सूचना जरी त्याच वेळी मान्य झाल्या असल्या तरी त्यांची प्रत्यक्षात अमल बजावणी होण्यास १९४७ साल उजाडले. या योजनेमुळे प्रांतभर ग्रंथालयाचे एक जाळे विणण्यात येऊन त्या त्या वाचनालयाला अनुदान रुपाने मिळणाऱ्या सरकारी मदतीमुळे त्यांच्या परिस्थितीत सुस्थिरता येण्यास मदत झाली. सरकारी योजनेप्रमाणे जिल्हा वाचनालयास ४००० रु. व तालुका वाचनालयास ४५० रुपये अनुदान मिळवायचे ते सशर्त होते. त्यात प्रमुख अशा अटी होत्या की अनुदान

ज्ञानसाधना साधणेसाठी सामान्य नागरिकाच्या जीवनात वाचनालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. शहराच्या मानाने येथील वाचनालयाची कामगिरी भरीवच म्हणावी लागेल. ज्ञानवृद्धी समावेत या वाचनालयाच्या वृद्धींत सार्‍यांचा हातभार लागावा हीच उत्कट इच्छा

२६–६–६४ **उत्तमराव ल. पाटील**

मिळणाऱ्या वाचनालयाने सरकारी अनुदानाइतकीच रक्कम वर्गणी व देणगी रुपाने दरसाल जमा केली पाहिजे. सर्व दर्जाच्या व्यक्तींना ग्रंथ व वर्तमानपत्रे वाचनालयात बसून वाचण्यास मोफत दिले पाहिजेत.

आपल्या नगर वाचनालयाचे रूपांतर जिल्हा वाचनालयात करण्यासाठी मुंबई सरकारचे त्यावेळचे क्युरेटर ऑफ लायबरीज श्री. कर्वे येथे आले व त्यानी वाचनालयाची व्यवस्था पाहिली आणि लगेच सन १९४९ मध्ये या वाचनालयास "जिल्हा वाचनालय" म्हणून मान्यता दिली. इतकेच नव्हे तर सातारा हे लहान शहर असून येथील वाचकांची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन वाचनालयाच्या त्यावेळच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करून क्युरेटर यानी हा वर्ग अजिबात बंद होईल व ग्रंथवाचन वाचनालयातच करण्याइतको सवड असलेला वाचकवर्ग केवळ मुक्तद्वार विभागाचा फायदा घेईल, यामुळे असा वाचकवर्ग वगळून उरणाऱ्या तीनसाडेतीनशे सभासदांकडून सरकारी अनुदानाइतकी रक्कम म्हणजे ४००० रुपये जमा होणार नाही तेव्हा वाचनालयाने दरसाल किमान २५०० रुपये इतकी रक्कम वर्गणी रूपाने जमवावी व सरकारने अनुदान रुपाने रुपये ४००० द्यावेत ही कार्यकारी मंडळाची सूचना मान्य केली. तेव्हापासून आमच्या वाचनालयास मुक्तद्वार जिल्हा वाचनालय म्हणून मान्यता देण्यात आली. दि. १ जानेवारीं १९४८ पासून आपल्या नगरवाचनालयाचे रूपांतर जिल्हा वाचनालयात झाल्याचे जाहीर करण्यात आले.

### सरकारी योजनेचा वाचनालयावरील परिणाम :

हे वाचनालय मुक्तद्वार होताच पाचव्या वर्गातील बहुसंख्य वाचकांनी सरकारी योजनेप्रमाणे आपणास जर मोफत वाचावयास मिळणार आहे तर उगाच चार आणे तरी वर्गणी का भरा? असा विचार करून वर्गणीदारांच्या यादीतून आपली नावे कमी केली. वाचनालय मुक्तद्वार होताच मोफत वाचकांची गर्दी अतोनात वाढली. त्यानंतर व्यवस्थेच्या सोईसाठी "वर्गणीदार विभाग" व "मुक्तद्वार विभाग" असे दोन वेगळे विभाग दोन दालनात करण्यात आले. या व्यवस्थेमुळे काही दैनिकांचे दोन दोन अंक विकत घ्यावे लागले. वाचनालयात बसून मोफत ग्रंथ वाचन करण्यासाठी व या विभागावर देखरेख ठेवण्यासाठी नोकरवर्गात वाढ करावी लागली. वाचनालयात येणाऱ्या लोकांची संख्या वाढताच वाचनालयाची जागा अपुरी पडू लागली, त्यामुळे पूर्वेकडील मोकळी जागा बंदिस्त करून इमारत वाढविण्याचा विचार चालू झाला. येथील वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँण्ड एक्झिक्यूटर कंपनीकडून ४ टक्के दराने ३५०० रुपयाचे कर्ज काढून मोकळया जागेवर ५८ फूट लांब व १८ फूट रुंदीचा मोठा हॉल बांधण्यात आला. विजेच्या दिव्यांची सोय करण्यात आली. इमारत वाढीमुळे नवे फर्निचर विकत घ्यावे लागले. याचा एकंदर खर्च ६२०० रुपये आला. वाचनालयाने तोही खर्च सोसला. या इमारतीचे उद्घाटन १५ सप्टेंबर १९५० रोजी त्यावेळचे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राजकवि यशवंत यांच्या हस्ते करण्यात आले. इतके करूनही वाचक मात्र सरकारी योजनेचा गैरफायदा घेऊ लागले व वर्गणीदारात बरीच घट आली. अशा परिस्थितीत सरकारी अटीप्रकारे २५०० रुपये कसे जमतात याची चालकांना विवंचना पडली. तरीपण ही योजना एक वर्षभर राबवून पाहाण्याचा चालकांनी निर्धार केला. वर्षाअखेरीस असे दिसून आले की, या योजनेमुळे अनेक गोरगरिबांच्या वाचनाची सोय झाल्यामुळे तोच आपला फायदा मानून ही योजना वाचनालयाने चालू ठेवली. अशा रीतीने आणखी तीन वर्षे गेली.

### सरकारी योजनेत झालेला फरक :

सातारा वाचनालयाची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन त्यावेळच्या क्यूरेटरांनी सरकारी अनुदानाइतकी म्हणजे ४००० रु.ची रक्कम जमविण्याऐवजी दरसाल २५०० रु. जमविण्याची जी सवलत दिली होती ती कायम नसून फक्त त्या वर्षापुरतीच होती असा त्या कलमाचा अर्थ लावून येथील नगर वाचनालय दरसाल ४००० रु. जमविणार असेल तरच सरकार ४००० रु. अनुदान देईल, नाहीपेक्षा वाचनालयाने जमविलेल्या रकमेइतकेच सरकारी अनुदान दिले जाईल अधिक दिले जाणार नाही अशी भाषा सुरू झाली. याचे पर्यवसान कशात होणार हे स्पष्ट दिसत होते. वाचनालयाने सर्व वाचकांची सभा भरवून त्याना परिस्थितीची जाणीव करून दिली. वर्तमानपत्रात लेख लिहून वाचकांचे कोठे चुकते याचे दिग्दर्शन केले. प्रकटन फलकावर पत्रके लावून वस्तुस्थितीची कल्पना दिली. त्यातल्या त्यात चार आणे ही वर्गणी देण्याची ऐपत असणाऱ्या वाचकांना विविधरीतीने विनवून पाहिले पण सरकारने आपल्यासाठी मोफत वाचनाची सोय केली असताना उगाच वर्गणी कशासाठी भरावयाची हीच कल्पना बाळगणाऱ्या वाचकावर या विनवण्याचा फारसा परिणाम झाला नाही. पुढे वर्गणीत थोडी वाढ करण्याचा प्रयत्न केला पण तोही साध्य झाला नाही. मध्यंतरी वर्गणीदार विभाग अधिक आकर्षक करून वर्गणी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरी पण सरकारी योजनेतील अट पुरी करण्याचे सामर्थ्य निर्माण झाले नाही.

सरकारने एक पत्रक पाठवून सरकारी योजना मान्य करणाऱ्या वाचनालयात वर्गणीदार व मुक्तद्वार असे विभाग पाडणे हे सरकारच्या ग्रंथालय योजनेशी विसंगत आहे. देणगी अगर वर्गणीच्या रूपाने ४००० रुपये मिळविले तरच सरकारी ४००० रु. अनुदान मिळेल. वाचनालय ४००० रु.पेक्षा कमी अशी जितकी रक्कम जमवेल तितकीच रक्कम सरकारकडून त्यास मिळेल. पूर्वीची सवलत यापुढे मिळणार नाही व त्यातूनही १५टक्के कपात करण्यात येईल अशा आशयाची पत्रके सरकारकडून वाचनालयाकडे येऊ लागली. शेवटचा प्रयत्न म्हणून चालकांनी नागरिकांची प्रकट सभा घेऊन वस्तुस्थितीची पुन्हा कल्पना दिली. लोकांना वर्गणीदार होण्याची विनंती केली व परिस्थिती न सुधारल्यास सरकारी योजनेप्रमाणे मिळणारे अनुदान नाकारून १ एप्रिल १९५३ पासून पुनश्च पूर्वीप्रमाणे वाचनालय केवळ वर्गणीदारांसाठी ठेवावे अशी पूर्वसूचना देऊन ठेवली. या विनवणीचा

फारच थोडा उपयोग झाला. शेवटी नाइलाजाने चालकांना वाचनालयातील मुक्तद्वार विभाग बंद करणे भाग पडले व अनुदानरूपाने मिळणाऱ्या सरकारी मदतीवर पाणी सोडावे लागले.

यामुळे मुख्य तोटा जो झाला तो असंख्य गरीब वाचकांचा. या मुक्तद्वार वाचनालयात ज्यांना महिन्याकाठी अनेक वर्तमानपत्रे, मासिके व ग्रंथ यांच्या मोबदल्यात फक्त चार आणे देणे सहज शक्य होते असे शेंकडो वाचक सरकार जर आपल्यासाठी अनुदान देते तर हे चार आणे तरी का खर्च करा, अशा भावनेने वाचनालयाचा फायदा घेत होते. आज पुन्हा पूर्वीप्रमाणे केवळ वर्गणीदारासाठी वाचनालय ठेवताच हेच समर्थ असलेले पूर्वीचे मोफत वाचक भराभर वर्गणी भरु लागले. याच लोकांनी हा समंजसपणा यापूर्वी दाखविला असता तर सरकारी योजना चालू ठेवून वर्गणी रूपाने वाचनालयास दरसाल ४००० रुपये जमवून देणे सहज शक्य झाले असते, व चार हजार रुपये आपण जमवू शकतो या बळावर सरकारकडून ४००० रुपयाचे अनुदान मिळवून वाचनालयाचा दुपटीने फायदा करून देता आला असता.

जिल्हा वाचनालय म्हणून राहाण्याचे भाग्य सातारच्या नगर वाचनालयाच्या नशिबी नसावे. केवळ नाइलाजास्तव वाचनालयाला सरकारी अनुदान नाकारावे लागले. वाचकांनी कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमची वर्गणी चालू ठेवू व सरकारी योजनेप्रमाणे ४००० रुपये आपल्या जिल्हा वाचनालयासाठी मिळवून हे वाचनालय अधिक कार्यक्षम करण्याचा निश्चय केला असता तर घेतलेला निर्णय बदलून घेण्यास कार्यकारी मंडळास आनंद वाटला असता. हा असहकार सरकारी धोरणात बदल होण्यास उपयोगी पडला. १९५३ साली नगर वाचनालयाचा शतसांवत्सरिक महोत्सव प्रा. ना. सी. फडके यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. त्याच वेळी महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे तिसरे अधिवेशन नगर वाचनालयातर्फे सातारलाच झाले. महाराष्ट्रातील ग्रंथालय कार्यकर्ते एकत्र आले. सरकारी अधिकारीही आले व याविषयावर खूप विचारविनिमय व चर्चा झाली. क्यूरेटर ऑफ लायब्ररीज श्री. त्र्यं. दि. वाकनीस यांनी आपले एकटेच ग्रंथालय या योजनेतून बाहेर राहू नये अशी विनंती केली व सरकारी अनुदान नियमाचा फेरविचार करण्याचे आश्वासन दिले.

जेवढी रक्कम जमेल तेवढेच अनुदान द्यावयाचे हे सूत्र बदलून खर्चाचे प्रमाणात अनुदान देण्याचे धोरण जाहीर झाले. वाचनालयाने १९५४-५५ पासून पुन्हा जिल्हा ग्रंथालय म्हणून काम करण्यास सुरवात केली.

**घटना दुरुस्त्या :**

वाचनालयाची घटना व नियम पूर्वी इंग्रजीत असत ते बदलून १९४५ पासून मराठी नियम अमलात आले. या नियमात १९६३ साली पुन्हा दुरुस्त करून नवीन नियम अमलात आले. वारंवार होणाऱ्या दुरुस्त्याचा फेरविचार करून १९७४ मार्चला पुन्हा एक समिती नेमून नियमात दुरुस्त्या करण्यात आल्या व ते नियम अमलात आले. या नियमात काही बदल झाले तरी प्रामुख्याने त्याच नियमाचे आधारे आज वाचनालयाचा कारभार चालत आहे.

> एकशेबारा वर्षे ज्ञानाची साधने पुरविणारी ही संस्था कोणाही माणसाच्या आदराला पात्रच राहील. साताऱ्या सारख्या महाराष्ट्रातील मानाच्या नगरीत ही उत्कृष्ट संस्था म्हणून काम करीत आहे, चालकांना धन्यवाद. संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो हो शुभेच्छा.
>
> १६-८-६४ वि. स. पागे
>
> सभापती महाराष्ट्र राज्य विधान परिषद मुंबई

**सार्वजनिक न्यास म्हणून नोंदणी :**

महाराष्ट्र राज्याने मुंबई विश्वस्त कायदा सन १९५२ मध्ये लागू केल्याने त्या नियमाप्रमाणे नगर वाचनालयाची सार्वजनिक संस्था म्हणून नोंद करण्यात आली. आपल्या वाचनालयाचा नोंदणी क्रमांक १२४०७ असा आहे.

**ग्रंथसंख्या व वैशिष्ट्ये :**

वाचनालयाचा मुख्य कणा म्हणजे ग्रंथसंख्या. आपल्या वाचनालयाकडे नोव्हेंबर १९७८ अखेर मराठी २१,७०० इंग्रजी ९००० हिंदी १,७०० संस्कृत २०० बाल विभाग ५००० असे एकूण ३६,९०० ग्रंथ आहेत. याशिवाय साखळी योजनेचे राजा राममोहन रॉय फौंडेशनचे १,७८४ ग्रंथ व वाचनालयाने खरेदी केलेले ११०० ग्रंथ असे एकूण ३९.७८४ ग्रंथ आहेत. इसवीसन १९०० पूर्वीचे ६०४ इंग्रजी व २३९ मराठी ग्रंथ आहेत. १८१२ साली झालेल्या दी वर्क्स ऑफ पिटर पिंडर या इंग्रजी पुस्तकाचे चार भाग वाचनालयात आहेत. १८३६ साली श्री. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यानी लिहिलेले भूगोल शास्त्र गणित भाग व १८४४ साली प्रसिद्ध झालेले बाबाजीची बखर ही अगदी जुनी पुस्तके या संग्रहात आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

वाचनालयाकडे संदर्भ ग्रंथ असून त्याचा अभ्यासू वाचकाना मुक्तद्वार वापर करून दिला जातो. पदव्युत्तर अभ्यासासाठी अनेक वाचक वाचनालयातील ग्रंथांचा वापर करतात व त्याना सर्वप्रकारचे सहकार्य दिले जाते. त्याचप्रमाणे लेखक, शहरातील वृत्तपत्रे यानाही वेळोवेळी लागणारे संदर्भ सहाय्य तत्परतेने दिले जाते. अनेक लेखकांनी त्यांचे ग्रंथांचे प्रस्तावनेत या सहाय्याचा उल्लेख केलेला आढळेल.

**विशेष उपक्रम :**

पुणे विद्यापीठाचे बहि:शाल शिक्षण केन्द्राचे कार्य वाचनालयाने १९५५ ते १९६३ सालापर्यंत चालविले व विद्यापीठाचे सहकार्याने अनेक विद्वान वक्त्यांनी व्याख्याने ऐकण्याची संधी सातारकाना देण्यात आली.

वाचनालय प्रतिवर्षी शारदीय व्याख्यानमाला गुंफते व अनेक विषयावरील व्याख्याने सातारकरांना ऐकण्याची संधी मिळते. या शिवाय वर्षभर उपलब्ध होणाऱ्या वक्त्यांची व्याख्यानेही केली जातात.

एकनाथ मंडळ सातारा यांनी नगरवाचनालयाकडे ६५०० रु. निधी म्हणून दिला आहे. त्यामधून संत वाङ्मय व धार्मिक विषयावर व्याख्याने व प्रवचने केली जातात.

वाचनालयाला आज भेट देण्याचा योग आला. आपले वाचनालय हे मला खरे शहराचे भूषण वाटते. वाचनालय पहाण्याचा जेव्हा योग येतो तेव्हा माझी मान नेहमीच लवलेली असते. आदराने मराठीचे वैभव पाहून, व अभिमानाने. अशी उपकारक संस्था अत्यंत आस्मियतेने चालू ठेवल्या-बद्दल चालकांना धन्यवाद. सर्व शुभेच्छा.

१६–१२–६४ रणजित देसाई

वक्तृत्वोत्तेजक सभेने वाचनालयाकडे ११५० रु. देणगी १९५८ मध्ये दिली आहे. त्याचे व्याजातून व वाचनालयाचे खर्चातून ४ थी ते ९ पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता गोष्टींच्या स्पर्धा व १० वी ११ वीचे विद्यार्थ्यांकरता वक्तृत्व स्पर्धा वाचनालयातर्फे घेण्यात येतात. त्यात खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी भाग घेतात. प्रथमच स्टेजवर उभे रहाण्याची संधी वाचनालयाने दिली असे बरेच विद्यार्थी विद्यार्थिनी चांगले वक्ते म्हणून गाजले आहेत व त्यानी इतर स्पर्धांतही बक्षिसे मिळविली आहेत. तसेच गेली ३–४ वर्षे वाचनालय सर्व नागरिकांचे-करिता भावगीते, भक्तीगीते व नाट्यगीते यांच्या स्पर्धा घेत असून त्याला चांगला प्रतिसाथ मिळत आहे.

### काही महत्वाचे उपक्रम :

शतसांवत्सारिक महोत्सव : १९५३ साली प्रा. ना. सी. फडके यांचे अध्यक्षतेखाली नगर वाचनालयाचा शतसांवत्सरिक महोत्सव उत्साहाने साजरा झाला. त्या निमित्त एक स्मरणिका प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रा. ना. सी. फडके यांचें एक उत्कृष्ट व्याख्यान ऐकण्याची संधी सातारकर नागरिकांना लाभली.

### ग्रंथालय परिषद :

१९५३ साली प्रा. श्री. म. माटे यांचे अध्यक्षतेखाली न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नगर वाचनालयाचेवतीने महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे तिसरे अधिवेशन झाले. प्रा. माटे यांचे अध्यक्षीय भाषण फारच मार्मिक झाले. या परिषदेस बरेच प्रतिनिधी आले होते कांही ठराव मंजूर झाले. तेव्हापासून नगर वाचनालय महाराष्ट्र ग्रंथालय चळवळीत सहभागी झाले आहे.

## मराठी साहित्य संमेलन ४४ वे अधिवेशन

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्य साहित्य परिषदेची घटक संस्था या नात्याने वाचनालय करीत आहे. साहित्य विषयक व्याख्याने परिसंवाद, कवीसंमेलने आदि कार्यक्रम साहित्य परिषदेचे शाखेतर्फे केले जातात. २, ३, व ४ नोव्हेंबर १९६२ रोजी ४४ वे मराठी साहित्य संमेलन नामदार कै. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहाने साजरे झाले. भव्य व गाजलेले संमेलन म्हणून या संमेलनाची अनेक लोक आजही आठवण काढतात. या संमेलनासाठी महाराष्ट्रातून व अन्य ठिकाणाहून २५७५ प्रतिनिधी उपस्थित होते. १०४९ स्वागत सभासद नोंदले गेले होते. शाहू कला-मंदीर व न्यू इंग्लिश स्कूल या ठिकाणी भव्य मंडप घालून नाटके, कविसंमेलन, परिसंवाद असे कार्यक्रम मोठ्या संख्येने पार पडले. गांधी मैदानावर श्री. बाळासाहेब भारदे, आचार्य प्र. के. अत्रे, डॉ. शं. गो. तुळपुळे, गं. भा. सरदार, म. म. द. वा. पोतदार आदि वक्त्यांची व्याख्याने झाली. 'रायगडला जेंव्हा जाग येते,' 'तो मी नव्हेच' आदि नाटके नामवंत संचात साजरी झाली. या साहित्य संमेलनाचा सर्व खर्च वजा जाता शिल्लक रक्कम रुपये ११००–७१ पैसे देणगी म्हणून नगर वाचनालयाचे इमारत निधीकडे जमा करण्यात आले.

### जिल्हा ग्रंथालय म्हणून कार्य :

आपल्या वाचनालयास १९४९ पासून जिल्हा ग्रंथालय म्हणून मान्यता मिळाली असून वाचनालय जिल्ह्यामध्ये ग्रंथालयाचा प्रसार व्हावा, नवीन ग्रंथालये निघावीत या दृष्टीने सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे सहकार्याने कार्य करीत आहे. सातारा जिल्ह्यात ग्रंथालये होती त्यात वाढ होऊन सध्या सरकारमान्य ग्रंथालये जिल्ह्यात काम करीत आहेत. जिल्हा ग्रंथालयाचे कार्यालय नगर वाचनालयात असून जिल्ह्यातील सर्व वाचनालयांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सहाय्य देण्यात येते. जिल्ह्यात बरीच नवीन वाचनालये, पंचायत समित्यांचे वतीने खेडोपाडी सुरु करण्याचा प्रयत्न आहे. पण नवीन ग्रंथालयांना अनुदान देण्यास पुरेशी आर्थिक तरतूद नसल्याने अनेक वाचनालयांना अद्याप मान्यता मिळालेली नाही. सातारा तालुक्यात अशी मान्यता न मिळालेली २२ वाचनालये आहेत. त्याना मान्यता व अनुदान मिळावे असाही प्रयत्न सुरू आहे जिल्ह्यात नगर वाचनालयातर्फे निरनिराळ्या ठिकाणी ग्रंथप्रदर्शने भरविली जातात. साखळी योजनेनुसार ग्रंथाचा संग्रह करण्यात आला असून जिल्ह्यातील ग्रंथालयांना त्यांचे मागणी-प्रमाणे ग्रंथ पुरविण्यात येतात. जिल्ह्यातील अन्य शैक्षणिक संस्थानाही ग्रंथ पुरविले जातात.

### बाल विभाग :

प्रौढ वाचकाप्रमाणे बाल वाचकांना वाचनाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून वाचनालयाने सुरु केलेल्या बाल विभागाचे दिनांक ७–८ ५५ रोजी आनंद मासिकाचे संपादक श्री. गोपिनाथ तळवळकर यांनी उद्घाटन केले. १९५५ पासून वाचनालयात बाल विभाग सुरु आहे. वाचनालयात बसून बाल वाचकांना ग्रंथ व नियतकालिके विनामूल्य वाचनाची सोय असून अनेक बालवाचक त्याचा चांगला फायदा घेतात. आजकाल वाचकांना बसण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने पाठक भव-नाचे पूर्वेस व दक्षिणेस असणाऱ्या व्हरांड्यात त्याना बसावे लागते. बाल वाचकांचेकरिता स्वतंत्र प्रशस्त जागा नवीन संकल्पित इमारत बाढीत करण्याची योजना असून सर्व सोईंनी युक्त असा तो विभाग लवकरच होईल. या विभागासाठी स्वतंत्र ग्रंथसंग्रह असून घरी वाचनासाठी नेणारे बालवाचक सभासदही आहेत.

### महिला विभाग :

महिलांचेकरिता स्वतंत्र विभाग असून तो सायंकाळी २ ते ५ यावेळात उघडा असतो. काही महिला या विभागांचा फायदा घेतात. बऱ्याच महिला वाचनालयाच्या सदस्य असून त्या इतर सभासदा-प्रमाणे ग्रंथ, मासिके घरी वाचण्यास नेतात. महिलांना उपयुक्त अशी

नियतकालिके व ग्रंथ वाचनालय खरेदी करते व महिला त्याचा मोठ्या-प्रमाणावर लाभ घेतात. महिला मंडळाचे आवारात काही दिवस हे केन्द्र सुरू ठेवले होते. त्यास फारसा प्रतिसाद न मिळाल्याने ते वाचनालयाचे आवारात आणण्यात आले.

## भेटी

सातान्यात सार्वजनिक कार्यानिमित्त येणाऱ्या प्रमुख व्यक्तींना वाचनालयास भेटीचे निमंत्रण देऊन त्याना वाचनालयाचा परिचय करून दिला जातो. आजपर्यंत अनेक प्रमुख व्यक्तीनी भेट देऊन वाचनालयाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. पाहुण्याचे अभिप्रायाचे नोंदीतील काही उतारे इतरत्र दिले आहेत.

## वैशिष्ट्ये :

वाचनालयास शहराचे मध्यवर्ती ठिकाणी स्वतःची इमारत आहे. पाठक भवन या नावाचे वाचनालयाचे माडीवर सर्व सोयीनी युक्त असे सभागृह असून शहरातील ७५ टक्के सभा, संमेलने, व्याख्याने या सभागृहात होतात. वाचनालय मुक्तद्वार असल्याने हजारो वाचक रोज वाचावयास येतात व दैनिके, नियतकालिके व ग्रंथ वाचनाचा लाभ घेतात. वाचनालयाकडे असणाऱ्या ग्रंथ संग्रहाचा लाभ अभ्यासू वाचकांना वाचनाचे आवारात विनामूल्य करून दिला जातो. प्रवास वर्णने, नकाशे, रेल्वे टाइम टेबल आदि साहित्य वाचनालय नागरिकांना उपलब्ध करून प्रवासाठी उपयुक्त माहिती पुरविते. साखळी योजने-द्वारा वाचकांनी मागणी केल्यास वाचनालयात उपलब्ध नसणारे कोठलेही मराठीतील पुस्तक शासकीय विभागीय ग्रंथालय अगर केन्द्रीय ग्रंथालयाकडून आणून वाचनास उपलब्ध करून दिले जातात. व्याख्यान माला, परिसंवाद, ग्रंथ प्रदर्शने, चित्रांची प्रदर्शनने, रांगोळी प्रदर्शने गोष्टींच्या स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भावगीत, नाट्यगीत व भक्ती-गीतांच्या स्पर्धा आदि विविध उपक्रम वाचनालयात सुरू असल्याने समाजातील सर्व थरातील, शहरातील लोकांचा वाचनालयाशी अखंड संबंध येतो. वाचनालयाचे जाहिरात विभागाचा अनेकांना आपल्या मालाचे प्रसारासाठी व विक्रीसाठी उपयोग होतो व वाचनालयासाठी जाहिरातीचे रूपाने काही उत्पन्नही मिळते.

## ग्रंथांची देणगी :

वाचनालयास सतत लहान मोठया ग्रंथांच्या देणग्या मिळत असतात. गेल्या १५ वर्षात युनायटेड स्टेटस इन्फर्मेशन सव्हिसकडून, १००, ब्रिटिशकौन्सिल लायब्ररीकडून १००, श्री. चिं. भट ( वडिलांचे स्मरणार्थ ) ७८ ग्रंथ, दिवाण बहाद्दुर य. ब. ठोंबरे ५५९ ग्रंथ, श्रीमती हडप ( कै. बि. वा. हडप यांचे स्मरणार्थ ) ५७ ग्रंथ, अशा मोठया देणग्या मिळाल्या आहेत.

## उपनगर केंद्र :

सातारा शहराचा विस्तार वाढत असून शहराचे चारीबाजूस अनेक सहकारी घरबांधणी संस्था उभ्या रहात आहेत. शहराची लोकसंख्या ८० हजाराचे पुढे गेली असल्याने विविध भागातून वाचक वाचनालयात येतात. शहराचे पूर्वभागात औद्योगिक वसाहत झाली असल्याने व सर्व सरकारी व औद्योगिक संस्थाची कार्यालये पोवई नाक्याचे आसपास गेल्याने त्याभागात वाचनाची सोय करण्याची आवश्यकता निर्माण झाली. वाचनालयाने पोवई नाक्याजवळील

> नगर वाचनालय, सातारा या संस्थेस भेट देण्याचा सुयोग लाभला. वाचनालयाचे ज्ञानदानाचे कार्य वाढते आहे. हीच त्याच्या लोकप्रियतेची साक्ष होय. वाचनालयाची इमारत वाढविण्याचाही कार्यकर्त्यांचा मानस आहे व ते आवश्यकच आहे. इमारत वाढवताना अद्ययावत ग्रंथालयाच्या रचना पाहून त्यानुसार ज्या सोई करून घेता येतील त्या अवश्य घ्याव्यात. सातारा शहरास भूषणभूत असलेल्या या संस्थेचा असाच सतत उत्कर्ष होवो ही इच्छा.
>
> २३–७–६६ ज. श्री. टिळक
>
> संपादक दैनिक केसरी, पुणे

सहकारी बोर्डाचे आवारात त्यांचे सहकार्याने नगर वाचनालयाचे उपनगर केंद्र सुरु केले. या केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्र स्कूटर्सचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर श्री. एम्. एन्. कांगो यांचे हस्ते दिनांक १३–११–७६ रोजी झाले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. बाबुराव घोरपडे हे अध्यक्षस्थानी होते. या केंद्रात सध्या १०० सभासद असून वाचनाच्या सर्व सोई उपलब्ध आहेत. या केंद्राचे रुपांतर स्वतंत्र संस्थेत केल्यास अधिक सोई उपलब्ध होतील हे जाणून वाचनालयाने त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे.

## संकल्पित इमारत वाढ :

वाचकांची वाढती गरज ध्यानी घेऊन व शहरात प्रशस्त बंदिस्त सभागृह नाही तीही उणीव दूर करावी म्हणून या महोत्सवानिमित्त वाचनालयाचे इमारतीचा विस्तार करण्याची योजना निश्चित केली आहे. यामुळे बालविभागासाठी व महिला विभागासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होणार असून सुमारे ८५० जणांना बसता येईल असे प्रेक्षागृह तयार होईल. या प्रेक्षागृहाची रचना अशी करण्यात येणार आहे की वेळप्रसंगी त्यात नाट्यप्रयोग होऊ शकेल व शहाराची बंदिस्त नाट्य-गृहाची गरज काही प्रमाणात भागविता येईल. यासाठी जरूर ती परवानगी नगरपालिकेने ठराव करून दिली असून इमारतीचे प्लॅन व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. इमारत बांधणीस सुमारे सहा लाख व फर्निचरसाठी सुमारे एक लाख असा एकूण सात लाख रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम सरकारी अनुदान, देणग्या स्मरणिकेतील जाहिराती यामार्गे उभी करण्यात येणार आहे. सर्वांचे सहकार्याने हे कार्य पूर्ण होईल असा विश्वास वाटतो.

गेल्या दीडशे वर्षांतील :

# वाई येथील ग्रंथनिर्मितीची परंपरा :

लेखक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

महाराष्ट्रातील नवविचारांचे प्रबोधन गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनी सुरू केले. ते वाई येथे सदर अमीन म्हणून काम करीत असता त्यांनी स्थानिक वाचनालयाची वाई येथे स्थापना केली. लोकहितवादींनी स्थापलेल्या वाचनालयाचे येथील टिळक स्मारक मंदिरातील ग्रंथालयात रुपांतर झाले व ते ग्रंथालय येथील मराठी वाचकवर्गाची सर्व प्रकारची गरज आजपर्यंत पुरवीत आहे. त्याचप्रमाणे प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्कृत, इंग्रजी व मराठी साहित्याचे मोठे ग्रंथालय ५० वर्षांपूर्वी स्थापन झाले. त्यांचाही उपयोग वाचकवर्गास होतो. विश्वकोश कार्यालयाच्या शासकीय ग्रंथालयात सुमारे ३६ सहस्त्र ग्रंथ व प्राज्ञपाठशाळेच्या ग्रंथालयात छापील १५ सहस्त्र व लिखित पोथ्यांच्या स्वरूपात ११ सहस्त्र ग्रंथ आहेत.

वाई हे शेकडो वर्षे भारताच्या परंपरागत विद्या आणि कला यांच्या उपासनेचे क्षेत्र आहे. मूर्ती, मंदिरे, तदनुषंगिक रंग चित्रे, उद्याने इत्यादी शिल्पे, वाद्य व संगीत या कला शिवशाहीपासून पुन्हा भरभराटीस आल्या. येथील अवशेषांवरून तत्पूर्वीची खंडित परंपरा अनुमानिता येते. वेदशास्त्रांची परंपरा मात्र केव्हाच खंडित झाली नाही. ब्रिटिश राजवट स्थापन झाल्याबरोबर संस्कृत विद्यांबरोबरच मराठी वाङ्मयालाही ऊर्जित दशा प्राप्त झाली. अनेक नामवंत मराठी ग्रंथकार व भाषांतरकार निर्माण झाले. महादेवशास्त्री गोविंद कोल्हटकर आणि कादंबरीकार लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांना आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासात स्थान मिळाले आहे. महादेवशास्त्री कोल्हटकरांनी पाच मराठी कविता संग्रह, शेक्सपिअरच्या अथेल्लो या नाटकाचे मराठी भाषांतर आणि कौलवमाचा वृत्तांत प्रसिद्ध केला. लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्या 'मुक्तामाला' व 'रत्नप्रभा' कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. विद्यापीठाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये या कादंबऱ्याही अजून अंतर्भूत केलेल्या दिसतात. मनोहर विष्णू काथवटे हे त्यानंतरच्या पिढीतले लेखक होत. 'अबूबकर' आणि 'उमर' या खलिफांची संक्षिप्त चरित्रे 'भारत खंडाचा प्राचीन इतिहास,' 'पारशांचा इतिहास,' 'अजमेर,' 'वाईच्या काथवटे घराण्याची माहिती' त्याचप्रमाणे 'सुधारणा, उद्भव व उपाय' इत्यादी पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली. गेल्या शतकात संस्कृत विद्यांना चांगला उजळा देण्याचे कार्य परंपरागत पद्धतीने अध्ययन केलेल्या शास्त्री-पंडितांनी मराठीत केले. त्यामध्ये धर्ममार्तंड का. वा तथा भाऊशास्त्री लेले हे एक अग्रणी होत. त्यांनी मोदवृत्तनामक मुद्रणालय स्थापून मोदवृत साप्ताहिक आणि धर्म मासिक चालविले होते हे धर्म मासिक महाराष्ट्रात शतकभर चालू असलेल्या धार्मिक व सामाजिक सुधारणावादाचे, धर्मशास्त्राच्या आधारे सप्रमाण खंडण करणारे विद्वत्तापूर्ण लेख प्रसिद्ध करीत होते; त्याबरोबरच धार्मिक विषयावर अनेक निबंधही प्रसिद्ध करीत असे. भाऊशास्त्री लेले यांनी मराठीमध्ये संस्कृतमधील वेद, उपनिषदे, स्मृतिग्रंथ, पुराणे, वाल्मिकी रामायण, धर्मशास्त्र यांची भाषांतरे प्रसन्न भाषेत अनुवाद करून मराठी वाचकांपुढे ठेवली आहेत. मनुस्मृती, वाल्मिकी रामायण, मार्कंडेय पुराण, विष्णपुराण, योगवासिष्ठ, ब्रह्मसूत्रशांकरभाष्य, भगवद्गीता शांकरभाष्य, देवी भागवत (१ ते ४ स्कंध), महाभारत (आदि पर्व ते द्रोण पर्व) इत्यादी अनेक संस्कृत ग्रंथाच्या भाषांतराबरोबरच गीतारहस्य परीक्षण, पुराणनिरीक्षण-परीक्षण वेदमूर्ती पंडित श्री. दा. सातवळेकर यांच्या स्पर्शास्पर्श या ग्रंथाचे परीक्षण इत्यादि समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. लेले यांच्या मोदवृत्त मुद्रणालयात आधुनिक संस्कृत गद्याचे सर्वश्रेष्ठ प्रवर्तक आप्पाशास्त्री राशीवडेकर यांचे 'सूनृतवादिनी' हे संस्कृत साप्ताहिक व 'संस्कृत चंद्रिका' हे सर्व भारतातील संस्कृत पंडितामध्ये मान्य झालेले संस्कृत मासिक छापून प्रसिद्ध होत होते. श्री लेले यांच्यानंतर संस्कृत पंडितांच्या पिढीमध्ये दोन मोठे धर्मसुधारक विद्वान निपजले; ते म्हणजे श्री. स्वामी केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) आणि पाचवड येथील धुंडिराजशास्त्री गणेश बापट दीक्षित हे होत. बापट दीक्षित यांनी ऐतरेयब्राह्मण (ऋग्वेद) आणि वाजसनेयी संहिता (यजुर्वेद) यांची भाषांतरे करून प्रकाशित केली. या दोघांनी आणि त्यांच्या शिष्यांनी, हिंदू धर्माच्या सुधारणेचे महाराष्ट्रात जे आंदोलन शतकभर सुरू होते, त्या आंदोलनाला धर्मशास्त्राचे आधार देऊन पुढे नेले. केवलानंद स्वामींनी बरेचसे संस्कृत ग्रंथच निर्माण केले. त्यांनी संस्कृतमध्ये निर्माण केलेला सप्तखंडात्मक 'मीमांसाकोश' याला जागतिक कीर्ती लाभली आहे. त्यांनी अद्वैतसिद्धी या वेदांत ग्रंथाचे मराठीमध्ये भाषांतर केले असून त्याचा प्रथम भाग नुकताच प्रसिद्ध झाला व दुसरा प्रसिद्धीच्या वाटेवर आहे. त्यांनी धर्मकोश संपादनाच्या कार्याचा पाया घातला व त्यानंतर त्यांनी स्थापन केलेल्या प्राज्ञ पाठशाळा मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे धर्मकोशाचे प्रमुख संपादक झाले. धर्मकोशाचे संस्कृतमध्ये तेरा खंड आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत आणि १४ खंड अजून प्रसिद्ध व्हावयाचे आहेत.

---

मी मराठी कुमार विभागाच्या उद्घाटनासाठी आलो होतो. प्रगती खूप झाली आहे हे पाहून आनंद होतो. हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून असेच विकसित होत जावो ही सदिच्छा.

१२-३-६४ — गोपिनाथ तळवलकर

---

वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाने हिंदू धर्म सुधारणेचे जे आंदोलन चालविले, त्या आंदोलनाची पार्श्वभूमी धर्मग्रंथाच्या द्वारे निर्माण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन आतापर्यंत आधुनिक पद्धतीने धर्मशास्त्राचे समालोचन करणारे पंचवीस पेक्षा अधिक ग्रंथ मराठीत प्रसिद्ध केले आहेत. महादेवशास्त्री दिवेकर यांनी या उपक्रमाला प्रथम उचलून धरले. 'आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष,' 'हिंदु धर्म शिक्षण,' 'धर्मशास्त्र मंथन,' 'धर्मबाह्यांचे शुद्धीकरण,' 'विद्यार्थीधर्म,' 'ब्राह्मणातील पोटजातीचे एकीकरण,' 'अस्पृश्यतेचे उच्चाटन,' 'ब्रह्मज्ञान व बुवाशाही' इ. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांनी धर्मसुधारणेच्या विचाराला उत्तम प्रेरणा दिली आहे.

वैकुंठवासी बाळकृष्णबुवा मार्तंड चौंडे हे गोरक्षणाच्या आंदोलनाचे एक प्रमुख नेते होते. वैदिक धेनुगाथा, गोज्ञानकोष इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. याच पिढीतले अनेक महत्वाचे लेखक म्हणजे मकरंद मालाकार नरहर नारायण पटवर्धन व इतिहास संशोधक शं. ना. जोशी हे होत. पटवर्धनानी 'इला सुंदरी,' 'जीवितयात्रा,' 'राणी चंद्रावती' या कादंबऱ्या मकरंदमालेमध्ये प्रसिद्ध केल्या. शं. ना. जोशी यांनी शिवचारित्र साहित्यखंड भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे प्रकाशित केले. 'मंत्र्युत्तम नाना फडणीस, शकावली' हे त्यांचे पुस्तकही लक्षात घेण्यासारखे आहे.

१९६२ साली वाई येथे प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इमारतती महाराष्ट्र शासनातर्फे मराठी विश्वकोशाच्या संपादनाचे कार्यालय स्थापन झाले. प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे असून या विश्वकोशाच्या कार्यालयामध्ये संपादकीय कार्य करण्याकरिता साधारणपणे पन्नास शासकीय कर्मचारी गुंतले आहेत. सुमारे पाचशे पेक्षा अधिक संख्येचे भारतातील व विशेषतः महाराष्ट्रातील विद्वान विश्वकोशाकरिता लेखक व समीक्षक म्हणून आपले लेखन पाठवीत असतात. आधुनिक सामाजिक शास्त्रे, विज्ञाने व तंत्रविज्ञाने या विषयात पारंगत असलेले विद्वान यामध्ये अंतर्भूत आहेत. या विद्वानांपैकी अनेक विद्वान अभ्यागत संपादक म्हणून वेळोवेळी निमंत्रित केले जातात. ते वाई येथील प्राज्ञपाठशाळेच्या निवासगृहात अनेक आठवडे राहतात आणि लेखनकार्य करून जातात. या लेखनकार्याला साह्यभूत म्हणून शासनातर्फे प्राज्ञपाठशाळा केवलानंद सरस्वती स्मारक मंदिरात इंग्लिश, संस्कृत, मराठी, हिंदी इ. भाषांवरील अद्ययावत ग्रंथांचा व नियतकालिकांचा समावेश करणारे ग्रंथालय स्थापन केले आहे. या ग्रंथालयाच्या जोडीलाच प्राज्ञपाठशाळा मंडळाचे ग्रंथालयही संपादकांच्या व लेखकांच्या उपयोगाकरता सादर केलेले आहे. मराठी विश्वकोश एकंदर वीस खंडामध्ये प्रकाशित व्हावयाचा असून त्यातील आठ खंड मुद्रित झाले असून, पाच खंड प्रकाशित झाले आहेत.

☆ ☆ ☆

---


WITH BEST COMPLIMENTS FROM :—

## Menon Pistons Private Limited

**Manufacturers of Aluminium Alloy Pistons and Piston Rings for Automobile and Industrial Engines.**

**: In Collaboration with :**

M/s. Nippon Piston Ring Company Ltd.,
TOKYO, Japan.

Phones :- 5242
3563

**Menon Pistons Pvt. Ltd.**
Industrial Estate,
SHIROLI,
Kolhapur : 416 005.

# ग्रंथालये ही ज्ञानमंदीरे

बॅ. पी. जी. पाटील.
माजी कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

ग्रंथाना गुरु म्हटलेले आहे. आणि हे ग्रंथ जिथं सदैव आपल्या वाचकरूपी शिष्याची वाट पहात असतात ती ग्रंथालये म्हणजे ज्ञानाची मंदिरे होत. " The true University of these day is a collection of books " Carlye चे वचन प्रसिद्ध आहे. एकदा शिक्षण मिळालं नि ज्ञानाची गोडी निर्माण झाली, वाचनाची भूक लागली की त्यासाठी वाचनालयाची गरज निर्माण होते. अशी वाचनालये ही खरी संस्कृती घडविणारी नि संस्कार करणारी केंद्रे असतात.

म्हणजे Libraries are as the Shrines where all the relics of ancient saints, full of true virtue, and that without delusion or imposture, are preserved and reposed.

ग्रंथालयातून आपल्या संस्कृतीचा वारसा जतन करून ठेवला जातो. जगाच्या इतिहासात क्रूरकर्मा हुकूमशहानी आधी ग्रंथालयाच्या इमारती उध्वस्त केल्याचे आपणास ठाऊक आहेच. अगदी अलीकडे बांगला देशातही तेच घडल्याचे आपणास माहीत आहे. त्यावरून ग्रंथालयाची धास्ती आक्रमकांना सदैव वाटत असल्याचे दिसेल, त्यांचे कारण अस्मितेची स्फूर्ती ग्रंथालयातून लाभते. पूर्वजांचे जीवन सर्वस्व जणू ग्रंथालयातील कपाटात ओळीने मांडून ठेवलेल्या ग्रंथांतून जपून ठेवलेले आढळून येईल. म्हणून ग्रंथालयाचे महत्व ओळखले पाहिजे.

वाचनाची आवड निर्माण करणे आणि ती पुरविणे हे ग्रंथालयाचे काम होय. आपल्या देशात सुशिक्षितांचे प्रमाण थोडेफार वाढत आहे. पण खरेवाचक मात्र दुर्मिळ आहेत. परीक्षेसाठी किंवा काही तरी वेळ काढायचा म्हणून वाचणारेच फार. तरुण विद्यार्थ्यांना चित्रपटाप्रमाणे वाचनाची गोडी कशी लागेल हा खरा प्रश्न आहे. वाचनाचे संस्कार लहानपणीच केले पाहिजेत. इंग्रजी वाङ्मयात पेंग्विन-पेलिकन सारख्या पॉकेट बुक्सनी वाचकवर्ग वाढविला. ग्रंथ वाचकवर्ग वाढविला. ग्रंथ वाचनातून क्रांती झाल्याचे दिसेल. महात्मा गांधी, थोरो, रस्कीन अशा थोर थोर व्यक्तींची चरित्रे पाहिली तर एकेका पुस्तकाने त्यांचे जीवन घडविले असे दिसेल. ध्येयाचा मार्ग ग्रंथांनी दाखविला. विल्यम कॉर्बेट हा नांगर धरणारा. पण एका वर्षात त्यानी वाचनालयाची सारी पुस्तके वाचून फस्त केली. त्यानी लिहिलं की, भोजनखर्चात काटकसर केली पण वाचन बुडविले नाही. साने गुरुजींबद्दल तर सांगतात लायब्ररीत त्याना कोणीही केव्हाही शोधायला यावे. तहानभूकसुद्धा वाचनापुढे विसरून जात. आणि खरोखर ग्रंथ हे बुद्धीचे खाद्य आहे. बर्लिनच्या स्टेट लायब्ररीच्या प्रवेश द्वारीचे घोषवाक्य कोरलेले आहे. तर इजिप्तमध्ये अलेक्झांड्रियाच्या लायब्ररीच्या प्रवेशद्वाराजवळ खोदले आहे.

आणि ते खरेच आहे. ग्रंथालयात जाणे म्हणजे एक नवे 'टॉनिक' घेण्यासारखंच आहे. नव्या विचारांनी नवा उत्साह संचला पाहिजे, नवी दृष्टी प्राप्त झाली पाहिजे. म्हणूनच त्यास आरोग्यमंदिर म्हटले आहे. लोक ग्रंथालयात कशासाठी जातात यासंबंधी एक मजेशीर वचन C. C. Colton ने सांगितले आहे. Some read to think–those are rare, some to write these are common; and some to talk – and those form the great majority.

यापैकी आपण कोणत्या गटात बसतो याचा ज्याने त्याने विचार करावा, पण रामदासांनी म्हटल्याप्रमाणे दिसामाजी काही तरी वाचले पाहिजे, त्यावर मनन केले पाहिजे तशी सवय अंगवळणी पडली पाहिजे, कारण —

संसार विषवृक्षस्य द्वे फले मतोपमे।
काव्यामृत रसास्वादः संगीतः सज्जनैःसह ।

ग्रंथ हे ' ग्रेट कंपॅनियन ' ' मास्टर्स ' आहेत. ते लाभण्याचे ठिकाण हे ग्रंथालय होय. अशी ग्रंथालये वाढोत-विकसित होवोत आणि त्यातून त्यांच्या सभोवतालचा परिसर संस्कृतिसंपन्न होवो अशा शुभकामना आपण मनाशी बाळगू या.

नगर वाचनालयाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवाच्या समारंभास शुभेच्छा.

☆ ☆ ☆

ज्या वाचनालयाचा मी २५ वर्षांपूर्वी सभासद होतो, तेथे आज आल्यावर पूर्वीच्या सर्व सुखद स्मृति जागृत झाल्या. नगर वाचनालयातील बालांच्यासाठी चालविण्यात येणारा विभाग पाहून फार आनंद वाटला. या सांस्कृतिक केंद्राचा सतत विकास व या कामातून सातारा येथील नागरिकांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरो हीच सदिच्छा.

१६–८–५९ ग. प्र. प्रधान

# माझी आठवण

— देवदत्त दाभोळकर.

१५५, सदाशिव पेठ, सातारा शहर या वास्तूने माझ्यावर केलेल्या संस्काराच्या खालोखाल पूर्वीच्या आर्थर बागेच्या परिसराने माझ्यावर संस्कार केले आहेत. तेथील नगरपालिकेची प्राथमिक शाळा, सरकारी हायस्कूल, खुद्द आर्थर बाग, गांधी मैदान, शेजारचे मारुतीचे देऊळ (माझ्या एकदोन परीक्षा तरी मी या मारुतीच्या मदतीने पास झालो आहे.) व कमिटीचा पोहण्याचा तलाव या सर्वांचा यात समावेश आहे. तसाच समावेश नगर वाचनालयाचा व त्यावरील पाठक हॉलचाही आहे. महाविद्यालयीन अध्ययनाच्या कालखंडात सुट्टीच्या दिवसात सातारला असताना मी नियमितपणे नगर वाचनालयाचा लाभ घेतला आहे. कधी ओणवून तर कधी टाचा उंचावून इतरांचे श्वास अंगावर घेत व आपल्या निश्वासाचा लाभ इतराना देत गर्दीत वर्तमानपत्रे वाचली आहेत. आपल्याला हवे असलेले मासिक दुसरा हातातून खाली कधी ठेवतो याची टपून वाट पाहिली आहे आणि त्याने खाली ठेवताच तीन चार दिशांनी त्याच्यावर येणाऱ्या झडपांची स्पर्धा जिंकण्याचा कधी यशस्वी तर कधी अयशस्वी प्रयत्न केला आहे. बी. ए झाल्यानंतर एम्. ए. होईपर्यंतच्या कालावधीत टाईम्स ऑफ इंडियातील Situations Vacant हे सदर नियमितपणे बारकाईने पाहिले आहे व त्यातले पत्ते व बॉक्स नंबर टिपून घेतले आहेत. सहा साडेसहापर्यंत हे कार्यक्रम करावेत व व्याख्यानाचा एखादा बोर्ड बाहेर लागलेला असेल तर नंतर भक्तिभावाने वर जाऊन ते व्याख्यान ऐकावे हा क्रमही मी काही दिवस केला आहे. हा सर्व कालव्यय अपव्यय झाला असे मला आजही वाटत नाही.

साताऱ्चे असे एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक वातावरण या परिसरात विशेषतः नगर वाचनालयात व पाठक हॉलमध्ये प्रतीत होई. छोट्या आकाराच्या शहरात काही सांस्कृतिक कार्यक्रमांचे जिवंत प्रवाह असले तर त्या शहरातील सामाजिक जीवनाला एक वेगळीच सहज प्रसन्नता लाभत असते. त्या काळात येथील वातावरणात ती जाणवत असे.

आजही या सांस्कृतिक वातावरणाची जोपासना करण्याचा प्रयत्न करणारे नागरिक या शहरात आहेत. सांस्कृतिक या शब्दामध्ये प्रतिगामी, पुरोगामी अशा अभिनिवेशांचा वाद मला या ठिकाणी अभिप्रेत नाही. विवेकनिष्ठ विचार व भावनाशुद्ध आचार यांचे संस्कार देणारी सांस्कृतिक व्यासपीठे गावोगाव उभी राहिली पाहिजेत. साताऱ्यात हे काम थोडेसे अधिक सुकर व्हावे असे वाटते.

☆ ☆ ☆

अनेक वर्षांच्या जुन्या संस्थांपैकी एक असे हे वाचनालय असल्याने सातारा जिल्ह्यात तरी त्याचे वैशिष्ट्य आहे. जुनी वाचनालये नवीन उत्साही तरुणांच्या हाती दिली की त्यात नवीन जोम येतो व तो अद्यावत् पद्धतीने चालतात. आणि त्यांची रुची नव्या बरणीतील जुन्या मुरलेल्या लोणच्याप्रमाणे खमंग व अवीट असते. या वाचनालयाने जुन्या अनेक थोर पुढाऱ्यांचे दर्शन घेतले आहे व त्यांची परंपरा ते आस्थेवाईकपणे आजही चालवीत आहे.

६ व ७ ऑक्टोबर १९५७ — शं. के. कानेटकर


# सरदारगृह

(स्थापना सन १८९८)

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय

कारखानदार व व्यापारी बंधूना
मध्यवर्ती व सोईस्कर ठिकाण

प्रत्येक खोलीत स्वतंत्र बाथरूम व बालकनी

सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड
फुले (क्रॉफर्ड) मार्केटजवळ, मुंबई ४००००२

दूरध्वनि : ३१४३३७ तार : 'सरदारगृह' मुंबई २

# वाचनालय-ज्ञानाचे दिव्य चक्षु

लेखक : श्री. बाबासाहेब पुरंदरे

आपल्याकडे तीर्थक्षेत्रांना जेवढे महत्व आहे तेवढे महत्त्व हे युरोपमध्ये ग्रंथालयांना दिले जाते. ग्रंथालयाच्या बाबतीत लोकांच्या भावना फार उदात्त आहेत. खुद्द पॅरिसमध्ये एक ग्रंथालय आहे ते ओळखले जाते ' बिब्ली ऑथिक नेशोनेल ' या नांवाने. बिबली-ऑथीक या शब्दाचा अर्थ वाचनालय असा आहे ' आणि या ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या आहे साठ लाख. हे सर्व ग्रंथ अभ्यासकांना कोणत्याही क्षणी तेथे उपलब्ध आहेत. येथे अनेक अभ्यासक अभ्यासास येतात. मी स्वत: येथे मराठी इतिहासाच्या अभ्यासासाठी गेलो होतो. जसे या ग्रंथालयामध्ये छापील ग्रंथ आहेत तसेच गुजराथी कानडी आणि भारतीय भाषामधले ग्रंथ येथे आहेत. मोडी मधले हस्तलिखीते ज्यावेळी मी पाहिली त्यावेळी मी चकीतच झालो. पुण्यामध्ये चार्लस दि ओकोहोल यांनी इ. सन १८३०–३५ या काळात विष्णुशास्त्री बापट या नावाच्या पंडिताच्या मदतीने अनेक संतांची काव्यें, संत वाङ्मयाचा इतिहास, त्याचप्रमाणे मराठी वाङ्मयाचा इतिहासही हस्तलिखितात तयार करुन घेतला आणि त्यांनी तो इ. स. १८४२ मध्ये फ्रान्सला नेला. अर्थात नेत असतांना मात्र चार्लस दि ओकाहोल हे डायरी-याच्या विकाराने वाटेमध्येच गलबतावर म्हणजे जहाजात प्रवासात मरण पावले. परंतु हा सर्व ग्रंथ संग्रह मात्र आज ह्या गृहस्थांच्या नावाने म्हणजे चार्लस दि ओकोहोल या नावाने तेथे ठेवलेला आहे. यात शिवाजी महाराजांच्या बद्दल, काही प्रमाणात पेशव्यांच्या बद्दल, काही प्रमाणात शालिवाहन व यादवराजे यांचेबद्दल सुद्धा मोडीमध्ये खूप बखरी व इतर वाङ्मय आहे. तें फार मौल्यवान आहे.

या लायब्ररीतले माझ्या स्वत: बद्दलचे घडलेले एक लहानसे उदाहरण मी सांगतो. शिवाजी महाराजांचे एक अस्सल चित्र तेथे आहे. इ. स. १६८५ मध्ये मीर मोहम्मद या नावाच्या चित्रकाराने काढलेले चित्र. त्याची प्रत ही मुअज्जम हा जो औरंगजेबाचा मुलगा यांच्या पदरी असलेल्या या मीर मोहम्मद याने ती तयार केली. कोणा करता तयार केली ? तर इटली मधला व्हीनिसचा राहणारा निकोलोव मनुची यासाठी. हा एक प्रवासी व तोफखान्यावरचा उत्तम गोलंदाज–हा स्वत: एक डॉक्टर सुद्धा होता, तर त्याने ह्या काळाच्या मोगलांच्या इतिहासावर चार मोठे थोरले ग्रंथ लिहून ठेवले आहेत. त्या ग्रंथांचें नांव ' स्टोरी ओ डो मोगोल '. या ग्रंथांमध्ये शिवाजी महाराज, मिर्झाराजे जयसिंह, रामसिंग, शहाजहान, औरंगजेब इत्यादि त्या काळातील व्यक्तींची अस्सल विश्वसनीय अशी चित्रे काढून ठेवलेली आहेत. ही सगळीं रंगीत आहेत. यामध्ये शिवाजी महाराजांचे एक चित्र त्यांनी मीर मोहम्मदकडून तयार करुन घेतले आणि ही सगळी चित्रे त्याने त्या ग्रंथामध्ये समाविष्ठ केली आणि मूळ हस्तलिखित आणि ही चित्रे या ' बिबली ऑथिक नेशोनेल 'मध्ये आज ठेवलेली आहेत.

हे मूळचे चित्र मला बघायचे होते. पण मला त्याचा जो मूळ नंबर आहे लायब्ररीतला, तो मला माहिती असण्याची शक्यता नव्हती, मला माहीतही नव्हता. तेव्हा माझ्यापुढे प्रश्न आला आणि ते लायब्ररीतले क्युरेटर होते त्यांचे पुढेही प्रश्न आला की हे शिवाजी महाराजांचे चित्र आहे ते मी तुम्हाला देऊ कसे ? आमच्याकडे अशी चित्रे हजारोंनी आहेत. आणि खरोखर भारतामध्ये आपणाला पेंटिग्ज सापडणार नाहीत, इतकी पेंटिग्ज भारतीय इतिहासातली, मग ती धार्मिक सुद्धा आहेत, त्यांत कांही निसर्गचित्रं आहेत, कांही जनावरांची चित्रें आहेत, काही ऐतिहासिक चित्रे आहेत, अशातऱ्हेची काही रागदारीची चित्रें आहेत. अशा तऱ्हेची असंख्य चित्रे आज पॅरीसमध्ये आहेत. किंबहुना युरोपमधल्या प्रत्येक म्युझियममध्ये आहेत. या बाबतीत सगळ्यात दरिद्री देश म्हणजे खुद्द भारत. भारतामध्ये आपलीच चित्रे अत्यंत कमी आहेत.

मुद्दा असा की, यामध्यें शिवाजी महाराजांचे जे चित्र आहे ते काढावयाचे कसे ? तेव्हा मला असे आठवले कि ' स्टोरी ओ डो मोगोल 'ची प्रत असेल त्यात त्या चित्राचा नंबर दिला असेल. तेव्हा मी त्या क्युरेटरला असे सांगितले की ' स्टोरी ओ डो मोगोल ' चा तिसरा भाग जर मला दिला तर त्यात मला ते मिळेल. त्यांनी स्टोरी ओ डो मोगोलचा तिसरा भाग माझ्यापुढे आणून ठेवला होता पण तो होता १७०७ मधे छापलेला. हा पुस्तक तयार करणारा लेखक निकोलोव मनूची इ. स. १७०७ मधें त्यावेळेस भारतात होता, त्याचा मृत्यू १७१० मध्ये मद्रास मध्यें झाला. परंतु त्याने लिहिलेल्या १७०७ मधील ग्रंथाची हस्तलिखित प्रत युरोपमध्ये आलेली होती. आणि त्याचे भाषांतरही तेथे तयार होते. इतकेच नव्हे तर तो त्या ग्रंथांचा तिसरा भाग ५ ते ६ मिनिटात त्यांनी मला आणून दिला. मी थक्क झालो, त्याहीमध्ये चित्रेही आहेतच पण त्याहीपेक्षा विलक्षण म्हणजे त्यामध्ये भारताचा त्या वेळचा नकाशाही दिला आहे. इ. स. १७०७ मध्ये शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर फक्त सत्तावीस वर्षानंतर भारताचा आणि त्यापेक्षा महाराष्ट्राचा नकाशा दिला आहे. म्हणजे इतके जुने ग्रंथ तेथे जपले आहेत. असे हे बिबली ऑथिक नेशोनेल ग्रंथालय आहे आणि त्यामध्ये इतक्या जुन्या ग्रंथाची जपणूक केली आहे. ग्रंथालय ही अत्यंत महत्वाची राष्ट्रीय तिजोरी ते समजतात. अशा तऱ्हेची अनेक ग्रंथालये तेथे आहेत.

खुद्द पॅरिसमध्यें मोलीयर, डांटे, रुसो, व्होलटेअर असे अनेक नामवंत लेखक होऊन गेले. या लोकांचे हस्तलिखित ग्रंथ आणि त्यांनी लिहिलेल्या कलाकृती तेथे ठेऊन दिल्या आहेत. त्यात मोलीयरच्या नावाने किंबहुना त्याने निर्माण केलेले थिएटर तेथे आहे. आज या गोष्टीला ३२५ वर्षे होऊन गेली. आजही ते थिएटर सुस्थितीत आहे व आजही तेथे नाटकाचे प्रयोग होतात. नाटकांच्या संबंधीतील अत्यंत उत्कृष्ट दर्जाची लायब्ररी तेथें आहे. पाच पांचशे

लहानपणच्या सगळ्या स्मृती आज पुन्हा एकदा जाग्या झाल्या. बरं वाटलं.

८-११-७६ **बाळ कोल्हटकर**

आयुष्य हे देण्यासाठी आहे, घेण्यासाठी नाही.

या वाचनालयात आज मला जे पाहून समाधान झाले त्या वरून मला वरील ओळ सुचली. १२५ वर्षे संस्थेने वरील कार्य निर्विघ्नपणे पार पाडले. आणखी १०० वर्षे सुद्धा ही संस्था हेच कार्य करीत राहील अशी आशा आहे.

८-२-७८ **राजा गोसावी**

या वाचनालयाचा १२५ वा वाढदिवस लवकरच आपण साजरा करणार आहात. तो यशस्वी होवो. आमच्या शुभेच्छा आपल्या मागे आहेत

१७-११-७८ **सीमा देव**
**रमेश देव**

सहा सहाशे वर्षांपूर्वीची नाटकांची हस्तलिखिते, सर्व छापील नाटके, नाटककारांची चित्रे व प्रत्यक्ष अभिनय करीत असतानाची छायाचित्रे तेथे जपून ठेवली आहेत. खरोखर विविध विषयांची ग्रंथालये तेथे आढळतात.

खुद्द लंडनमध्ये ग्रंथालये म्हणजे एक विलक्षण प्रकार म्हणावा लागेल, प्रेक्षणीय प्रकार मानावा लागेल. इंडिया ऑफिस लायब्ररी ही लंडनमधील प्रख्यात लायब्ररी आहे. हिंदुस्थान विषयक आज सन १९७८ मध्ये किंवा येथून पुढच्या युगात जर कुणाला अभ्यास करावयाचा असेल तर या लायब्ररीच्याविना अभ्यास परिपूर्ण होणार नाही. असंख्य लोकांनी हिंदुस्थान बद्दल जे काही संकलीत केले आहे, लिहून ठेवले, अनुभवलं ते सर्व तेथे आहे. हस्तलिखिते आहेत, पत्रे आहेत, लो. टिळक, रंगो-बापूजी, चिपळूणकर, राजाराम मोहनराय (जगदीशपूरचे) सार्वजनिक काका, बहादूरशहा, कुंवरसिंह, अमरसिंह असे अनेक तऱ्हेचे विविध क्षेत्रात काम करणारे मग ते धार्मिक क्षेत्रातले असोत की राजकीय क्षेत्रातले असोत, सामाजिक क्षेत्रातले असोत, क्रांतिकारक क्षेत्रातले असोत, सत्ताधारी जुने असोत परंतु या सर्वांबद्दलचे रिपोर्टस्, त्यांचे ब्रिटिशांबद्दलचे म्हणणे बोलणे किंवा ब्रिटिशांचे त्यांच्या बद्दलचे अहवाल, अभिप्राय हे सगळे आपणास तिथे पहायला मिळतील. वासुदेव बळवंत फडके इतकेच नाही तर सातान्यातले भिडे गुरुजी यांच्या बद्दलची सुद्धा तिथे एक फाईल आहे हे वाचून आपल्यालाही विशेष वाटेल. त्यांनी अत्यंत जपून ठेवलेली आहे. आपल्याला त्या बद्दल अभ्यास करता येईल. रंगो बापूजी गुप्ते ही सातान्यामधील अत्यंत विख्यात व्यक्ती तिच्याबद्दल आपले दुर्लक्ष झालेले आहे. आपल्यापैकी कोणी त्याकडे लक्ष दिलेले दिसत नाही. फक्त प्रबोधनकार ठाकरे यांचे त्या विषयी एक पुस्तक आहे.

रंगोबापूजी विषयी तिथे इतकी कागदपत्रे आहेत की, रंगो बापूजींचे चरित्र लिहायचे झाले तर इंग्लंडलाच जावे लागेल लंडनलाच बसावे लागेल, अशी ही इतकी तिथे कागदपत्रे आहेत. लक्षावधी नव्हे कोटयावधि म्हटले तर चूक होणार नाही इतकी कागदपत्रे तिथे आहेत. त्याचे इंडेक्सिंग उत्तम रितीने केलेले आहे. आपल्याला पाहिजे ते उत्तम रितीने मिळू शकेल, आणि कोणाही अभ्यासकाला आज ते मुक्त आहे.

ब्रिटिश म्युझियम लायब्ररी हा सुद्धा लक्षावधि दुर्मिळ ग्रंथांचा एक प्रचंड खजिना आहे. या लायब्ररीत सर्व भाषेतले हस्तलिखीत आणि छापील सुद्धा असे ग्रंथ आहेत. मॅग्नाचार्टा ही तिथेच ठेवलेली आहे. मॅग्नाचार्टावरती सुट्टीचा दिवस सोडून रोज एक तास तिथ जाणकाराचे भाषण असते. आपल्याकडे हे सापडणार नाही. आपण खूप मोठ्या विषयांचे वारसाहक्क सांगणारे प्राचीन परंपरेचे संस्कृतीचे आपण हक्कदार आहोत यात शंकाच नाही. पण असे मात्र कधी केले नाही. दासबोधावरती किंवा ज्ञानेश्वरीवरती किंवा तुकारामाच्या गाथेवरती धार्मिक भूमिकेवरून तरी रोज प्रवचन होतय असं घडणारी गांव महाराष्ट्रात तरी क्वचितच सापडतील. मग शास्त्रीय पातळीवरून अभ्यास करणारी अशी ग्रंथालये किंवा संस्था यासुद्धा आपल्याकडे फार दुर्मिळ आहेत. परंतु त्यांच्याकडे मात्र मॅग्नाचार्टावर रोज एकतास व्याख्यान देणारी जाणकर माणसे असतात. याच लायब्ररीत मराठी, कानडी अशी हस्तलिखिते सुद्धा विपुल आहेत. ब्रिटीश म्यूझियम लायब्ररी ही लक्षावधी ग्रंथ असणारी प्रचंड लायब्ररी आहे. हे या लायब्ररीचे वैशिष्ठ्य आहे.

लंडन शहरात आणखी एक लायब्ररी आहे ती फक्त वृत्तपत्रांची आहे. वृत्तपत्र ही चळवळ युरोपमध्ये आणि विशेषतः ब्रिटनमध्ये सुरू झाल्यापासून प्रत्येक वृत्तपत्राचा प्रत्येक अंक तिथे ठेवलेला आहे. आपण कोणतेही वर्ष, दिवस वर्तमानपत्राचे नाव उच्चारा ते पाच मिनिटाच्या आत आपल्यापुढे मूळ वर्तमानपत्राचा अंक वाचून ठेवतील. आता त्याचे मायक्रोफिल्मिंगही झालेले आहे. त्या दृष्टीने हा देश फार पुढे गेलेला आहे. पु. ल. देशपांडे नी मला एक आठवण सांगितली. अर्थात ती आठवण अमेरिकेतील होती. परंतु ती ग्रंथालयाबद्दल होती. एकदा ते लायब्ररीमध्ये गेले आणि १९२० मधील म्हणजे आपल्या जन्मदिनावेळची फाईल आहे का आणि जन्मदिवसाचा केसरीचा अंक आहे का याची चौकशी केली. योगायोगाने त्या दिवशी केसरी प्रसिद्ध झाला होता. त्यावेळी केसरी आठवड्यातून दोनदा प्रसिद्ध व्हायचा, एकदा प्रसिद्ध व्हायचा. परंतु त्यांनी मागितलेल्या अंकाची फाईल अक्षरशः दोन मिनिटाच्या आत त्यांचे हातात ठेवली. मग त्या क्युरेटरने त्यांना विचारलं तुम्ही हीच तारीख का सांगितली ? तेव्हा ते म्हणाले या दिवशी माझा जन्म झाला. आणि तो अंक इथे आहे का याचे कुतुहल म्हणून मी तो अंक पाहिला.

अशी इंग्लंडमध्ये, युरोपमध्ये खूप विषयांची ग्रंथालये आहेत. नवीन पुस्तके तयार होतात. नेपोलियन या एका विषयांवर किती ग्रंथ असतील ? एकूण ग्रंथाची संख्या आहे २ लक्ष २९ हजार. दरवर्षी कमीतकमी दहा ग्रंथ नेपोलियन या विषयावर प्रसिद्ध होतात. मी एक ताजा फ्रेंच भाषेतील नेपोलियनवरचा ग्रंथ पॅरिस मध्ये पाहिला. त्या ग्रंथाचे नाव होत ' द फेमस कॅंपेनस ऑफ नेपोलियन. ' हा ग्रंथ ज्या स्कॉलरने तयार केला त्यानं पंचवीस वर्षे मोहिमांचा अभ्यास केला आणि तो ग्रंथ लिहिलेला आहे. पण आश्चर्य तेही नाही त्या पलिकडील आश्चर्य म्हणजे हा ग्रंथ झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत त्याचे उत्कृष्ट दर्जाचे इंग्लीशमध्ये भाषांतर प्रसिद्ध झाले. आपलेकडे मूळ मुळी ग्रंथच निर्माण होत नाहीत. आणि तो मूळ ग्रंथ जरी एखाद्या भाषेत निर्माण झाला तरी खपत नाही. मग त्याची भाषांतरे होणेचे तर दूरच राहीले ! अशी एकंदर स्थिती आहे.

शेक्सपीयरच्या सर्व ग्रंथाचे किंवा नाटकाचे म्हणा– कथांचे ग्रंथालय हें स्ट्रेटफोर्डला आहे व अशी ही ग्रंथालये ही समृद्ध आहेत.

प्रत्येक चर्च मध्ये जवळ जवळ मूळ ग्रंथांच्या प्रति आहेत. जुन्यातल्या जुन्या हस्तलिखीत व छापील बायबलच्या प्रति तेथे आहेत त्या जेंव्हा मी पाहिल्या तेव्हा मी विस्मित होऊन गेलो. पहा केवढे करुन ठेवले आहे यानी ! पण अशा तऱ्हेचा आपणाकडे उपक्रम काही लोकानी केला नाहीच असे नाही. काही लोकांनी केलेला आहे. उदाहरणार्थ, आमचे समर्थ भक्त शंकरराव देव यांनी समर्थांच्या वाङ्मयाचे एकत्रिकरण करणेचा प्रयत्न धुळचाला वाग्देवता मंदीरात केला, आणि तो आज अस्तित्वात आहे. दुर्दैव हे आहे की आज पाच कोटींच्या महाराष्ट्रातून कोणाचे लक्ष मात्र त्याच्याकडे जात नाही. आज तो ग्रंथ संग्रह म्हणजे न वापरणेचे दागिने असावेत असा तो तेथे आहे. एका सगळयात मोठया ग्रंथालयाचा मी उल्लेख करतो व थांबतो. मँचेस्टरला एक ग्रंथालय आहे. ते अर्थात ब्रिटीशांचे ग्रंथालय आहे. व त्या ग्रंथालयात सहसा कोणी येऊ नये अशीच तेथल्या चालकांची इच्छा असते की काय असे वाटते. एखादा हॉस्पिटल मधला सीरियस पेशंटचा विभाग जसा असावा तसे ते ग्रंथालय आहे. अत्यंत दुर्मिळ नाजूक झालेले असे ज ग्रंथ आहेत ते तेथे ठेवलेले आहेत. त्या ग्रंथाची काळजी अशा सीरियस पेशंट सारखी घेतली जाते. आणि तेथे जर कोणी अभ्यासाला आला तर त्या ग्रंथालयांत अभ्यास करण्याची परवानगी अशा अभ्यासकाला द्यायची काय आवश्यकता आहे याची प्रथम चिकित्सा केली जाते आणि जर त्यांनी सांगितले की, होय अशा इ. सनाच्या अकराव्या शतकात निर्माण झालेल्या अशा अशा ग्रंथाची प्रत मला बघावयाची, अभ्यासायची आहे, त्यासाठीं आवश्यकता आहे. तर त्या ग्रंथाची प्रत दुसरीकडे कोठे आहे का हे पाहून त्याला असे सांगितले जाते की, तिकडे लंडनला जा, लिस्बनला जा, बर्लिनला आहे तिकडे जा, इत्यादि. इतकेही करून जर कुठे नसेल तर त्याला त्या ग्रंथाची प्रत दाखविली जाते व मग दक्षतापूर्वक प्रत्येक पानन्पान काळजीपूर्वक पाहून त्याचे पुढे ठेवले जाते. शक्यतो मायक्रो फिल्म केलेली प्रत त्याला दाखवली जाते, मग मूळ प्रत दाखवितात. इतका दक्षता घेतात की ग्रंथालयाला आग लागू नये, कुठल्याही रीतीने नासाडी होऊ नये कीटक व वाळवी या सारख्या प्राण्यांकडून खराबी होऊ नये अशा प्रकारे दक्षता घेतली जाते. तसेच त्याची चोरी होऊ नये, अभ्यासकांनी ते अत्यंत काळजीपूर्वक हाताळावे अशासाठी तेथे प्रत्येक दालनांत त्याला संरक्षक आहेत, त्यांचे जाणकार अभ्यासक आहेत. अशा तऱ्हेने तेथे ग्रंथालय ठेवले जाते.

अशी ग्रंथालये खूप आहेत. त्या शिवाय ब्रिटीश म्युझियम आहे. इंपिरिअल म्युझियम आहे. प्रत्येक विषयाचे, विशेषत: लष्करी विषयाचे ग्रंथालय इतके मोठे आहे की त्या ग्रंथालयात आपण हिंडायला लागलो की असे वाटायला लागते की रणांगणावर तोफा वापरल्या नसतील इतके त्यावर ग्रंथ येथे आहेत. ग्रंथालय जवळजवळ हे तिथल्या संस्कृतीचा गाभा समजतात. मी एक लहानसा अनुभव सांगतो, ज्ञानाच्या बाबतीत ही मंडळी किती सावध असतात, तळमळत असतात. मी जर्मनीत एका कारखान्यात गेलो होतो. इलेक्ट्रिक साधनांचा होता, कुतुहल म्हणून गेलो तेव्हा तेथे तिथला स्टाफ कमी करणेची त्यांची योजना चालली होती, मंदी आहे इत्यादि कारण होते. मी मॅनेजरला–दुभाषा मार्फत-विचारले की तुम्ही

> वाचनालयाची प्रगती पाहून समाधान वाटले. सदस्यांची वाचनाभिरुची, ज्ञानलालसा आणि कार्यकर्त्यांचा साक्षेप यामुळे हे वाचनालय उत्तरोत्तर अधिक उत्कर्ष करील असा भरवसा वाटतो.
>
> २९–४–७६ — भारदे

स्टाफ कमी करता तेव्हा तुमचे धोरण काय असते ? याचा परिणाम बेकारी वगैरे होत नाही का ? पण ते म्हणाले की आमचा एक विभाग असा आहे की तेथे मात्र आम्ही तो कधी कमी करीत नाही. टंचाईच्या काळात देखील तेच. उलट तज्ञ माणसे मिळाली तर आम्ही ती तेथे वाढवतो. तो विभाग म्हणजे लॅबोरेटरी. तेथे नवीन ज्ञान निर्माण होत असते. नवीन निष्कर्ष निघत असतात. ते पुढच्या व्यवसायाला उपयोगी पडतात म्हणून हा ज्ञानाचा जो विभाग आहे तो आम्ही कधीही बंद ठेवत नाही, कमी करत नाही. माझे डोक्यात कल्पना येते की हा ज्ञानाचा डोळा सतत ते उघडा ठेवतात व त्या बाबत ते दक्ष असतात. ग्रंथालये ज्ञानाची साधने वगैरे बद्दल ते दक्ष असतात. B. B. Corporation बद्दल ते म्हणतात : B. B. C. is the eye and ear of the British nation.

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा !

विश्वासाचे एकच ठिकाण–

**दि कराड सहकारी खरेदी-विक्री सोसायटी लि. कराड.**

मुख्य ऑफिस : मार्केट यार्ड, कराड.

फो. नं. २६८

| भाग भांडवल | खेळते भांडवल | वार्षिक उलाढाल |
| --- | --- | --- |
| १६·७० लाख | ९६ लाख | १·४३ कोटी |

— ऑडिट वर्ग 'अ' —

शेती मालाची विक्री, रासायनिक खते, कापड, औषधे, खनिज तेले, जीवनावश्य वस्तू, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रीक मोटर्स व स्पेअर पार्टस्
योग्य भावात मिळण्याचे
एकमेव ठिकाण
व

**संस्थेचा दाणेदार मिश्रखत कारखाना**

एम्. डी. कुलकर्णी — मॅनेजर
रा. श. भोसले — व्हा. चेअरमन
ज. मा. पिसाळ — चेअरमन

# सातार्‍याच्या परिसरांतील एका कर्मठ विद्यापीठाची कथा

: सौ. दीपा गोवारीकर.

सातार्‍यांतील माहुलीजवळ असणारी श्रीकृष्णधाम येथील श्रीकृष्णदास महाराजांची समाधि म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात उदात्त ध्येयांनी प्रेरीत झालेल्या एका ध्येयनिष्ठ शिष्यपरिवाराची दिव्य आणि उद्‌बोधक अशी कहाणी आहे.

"नरनारीबाळ अवघा नारायण। ऐसे माझे मन करी देवा' या ब्रीदाचे कृष्णदासमहाराज मूळचे रत्नागिरीचे होत. पूर्वाश्रमीचे कृष्णदास गोगटे हे साधतुल्य वृत्तीचे नामांकित शिक्षक होते. १९०६ सालापर्यंत त्यांनी सांगली व कोल्हापूर येथे प्राथमिक मराठी शिक्षकाचे काम केले.

पुढे त्यांनी रामदासी पेशा पत्करला व ते माहुलीला आईसाहेबांचे घाटावर वस्तीसाठी आले. त्यांचेबरोबर त्यांचे दोघे शिष्य होते. चातुर्मासांत गुरुदेव दोघा शिष्यांसह कोरडी भीक्षा घेण्याचे व्रत घेऊन गांवोगांव फिरत. भ्रमणाचा उद्देश म्हणजे जिथे जिथे जावे तिथे तिथे समर्थ संप्रदायाचा प्रसार करणे हा असे. समर्थ संप्रदायाचा प्रसार हे प्रमुख उद्दीष्ट असले तरी वारकरी संप्रदायाची व ज्ञानेश्वरादि संतांच्या वाङ्मयाचीही त्यांना आस्था असे.

महाराजांनी या भ्रमंतीमध्ये मुळात परमार्थाकडे ओढा असणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांच्यात बालपणातच अध्यात्माची गोडी वाढवली. त्यातील कांही विद्यार्थ्यांनी त्यांना आपणहून गुरु केले व आजन्म त्यांचे शिष्यत्व मानले. विशेष म्हणजे या मुलानी विद्याभ्यासातील प्रावीण्य परमार्थ साधनेच्या आड कधीही येऊ दिले नाही.

" मी मुलांना देव मानतो " असे गुरुदेवांचे यथार्थपणे म्हणणे असे, इतकेच नव्हे तर देवादिकांची नावे असलेल्या आपल्या कांही शिष्यांची नावे गुंफून त्यांनी श्लोकांची रचना केली होती.

मुलांनी शिक्षण घेतलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे व आपल्या प्रसादपूर्ण वाणीने ते मुलांच्या मनावर आपले हे मत बिंबवीत असत. " मी तुमच्या परमार्थाची काळजी घेतो व तुम्ही माझे राहिलेले शिक्षण पूर्ण करा " असे कळकळीचे मागणे ते त्यांच्या शाळकरी शिष्यांचेपाशी मागत. त्यांच्या बहुतेक शिष्यांनी त्यांची ही मनःपूर्वक इच्छा पूर्ण केली. त्यांतील दोघातिघांनी तर अत्युत्तम प्रकारचे यश संपादिले. त्यांपैकी चारदोन नांवे सांगायची तर प्राच्यविद्याविशारद डॉ अ. स. अळतेकर हे विश्वविख्यात किर्तीचे होत. त्यांचे ज्येष्ठ बंधु श्री. ग. स. अळतेकर मंडलिक सुवर्णपदक विजेते. हे दोघेही बंधु संस्कृत व इंग्रजीचे एम. ए. श्री. दादासाहेब पंडित हे संस्कृत इंग्रजीचे बी. ए. व दोन्ही भाषांवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व. जे प्रभुत्व विनोबाजी भाव्यांसारख्या चोखंदळ भाषाजाणकाराने तज्ज्ञाने निर्विवादपणे मान्य केले. श्री. मो. वा. जोगळेकर इंजिनिअर हे महाराजांचे निस्सीम चाहते तर मॅट्रिकला श्री. सी. डी. देशमुखांच्या खालोखाल नंबराने उत्तीर्ण झालेले. श्री. पी. डी. कुलकर्णी हे इंग्रजीबरोबर नामांकीत गणितज्ञ होते.

१९१० साली काही सरकारी अडचणीमुळे महाराजांनी आईसाहेब महाराजांचा घाट सोडला व ते तेथील जवळच्याच रामेश्वर घाटावरील राममंदीरात वास्तव्यासाठी गेले तिथे त्यांचा वास १९११ ते १९१५ सालापर्यंत होता. १९१५ साली महाराजांचे महानिर्वाण झाले.

महाराज हयात असेपर्यंत त्यांच्या शिष्यवर्गाची सुट्टीमध्ये एकत्र जमण्याची जागा म्हणजे माहुलीचा रामेश्वर घाट हा असे. शिष्यामध्ये यशवंतराव सबनीस बा. ल. शिवनामे, कृष्णा मास्तर, दादासाहेब पंडित, अळतेकर बंधू, मारुतीराव पालेकर मो. वा. जोगळेकर, नानासाहेब वेचलेकर, बापूसाहेब सहस्त्रबुद्धे ही नावे प्रामुख्याने आत्ता स्मरतात. श्रीकृष्णदास स्वामींचा सर्व शिष्यसमुदाय निष्कलंक चारित्र्याचा, राष्ट्रप्रेमी, निरलस व हाती घेतलेल्या कार्याला संपूर्ण निष्ठेने वाहून घेणारा होता. यापैकी प्रत्येकाने स्वतः निवडलेल्या क्षेत्रात सचोटीने लौकिक व नाव मिळवले.

महाराजांच्या निर्वाणानंतर गुरुबंधुना एकत्र जमावे ही आस वाटे. भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करून कार्य ठरवावे व पूज्य गुरुदेवांच्या चिंतनासाठी एकत्र यावे अशी उत्कट इच्छा वाटे. या वेळपर्यंत या शाळकरी मुलांचे वयपरत्वे कॉलेज युवकात रूपांतर झाले होते. गुरुदेवांनी जोपासलेली परमार्थाची गोडी मनामध्ये होतीच शिवाय एकीकडे लोकमान्य टिळक जाज्वल्य असे राष्ट्रप्रेम मनामध्ये वाढीला लावीत होते. जागेअभावी ही मंडळी आपला मेळावा कधी डेक्कन कॉलेजवर तर कधी गुरुबंधु अळतेकर यांचे घरी भरवीत असत.

शिष्यमंडळीना एकत्र संमेलनासाठी स्वतःची जागा हवीच असे प्रामुख्याने श्री. यशवंतराव सबनीस, दादासाहेब पंडित, पी. डी. कुलकर्णी या मंडळीना वाटू लागले. व या इच्छेतून श्रीकृष्णधामच्या आश्रमाचा जन्म झाला.

मेळाव्याची जागा गुरुदेवांचे समाधीपाशी असावी हे सर्वस्वी औचित्यपूर्ण होते या दृष्टीने १९२२ साली कृष्णधाम मंडळाची स्थापना झाली. गुरुदेवांची समाधि व तिच्या भोवती पक्क्या विटांचे देवस्थान बांधण्यात आले. थोड्या दूर अंतरावर पाच खणी राहती जागा बांधली. आश्रमाची प्रमुख वैशिष्टये म्हणजे जातिभेदाला संपूर्ण फाटा व महात्माजींच्या मूलोद्योगाची जोपासना संस्थेच्या सर्व आर्थिक गरजा संस्थापकांनी दरवेळी स्वतः निभावून नेल्या. " द्यायचे पण मागायचे नाही " हा बाणा असल्याने फंड कधी गोळा केला नाही. तसेच शिष्यवर्ग केवळ सातार्‍यापुरता मर्यादित नसून विदर्भापर्यंत त्याची मर्यादा पसरली आहे.

सातार्‍यांत स्थापना झालेल्या संस्थेचा प्रपंच विदर्भात कसा पोचला ही घटनादेखील शिष्य वर्गाच्या कार्यप्रवणतेची साक्ष देण्याच्या दृष्टीने अत्यंत बोलकी आहे.

१९२० साली महात्मा गांधींनी जेव्हा सरकारविरुद्ध असहकारिता पुकारली, आणि सरकारी व त्यांच्या मदतीच्या शाळा, कॉलेजवर आणि कोर्टावर बहिष्कार पुकारला तेव्हा पी. डी. उर्फ आबासाहेब कुलकर्णी हे दुसऱ्या एल्. एल्‌बी. चा अभ्यास करीत

नगर वाचनालय, सातारा ह्या सुप्रतिष्ठित संस्थेला भेट देण्याचा योग जुळून आला. संस्थेच्या कार्यकर्त्यांची तळमळ आणि ध्येयवादिता नजरेत भरली. वाचनालयातील चांगला ग्रंथसंग्रह नि टापटीप पाहून समाधान वाटले.

२९-११-७६ **विद्याधर गोखले**

होते. दादासाहेब पंडीत हे बी. ए. झाले होते. बापूसाहेब सहस्त्रबुद्ध यांनी आकोल्यास सरस्वतीमंदिर ही राष्ट्रीय शाळा आधीच सुरु केली होती. बापुसाहेबांनी महात्माजींच्या आदेशानुसार लॉ क्लास सोडून आबासाहेबांना अकोल्यास बोलाविले. श्री. शिवनामे, दादासाहेब पंडित व कृष्णा मास्तर यानाही या शाळेच्या कार्याच्या उभारणीसाठी बोलावून घेतले. राष्ट्रीय शाळेला सढळ मदत मिळण्याची विदर्भात अनुकूल स्थिती होती. श्रीकृष्णदास महाराजांचा हा ( वर उल्लेखिलेला ) सर्व शिष्यगण सत्वर तेथे गेला, राष्ट्रीय शाळा तेथें स्थापण्यात आली. आणि तितच सरस्वती मंदीर समाविष्ट होऊन 'टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदीर' या नावे ही शिक्षण संस्था वाढीस लागली.

तिचे हायस्कूल हे गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणच नव्हे तर भोजन आणि निवास देणारे गुरुकुलासारखे अद्वितीय शिक्षणगृह झाले. ते हायस्कूल पुण्याच्या टिळक विद्यापीठास निगडीत करण्यात आले व स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते मुंबई विश्वविद्यालयास जोडण्यात आले ह्या संस्थेला दोन उत्तम पाणीपुरवठा असणाऱ्या विहीरी असलेली सुमारे पस्तीस एकर जमीन मिळाली. त्यामुळे शेतीचे शिक्षण व प्रत्यक्ष सरकी काढण्यापासून ते खादीचे कापड तयार करणारी खादीची शाखा, लेथ वगैरे यांत्रिक सामुग्रीने शिक्षण देणारी औद्योगिक इंजिनिअरिंगची शाखा, दुभत्या गाईंच्या संगोपनाची शाखा अशा काढण्यात आलेल्या असून बौद्धिक शिक्षणाबरोबर कोणत्या तरी एका व्यवसायाचे शिक्षण तेथील विद्यार्थ्यांना घ्यावे लागते. विद्यार्थ्यांनी पाळचा ठरवून स्वयंपाक करणे, वाढणे, सारी निरवानिरव स्वत: करणे या गोष्टी पार पाडून आपल्या सर्व गरजा आपण स्वतः काम करून भागवाव्या लागतात. शारिरीक शिक्षण, शिस्त व स्वावलंबनाचे इथे कसोशीने पालन केले जाते.

गांधीजींचे एकनिष्ठ थोर अनुयायी अण्णासाहेब सहस्रबुद्धे हे ह्या संस्थेचे कांही काळ अध्यक्ष होते. भारताच्या अनेक थोर पुढाऱ्यांनी नमुनेदार राष्ट्रीय शाळा म्हणून हिची वाखाणणीं केली आहे. अनेक राष्ट्रीय शाळा असहकाराच्या युगांत निघाल्या व कांही लयासही गेल्या. पण ही संस्था आपल्या व्यावसायिक उपांगासह आजच्या घटकेसही जोमाने चालू आहे. राष्ट्राभिमानी व निरलस नागरिक तयार करीत आहे.

अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचा हा सर्व प्रपंच कांहीसा विस्ताराने वर्णन केला कारण राष्ट्रीय शाळा कृष्णधाम आश्रमाला आपली गंगोत्री मानते व आश्रमांच्या गरजांकडे जातीने लक्ष पुरवते. उच्च ध्येयाने प्रेरीत झालेला कार्यकर्त्यांचा मेळावा मूलतः कृष्णस्वामी महाराजांच्या उदात्त ध्येय प्रणालीवर वाढला होता हे इथे विसरता येत नाही. त्यामुळे कृष्णधाम आश्रमाचे महत्व अधीकच वाढते हे लक्षांत घ्यावे लागते.

कृष्णधाममध्ये १९३६ साली श्री. मो. वा. जोगळेकर यांनी स्वतःचे तज्ज्ञ नेमून आश्रमाचे सिमेंटचे पक्के बांधकाम करून दिले. १६×३० असा मंडप व २४×१२ असे देवस्थान ही अंदाजे मापे आहेत. खेरीज पांच खणी घर थोडया अंतरावर आहे. कृष्णा नदीचे काठी व जरंडेश्वराचे समोर ही पवित्र वास्तु उभी आहे. आश्रमाच्या दोन एकर जागेमध्ये भाजीपाला, भुईमूग, कडधान्य यांची लागवड होते. फुलझाडे आहेतच.

ज्यांनी गुरुप्रमाणे प्रेरीत होऊन हा आश्रम उभारला त्यातील कांही निर्वतले. जे हयात आहेत ते शरीराने थकलेले आहेत. भोवतालचे "खुर्चीसाठी" चाललेले राजकारण पाहून मनाने व्यथीत झाले आहेत. त्यांतील कांहीनी तर आजन्म ब्रह्मचर्यपालन करून देशाचा प्रपंच केला. ज्या काळांत आणि ज्या निष्ठांनिशी त्या आश्रमाची स्थापना झाली त्याचे महत्व आज कितपत उरले आहे उमगत नाहीं.

तथापि हाच आश्रम काळाच्या गरजेनुसार नव्या निष्ठानिशी नव्या रुपामध्ये पालटू शकेल कां ? थकले भागलेले कृष्णा मास्तर आश्रमाची व्यवस्था आज पहात आहेत. तिथे नव्या जोमाचे रक्त पुनरुत्थानासाठी जाऊ शकेल कां ?

अशक्य नाहीं. वाण आहे ती केवळ निःस्वार्थीपणे राबणाऱ्या हातांची. काळाची गरज ओळखणाऱ्या कल्पकतेची.

— आणि चिरस्थायी मूल्यांवर श्रद्धा ठेवणाऱ्या मनांची !

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा !

कपडयांचे आयुष्य वाढविणारे सातान्यातील एकमेव व पहिलेच

: आदर्श धुलाई केंद्र :

## प्रभात पॉवर लॉन्ड्री

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

सर्व प्रकारचे कपडे इलेक्ट्रिक मशिनरीने धुलाई केलें जातात. तसेच वुलन, रेशमी आदी भारी कपडयांचे ड्रायक्लीनिंगची सोय.

स्पेशल स्टार्च टिनोपालची सोय तसेच जरुरीसाठी अर्जंट कपडे मिळणेची खास सोय.

व्यवस्थापक,
प्रभात पॉवर लॉन्ड्री, सातारा.

# स्वराज्य सेवक सातारा

लेखक : पु. पां. गोखले
कराड

सन १८०२ च्या वसईच्या तहाने रावबाजीने इंग्रजांचा मिंधेपणा पत्करला. तो शिवछत्रपतींच्या ध्येयधोरणास कमीपणा आणणारा होता. इसवीच्या १७ व्या शतकाचा सूर्य उमाठ्यावर आला आणि यरोपातील चार राष्ट्रांच्या तागडी–तुकाप्पा कंपन्या पोटभरू म्हणून हिंदुस्थानांत आल्या. त्यांचे पाय ओसरीला लागले. आणि अवसर सापडताच पसरू लागले परिणामत: ज्या कंपन्यांनी तराजूच्या संरक्षणार्थ तलवारीला हात घातला त्यांच्या तलवारीची टोक तख्तांच्या रोखाने फिरणार हे छत्रपती शिवाजी महाराजांनी ओळखले. म्हणूनच त्यांनी सुरत व राजापूर येथील इंग्लंडच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारी लूटून धडा दिला. रायगडावरील राज्याभिषेकाच्या वेळी गुडघे टेकून कंपनीच्या ऑक्सीडनने सवलती मागितल्या असता छत्रपतींनी त्याला चांगलेच सुनावले होते. छत्रपतींची ही सावधगिरी मराठी रियासतीत जोवर "भलें बुद्धीचे सागर नाना" होते तोवर सांभाळली गेली. मध्यंतरी कंपनीला प्लासीच्या लढाईनंतर बंगालात राजकीय घर लागला होता. दिल्लीश्वराची दाढी सुद्धा मराठी रियासतीच्या वरकंदाजाकडून हालते हे कंपनीच्या तेव्हाच लक्षात आले होतें. म्हणून १८०० साली मराठी रियासतीतील फडणीशी पल्लेदारपणा संपलेला आढळताच कंपनीने वसईचा तह केला. तो मराठी रियासतीला सुरुंगच लागला.

हे आपले नाही. सातारच्या ( दुसरे ) शाहुमहाराजांचे बंधु चतुरसिंग भोसले यांना त्यांनी इंग्रजाविरुद्ध उठाव करण्याचे ठरवून मराठी रियासतीतील सरदार दरकदार, संस्थानिक यांचा सहकार मिळविण्याचा प्रयत्न केला. नागपूरकर भोसल्यांनीच फक्त तो दिला. पण अशिरगडच्या लढाईत पराभव पावून चतुरसिंग इंग्रजांचे युद्धकैदी झाले व त्यांच्या कैदेतच १८१५ साली हुतात्मा म्हणून देवाचरणी रुजू झाले. दरम्यान १८०८ साली प्रतापसिंह भोसले सातारच्या गादीवर आले आणि त्यांनी रंगो बापूजी मार्फत बाजीरावाने नासलेली डाळ सुधारण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांच्या बरोबर येथे आलेल्या पाश्चिमात्य सुधारणांपैकी लष्करी शिक्षणासुद्धा सर्व हक्क स्त्रियांना बहाल करून प्रतापसिंहांनी कारभार चालविला तो इंग्रजांनाही थक्क करून सोडण्यासारखा. पण १८१८ त पेशवाईची परिसमाप्ती करून इंग्रजांनी प्रतापसिंहांना जुन्या १४ पेट्यांच्या राज्याचा राज्याभिषेक पुन्हा केलाच. शिवाजीची गादीच उखडण्याचा डाव खेळण्यासाठी फासा टाकला.

राजांचा व रंगोबापूजींच्या लक्षात ते आल्यावर त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या कलकत्याकडील मुख्याधिकाऱ्याकडे न्याय मागण्यास सुरवात केली. पण गोव्याकडील पोर्तुगीजांना सामील असल्याचा आरोप साताऱ्याच्या गादीविरुद्ध लादून, उमाजी नाईकाच्या बंडात काही सातारकर असल्याचे घटीत जमेत धरून व प्रतापसिंहांना गादीवरून दूर करावयाचे ठरवून कंपनीने १८३९ साली प्रतापसिंहांना काशीस स्थानबद्ध केले व त्यांच्या धाकट्या भावास सातारच्या गादीवर बसवले. तो १८४९ साली निधन पावल्यावर ऐनजिनसी सातारचे राज्यच कंपनीने खालसा केले.

या सर्व अन्यायाविरुद्ध दाद मागण्याकरता रंगो बापुजी इंग्लंडच्या पार्लमेंटकडे धाव घेऊन गेले. पण तेथे त्यांना न्याय मिळाला नाही. मग त्यांनी १८५७ च्या उठावात दक्षिण पेटविली. परमेश्वराची कृपा नव्हती व उठावाल्यांना नामोहरम होऊन अज्ञातवासात दिवस काढावे लागले. व तसेच देवाघरी जाणे आले. १८५७ च्या उठावानंतर इंग्लंडच्या राणीने कंपनीकडून सत्ता काढून घेऊन स्वत:ला हिंदुस्थानची बादशाहीण म्हणून जाहीर केले. पण दुष्काळग्रस्त प्रजेला वेळेला घासभर अन्नही मिळत नाही हे पाहून १८७८ साली वासुदेव बळवंत फडके यांनी इंग्रजी राजवटी विरुद्ध शस्त्र उपसले. त्यांच्या बंडात वाईपासून शिराळपेट्यापर्यंत सर्व सातारा जिल्हा सामील होता पुष्कळांना त्यापायी अंदमानही पहावे लागले. फडक्यांचा उठाव फसला तेव्हा नव्या काळाला जन्म देणाऱ्या उघड व गुप्त चळवळी हिंदुस्थानात सुरू झाल्या पण सार्वजनिक सभेने सुरू केलेली स्वदेशीची व शेतकरी दुःखविमोचनाची चळवळ इंग्रजी सत्तेकडून न्याय मागण्या करताच होती. तिचे लोण सातारा जिल्ह्यात आले होते. १८८५ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसचे नियमित वारकरीच कित्येक सातारकर बनले.

१८८९ सालापासून काँग्रेस ही इंग्रज सरकारच्या गुस्स्याचा व रोषाचा विषय बनली व त्यामुळें जसे इतरत्रचे काँग्रेसजन सरकारचे नजरबंद बनले तसे सातारचेही. त्यातच लोक संघटनेसाठी लोकमान्य टिळकांनी गणपत्युत्सव व शिवाजी उत्सव सुरू केल्याबर सरकार जहालराजकारण्यावर कटाक्ष ठेवू लागले. त्यातच प्लेग ( १८९६ ) मधील सरकारी अत्याचारामुळें पुण्यास रॅंड कलेक्टरचा फडशा चाफेकर बंधूंनी पाडताच सशस्त्र क्रांतीच्या गुप्त संघटनेचीही घोहोच सातारा जिल्ह्यात झाली. गणपती, शिवाजी उत्सवात पद्या बाडूनही भाग घेणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना नोकरीस मुकून भणभणा हिंडावे लागले. त्यातील काहींनी गोवा, दमण, दीव मार्फत जर्मनी जपानपर्यंत सूत जमवून इंग्रजी राज्याला धरणीकंप देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे 'असुनि जिवंतही मेल्याचे' सुख सोहळे त्यांना भोगावे लागले. २० व्या शतकाच्या आरंभापासून लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीस अनुसरून चळवळ करणाराबरही सरकार विरोध होऊ लागला; पण जहाल मवाळादी लोकपक्षीयांच्या सहकार–समन्वयाची समेट भूमी म्हणून १९०० च्या प्रांतिक परिषदेपासून सातारा जिल्ह्याने मिळविलेला लौकिक १९०६ साली सातारा जिल्हा परिषद स्थापन होऊन १९२४ अखेर टिकला.

२० व्या शतकाच्या आरंभापासून लो. टिळकांनी जोरावलेल्या स्वराज्य-स्वदेशी-राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळी समुद्रासारख्या आपल्या ' वेळा ' सांभाळून त्यांनी निर्माण केलेल्या लोक–जागृतीसह अशा तग धरून राहिल्या की, त्यांनी सरकारी सत्तेची आग झाली तरी बोंब मारण्याची सोय उरू दिली नाही. लो. टिळकांना मंडालेची व स्वा. वीर सावरकरांना दुहेरी जन्मठेपेची शिक्षा होऊनही सातारा जिल्ह्यातील लोकजागर नंदादीपासारखा तेवत राहिल्याचे प्रत्यंतर, लो. टिळक सुटून आल्यावर त्यांनी सुरू केलेल्या होमरूल चळवळीच्या वेळी बिनचूक आले. " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे तो मी मिळविनच, " हा महामंत्र टिळकांनी जनतेला दिला, त्याचा अर्थ " इंग्रजाचे अधिराज्य भारतातून गेलेच पाहिजे व त्याजागी भारतीयांचे लोकशाही अधिराज्य स्थापन होऊन भारतीय व्यक्तीमात्रास आपापले पात्रतासिद्ध प्रतिष्ठा स्थान मिळवता आलेच पाहिजे " असाच अर्थ सातारा जिल्ह्याने केला. त्या योगेच भारतात स्वराज्य म्हणजेच राम-राज्य नांदेल असा होईल. सातारा जिल्ह्याने त्या दिशेनेच आपल्या चळवळीची प्रगतोन्नती साधण्यात धीमेपणा दाखवला, भारताच्या स्वराज्य विषयक महत्वाकांक्षा मातीमोल करण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९१९साली जालियनवालाबाग हत्याकांड केले, त्यामुळे १९२० साली सरकारने देऊ केलेल्या मॉंटफोर्ड सुधारणा मोडण्याकरता राबवावयाच्या म्हणून विधिमंडळाच्या निवडणुकांची भाषा सुरू झाली. इतक्यात देशाचे दुर्दैव ओढवले व लो. टिळक कालवश झाले.

जालियनवालाबाग करणाऱ्या ब्रिटिश रियासतीला लोकशक्तीच्या कालिमातेच्या अवतार दाखवावा म्हणून आता राष्ट्राचे धुरीणत्व पत्करलेल्या म. गांधींनी ब्रिटिश रियासतीसाठी असहकार पुकारला. सर्वत्र सरकारी धोरणावर व यंत्रणेवर परिणाम करण्याकरिता असहकाराची कायदेशीर आवृत्ती म्हणून मध्यवर्ती असेंब्लीत लोकप्रतिनिधी शिरले. लोकपक्षीय अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल निवडून देण्यात व लॉर्ड रिटन साहेबाचा अर्थसंकल्प फेटाळण्यात १९२५ साली साताऱ्च्या सरदार मुतालिकांच्या निर्णायक मताने लोकपक्षाचे यश प्रस्थापित झाले. १९२७च्या मद्रास कॉंग्रेसमध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाला व सातारा जिल्ह्यानेही नवोदित शक्तीचे स्वागत केले.

इंग्रजी राजवटीला ते कसे सहन होणार ? तिने आपल्या नख्या आता तीव्रतम केल्या. भारताच्या एकजिनसी राष्ट्रत्वाला तडे जाऊन ते पिचत रहावे म्हणून हिंदू मुस्लिम आगळी उभ्या करण्याचे उपद्व्याप ब्रिटिश रियासत १८९० पासून करीतच होती. तिचे चटके सातारा जिल्ह्यातही १८९०,१८९३, १९०७, १९१३ व १९२२ साली चांगलेच बसले. मध्यतरी १९०४ साली लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी करून दुभंगाची आग भडकाविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पण तीव्र लोकक्षोभापुढे नमते घेऊन १९११ साली बंगालची फाळणी ब्रिटिश राजवटीला परत घ्यावी लागली होती. १९२७ साली कॉंग्रेसने स्वातंत्र्याचा पुकार करताच ब्रिटिश राजवटीने हिंदुस्थानातच नवीन मुस्लिमराष्ट्र उर्फ पाकिस्तान पिकवण्याची आढी घातली. त्याचवेळी आपली जागतिक प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी हिंदुस्थानला द्यावयाच्या नवीन राजकीय सुधारणांचे स्वप्न ठरवावे म्हणून एका बाजूने सायमन कमिशन नेमले व दुसऱ्या बाजूने भारतातील सर्व राजकीय पक्षांनी

वरच्या मजल्यावर ज्ञान वितरणासाठी सभा व खाली ज्ञानाची साधने ही व्यवस्था मोठी नामी आहे. शिक्षण प्रसारास वाचनालय फार मोठी मदत करत आहे.

२७–१२–५७ कमलाबाई देशपांडे

एकमत करून राजकीय हक्कांची मागणी केल्यास तिचा विचारकरण्याचे आश्वासन दिले. भारतीय जनतेने ही आव्हाने स्वीकारली. पं. मोतीलाल नेहरू समिती नेमून सर्व पक्षीय एकमुखी मागणीने " तूर्त पण ताबडतोबीचे स्वराज्य " विशिष्ट योजनेने मागितले. त्याचप्रमाणे केवळ गोऱ्या सायमन कमिशनवर बहिष्कारही टाकला. सायमन कमिशन वरील बहिष्कारात पंजाबसिंह लाला लजपतराय यांचा लाठीहल्याने व जबरीने बळी घेतला. त्यास कारणीभूत असलेल्या सँडर्सला भगतसिंग प्रभूतींनी स्वर्गवासी करून स्वत: हुतात्मा पद पत्करिले.

भगतसिंग प्रभृतींचे पोवाडे सातारा जिल्ह्यातील शाहिरांनी सर्व महाराष्ट्रभर मुक्त कंठांनी गायले. त्यास बरोबर एकमुखी नेहरू रिपोर्टचेही प्रतिपादन आणि प्रचार खेड्यापाड्यापर्यंत नेऊन भिडविला. नेहरू रिपोर्टला ब्रिटिश राजवटीने प्रतिसाद न दिल्याने १९२९ च्या कॉंग्रेसने स्वतंत्र आणि स्वातंत्र्यताच मिळण्याचा ठराव मुक्रर केला. त्यास अनुसरून २६ जानेवारी १९३० रोजी भारताच्या सर्व खेड्यापाड्यातून स्वातंत्र्याचा जाहीरनामा तळाच्या लोकापर्यंत समजून, समजावून आणि निश्चयाने मने तयार करून जनता जागृत करण्याची व्यवस्था झाली. सहाजिकच सातारा जिल्हा जाहीरनाम्याने दुमदुमून गेला व सर्व तरुणवर्ग एका नव्या नेटाने मोहरला.

मग स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जनतेकडून प्रत्यक्ष चळवळ महात्माजींनी उभारली. प्रथम फ्रेंच राज्य क्रांतीने इंग्रजांना परिचित असलेल्या पानावरील ( टेबल ) मिठाचा सत्याग्रह व नंतर जंगलचा सत्याग्रह पुकारण्यात आला. मीठ व जंगल यांच्या बाबतचे अन्याय कायदे तोडण्यात आले. त्यात सातारा जिल्ह्याचे शेकडो सुपुत्र व सुकन्या बंदिवासात पडल्या. तांबवे ( ता. कराड ) येथील कसाई परदिणीने व बिळाशी येथील जनतेने जो सत्याग्रह ( जंगल ) केला तो ब्रिटिश सरकारने बंड मानण्याइतका प्रखर झाला, तेव्हाच इंग्लंडात गोलमेज परिषदा भरवून नव्या राजकीय सुधारणा देण्याचे नाटक ब्रिटिश राजवटीने उभारले होते. त्यात सनातन्यांचेतर्फे कराडचे नानासाहेब देशपांडे गेले होते. पण कॉंग्रेसने गोलमेज परिषदेवर बहिष्कार घातल्याने ' डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय हॅम्लेट ' नाटक व्हावे तशी गोलमेज परिषदेची स्थिती झाली. म्हणून १९३१ साली एका बाजूस कॉंग्रेसतर्फे म. गांधी व इंग्रज राजवटीतर्फे लॉर्ड आयर्विन यांच्यात बरोबरीच्या नात्याने करार होऊन गांधीजींना दुसऱ्या गोलमेज परिषदेस नेण्यात आले. पण संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय काहीच मागायचे नाही व घ्यायचेही नाही असा भारतीयांचा ठाम निश्चय असलेल्या म. गांधींनी तेथे ब्रिटिश राजवटीने हिंदुस्थानवर केलेल्या अंमलाचे भयानक वर्णन करून संपूर्ण स्वातंत्र्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

त्यामुळे ब्रिटिश राजवट पुन्हा चिडली आणि भारतावर १९३२ साली पुन्हा कायदेभंग चळवळ अन्याय प्रतिकाराचं करण्याची पाळी आली. या दुसऱ्या चळवळीतही सातारा जिल्ह्याने हिरिरीने भाग घेतला. तोपर्यंत इंग्लंडमध्ये तिसरी गोलमेज परिषद होऊन १९३५ साली काही नवीन राजकीय सुधारणा येण्याचे मुक्रर झाले. त्या नव्या सुधारणा कायद्यानुसार विधिमंडळाच्या चौकटीतही परकीय सत्तेशी दोन हात करण्याचे भारताने ठरविले. सातारा जिल्ह्यानेही त्या नव्या निवडणूकीत हिरिरीने भाग घेऊन आपले राष्ट्रीय प्रतिनिधी निवडले. निवडणूकीनंतर ११ पैकी ८ प्रांतात काँग्रेसला बहुमत मिळाले. तेव्हा मंत्रीमंडळाच्या दैनंदिन कारभारात राज्यपालांनी हस्तक्षेप करू नये या अटीवर सत्तेशी झगडा सुरू झाला. परिणामतः राजवटीने अल्प संस्थातून मंत्रीमंडळे बनविण्याचा अट्टाहास केला. मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री धनजीशहा कूपर झाले. त्यांच्या चार महिन्यांच्या कारकिर्दीत स्वातंत्र्यवीर सावरकर निर्बंधमुक्त झाले. पुढ काँग्रेसची मंत्रीमंडळे आली पण दीड एक वर्षात युरोपमध्ये हिटलरी होरपळ सुरू झाल्याने हिंदुस्थानही युद्धमान असल्याचे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. साहजिकच काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. पुढे ब्रिटिश राजवटीच्या नजरबंदीतून शिताफीने सुटून सुभाषचंद्र बोसांनी युरोपचा दौरा केला व भारताचे आझाद सैन्य उभारून सिंगापूरला 'चलो दिल्ली' ही घोषणा केली. भारताच्या सर्व खेड्यातून ही घोषणा तरुणांनी अंगिकारली. सातारा जिल्हाही त्यात मागे नव्हता. म. गांधीनी सुरू केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहातून व १९४२ साली सुरू केलेल्या 'चले जाव' चळवळीतून साताऱ्याने एवढ्या उत्साहाने भाग घेतला की तुरुंगाचे दरवाजे ओलांडून किसन वीर, पांडू मास्तर प्रभृती लोक बाहेर आले व अनेकानेक सहकाऱ्यांच्या बरोबरीने 'प्रतिसरकार' स्थापण्याच्या मार्गास लागले.

"अगे कारभारणी सोडून सगळा कामधंदा
स्वराज्य मिळवावयाचे आहे यंदा"

अशा निश्चयाने सातारा जिल्ह्यात एवढा उठाव झाला की, ब्रिटिश सरकार हादरले व पं. नेहरू 'जय सातारा' म्हणून गौरव करू लागले. अन्न, वस्त्र, शिक्षण, संरक्षण व न्याय या बाबत स्वराज्य सरकार लोकांची सेवा कशी करू शकेल याचा प्रत्यय भारतातील फक्त ११ जिल्ह्यातील प्रतिसरकारांनी असा आणून दिला की हिटलरी होरपळीचा बोंवट १९४५ साली होताच ब्रिटिश राजवटीने आपल्या राजकीय पारतंत्र्यातून अखंड भारताला सोडण्याचे ठरविले. आपण उगाळून ठेवलेली पाकिस्तानची विषवल्ली भारताच्या एकजिनसी राष्ट्रीयत्वाला तडा देऊन बसली होती तरी भारतीय मुस्लिमांचे पाकिस्तानही जागतिक प्रवृत्तस्वतंत्र राष्ट्र म्हणूनच मुस्लिमांना हवे होते याची पक्की गाठ ब्रिटिश राजवटीला झाली होती. हिंदुमुस्लिम एकमताने अखंड भारताचे स्वातंत्र्य संभाळण्यास तयार होत नाहीत असे अनुभवपूर्वक आढळल्यावर लोकमताचा प्रत्ययही १९४६ च्या विधिमंडळ निवडणूकांनी घेण्यात आला. त्यामुळे १९४७ च्या १४ ऑगस्ट रोजी पाकिस्तान व १५ ऑगस्ट रोजी स्वतंत्र भारत अशा दोन राष्ट्रांची निर्मिती व वहिवाट सुरू झाली. 'गड आला पण सिंह गेला' या वचनातील वेदनेनेच सातारा जिल्हा नवीन परिस्थितीशी जुळते घेऊन बसला. मग मुंबई प्रांताच्या कारभारात श्री. गणपतराव तपासे व (१९४८ साली संस्थाने विलीन झाल्यावर) फलटणचे राजे मालोजीराव निंबाळकर हे मंत्री म्हणून

उद्याच्या नागरिकांसाठी वाचनालय बजावीत असलेली सेवा मोलाची आहे.

३-३-६२ दत्ता सराफ

श्री. यशवंतराव चव्हाण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून लक्ष घालू लागले. काळाच्या ओघात यशवंतराव चव्हाण पुढे गुजरात व महाराष्ट्र या द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले व १९३७ साली त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्ण कलश आणला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर काही काळाने यशवंतराव मध्यवर्ती सरकारात संरक्षण मंत्र्यापासून परदेश मंत्र्यापर्यंत कालौघाच्या अपेक्षेप्रमाणे हरएक खात्याचे मंत्री म्हणून कारभार करू लागले. १९७७ च्या मध्यवर्ती निवडणूकी नंतर विरोधी पक्षाचे नेते म्हणूनही ते गाजले. १९७८ त परिस्थिती पालटली व साधे खासदार म्हणून काँग्रेस पक्षाचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी यांनी पत्करली.

यशवंतरावजींच्या चढत्या वाढत्या पदवीच्या काळात मध्यवर्ती असेंब्लीत सातारा जिल्ह्याचे श्री. आनंदराव चव्हाण राज्यमंत्री पदापर्यंत चढले व श्री. दादासाहेब आळतेकर यांनी अनेक विषयांवरील चिकित्सक वादपटू म्हणून नांव कमावले. महाराष्ट्राच्या प्रांतिक असेंब्लितही दादासाहेब जगताप यांना दोन वेळा मंत्री म्हणून काम करण्याचा मोका मिळाला व श्री. व्ही. एन. पाटील यांनी कारभार कुशलतेचे विरोधी टीकाकार म्हणून नांव केले. यशवंतरावजी चव्हाण पार्लमेंटरी सेक्रेटरी असतांनाही (१९४६ ते १९५२) श्री. बुवासाहेब गोसावी यांनी विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस म्हणून केलेली कामगिरी लोकप्रिय ठरली. श्री. त्र्यंबकराव पवार यांचा स्वतंत्र महाराष्ट्र मागण्याचा ठराव व बाबुराव गोखले यांची मर्मप्रश्नके लोकांच्या व वृत्तपत्रांच्या गौरवास पात्र ठरली. तात्पर्य स्वराज्याच्या ३१ वर्षात कारभार कुशलतेशी ज्यांचा ज्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध आला त्या त्या साताऱ्च्या सुपुत्रांनी ती कारभार कुशलता 'बहुजन सुखाय बहुजनहिताय' कशी सन्मुख होईल हे पहाण्याचा सेवायोग साधला एवढेच नव्हे तर कारभार कुशलतेशी संबंध सरल्यावरही जलमंदिर प्रकरणी भाऊसाहेब सोमण व आणीबाणीच्या टणकावणीत बाबुराव गोखले यांनी शासनाला निःस्पृहपणे तोंड देण्याचे धाडस जिल्ह्याच्या इतिहास प्रसिद्ध परंपरेला धरूनच दाखवले. त्याच प्रमाणे लोकसंग्रही सेवाभावामुळेच जनता सरकारच्या मध्यवर्ती कारभारातही श्री. गणपतरावजी तपासे यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली आहे.

स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीतही सोलापूर झेंडा सत्याग्रहासारख्या 'धमपाश गळ्याशी लावणाऱ्या दारुण प्रसंगात' धिटाईने, शिस्तीने श्री. दामुअण्णा एकबोटे सारख्याने पराक्रम केला होता. त्याच सेवावृत्तीने व साहसाने स्वराज्य संचलनातून सुराज्य निर्मितीची तपश्चर्या सातारा जिल्ह्याच्या देशभक्तांनी चालविली आहे. लोकसन्मुख राहून लोक कल्याणकारी व्रताचे पालन करण्यात आणि महाराष्ट्रीय अस्मिता भारताच्या प्रतिष्ठावर्धक सेवेला लावण्याचे व्रत निष्ठेने पाळण्यात सातारकरांनी सदैव धन्यताच मानली आहे व मानतील.

☆ ☆ ☆

# नगर वाचनालय एक संस्कारपाठ

प्राचार्य शिवाजीराव भोसले.

सातारा हे तसे इतिहास प्रसिद्ध नगर. या नगराचा इतिहास अजूनही घडतोच आहे. या शहराच्या भरणपोषणात अनेक व्यक्ती आणि संस्था सहभागी झाल्या आहेत. त्यात नगर वाचनालयाचा वाटा मोठा आहे.

माझ्या विद्यार्थिदशेत मी नगर वाचनालयाकडे ओढला गेलो तो माझ्या वाचनाच्या छंदामुळे. संस्कारक्षम वयात उत्तम ग्रंथ पहावयास आणि वाचावयास मिळणे हे भाग्याचे लक्षण आहे. मला हे भाग्य लाभले. उपजत अभिरुचीला अनुकूल वातावरण लाभले तर उमलत्या बुद्धीचे संस्कारण उत्तमरीतीने घडते. माझ्या जीवनात नगर वाचनालाने नेमके हेच केले. दुर्लभ ग्रंथाचे दर्शन पोरवयातच घडते ते या वाचनालयामुळे. दरमहा चार आणे भरून उदंड ग्रंथसंपत्तीचा लाभ घडत होता तो या ग्रंथालयात. तेव्हा मी त्या काळच्या सहाव्या इयत्तेत होतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे भारतीय तत्वज्ञानावरचे दोन खंड आणि श्री. अरविंदांचे (Life Divine) 'दिव्य जीवन 'या भव्य ग्रंथाकडे मी भक्तिभावनेने पाहिले ते या वाचनालयात. वाचलेले सर्व समजत होते असे नव्हे. पण समजावून घ्यावे असे जगात किती तरी आहे एवढे मात्र समजत होते. महात्मा गांधींच्या प्रासादिक शैलीचा प्रत्यय घडविणारे हरिजनचे अंक वाचनालयात बसून चाळताना चित्ताला प्रसन्नता प्राप्त होत असे. पंडित सातवळेकरांचे ' पुरुषार्थ ', बडोद्याचे 'व्यायाम' पनवेलचे 'आरोग्यमंदिर' पाँडेचारीचे 'संजीवन' अशी विधायक विषयांच्या विवेचनाला वाहिलेली नियतकालिके मला मनापासून आवडत. फडके-खांडेकरांच्या कादंबऱ्या, कुसमाग्रज, बोरकर यांचे काव्यसंग्रह, रा. श्री. जोग आणि वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा ग्रंथ अशा ललित, शास्त्रीय आणि विदग्ध वाङ्मय प्रकारांची जाण वेळीच आली ती केवळ या संस्थेमुळे. त्या वयात गाव सोडणे व ग्रंथांचा धांडोळा घेत गावोगावी फिरणे शक्य नव्हते. गावाच्या मध्यभागी असणाऱ्या या कल्पवृक्षाच्या छायेत माझे सर्व मनोरथ पुरे झाले. कन्याकुमारी येथे एका अभ्यासवर्गात स्वामी विवेकानंदावर एक व्याख्यान दिले. ते एकून कोणीतरी कुतुहल बुद्धीने विचारले। ' स्वामीजींचे ग्रंथ तुम्ही प्रथम कधी आणि कोठे वाचले ? ' या प्रश्नाचे उत्तर देताना साताऱ्च्या नगर वाचनालयाचा अभिमानपूर्वक उल्लेख करावा लागला. विवेकानंद शिला स्मारकाच्या छायेत तीन सागराच्या संगमस्थानावर सहजगत्या घडलेले नगर वाचन मंदिराचे स्मरण हा माझ्या जीवनातील एक सुखाचा क्षण होता.

सातारा शहरात वाचन, मनन व चिंतन यात रमणाऱ्या मंडळींच्या गाठीभेटीचे एकमेव ठिकाण ही वाचनालयाची ख्याती त्यावेळी सुद्धा होती. वाचनालयापुढे असणारी मोकळी जागा हे विचारवंताचे आश्रयस्थान होते. वाचलेल्या गोष्टींची चर्चा चाले ती त्या मोकळ्या जागी. वाचनालयापासून थोड्याच अंतरावर लहानशी भाजीमंडई होती. काही सेवानिवृत्त वृद्ध पालेभाज्याची पिशवी घेऊनच वाचनालयात येत. पालेभाज्या नसणारी जीवनसत्वे त्यांना नगर वाचनालयात मिळत. वृद्धांना ज्ञानवृद्ध करणारे हे शताब्दी वाचनालय चिरंजीव व्हावे हीच अपेक्षा.

☆ ☆ ☆


WITH BEST COMPLIMENTS FROM :—

For Latest Information On :-

Books & Periodicals, Gramophones Records, Postage Stamps, Slides etc.

PLEASE VISIT OR WRITE TO :-

USSR Books & Periodicals Show Room,
Vasundhara, B. Desai Road,
BOMBAY – 400 026.

Distributor For Maharashtra :-

LOK VANGMAYA GRIHA PVT. LTD.,
190-B, Khetwadi Main Road,
BOMBAY – 400 004.

★

SULPA FOUNDRIES
KARAD INDUSTRIAL ESTATE
P. O. : OGALEWADI – 415 105.
( Maharashtra )

★

Manufactures of Ferrous and Non_ Ferrous Casting with maximum Casting Weight ½ Ton.

Specialists In :

All types of Lubricating Oil Pumps ( Gear Type & Rotor Type ), Bell Housing & Other Automobile Parts.

# सातार्‍यातील संगीत कला

श्री. स. कृ. जोशी.

सातारा हे एके काळचे मराठी राज्याच्या राजधानीचे शहर. मराठ्यांचे राज्य नष्ट झाले तरी श्री शिवछत्रपतींचे घराणे या शहरात वास्तव्य करीत आले आहे. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अखिल जनतेला या घराण्याविषयी नितांत आदर आहे. संगीत कलेस या घराण्यातील अलिकडील काही पुरुषांनी प्रात्साहन देऊन अनेक कलावंतांना आश्रय दिला. विद्यमान वंशजाचे पूर्वज कै. श्रीमंत राजाराम ऊर्फ आबासाहेब महाराज हे संगीत कलाप्रेमी होते. त्यांचे मोठे चिरंजीव कै. शिवाजी ऊर्फ अण्णासाहेब महाराज हे सतारीचे जाणकार होते. धाकटे चिरंजीव कै. प्रतापसिंह ऊर्फ भाऊसाहेब महाराज यांनी इंदूरचे सुप्रसिद्ध वादनकार कै. नानासाहेब पानसे यांचे पट्टशिष्य सखारामबुवा आगळे वस्ताद यांचेकडे पखवाज व तबलावादनाचे संपूर्ण शिक्षण घेतले होते व दोन्ही शास्त्रांची त्यांना संपूर्ण माहिती होती. त्याकरता सखारामबुवा याना दरमहा रु. ५०० प्रमाणे ते तनखा देत. त्यांचे पश्चात त्याचे चिरंजीव इंदूरचेच अंबादास हेही तयारीचे वादनकार होते व त्यानाही महाराजांनी आश्रय दिला. कै. भाऊसाहेब महाराज यानी वादनकलेचे शिक्षणाकरता अनेक होतकरू विद्यार्थ्यांना आश्रय देऊन तयार केले. त्यापैकी कै. दत्तोबा कोल्हापुरे व कै. गोविंदराव चव्हाण नाव घेण्यासारखे वादनकार होऊन गेले. कै. गोविंदराव यांनी या शहरात 'दत्त गायनवादन' क्लास ही संस्था ३०।४० वर्षे चालविली. कै. विष्णू दिगंबर हे दौऱ्यावर सातार्‍यास आले असता त्यावेळी जलशात श्री. गोविंदराव यांचे पखवाज वादन झाले व त्यांचे नैपुण्याबद्दल पंडितजीनी त्यांचा गौरव करून पारितोषिक दिले.

कै. भाऊसाहेब महाराज यांचे हयातीत मरहूम निसार हुसेनखां, अबदुल करीमखां, कै. बाळकृष्णबुवा इचकरंजीकर, कै. शंकर पंडित व श्री. कृष्णराव पंडित ग्वाल्हेर, सतार वादनकार कै. काशीनाथबुवा मसूरकर व त्यांचे चिरंजीव श्रीपादबुवा या श्रेष्ठ कलावंतांना आपलेकडे बोलावून त्यांची त्यानी यथोचित संभावनाही केली. त्यानी नृत्यकलेचे शिक्षणाकरताही पुष्कळ प्रयत्न व खर्च केला. श्री. भाऊसाहेब महाराजांनी या कलेचे संवर्धनाकरता हजारो रुपये खर्च करून फार मोठे दातृत्व केले. पहिले प्रतापसिंह महाराज यांचे अमदानीत सुप्रसिद्ध गायक मरहूम बारसअल्ली यांसही महाराजांचा आश्रय होता व त्यांचेकरता यादोगोपाळपेठेत त्यानी वाडाही बांधून दिला. तो काही काळ पिंगळे यांचेकडे होता व आता तो जमनाबाई बोर्डिंग या नावाने ओळखला जातो.

### शहरातील प्रमुख संगीत घराणी :

या शहरातील जुने संगीत घराणें म्हणजे मटंगे यांचे. मटंगे हे मूळचे जोशी उपनावाचे असून राहणार संगमनेरचे. या घराण्यातील एक पूर्वज श्री. गंगाधरपंत यांचे मुलगे महादेवबुवा व धोंडो हे उत्तम तबला वाजवीत. महादेव बुवा यांचे मुलगे गोविंदबुवा यानी अनेक आख्याने रचली होती व कीर्तनकार म्हणून अनेक ठिकाणी त्यांना वर्षासने होती. दुसरे चिरंजीव नागेश हे उत्तम कवी होते व 'नंदीकेश्वर' या नावाचे काव्याची रचना त्यानी केली होती. गोविंदबुवांचे मुलापैकी कै. नारायणबुवा हे उत्तम कीर्तनकार होते व त्याकरता अनेक आख्याने व पद्य रचना त्यानी केली होती. त्यानी 'सावित्री' नाटक लिहिले व त्या नाटकाचे प्रयोगही मटंगे मंडळीनी केले. गोविंदबुवांचे तिसरे चिरंजीव कै. गणुबुवा हे सतारीये गायक होते व सर्वांत धाकटे चिरंजीव कै. नरहरी ऊर्फ नरसुबुवा हे अविवाहित व अंध असून अनेक वाद्ये वाजविण्यात ते तरबेज होते. कै. नारायणबुवा यांचे दोन चिरंजीव कै. केशवबुवा व कै. गोविंदराव. श्री. केशवबुवा यांचा लहानपणापासून अत्यंत सुरेख व गोड आवाज होता. लहानपणी घराण्यात संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यानी ग्वाल्हेरास वामनबुवा ध्रुपदीये व कै. शंकरपंडित यांचेकडे गायनाचे उच्च शिक्षण घेतले. कै. राजाभय्यापूछवाले हे त्यांचे सहाध्यायी. परंतु घरचे परिस्थितीमुळे श्री. केशवबुवा याना फार दिवस ग्वाल्हेरास राहता आले नाही व सातार्‍यास न्यू इं. स्कूल मध्ये गायन शिक्षक म्हणून सुमारे ३०–३५ वर्षे शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी संगीताचे धडे दिले. ते एक आदर्श व नामवंत अध्यापक होते. तसेच गव्हर्मेंट ट्रेनिंग स्कूल, कन्याशाळा, मिशनस्कूल व इतर संस्थामध्ये संगीताचे प्राध्यापक म्हणून काम केले. श्री गुरु-संगीत विद्यालय हे एक आदर्श संगीत विद्यालय त्यानी सुरु केले व चालविले. या विद्यालयास सरकारी ग्रँट होती. दरवर्षी विद्यालयाचे वार्षिक समारंभ फार मोठ्या प्रमाणावर साजरे होत. व नामवंत पाहुणे येत असत. याशिवाय शाळेतील होतकरू गायन शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ते घरी मोफत विद्यादान करीत. अनेक पदवीधर विद्यार्थीही त्यानी तयार केले : त्यापैकी काही – सौ. इंदिराबाई खाडिलकर, प्रस्तुत लेखक व श्री. कानेटकर हे रेडिओ गायक आहेत. स्वतः बुवांना रेडिओवर अनेक वेळा बोलवीत व त्यांचे श्रवणीय कार्यक्रम होत. परंतु १९३८ साली कै. केशवबुवा यांचा पाय दुखावल्यापासून ते पंगू झाले व एक डोळा मोतीबिंदुमुळे निकामी झाल्यामुळे त्यांची संगीत सेवा संपली. त्यांचे पश्चात त्यांचे मोठे चिरंजीव श्री. नरहर ऊर्फ आबा हे संगीताचे पदवीधर असून न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नोकरीस आहेत. तेही विद्यादानाचे काम करतात. त्यांची पत्नीही शाळेत संगीत शिक्षिका आहे. त्यांचा दुसरा मुलगा कै. बाळ यांनी वडिलांजवळ अध्ययन केले व ते एक होतकरू, अभ्यासी गायक होते. दुर्दैवाने असाध्य रोगाने ते अकाली मृत्यूमुखी पडले. अशारीतीने घराण्याचे पूर्वापार परंपरेप्रमाणे या शहरात संगीत कलेची अव्याहत सेवा केली व करीत आहेत. छत्रपती महाराजांचेकडेही या घराण्यातील मंडळींना आश्रय असे.

सातारा शहरातील दुसरे गवई घराणे म्हणजे ठाकूरदास बुवांचे. उपलब्ध माहितीप्रमाणे जगन्नाथ महाराज ठाकूरदास हे धृपद धमार व टप्पा गायकीचे. या जगन्नाथ बुवांना मुलगे तीन. रावजीबुवा, माधवबुवा व विनायकबुवा. रावजीबुवांचा मुलगा नानासाहेब उत्तम

हार्मोनियमवादक होता. माधवबुवांना मुलगे दोन. वसंतबुवा ऊर्फ अण्णाबुवा व यशवंतबुवा. कै. विनायकबुवा हे बिनकार असून बंदे-अल्लीचे परंपरेतील होते. ते ख्यालगायकी व ठुमरी गायक होते. सातारचे महाराजांकडे ते नवरात्रांत हजेरीस येत. कै. वसंतबुवा यांनी साताऱ्यास वसंत गायन समाज बरेच वर्षे चालविला. त्यांना तबला व पखवाज येत असे. ते अत्यंत गायनप्रेमी होते व वसंत गायन समाजात अनेक गायन व वादनाचे कार्यक्रम त्यांनी हौसेने केले. श्री. यशवंतबुवा यांना लहानपणी घराण्यातील गायनाचे शिक्षण मिळाले होते. त्यानंतर त्यांनी कै. भास्करबुवा बखले यांचेकडे ही थोडफार अध्ययन केले. त्यांचा आवाज अत्यंत मधूर व सुरेल असून ते इंदूरदरबार गायक होते व शिक्षकही होते. ते कीर्तनेही करीत. इंदूरदरबारचे त्याना पेन्शन होते. त्यांचा मोठा मुलगा श्री. माणिक-बुवा यांनीही श्री. मास्टर कृष्णराव यांचेकडे काही काल अध्ययन केले व ते मुंबईस गायनसमाज चालवीत. ठाकुरदास घराणे हे प्रतिष्ठत घराणे समजले जात असे.

साताऱ्यातील तिसरे घराणे म्हणजे बालाजीबुवा गवई यांचे. त्यांचे उपनाव मूळचे गोसावी व पुढे त्याना गवई म्हणू लागले. कै. बालाजीबुवा ध्रुपदे गात असत. ते सुरेल होते. त्यांना मुलगे दोन. सखाराम व वासुदेव. सखाराम यांनी वासुदेव यांचा मुलगा रामचंद्र यास दत्तक घेतले होते. रामचंद्र ऊर्फ रामभाऊ हे बऱ्या पैकी गात असत. वासुदेव यांचे इतर दोन मुलगे कै. कृष्णाजीबुवा हे कोर्टात नोकरीस होते. ध्रुपदे, ठुमरी व तराणे ते गात असत. त्यांचे घरी गाण्याच्या बैठकी होत. बाळाबुवा हे ही थोडे फार गात असत.

कै. चिंतूबुवा या नावाचे एक गवई विद्यादानाचे काम करीत.

घराण्याचे म्हणून नव्हे परंतु साताऱ्यात अनेक वर्षे बंध गवई कै. कल्लूबुवा कुलकर्णी याचाही या लेखात नामनिर्देश करणे जरूर आहे. त्यांचे शिक्षण प्रथम काही दिवस औंधचे दिवंगत गवई कै. गुंडूबुवा इंगळे यांचेकडे झाले व नंतर कै. अनंत मनोहर यांचेकडे झाले व त्या घराण्याचे गाणे ते गात असत. तेही एक लोकप्रिय गायक होते. व्हायोलिन वादनाचा अभ्यासही त्यानी केला होता व गायक व व्हायोलिन वादनकार म्हणून अनेक वर्षे त्यांचे रेडिओवर कार्यक्रम होत. विद्यादानाचे कामही ते करीत. ते एक तडफेचे गायक होते दुर्दैवाने त्यांचा विहिरीत पडून आकस्मिक मृत्यू झाला.

श्री. गजानन बुवा पेंढारकर हेही सातारचे पिढीजात रहिवासी असून त्यांनी प्रथम काही वर्षे कै. केशवबुवा मटंगे यांचेकडे व नंतर कै. विष्ण दिगंबर पलुस्कर यांचेकडे अध्ययन केले. गेली सुमारे ३० वर्षे या शहरात संगीत शिक्षकाचे काम करीत आहेत. सातारा कन्याशाळेत व महाराजांचे श्री भवानी मंदिरात अनेक वर्षे ते हजेरी लावीत. श्री गुरु संगीत विद्यालयातही अनेक वर्षे त्यांनी विद्यादानाचे काम कले. ते आता वयोवृद्ध झाले आहेत.

श्री. शिवरामपंत करंदीकर यांचा पेशा बँकेत नोकरीचा होता. तरी त्यांनी गांधर्व महाविद्यालयाची एक संस्था म्हणून गायनवादनाचे अनेक वर्षे विद्यालय चालविले. प्रथम सरस्वती विद्यालयाचे चालक व नंतर गांधर्व महाविद्यालयाचेतर्फे होणाऱ्या परीक्षेकरिता अनेक विद्यार्थी त्यानी तयार केले.

या शिवाय अलिकडे काही वर्षे श्री. शंकरराव कान्हेरे हेही गायन व्हायोलिन व पेटी वादनाचें शिक्षणही आपल्या विद्यालयात देत आहेत. त्यांना जलतरंगाचाही व्यासंग असून त्यांचे रेडिओवर कार्यक्रम होतात.

तसेच अलिकडे बरेच वर्षे श्री. प्रभाकरपंत जोशी यांनीही संगीत विद्यालय नेटाने चालविले असून त्यात अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनी त्यानी तयार केल्या आहेत. ते पेटीची साथ उत्तम करतात. ट्रेनिंग कॉलेजमध्येही ते प्राध्यापक आहेत.

या व्यतिरिक्त वैयक्तिक असेही कलावंत या शहरात आहेत. ला. इन्शु. कॉर्पोरेशनमधील सेवानिवृत्त श्री. देवधर हेही पिढीजात गवई घराण्यातील असून त्यांचीही संगीत सेवा चालू आहे. ते रेडिओ-वरही गातात. त्यांनी नाटकांतही गायकनट म्हणून भूमिका केल्या आहेत.

प्रस्तुत लेखकही लहानपणापासून संगीताची सेवा करीत आहे. १९३५ सालापासून रेडिओ गायक, ग्रामोफोन रेकॉर्डिंग, नाट्य संगीत या सर्व क्षेत्रात कलेची सेवा केली आहे व अद्याप वय ७७ मध्येही रेडिओ गायक आहे.

याशिवाय लाईट म्युझिक गाणारे श्री. दयाळ यांचाही नाम निर्देश करणे जरूर आहे. ते म्यु. टीत सेवक असूनही संगीताचा व्यासंग त्यांचा चालू आहे. त्यांना रेडिओवरही वारंवार बोलाविले जाते. तबल्याची साथही ते करतात.

याशिवाय रघुनाथबुवा रहिमतपूरकर हेही पिढीजात तबला-वादनकार असून साताऱ्यात ते त्या शाखेत अधिकारी मानले जातात. ते साथसंगम समजून उत्तम करतात.

याशिवाय श्री. लक्ष्मणबवा बैरागी पेटीवादनकार असून गातात.

संगीत-शास्त्रात रस घेणारी अशी मंडळी या शहरात आहेत श्री. हेनरे, ( तबलावादनकार. ) श्री. शंकरराव भिडे, श्री. सुदामे ( तबलावादनकार ), श्री. निळूभाऊ भावे व श्री. कुलकर्णी.

या शहरात अनेक भजनी मंडळेही आहेत व ती स्त्रियांची आहेत.

सातारा शहरात गायन वादनाचे कार्यक्रमही वेळोवेळी होतात व नामांकित कलावंतही हजेरी लावतात. एकेकाळी कै. अण्णा वैद्य, श्री. कुलकर्णी मास्तर यांचेकडे गाणी व बजावणी होत. हल्लीही श्री. अरुण गोडबोले व त्यांचे बंधू हे संगीताच्या प्रथित यश गायकांच्या मैफली प्रसंगानुरुप घडवून आणतात व संगीत श्रवणाचा लाभ सातारकरांना देतात.

एकंदरीत सातारा नगरी प्राचीनकालापासून संगीताची सेवा अव्याहतपणे करीत आली आहे व पुढेही करील.

☆ ☆ ☆

# ' स्वतःच्या मालकीचं पुस्तक '

लेखक : दा. सी. देसाई, मुंबई

अध्यापन–महाविद्यालयात शिकत असताना एक हौस म्हणून मूक-बधिर विद्यालयांतील लहान मुलामुलींना 'बोलतं' करायचं शिक्षण घ्यायला मी जात असे. त्या मुलांना अक्षरे ओळखता यायला लागली, वाचता येऊन उच्चार करता यायला लागले, अक्षरांची जुळणी करून शब्द बनवता येऊ लागले व मग शब्दांची नीट मांडणी करून अर्थवाही वाक्यांची रचना करता यायला लागली की त्यांना कोण आनंद व्हायचा ! मी गेलो की पानंच्या पानं मजकूर तो माझ्याकडून लिहून घ्यायची आणि वाचत बसायची. त्यांच्यासाठी योग्य अशी मराठी पुस्तकं त्या पंचवीस वर्षांपूर्वीच्या काळात उपलब्ध नव्हती. त्यामुळे 'मूकं करोति वाचालं' साठी धडपडणाऱ्या त्या लहानग्यांना मी हातानं लिहून दिलेले पाठ अधाशासारखे संपवावेसे वाटायचे. नवीन वाचता यायला लागलं की केवळ त्या मुक्यांचीच नव्हे, सगळ्याच बालकांची वाचायची भूक अफाट वाढते, हातात सापडेल त्याचा वाचून फडशा पाडायचा असा त्यांचा सहज स्वभाव बनतो. पुस्तकांच्या दुनियेत ते कसे तास न् तास रमून जातात, हे मुलांनी फुललेल्या कोणत्याही बालवाचनालयात आपण बघू शकतो, फार कशाला 'अहो मला वाचता येतंय' असं सांगून रस्त्यावर वाटल्या जाणाऱ्या जाहिरातीही मिळविण्यासाठी त्यांची कोण धडपड चालते, ते बघण्यासारखं आहे. ती फटुरडी जाहिरात त्यांच्या दृष्टीनं सोन्याच्या सफरचंदाच्या मोलाची असते !

वाचनाचं वेड किंवा ओढ लागलेल्या अशा बालकांना वाचनाच्या बाबतीत काही वळण लावावयाचीही गरज असते. त्याचप्रमाणे ज्यांना वाचनाची अशी सहज स्वाभाविक गोडी लागत नाही, त्यांना ती कशी लागेल यासाठीही युक्त्या शोधाव्या लागतात. भारतात नव्यानंच 'चहा' जनमानसात रुजवायचा होता. दुधदुभत्यात न्हाणाऱ्यांना 'चहा' कडे खेचायचं होतं, तेव्हा विक्रेत्यांनी एक छान क्लृप्ति शोधली होती. जत्रेत, बाजारात, उत्सवाच्या ठिकाणी जिथं कुठे गर्दी असेल तिथं ते गरम चहा फुकट वाटायचे. लोकांच्या जिभेला या फुकट चहाची चटक इतकी लागली की विकतचा चहा घ्यायची सवय त्यांना आपोआप जडली आणि घरोघरी आतिथ्यासाठी चहाचा कप पुढे केला जाऊ लागला ! असाच काहीतरी बहाणा हुषारीनं हुडकून काढून मुलांना 'वाचतं' करायला पाहिजे; 'तिळा उघड'च्या मंत्रानं अलिबाबाची गुहा खुली व्हायची, तशी 'वाचना'च्या मंत्रानं केवढं प्रचंड ज्ञानभांडार आपल्यासाठी उघडं होतं याची जाणीव त्या मुलांना करून द्यायला पाहिजे. आणि वाचनवेड्या मुलामुलींच्या वाचनाला वळण दिलं पाहिजे याची एक वाट परवा मला सापडली.

आमचा छोटा अमोल परवा शाळेतून घरी आला, तो मोठ्या खुषीत ! त्याच्या वर्गातल्या कोणा एका छोट्या मित्राचा त्या दिवशी वाढदिवस होता आणि त्या मुलाच्या कल्पक आईवडिलांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या वर्गमित्रांना खाऊ वाटण्याऐवजी छोटी छोटी पुस्तकं वाटली होती ! अगदी प्रत्येकाला स्वतःला नवं नवं पुस्तक बक्षिस मिळालं होतं ! एरव्ही अमोल घरी आला की, दप्तर फेकून देऊन तडक अंगणात खेळायला धावतो. खायचीप्यायचीही शुद्ध त्याला नसते; पण त्या दिवशी आल्याबरोबर त्यानं दप्तरातून ते नवं नवं पुस्तक बाहेर काढलं, मोठ्या अप्रूपानं सगळ्यांना दाखवलं आणि 'स्वतःचं' 'माझ्या मालकीचं' पुस्तक ऐटीत वाचायला घेतलं, दोन पानं वाचली आणि मग नेहमीच्या उद्योगाकडे त्यानं आपला मोर्चा वळविला. रात्री झोपण्यापूर्वीही वाचनाच्या केवळ गंमतीखातर दहापाच पानं वाचल्याशिवाय तो झोपत नाही आता ! घरात असेपर्यंत पुस्तक हातात न घेणारा, कितीही दाटा–ओरडा, प्रलोभन दाखवा, त्याला भीक न घालणारा हा मुलगा ते स्वतःचं, स्वतःच्या मालकीचं पुस्तक हातात आल्यापासून इतका काही बदलला आहे की 'स्वतःचं' पुस्तक असण्यांची ही मुलांची प्रवृत्ती मला एक वेगळी वाट सुचवून गेली !

वाट सुचली असली तरी फारच अवघड आहे, याची मला जाणीव आहे. अभ्यासाला हवी असणारी क्रमिक व इतर साहित्यही विकत घेणे ज्या देशातल्या मुलांना (म्हणजे ज्यांच्या मातापित्यांच्या खिशाला) परवडत नाही आणि शासनालाही अशा अगदी अपरिहार्य व आवश्यक शैक्षणिक साहित्याचा व पुस्तकांचा मोफत पुरवठा करण्याची ऐपत नाही. तिथं इतर पुस्तकं मुलांना 'स्वतःच्या मालकीची' करून देण्यासाठी फुकट वाटणं कोणाला झेपणार आहे ? शिक्षणावर या देशात भरमसाठ खर्च केला जातो, अशी हाकाटी पिटली जाते. पण त्यातला पगारासाठी किती खर्च होतो आणि विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणाऱ्या प्रयोगशाळा, छदगृहे, क्रीडांगणे ग्रंथालय इ. प्रीत्यर्थ किती वाटा मिळतो, ते बघणं बरचसं मार्गदर्शक ठरेल. कला आणि क्रीडा यांचं जीवनातील स्थान कोणतं याचं तारतम्य किंवा अवधान सुटल्यामुळे आपल्या देशात चित्रपट, दूरदर्शन आणि क्रिकेट यापायी किती अफाट खर्च होतो तो या गरीब देशाला परवडतो ! पण बालकांना बौद्धिकदृष्ट्या परिपुष्ट करण्यासाठी हव्या असणाऱ्या पुस्तकांसाठी खर्च करायला मात्र आपलं दारिद्र्य आड येत असतं ! सर्वच बाबतीत अग्रक्रमांचा ताळ सुटलेला आपला देश ग्रंथ आणि ग्रंथालयांच्या बाबतीत दळभद्रेपणा न दाखवील तरच नवल !

पुस्तक निर्मितीच्या बाबतीतही व्यापारी वृत्ती सांभाळावी लागत असल्याकारणानं स्वस्त दरात पुस्तक उपलब्ध करून देण्याची कमी खर्चात परवडतील अशी पुस्तक निर्माण करण्याची कल्पना कोणाच्या डोक्यात येत नाही. त्यामुळे ती विकत घेऊन मुलांना 'फुकट' वाटण्याचं औदार्य कोणाच्या अंगी स्फुरणार ? पुस्तक स्वतःच्या मालकीच होणार असेल तर मुलं त्यावर कशी तुटून पडतात हे मी बघितलं आहे. मुंबईतील सोविएत सांस्कृतिक भवनात अशी सोविएत युनियनसंबंधी माहिती देणारी पुस्तकं घेऊन जाण्यासाठी ठेवली जातात. पुस्तक तिथं ठेवली जायचा अवकाश, मुलं ती

बारा वर्षांपूर्वी मीच स्वतः उद्घाटित केलेला कुमार विभाग इतका विकसित झाला आहे हे पाहून समाधान झालें.

१९–११–६७ गोपीनाथ तळवलकर

भराभर उचलून घेतात ! अर्थात आपल्याकडील उदार मंडळींना ग्रंथ वाटण्याचं औदार्य कधी येईल आणि सरकारी तिजोरीला ग्रंथ वाटपासाठी पैसा उपलब्ध करून देण्याइतकी ऊब कधी येईल, याचा अंदाज मी आज बांधू शकत नाही. पण कुठ तरी या योजनेची गंगोत्री सापडायला मात्र पाहिज.

मुलांच्या मनात मालकीची सहजभावना असते. स्वतःच्या मालकीचं पुस्तक असावं असं त्यांना मनापासून वाटत असत. जसं स्वतःची बॅट असणं, कॅरम असणं, दुचाकी असणं, यात त्याला स्वामित्वाचा अभिमान वाटत असतो, तसच पुस्तकांच्या बाबतीतही घडेल, अस मला वाटत.

माझी कल्पना अशी आहे, ज्या ज्या विद्यालयातून शक्य येईल तिथं हा प्रयोग करावा. वर्ग शिक्षकांनी आपापल्या वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे चौकशी करून त्याच्याकडे कोणती पुस्तक आहेत, याची माहिती जमा करायची. त्यांना कोणती पुस्तक वाचावीशी वाटतात तेही जाणून घ्यावं. मग त्याच्या आधारानं एका चाळीस मुलांच्या वर्गासाठी शंभर एक पुस्तकांची खरेदी करायची. पुस्तकांत विविधता असेल. विषयांची,वाङ्मय प्रकारांची वगैरे. पण सगळ्या पुस्तकांच्या किंमती मात्र जवळपास सारख्या असाव्यात. खास कमी खर्चाच्या आवृत्त्या त्यासाठी काढलेल्या असाव्यात. त्या पुस्तकांच्या राशी ग्रंथालयात टेबलावर मांडून ठेवायच्या. मुलाला कोणतंही पुस्तक सहज उचलता येईल, बघता येईल अशा रीतीनं. पुस्तकांची निवड करायला मुलांना स्वातंत्र्य द्यायचं–पण अट घालायची एकेकाला केवळ एकच पुस्तक घेता येईल आणि जे पुस्तक तो निवडील ते त्याच्या मालकीचं होईल ! माझी खात्री आहे ती मुलं, त्यांची बालबुद्धी असली तरी, मोठ्या हुषारीनं आपल्या पुस्तकाची निवड करतील !

अशी निवड करीत असताना मुलं त्याबाबतीत निरनिराळ्या कसोट्या लावतील. पुस्तक स्वतःच्या मालकीचं होणार असल्यामुळे ते अधिक कालमर्यादेपर्यंत आपल्या संग्रही ठेवण्यायोग्य असलं पाहिजे, याची काळजी घेतील. म्हणजेच वेताळ, भुतं, परीकथा, रहस्यपूर्ण कथा अशी झटकन वाचून पटकन फेकून देण्यासारखी पुस्तकं ती सहसा निवडणार नाहीत. शंभरातून एकच पुस्तक निवडायचं असल्यामुळे आधी शंभरही पुस्तके ती हाताळतील, बघतील, थोडंफार वाचून त्यांच्या दृष्टीनं मूल्यमापन करतील आणि मगच पुस्तकाची निवड करतील. पण या निमित्तानं शंभरएक पुस्तकं त्यांच्या नजरेखालून जाणार आहेत, हा केवढा फायदा ! शिवाय स्वतःचं होणारं पुस्तकं त्यांच्या दृष्टीनं अपार मोलाचं असल्यामुळे त्याची निवड विलक्षण हुषारीनं केली जाईल. अशावेळी एखादा चुणचुणीत मुलगा शब्दकोशाची देखील निवड करू शकेल, असं मला वाटतं !

मुलांना पुस्तकं वाटायची ( निवडू द्यायची ) तो दिवस शाळेत समारंभ-उत्सव असा साजरा करावा. मुलांच्या अवतीभोवती त्या दिवशी सतत ग्रंथच असतील, याची काळजी घ्यावी. थोडक्यात हा ' पुस्तकदान समारंभ ' ग्रंथालयातच साजरा करावा. सगळ्या बाजूंनी हारीनं पुस्तकं लावलेली. मधल्या दोन मेजांवर सगळी वाटायची पुस्तकं मांडून ठेवलेली, मुलांकडून माहिती जमा करून त्याच्या आधारे खास निवडलेली पुस्तकं. पुस्तकांची शीर्षकं, मुखपृष्ठ मुलांच्या सहज डोळ्यांसमोर यावी, अशी मांडणी. मग अध्यापक मुलांना सांगणार " मेजांवर मांडलेल्या पुस्तकांतून तुम्ही तुमच्यासाठी स्वतःसाठी–एक पुस्तक फक्त एकच निवडायचं. ते तुमचं होणार आहे. " अर्थात कोणीतरी जिज्ञासेन विचारेल, कोणतही पुस्तक ? अध्यापक ' होकारार्थी ' मान हलवतील, होकार भरतील किंवा अगदी स्वच्छ शब्दात स्पष्टपणानं सांगतील. " हो, हो, कोणतंही पुस्तक ! मग कितीतरी हातांच्या जोड्या पुस्तकं उचलतील. उलटसुलट करून बघतील. मधलंच पान काढून वाचून बघतील. कोणी पुस्तक उचलून त्याचं वजन तोलतील ! आपल्या पुस्तकाची भर्रकिन निवड करून कोणी उतावीळपणानं अध्यापकांकडे किंवा कोणी ग्रंथालयप्रमुखाकडे धावतील. परंतु बहुसंख्य मुलं फार शांतपणानं तपासणी करतील व फार विचारानं आपल्यासाठी घ्यायच्या पुस्तकाची निवड करतील. कारण त्यातली कितीतरी मुलं अशी असणार की, ज्यांचं स्वतःचं असं पुस्तक त्या आधी कधीच नसणार ! हा निवडीचा कार्यक्रम चालू असेल तेव्हा अध्यापक आणि ग्रंथालयप्रमुखाने मागे नुसतं उभं राह्यचं. मुलांनी काही माहिती विचारली तर द्यायची; पण पुस्तकाची निवड करण्याच्या बाबतीत मात्र काहीही बोलायचं नाही.

अशा रीतीनं निवडीचं स्वातंत्र्य देण्यामागे एक शैक्षणिक भूमिका आहे. ग्रंथालयातून पुस्तक वाचण्यासाठी उसनवारीनं नेणं किंवा अगदी थोड्या पुस्तकांमधून निवड करायला लावणे, यापेक्षा आपलं पुस्तक घेऊन वाचण्यात काही वेगळाच आनंद असतो. पुस्तकांच्या ढिगाऱ्यातून स्वतःसाठी नेमकं पुस्तक उचलायचं, या निवड करण्यातही एक हुषारी दडलेली आहे.

वाचन हा शिक्षणाचा एक भाग आहे. वाचूनही कैक गोष्टी शिकता येतात. तेव्हा वाचन परिणामकारक होण्यासाठी अनेक तंत्र विद्यार्थ्यांना शिकविली जातात. पण वाचन यशस्वी होण्यासाठी या तंत्राबरोबर मंत्रही हवा. वाचनापाठीमागे काही उद्देश असेल, प्रोत्साहनकारक काही प्रेरणा असेल तर वाचन अधिक प्रभावी, उपयुक्त होईल. वाचनामागे प्रेरणा नसेल तर वाचनाचं सर्वोत्कृष्ट तंत्रही वाया जाईल. तेव्हा तंत्र म्हणजे सर्वस्व नव्हे; शिकणाऱ्याला प्रेरणा कोणती आहे, हीही गोष्ट महत्त्वाची असते.

मुलांनाही वाचनात मौज वाटायला हवी. शिक्षकाच्या समाधानाखातर मुलांनी वाचणं, एवढं वाचलंच पाहिजे या सक्तीपायी वाचन होणं, हे काही खरं नाही. वाचनात आनंद मिळायला हवा, रस वाटायला पाहिजे, रमायला पाहिजे. त्यासाठी वाचनामागे

प्रेरणा असावी लागते. पुस्तकं म्हणजे आनंदाचा स्त्रोत आहे, वाचनात अपार आनंद आहे असं वाटण्याजोगं वाचनीय साहित्य मुलांना उपलब्ध व्हायला हवं. तशी प्रेरणा मिळाली की बालकांचा उत्साह उतू जातो. यासाठी स्वस्त पुस्तकांची निर्मिती व बालकांसाठी त्यांचं मोफत वितरण, हा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम ठरतो. भारतासारख्या गरीब देशात ही गोष्ट उदार दाते, व सरकार यांच्या मदतीशिवाय असंभवनीय वाटते. अशा तऱ्हेच्या योजनात पालकांनाही सहभागी करून घेण्याची गरज आहे. अशा विधायक कार्याच्या निमित्तानं पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणकेंद्रात येतील तर शिक्षणाच्या दृष्टीनं तेही हिताचंच ठरेल. वाचन, पुस्तक आणि आनंद या तिहींचा मेळ जमवून देणं, हे विधायक कार्य आहे. ते यशस्वी करण्यासाठी पुढील गोष्टी केल्या पाहिजेत —

१ ) बालकांना पुस्तक द्या. वाचनाचा आनंद वाढवावयाचा असेल तर पुस्तकाच्या मालकीचा अभिमान मुलाला वाटायला हवा.

२ ) स्वत:साठी स्वत:चं पुस्तक निवडायची संधी बालकाला लाभावी. शाळेतून किंवा ग्रंथालयातून केवळ वाचण्यापुरत्या आणलेल्या पुस्तकापेक्षा पुस्तक स्वत:च्या मालकीचं होणं यात बालकाच्या दृष्टीनं व्यक्तिगत अधिक अर्थ सामावलेला असतो. मुलांना स्वत:च्या पुस्तकाची निवड करायची संधी दिली तर पुस्तक उलथी पालथी करतात, स्वत:च्या अशा नीट कसोट्या लावतात आणि अक्कलहुषारीनं पुस्तक पसंत करतात, असं ध्यानात यईल.

३ ) पुस्तक वितरणाच्या अलिकडे पलिकडे असे काहीतरी उपक्रम योजावेत की–' पुस्तक–वितरण दिन ' हा त्यातील अगदी कळस ठरावा !

४ ) अशा प्रकल्पात पालकांनाही सामील करून घ्यावं. घरीही मुलांची वाचनाची संवय वाढवायला पालकांचं सहकार्य हवंच असतं.

५ ) निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पुढे विपुल आणि विविधसाहित्य मांडले जावे. तुटपुंज्या सामग्रीतील निवड म्हणजे एक प्रकारे संधी वाया दवडणंच आहे. सर्व प्रकारची, सर्व विषयांवरची प्राथमिक माहिती देणारी, सोपी अशी भरपूर पुस्तक विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा किमान दुप्पट तरी पुस्तकं ठेवायला पाहिजेत. आणि वर्षातून किमान तीन वेळा तरी अशी संधी मुलांना मिळावी. शिक्षणसंस्थातून " स्वत:ची " पुस्तकं मिळण्याची सोय झाली तर त्यातून वाचनाचा जो आनंद वाढेल, वाचनाची जी चटक लागेल, त्यामुळे बालकांची वाचनाची भूक अपरिमित वाढ शकेल आणि या ' पुस्तकदान ' योजनेपायी पालकांना स्वतंत्रपणे कितीतरी पुस्तके आपल्या पाल्यांना विकत घेऊन द्यावीशी वाटू लागतील ! वाचनाचा प्रसार अफाट होऊ शकेल !

सरकारी अनुदानाप्रमाणेच या योजनेला मराठी प्रकाशकाकडूनही सक्रिय प्रतिसाद मिळायला पाहिजे. स्वस्त दरात विविध विषयावरील पुस्तकांची उपलब्धी ही महत्त्वाची गरज आहे. पाच सहा कोटी मराठी भाषिकांचं स्वतंत्र राज्य अस्तित्वात येतं, शिक्षणाचा प्रसार होतो. पण मराठी पुस्तकांचा खप मात्र वाढत नाही ! अजून बहुतेक पुस्तकांची अकराशे प्रतींची आवृत्ती काढावी लागते आणि ग्रंथालयावर भिस्त ठेवून दोनशे प्रती खपल्या की पुस्तकाचा खर्च बाहेर पडेल, अशा बेतानं प्रकाशनाचा अर्थ व्यवहार बसवावा लागतो. स्वत:चं ग्रंथालय, गृहपुस्तकसंग्रह या कल्पना आपल्या शिक्षितांच्यातही मूळ धरू लागलेल्या नाहीत. प्राध्यापकांच्या घरी पुस्तकांची कपाटे असलीच तर ती बहुधा महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून आणलेल्या ग्रंथांनीच भरलेली सापडायची ! श्रीमंतीचा डौल म्हणून ज्यांची घरग्रंथालयं तयार झाली आहेत त्यांच्यात इंग्रजी पुस्तकांची भरताड दिसेल ! तीही फॅशन म्हणून ! शिवाय मॅचिंग देखणेपणासाठी होणाऱ्या पुस्तकांची निवड वेगळीच ! एवंच शिक्षण प्रसार झाला तरी मराठी पुस्तकांचा खप नाही. स्वस्त पुस्तकांची निर्मिती करून, प्रथमत: सरकारी अनुदानाच्या भरवंशावर ' स्वत:च्या मालकीच पुस्तक ' प्रकल्पाला जालना मिळाली आणि स्वत:चं ग्रंथालय निर्माण करण्याची आवड लहानपणीच निर्माण झाली ( चटक लागली, म्हणून का ? ) तर ग्रंथालय आणि वाचनाची चळवळ याला एक नवी दिशा महाराष्ट्रात लागल्याचं दृश्य येत्या दशक दोन दशकात दिसू शकेल.

☆ ☆ ☆

आज नगर वाचनालयाला भेट दिली; फार समाधान वाटले.

१०–११–७० आत्माराम रावजी देशपांडे


**हार्दिक शुभेच्छा !**

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.**

**सांगली (महाराष्ट्र)**

हेड ऑफिस : हायस्कूल रोड, सांगली.

फोन नं. ३५४४, ३०३०, ३०९७, ३२७२.

ग्राम : रयतबँक

**— सर्व प्रकारच्या ठेवयोजना —**

लॉकर्सची सोय : हेड ऑफिस, इस्लामपूर, आटपाडी, आष्टा, करमणी, शिराळा, खरसुंडी, कवठेमहांकाळ आणि मार्केटयार्ड तासगांव.

| सांपत्तिक परिस्थिती (३०-६-७८) | रु. लाखात |
|---|---|
| भाग भांडवल | १५३·२४ |
| निधी | १३५·१० |
| ठेवी | १,८४२.०० |
| दिलेली कर्जे | २,६००.०० |
| नफा | २४.४५ |
| खेळते भांडवल | ३,४००·०० |

: सहकारी चळवळीचे जिल्ह्यातील प्रमुख केन्द्र :

पं. मा. टाकवेकर — व्यवस्थापक
सौ. सरोज पाटील — व्हा. चेअरमन
गु. र. पाटील — चेअरमन

# कीर्तिवंत सातारा

संभाजीराव पाटणे

ज्ञानोपासक, कर्मोपासक, धर्मोपासक, देशोपासक ईश्वर-निष्ठांची मांदियाळी सातार भूमीत अवतरली. लोकोद्धाराचे हे अग्रणी हीच या भूमीची शक्ती. या शक्तीने स्फूर्ती दिली आणि दाही दिशांना कीर्तिसुमनांची बरसात केली. या बरसातीने अजिक्यतारा न्हाऊन निघाला. अजिक्यताऱ्याच्या अजिक्य यशोगाथा आजही गाईल्या जातात. डोंगरी किल्यातून, कडेकपारीतून, दऱ्याखोऱ्यातून, रानामाळातून घडलेला साताऱ्याचा इतिहास क्षात्र धर्माचा इतिहास आहे. देशाची, देवाची आणि धर्माची प्रतिष्ठा वाढविणारा हा इतिहास देशभक्तीची, मानवधर्माची आणि सेवामय त्यागी जीवनाची शिकवण देतो. शिवप्रभूंच्या पदस्पर्शानें पुनित झालेला, संत महंतांच्या अध्यात्माने बहरलेला व अनेक शूर वीरांच्या पराक्रमाने पोसलेला हा सातारचा इतिहास भारताच्या इतिहासात अढळपदी वावरत आहे.

पं. नेहरूंनी 'जय सातारा' म्हणून गौरविलेल्या या जागृत साताऱ्याचे जागते रूप बाबूराव गोखल्यांच्या लेखणीतून साकारले आहे. सातारा जिल्ह्याच्या इतिहासातले जिल्ह्याचे ठाणे सातारा. अडीच हजार वर्षांपासूनची पार्श्वभूमी लाभलेला हा सातारा बुद्धकालाशी नाते जोडतो. छत्रपति शिवाजी महाराजांच्या परंपरेचा वारसदार ठरतो.

### 'सातारा' हे नाव कसे पडले :

सातारा हे नाव कसे पडले यासंबंधाने विविध मते आहेत. साताऱ्याच्या दक्षिणेस साते नावाचे गाव आहे. त्याच्या जवळच्या दऱ्यास सात दरा असे म्हणतात. हा सात दरा सातारा किल्ल्याच्या दक्षिणेस उरमोडी नदीच्या पलिकडे जो डोंगर आहे त्याच्या कुशीत आहे. जुना सातारा म्हणजे हा दरा. त्यानंतरच्या काळात महार दऱ्याच्या जवळ लोकांनी जी वस्ती केली त्या वस्तीला सातारा असे नाव पडले. सितारा या फारशी शब्दापासून सातारा शब्द तयार झाला असेही काहीजण मानतात. परंतु मुसलमानांचे आगमन होण्यापूर्वी सात दरा म्हणजेच सातारा अस्तित्वात होता. त्यामुळे सितारा किंवा सतारा शब्दापासून सातारा शब्द बनला नसल्याचे राजवाडे व्युत्पत्तिकोशात म्हटले आहे. सप्ततारा शब्दापासून सातारा अशीही व्युत्पत्ती आहे. अजिक्य ताऱ्याचे जुने नाव सप्तर्षींचा किल्ला असे होते. या किल्ल्यावर असलेल्या सप्तर्षींच्या देवालयाचा उल्लेख मराठ्यांच्या इतिहासात आढळतो. सप्तर्षींपासून सातारा नाव पडल्याचेही सांगितले जाते. सातर शब्दाचा अर्थ ईशान्य असा आहे. कोल्हापूरच्या शिलाहार वंशीय दुसऱ्या भोजराजाने ११९० मध्ये सातारचा किल्ला बांधला. भोजराजाची राजधानी पन्हाळगड येथे होती. पन्हाळगडच्या ईशान्येस असलेले हे गाव म्हणजेच पूर्वीचे सातर. त्यावरून सातारा शब्द बनला. औरंगजेबाचा मुलगा अजिमशहा याने सातारच्या किल्ल्याला वेढा दिला तेव्हा किल्ल्याला सतरा दरवाजे व बुरूज होते. यावरूनही सातारा नाव पडले असावे असे म्हटले जाते.

### प्राचीन परंपरा :

सातारच्या परिसरात इ. स. पूर्वी २०० मध्ये बौद्धांचा अंमल होता. आगाशिवाच्या डोंगरातील बौद्धलेणी आजही बुद्धकालाची साक्ष देतात. इ. स. पूर्व ९० आंध्र भृत्त या ठिकाणी राज्य करीत होते. तिसऱ्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत चालुक्य, राष्ट्रकूट, सिंघण, शिलाहार, यादव राजे सातारा येथे राज्य करीत होते. चौदाव्या शतकात देवगिरीचे यादव येथे राज्य करीत होते. देवगिरीच्या यादवांनी सातारचा किल्ला शिलाहारांचेकडून जिंकून घेतला होता. यानंतर हा प्रदेश बहामनी राजांच्या अंमलाखाली आला. यावेळी आजच्या नांदगांवच्या घोरपडे घराण्याकडे सातारतर्फे ४२ गावांची व कराडच्या २२ गावांची देशमुखी असल्याचा उल्लेख सातारा गॅझेटियरमध्ये आहे. १३४७ ते १४९८ पर्यंतच्या बहामनी कालखंडानंतर १६५९ पर्यंत आदिलशहाकडे हा प्रदेश होता. आदिलशहाकडे सातारचा किल्ला आला त्यावेळी त्यास 'हुकेबहन' असे म्हणत. चांदबिबीला कैद करून १५९७ मध्ये या किल्लयावर ठेवण्यात आले होते. शहाजी राजे १६३७ साली आदिलशहाकडे चाकरीत होते. त्यांच्या मदतीने मुधोजी आणि बजाजी निंबाळकर सुटले व फलटणचे जहागिरदार बनले. पुढे १६४० मध्ये बजाजीच्या बहिणीचा सईबाईचा शिवाजीशी विवाह झाला. छत्रपतींना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात अठरापगड जातींनी सहाय्य केले. या कार्यात घोरपडे घराणे सामील झाले. परमानंदाने १२ व्या अध्यायात 'घोरकर्मा घोरफटो बाजराजो महापुजः' असे घोरपड्यांचे वर्णन केले आहे. नांदगाव आणि भिकार तासगावमध्ये असलेले घोरपडे त्यांचे वारसदार आहेत. देशमुख-पाटील असलेले हे घराणे शाहू महाराजांशी संबंधित होते. आजचे जि. प.चे अध्यक्ष बाबुराव घोरपडे याच घराण्यातील. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत किसन वीरांचे समवेत भाग घेऊन कारावासही भोगला.

### सज्जनगड :

१६७३ मध्ये शिवाजी महाराजांनी परळी व सातारचा किल्ला जिंकून घेतला. परळीच्या किल्लयावर रामदास स्वामी राहत. सज्जनांच्या वास्तव्यामुळे या किल्लयास सज्जनगड म्हणण्यात येऊ लागले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने या प्रांतात धुमाकूळ घातला. औरंगजेबाने सातारच्या किल्लयावर हल्ला केला त्यावेळी किल्लेदार प्रयागजी फणसे याने बुरूजावर उभे राहून किल्ला रक्षणार्थ सैन्य उभे केले. परंतु अचानक सुरुंग उडाल्याने त्याचा त्यात अंत झाला. बादशहाने हा किल्ला घेतला आणि विजयाचे स्मारक म्हणून बुरूज बांधला. हा बुरूज करंजे येथे आहे. याचवेळी या किल्याचे नाव "अजिक्यतारा" ठेवण्यात आले. १७०६ मध्ये परशुराम प्रतिनिधीने किल्ला लढून ताब्यात मिळविला. १७०८साली

किल्लयावर शाहूंचा राज्याभिषेक झाला. १७१४ मध्ये धनाजी जाधवाचा कारकून बाळाजी विश्वनाथ यास पेशवा करण्यात आले. त्याने १७१९ मध्ये शाहू महाराजांच्या मातुःश्री येसूबाई यांना किल्लयावर आणले.

शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर राजारामाचे नातू रामराजे यांना दत्तक घेण्यात आले. त्यानंतर धाकटे शाहू महाराज ( दुसरे ) ऊर्फ आबासाहेब महाराज यांना दत्तक घेतले. १८०८ सालापर्यंत त्यांची कारकीर्द होती. प्रतापसिंह, राजाराम व शहाजी ऊर्फ अप्पासाहेब यामध्ये सातारा शहराचे शिल्पकार म्हणून श्रीमंत छत्रपती "प्रतापसिंह महाराज" हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याचे वारसदार म्हणून लौकिकास पात्र ठरले. सातारा शहराच्या मध्यभागी राजवाड्यासमोर त्यांचा पुतळा बसवून तसेच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनीच सुरू केलेल्या हायस्कूलचे (मूळच्या पाठशाळेस) 'प्रतापसिंह हायस्कूल' हे नामाभिधान करण्यात आले.

### प्रतापसिंह महाराज : कर्तबगार राजा :

साताऱ्याच्या ऐतिहासिक परंपरेचा आजही सातारवासियांना सार्थ अभिमान वाटतो. बाबाजी भोसले यांना मालोजी आणि विठोजी ही पुत्ररत्ने झाली. मालोजीराजांना शहाजी व शरीफजी हे सुपुत्र झाले. शहाजीराजांचे संभाजी, शिवाजी व व्यंकोजी हे तीन राजपुत्र, छत्रपती शिवाजी महाराजांना संभाजी व राजाराम हे सुपुत्र झाले. मृत्यूनंतर हिंदवी स्वराज्याची सातारा व कोल्हापूर ही दोन राज्ये झाले. छत्रपती संभाजीनंतर शाहू व त्यानंतर वर उल्लेखिलेल्या राम राजांना दत्तक घेण्यात आले. रामराजांनी आबासाहेब (दुसरे शाहू) यांना दत्तक घेतले. भवानजी राजेशिर्के यांच्या सुकन्या आनंदीबाई या त्यांच्या धर्मपत्नी. या कर्तबगार मातेपोटी साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यावर १८ जानेवारी १७९३ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज जन्मास आले. वडिलांच्यानंतर १६ मे १८०८ रोजी त्यांना छत्रपती पद मिळाले. आपसातील फंदफितुरी आणि इंग्रजांची कुटिलनीती यामुळे ४ सप्टेंबर १८३९ रोजी त्यांना पदच्युत करण्यात आले. लिंब गावी गोठ्यात राहण्याचा प्रसंगही त्यांच्यावर गुदरला.

अगदी अल्पकाळात त्यांनी बरेच कार्य केले. १८२९ साली महारदरा व यवतेश्वर येथे तलाव बांधून खापरी नळाने शहरात पाणी आणले. जुना राजवाडा, आजचे डी. एस्. पी. कार्यालय, त्यासमोरील तुरुंग इ. इमारती बांधल्या. ३६ फूट रुंदीचा अर्धा मैल लांबीचा पॅलेस स्ट्रीट तयार करून दोन्ही बाजूस इमारती बांधल्या. गेंडा माळावर पायदळ छावणी होती. प्रतापगंज, भवानीपेठ वसविली. ठिकठिकाणी ओढ्यावर पूल बांधले.

अजिंक्यताऱ्यावरील मंगळाईचे देऊळ, प्रतापगडावरील भवानीमातेच्या देवालयाचा जीर्णोद्धार, सज्जनगडावरील रामदास स्वामीचे देवालय, केळवरमार्गे महाबळेश्वर रस्ता, महाबळेश्वरची मालकमपेठ वसविण्याचे कार्य यांच्या कारकीर्दीत झाले.

मुलींच्या शिक्षणाची सोय करणारा, सातारला पाठशाळा सुरू करून इंग्लिश, पर्शियन, संस्कृत भाषेच्या अध्यापनाची सोय करणारा हा राजा प्रजाहितदक्ष होताच; त्याचप्रमाणे दूरदृष्टीचाही होता, सत्यासाठी समर्पण करणारा हा त्यागी, स्वाभिमानी, उदार स्पष्टवक्ता व लोकोद्धारक राजा १४ ऑक्टोबर १८४७ रोजी काशी येथे स्वर्गवासी झाला.

> ज्या पद्धतीने हे कार्यालय चालले आहे ते ऐकून फार समाधान वाटले. ही इतकी जुनी संस्था आहे व तिचे कार्य प्रगतीपथावर आहे.
>
> १–११–५८ — द. श्री. जोग

प्रतापसिंह महाराजांच्या नंतर त्यांचे बंधू आप्पासाहेब महाराज, त्यानंतर व्यंकोजीराजे ( दत्तक ), त्यानंतर त्यांचे दोन सुपुत्र शिवाजी महाराज व प्रतापसिंह महाराज. प्रतापसिंह महाराजांनी २८ मे १९२५ रोजी शाहू महाराजांना दत्तक घेतले. छत्रपती शाहू महाराजांशी ७ मे १९३९ रोजी धार येथे सुमित्राराजे यांचा विवाह झाला १९५० साली छत्रपती शाहू महाराज स्वर्गवासी झाले. त्यांचे सुपुत्र प्रतापसिंह महाराज, विजयसिंह, अभयसिंह व शिवाजी व सुकन्या सत्वशीला. श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे ४ मार्च १९७८ रोजी मुंबईस दुःखद निधन झाले. साताऱ्याच्या हजारो नागरिकांनी ५ मार्च रोजी त्यांचे अखेरचे दर्शन घेतले. राजगादीवर श्रीमंत छ· प्रतापसिंह महाराजांचे १० वर्षाचे चिरंजीव उदयराजे यांना स्थानापन्न करण्यात आले. राजमाता सुमित्राराजे भोसले यांनी सातारा शहराच्या सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राशी आपुलकीचे सेवाभावी संबंध ठेवून सात्त्विक सेवाभावाचे अनेकवार दर्शन घडविले आहे. साताऱ्याचेच नव्हे तर महाराष्ट्राचे त्या श्रद्धास्थान बनल्या आहेत.

### स्वातंत्र्य संग्रामात आघाडीवर :

युगपुरुषाचा वारसा सांगणाऱ्या साताऱ्याने स्वातंत्र्य संग्रामातही बहुमोलाची कामगिरी केली.

१८८५ मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना मुंबईस झाली· या सभेची प्रांतिक परिषद सातारला १९००साली झाली. दादासाहेब करंदीकर, बळवंतराव कोल्हटकर व रावसाहेब लिमये यांनी जिल्हाभर दौरे काढून राष्ट्रीय सभेचा प्रचार केला. सातारा शहरात स्वातंत्र्य प्रेमाने भारावून गेलेली लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी आदी थोर देशभक्तांच्या विचारांचा पाठपुरावा करणारी मंडळी होती. डॉ. वा. वि. आठल्ये, कृष्णराव कळंबे, महादेव हिंगे इ. क्रांतिकारी संघटनेशी संबंध ठेवीत होते. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेतही साताऱ्याचे जवान सहभागी झाले होते. विमामहर्षी आण्णासाहेब चिरमुले यांनी समाजसेवा कार्यात स्वदेशीस महत्व दिले. १९१६ साली शेतकरी परिषद झाली. १९२५ साली सातारा येथे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक सामाजिक परिषद भरली होती. महर्षी शिंदे यांच्या प्रार्थना

समाजाच्या कार्यात रा. ब. काळे सहभागी झाले होते. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातही सातारा आघाडीवर होता. भाऊसाहेब सोमण, फळसळकर, घाणेकर इत्यादी राष्ट्रीय विचारांनी प्रेरित झालेली मंडळी असहकाराच्या चळवळीत सामील झाली. सोलापूरच्या सत्याग्रहात दामुअण्णा एकबोटे सहभागी झाले. लो. टिळक राष्ट्रीय शाळा, राष्ट्रीय दल इ. राष्ट्रप्रेमी संघटना देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आघाडीवर होत्या.

१९४२ च्या चलेजाव चळवळीत भाऊसाहेब सोमण, शंकरराव साठे, गणपतराव तपासे सहभागी झाले. त्यांना अटक करण्यांत आली.

सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील, जी. डी. लाड, काशिनाथ देशमुख, बरडे मास्तर, किसन वीर, शेख काका, पांडुरंग बोराटे जिल्ह्यात गोविंदराव खोत, बापू कचरे, स्वामी रामानंद भारती इत्यादींनी प्रतिसरकार स्थापन केले होते. पत्रीसरकार म्हणून त्याचा दरारा निर्माण झाला होता. सातारा जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीत जिल्ह्याचे ठाणे असलेला सातारा आघाडीवर होता. भूमिगतांना सहाय्य केले जात होते. तानाजी पेंढारकर, डॉ. गोडसे, गरुड इ. क्रांतीच्या लढ्यात सहभाग घेऊन देशप्रेम व्यक्त करीत होते. १ जाने. १९४५ ला जिल्ह्याच्या पोलीस ठाण्यातून बंदुका पळविण्यात आल्या. देशभर स्वातंत्र्य चळवळीने जोर धरला होत. या चळवळीत सातारा मानाचा तुरा बनला होता. इंग्रजांच्या पाशवी शक्तीशी लढणारा सातारा जिद्दीने, स्वाभिमानाने, त्याग भावनेने आणि देशनिष्ठेने स्वातंत्र्य प्रेम व्यक्त करीत होता. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. साताऱ्चा अजिंक्यतारा तिरंगी निशाणाचे स्वतंत्र अस्तित्व घेऊन पुन्हा मानाने मिरवू लागला.

### स्वातंत्र्यानंतरची तीस वर्षे :

स्वातंत्र्यानंतरच्या तीस वर्षांच्या कालखंडात जी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक परिवर्तने घडत राहिली त्यामध्येही साताऱ्याने पुढाकार घेतला. गोवा मुक्तिसंग्राम, नगर हवेली संग्राम, चिनी आक्रमण, भारत-पाक युद्ध, बांगला देश स्वातंत्र्य युद्ध आदी राष्ट्रीय लढ्यात साताऱ्च्या अनेक शूरवीरांनी मौलिक कामगिरी केली. पराक्रमाची शर्थ करून आपले धैर्य आणि शौर्य देशाच्या प्रतिष्ठेसाठी प्राणपणाने अर्पण करणारी साताऱ्ची पवित्र भूमी पुन्हा पावन झाली.

### शहरातील वैशिष्ट्ये :

या पावनभूमीत प्रवेश करताना पोवई नाक्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून नगरीत यावे लागते. या नगरीतल्या जुन्या व नव्या इमारती आपणाशी बोलत राहतात. चार भिंतीवरचे स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक तसेच जवाहर बागेतला स्वातंत्र्य सैनिकाचा स्मृतिस्तंभ देशभक्तांच्या थोर कार्याची आठवण करून देतो. १७२२ साली शाहू उद्यानाच्या ठिकाणी असलेला राजाचा महाल ( रंगमहाल ) आगीच्या भक्षस्थानी पडल्याचे कळताच मन हेलावून जाते. राजमातांचे निवासस्थान असलेला अदालतवाडा पाहून अडीचशे वर्षापूर्वीच्या न्याय मंदिराची आठवण येते. प्रतापसिंह महाराजांनी १८२४ साली बांधलेला व सध्याचे प्रतापसिंह हायस्कूल असलेला जुना राजवाडा, १८४४ साली आप्पासाहेब महाराजांनी बांधलेला, सध्याचे न्यायालय असलेला, नवा राजवाडा पाहून शिल्प-कलेचे आणि कारागिरांच्या कलेचे कौतुक करावे वाटते. जलमंदिरा-तील भवानीदेवी छत्रपतींच्या घराण्यातील देवतांचे पुण्यस्मरण घडवितें. १८४९ साली प्रतापसिंह महाराजांनी आपले खाजगी ग्रंथालय जनतेस दिले. १८५३ सालापासून अस्तित्वात असलेले हे जिल्हा ग्रंथालय नगरवाचनालय म्हणून उत्तम प्रकारचे कार्य करीत आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्वावलंबी शिक्षण योजनेचा शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडविणारा प्रयोग याच भूमीत केला. रयत शिक्षण संस्थेने सामाजिक समतावादी शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विवेकानंद शिक्षण संस्था, इतर स्थानिक शिक्षण संस्था या पूर्ण प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतचे कार्य करीत आहेत. शासनाचे एस. टी. स्टॅंड जवळचे शिवाजी वस्तु संग्रहालय इतिहासाचे व महाराष्ट्रीय अस्मितेचे दर्शन घडवीत आहे.

### औद्योगीकरणाला गती :

सातारा शहरानजिक कोडोली भागात औद्योगिक क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. त्या ठिकाणी महाराष्ट्र स्कूटर्स कारखाना सुरू झाला असून नवे उद्योगधंदे निर्माण होत आहेत. माहुलीजवळ रेल्वे लाईन आल्याने सातारा शहराची महत्त्वाची सोय झाली आहे. सातारा शहरानजिकचे कूपर इंजिनियरिंग, सातारा शहरातील सातारा इंडस्ट्रियल वर्क्स, अभिनव इंडस्ट्रिज, भारत इन्स्ट्रुमेंट्स, अजिंक्य इंडस्ट्रिज, सैनिकांचे टी. सी. पी. सी., झाड यांची सिल्क मिल, अमर सोप फॅक्टरी, आयुर्वेदीय अर्कशाळा, चिपळूणकर, गोडबोले, भाटीया इत्यादींचे जर्दा तयार करण्याचे कारखाने, लाटकर, मोदी इत्यादींचे सातारी कंदी पेढे प्रसिद्ध आहेत. वाढत्या व्यवसायामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे. आयुर्वेद महाविद्यालय, सिव्हिल हॉस्पिटल, आगाशे हॉस्पिटल व इतर खाजगी दवाखान्यातून रुग्णसेवा केली जाते.

सातारा शहराची सहकार क्षेत्रातही आघाडी आहे. जिल्हा कंझ्युमर्स सोसायटीचे मुख्य कार्यालय सातारा येथेच आहे. खरेदीविक्री संघ, दुग्ध पुरवठा संघ, सहकारी सोसायट्यांची विविध दुकाने त्याच प्रमाणे सहकारातून निर्माण झालेल्या गृहनिर्माण संस्था, गेंडामाळा-वरील एल. आय. सी. ची वस्ती, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या नव्या वास्तु व कँप भागात होत असलेली वाढती निवासस्थाने सातारा शहराच्या वाढत्या रूपाचे प्रतीक आहेत. १९०१ साली साताऱ्ची लोकसंख्या २६,०२२ होती. १९७१ साली ही लोकसंख्या ६६,३४४ झाली. तर आज हीच संख्या ८०,००० च्या पुढे गेली आहे. १९८० सालापर्यंत साताऱ्चे औद्योगिक क्षेत्र वाढत गेल्यास एक लाखाचे वर ही संख्या जाईल.

### धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन :

सातारा शहरात हिंदु धर्मीयांची १७७ देवालये आहेत. मुसलमान धर्मीयांची ३० प्रार्थनास्थळे, ख्रिश्चनांची दोन, जैनांची दोन, पारशी समाजाचे एक व इतर दोन प्रार्थनास्थळे येथे आहेत. संकेश्वर मठाधिपतींनी बांधलेला शंकराचार्यांचा मठ, बाबामोतीवाले यांनी स्थापन केलेला महानुभाव मठ, भटजीमहाराज मठ, ढोल्या

गणपती, खिडीचा गणपती व कुरणेश्वर, ज्ञानेश्वर मंदिर, आनंदवाडी दत्त, शनीचे देवालय, श्री कृष्णेश्वर देवालय, कोटेश्वर, विश्वेश्वर, गोराराम, काळाराम, यादोगोपाळातील मारुती, गारेचा गणपती इत्यादी मंदिरांबरोबरच या वर्षी पंचमुखी गणेशमंदिराचे नवे भव्य देवालय राजपथाजवळ तयार झाले आहे.

येथील टिळक मेमोरियल चर्च शंभर वर्षापूर्वीचे आहे. सातारला १८८६ साली रा. रा. सीताराम जव्हेरे यांनी प्रार्थना समाज स्थापन केला होता. बाबू सत्येंद्रनाथ ठाकूर साताराचे जज्ज म्हणून १८९५ साली आले. त्यांनी जाहीररीत्या प्रार्थना समाजाची स्थापना केली. रा. ब. मराठे, रा. ब. काळे, मोरोपंत जोशी इत्यादींचा त्यात सहभाग होता. डॉ. भांडारकर, न्या. रानडे प्रार्थना समाजाचे कार्यासाठी सातारला येत, परंतु हा प्रार्थनासमाज पुरेसे कार्यकर्ते सातत्याने न लाभल्यामूळे पुढे टिकला नाही.

सर्वभूती समानभाव ठेऊन सातारा शहरातील भिन्न धर्मीय, भिन्न भाषिक रहिवाशी सातारच्या लोकजीवनाशी समरस झाले आहेत. व्यंकटपुरा, चिमणपुरा, रामाऊचा गोट, मंगळवार, यादोगोपाळ, शुक्रवार, भवानी, सोमवार, प्रतापगंज, सदाशिव, शनिवार, गुरुवार, केसरकर, बुधवार, पंताचा गोट, करंजे, बसप्पा, रघुनाथपुरा, माची, रविवार, मल्हार, दुर्गा, राजसपुरा, गोडोली, कामाठीपुरा, सदरबझार कँप अशा पेठेत सातारा वसलेला आहे. या ठिकाणी १८५३ पासून नगरपालिका कार्य करते. शाहू कलामंदिर, न. पा. शिक्षणमंडळ, दवाखाना, स्टँड नजीकचे भव्य स्टेडियम इ.सार्वजनिक क्षेत्रात नगरपालिका काम करते.

**कीर्तीवंत सातारा :**

सातारा शहरापासून सहा मैलावरील सज्जनगड रामदासांची आठवण करून देतो. तीन मैलावरील संगम माहुलीचा कृष्णाकाठ शाहू महाराजांच्या चितेत १७४९ साली सती गेलेल्या सकवारबाईची आठवण करून देतो. या घटनेच्या स्मरणार्थ स्थापिलेली दोन शिवलिंगे व छत्रपती राणी ताराबाई यांचे स्मारक इतिहासाला पुन्हा उजाळा देतो. सातारच्या वायव्येस सहा मैलांवरचे धावडशी गाव शाहू महाराजांचे अध्यात्मिक गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांची आठवण देते. तेथून नजीक असलेले मेरुलिंग प्रेक्षणीय आहे. तसेच तीन मैलांवरचे यवतेश्वर ठिकाणही निसर्गरम्य असून तेथील महादेवाचे देवालय पाहण्यासारखे आहे.

सातारा शहराच्या पूर्वेकडचा कोरेगांव तालुका, पश्चिमेकडचा जावळी तालुका, दक्षिणेचा पाटण तालुका, कऱ्हाड तालुका, उत्तरेचा वाई तालुका आणि पूर्वेस कोरेगांव, खटाव, माण, फलटण हे तालुके आहेत. उत्तरेकडील वाई महाबळेश्वर व खंडाळा हे तालुके एकमेकांस जोडून आहेत. प्रत्येक तालुक्याची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व करीत असलेल्या अनेक व्यक्ती या जिल्ह्यांत निर्माण झाल्या आहेत. पुसेगावला जाताच सेवागिरीचे दर्शन घडते, गोंदवल्याचे गोंदवलेकर महाराज याच परिसरातले. वाईच्या ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वतींची व सध्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रमुख संपादकत्वाखाली चाललेल्या विश्वकोश निर्मितीची नोंद घ्यावी लागते.

> महाराष्ट्रातील पुढारलेले असे हे वाचनालय आहे. वाचनालयाने हाती घेतलेल्या ज्ञानदानाच्या कार्यात मी सुयश चिंतितो.
>
> २६-१२-६२ श्री. भि. जोशी
>
> गीताप्रवचनकार, सांगली

कराड नगरीचे भूषण यशवंतरावजी चव्हाण यांच्याही मौलिक राजकीय आणि सामाजिक कार्याचा विचार करावा लागतो. अशा अनेक नररत्नांच्या मालिकेने खुलून दिसणारा हा प्रदेश दिसायला राकट आहे. तसाच सुपीकही आहे. कोयनेने येथे लखलखाट केला आहे तर कृष्णेने ही भूमी सुजलाम सुफलाम बनविली आहे. निरनिराळ्या तालीम संघांनी जागतिक सन्मानपदे मिळविली आहेत. या सुजलाम सुफलाम प्रदेशात बलवान मनगटांनी विशेष कामगिरी केली आहे. माहुलीचे श्रीरंग जाधव हेलसिंकीच्या जागतिक सामन्यात खेळले. बाबू काशीद जाकार्ता येथील आशीयाई सामन्यात सहभागी झाले. सातारा शहर तालीम संघ, भिडे व्यायामशाळा, शिवाजी उदय मंडळ, कृष्णा क्रीडा मंडळ इत्यादी संस्थांनी क्रीडाक्षेत्रात मोलाचे कार्य केले. सातारा मराठा विद्याप्रसारक समाजानेही जमनाबाई बोर्डिंग, शिवणवर्ग, तसेच सैनिक प्रशिक्षणार्थ सहाय्य केंद्र स्थापन करून समाजाची सेवा केली. क्रांती स्मृती विद्यालयानेही बलसंवर्धनाबरोबर ज्ञान संवर्धनाचे कार्य हाती घेतले. शासनाचे सैनिक स्कूल, पब्लिक स्कूल, आय. टी. आय. येथे उत्तम प्रकारे चालते. सातारा शहराच्या शैक्षणिक तसेच बलसंवर्धन कार्यात अनेक मंडळांनी सहभाग घेतला. कला, साहित्य, वृत्तपत्र सृष्टीतही सातारा मागे नाही.

१८५८ साली येथे चितळे यांनी ' शुभसूचक ' हे साप्ताहिक सुरू केले. त्यानंतर महाराष्ट्र मित्र, विनोद, प्रतोद, प्रेक्षक, श्री शाहू, ध्रुव, जनक्रांति, तडफ, छत्रपती, हंस इ. साप्ताहिके सुरू झाली. ग्रामोद्धाराचे दैनिकात रूपांतर झाले. ऐक्यही दैनिक झाले व सध्या ऐक्य हेच जिल्ह्याचे प्रमुख वृत्तपत्र बनले आहे. साप्ताहिक समर्थ दर गुरुवारी नियमितपणे निघते. तसेच येथे ' जिव्हाळा ' व नुकतेच सुरू झालेले ' महाराष्ट्र मित्र ' साप्ताहिक साहित्य व समाजसेवेत तयार झाले आहे. समर्थ सेवा मंडळाचे ' सज्जनगड ' मासिकही येथून नियमितपणे प्रकाशित होते.

सातारा वृत्तपत्रीय क्षेत्रात आघाडीवर असून या ठिकाणी उत्तम प्रतीची मुद्रणालयेही आहेत.

बँका, न्यायालये, शासकीय यंत्रणेखाली चाललेली निरनिराळी कार्यालये यामुळे शहराचे ठिकाणी अनेकांना कामानिमित्ताने यावे लागते. गुरुवारी आणि रविवारी या ठिकाणी बाजारानिमित्ताने आसपासच्या खेड्यांतील लोक येतात. असा हा गजबजलेला सातारा पुढे चालला आहे. भूतकाळाचा शोध घेऊन भविष्याचा वेध घेणारा आणि वर्तमानकालात स्वाभिमानी व तेजस्वी वृत्तीने जगणारा सातारा कर्तृत्वाचा आलेख वाढता चढतो आहे.

☆ ☆ ☆

सातारा शहराचं सांस्कृतिक केंद्र :

# पाठक भवन

लेखक : वि. ल. चाफेकर
बी. ए. ऑनर्स

सातान्यातल्या कोणत्याही सुशिक्षिताला पाठक भवन कुठाय हे सांगावे लागत नाही. सुशिक्षिताप्रमाणे अशिक्षितातही आता याचा बोलबाला झाला आहे. सर्वसामान्यपणे मध्यम प्रमाणावर भरणाऱ्या सभा, व्याख्यानें परिसंवाद याच सभागृहात होतात. राजकारण, साहित्य, संस्कृति, कला, समाजकारण, नगरविषयक चर्चा इ० कितीतरी विषय या पाठकभवनात चर्चिले गेले व सुशिक्षित, अशिक्षित अबालवृद्ध स्त्रीपुरुषांनी ते चवीने ऐकले. शहरातले विविधक्षेत्रांतले कितीतरी कार्यकर्ते तसेच परस्थ विद्वान त्या सभागृहात आपली हजेरी लावून गेले. या दृष्टीने नगर वाचनालयाच्या शिरोभागी हे भवन शोभून दिसते. बरेच दिवसात जर या सभागृहात एखादे व्याख्यान एखादा कार्यक्रम झाला नाही तर सुशिक्षित लोकांना चुकल्या चुकल्यासारखे वाटते.

पाठक भवनातल्या सभेचा सर्वसाधारण श्रोता हा वाचनालयात येणारा पेन्शनर असतो अशी अनेकांची समजूत आहे. कांही वेळा ही खरी वाटते. पुष्कळदा हे तेथे बोलणारा वक्ता व चर्चिला जाणारा विषय यांवर अवलंबून असते. सामाजिक विषयावर बोलणारे बाबा आढावासारखे वक्ते लाभले किंवा नरहर कुरुंदकरांचे सारखे आजकालचे विचारवंत असले की तरुणांची इतकी प्रचंड गर्दी होते की मग अनेकांना व विशेषत: वृद्धांना व स्त्रियांना बसायला अगर उभे रहायलाही जागा नसते. गीता प्रवचनकार भिडेशास्त्री किंवा मुळे शास्त्री सारख्या प्रवचनकारांची प्रवचने असली कीं स्त्रियांच्या प्रचंड गर्दीपुढे पुरुषांना अंग चोरून बसायची पाळी येते.

व्याख्यानात रंगून गेलेल्या श्रोत्याला लोखंडी खुर्च्यांची खडखड त्रास देत नाही की लाकडी खुर्चीत अडकून कपडा फाटतोय याचे भान राहात नाही. सातारा शहराची रचना ध्यानी घतली तर पाठक भवनासारखे मध्यवर्ती सभागृह व जागा दुसरी नाही. तसेच संस्था व पक्ष कार्यकर्त्यांचे दृष्टीनेही श्रोते जमायला हमखास उपयोगी अशी ही जागा; कारण खाली दिवसभर उघडे वाचनालय; त्यामुळे हुकमी श्रोत्यांची वाण पडत नाही. बरे सभेची जाहिरात म्हणावी तर तशी फारशी करावी लागत नाही. दोन दिवस वाचनालयात फलक लावला तरी हॉल भरण्याइतकी गर्दी ठरलेली.

सातारचे हे सभागृह सत्तर पाऊणशे वर्षाइतके जुने. त्यामुळे समाजाच्या विविध स्तराचे व अनेक पिढ्यांतील बदलत्या विचारांचे पडसाद या सभागृहात उमटले आहेत. ज्याप्रमाणें 'विषम विवाह' विरोधी सभा या सभागृहाने पाहिली त्याचप्रमाणे विषम विवाहाला पाठिंबा देणारी व "आजच्या विवाह विषयक समस्या" या विषयावरही परिसंवाद येथे गाजले. राजकीय बाबतीतले मवाळ जहालांचे वाद येथे झाले. हिंदुसभा, काँग्रेसच्या राजकारणाची चर्चा व चिरफाडही यथे झाली. रामराज्य परिषदेपासून कम्युनिस्ट पक्षापर्यंतचे विविध विचार या हॉलमध्ये ऐकवले गेले व आजही जात आहेत कितीकांचे सत्कार येथे झाले; कितिकांना श्रद्धांजली वाहिल्या कितिकांचे वादविवाद येथे झाले आहेत. सर्व अर्थाने हे व्यासपिठ खरोखरीच पक्षातीत आहे. येथे शेक्सपीयर कालिदासापासून मर्ढेकर तेंडुलकरापर्यंत अनेक साहित्यकांच्या कलाकृतीवरील व्याख्याने गाजली व सातारकरांनी ऐकली. हिंदू, मुस्लिम, बौद्ध, खिश्चन कित्येकांची तत्वे ऐकविली गेली. नागरिकांच्या अडचणीपासून सार्वत्रिक निवडणुका पर्यंत अनेक विषयावरील स्थानिक कार्यकर्त्यांचे एकमेकांवर प्रहार करणारे व आपल्या मताचा पुरस्कार करणारे परिसंवादही येथे रंगले.

ज्यांच्या नावावर सभागृह शोभत आहे ते सातारचे भूषण पाठक मास्तर, रावबहादूर काळे, दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण, भाऊसाहेब मोडक, नाथ घाणेकर, फणसळकर वकील, नानासाहेब आगाशे, बाबूराव भिडे, शि. गो भावे, लिमये, कर्मवीर पाटील, तात्यासाहेब साठे, डॉ. आठल्ये, यांच्या सारख्या सातारच्या

---

कोणाच्याही व्याख्यान, प्रवचनाला पाठक भवन उपलब्ध असायचे व त्याची योजना करायला 'ज्ञानविकास मंडळा'सारख्या संस्था. त्यामुळे कोणीही परस्थ वक्ता व्याख्यानासाठी विचारायला आला की ग्रंथपाल श्री. साने त्याला सांगायचे की तुम्ही ज्ञानविकास मंडळाच्या चाफेकरांना भेटा, ते तुमचे व्याख्यान ठेवतील.

एकदा एक प्रवचनकार असेच सान्यांनी पत्ता दिल्यावर माझेकडे आले. आपण प्रवचनकार आहोत; परदेशी जाऊन आलोत, गावोगावी प्रवचने देतो, आता येथे आलो असे म्हणाल्यावर त्यांना घेऊन वाचनालयात आलो व त्यांच्या पाच प्रवचनासाठी हॉल घेऊन फलकही लावला त्यांची सोय झाल्याने ते खुष झाले व ज्ञानविकास मंडळासही आयता कार्यक्रम चालून आला. पाच दिवसांच्या त्यांच्या प्रवचनास स्त्री पुरुष श्रोत्यांची प्रचंड गर्दी होती व शेवटच्या दिवशी त्यांची संभावनाही चांगली झाली.

ते प्रवचनकार म्हणजे त्यावेळी अप्रसिद्ध असलेले गीता प्रवचनकार श्रीपादशास्त्री भिडे. पुढे त्यांची अनेक प्रवचने वेळोवेळी झाली.

नगर वाचनालयाचे वतीने एकदा श्रीमती कमलाबाई देशपांडे यांचे स्त्रियांचें हक्क व कायदा यावर व्याख्यान होते. अध्यक्ष होते शिवरामपंत लिमये. कमलाबाईचे विचार परिप्लुप्त, समतोल व अभ्यासू भाषण झाल्यानंतर समारोप करताना श्री. लिमये म्हणाले की अशा प्रकारे समतोल, अभ्यासू भाषण करण्याचा वारसा कमलाबाईंना त्यांच्या वडिलांपासून–कै. साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकरांपासून–मिळाला आहे. लिमयांच्या या समयोचित उद्गारांना श्रोत्यांनी चांगली दाद दिली.

थोर सुपुत्रांनी आपले विचार या ठिकाणी ऐकवून आणि विविध विषयावर या सभागृहात विचार विनिमय करून सातारकरांची वैचारिक पातळी उचावण्यात निश्चितच साह्य केले. विद्यमान पिढीतील सर्वश्री व्ही. एन. पाटील, बॅ पी जी पाटील, बन्याबापू गोडबोले, मनोहरपंत भागवत, डॉ. पां. के कोल्हटकर, नारायणराव कोकजे, अण्णासाहेब काशीकर, बाबूराव घोरपडे, इ. विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी हे सभागृह अनेकदा गाजवले.

नगर वाचनालयाच्या या सभागृहात वाचनालयाच्या सभा तर होतातच पण त्याशिवाय साहित्य सभा, गेली पंचवीस वर्षे सभा व्याख्याने करणारे ज्ञानविकास मंडळ यांचे या सभागृहाशी अतूट असे नाते जडले आहे. या सभागृहाच्या अंगाखांद्यावर या संस्थांचे कार्य पोसले आहे. विविध राजकीय पक्ष, कामगार संघटना युवक दले यांना हे सभागृह आपले वाटते.

पाठक हॉलचा श्रोतृवर्ग हा आपला दर्जा राखून आहे. सर्वांचे विचार शांतपणे ऐकणारा पण तितकाच चोखंदळ, प्रश्नोत्तरे करून रंगत आणणारा व योग्य त्या वक्त्याला दाद देणारा असा हा श्रोतृवर्ग अनेक परस्थ वक्त्यांनाही मोह पाडतो.

एकेकाळी सातारसारख्या पेन्शनरांच्या गावाला हे सभागृह पुरेसे होते पण आता प्रत्येक शहराचा चेहरा मोहरा बदलत आहे. वाढता शिक्षणाचा प्रसार विद्यार्थ्यांची व सुशिक्षितांची वाढती संख्या कला–शास्त्र–विनोद इत्यादींची वाढती भूक व औद्योगीकरण, वाढती राजकीय सामाजिक जागृति यामुळे आता हे सभागृह पुरे पडत नाही. त्यामुळे ध्वनिक्षेपक लावून बाहेर उभे राहाण्याची सोय करावी लागते. त्यामुळे सभागृह वाढीची योजना अवश्यक आहे. आताच्या या सभागृहात किमान दुप्पट श्रोते सहज बसावेत व सुसज्ज प्रेक्षागृह असावे अशी वाचनालयाची योजना आहे. त्या दृष्टीने विस्ताराच्या योजनेत आधुनिक सोयींची व स्वच्छतागृहाची सोय नव्या इमारतीत केलेली आहे.

वाचनालय जरी शासकीय नियंत्रणाखाली पूर्वीपासून असले तरी पाठक भवन व त्याचे कार्य आणि व्यवस्थापन पहिल्यापासून स्वतंत्र बाण्याची व राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करता यावी या दृष्टीने त्याची व्यवस्था व सभागृहाची योजना पूर्वीपासून चालू ठेवली आहे.

या ग्रंथालयात आल्यावर ज्याला वाचनाचा मोह पडणार नाही तो करंटा. पण येथे भाग्यवंत बहुत. अधिक काय लिहावे ?

२७–११–७१ शिवाजीराव भोसले

त्यामुळे ब्रिटिशांच्या काळातही इंग्रजी राज्य मोडण्याच्या घोषणा या सभागृहात झाल्या. त्यातूनच 'आॅर्थर हॉल' हे नांव बदलून 'पाठक भवन' असे नवे नाव देण्यात आले. कोणत्याही संस्थेस व पक्षास उपलब्ध होऊ शकणारे हे सभागृह संस्था चालकांच्या राजकीय पक्षाच्या दृष्टीने अत्यंत सोईचे व उपयुक्त ठरले. शिवाय भाडेहि माफक. पूर्वी आठ बारा आण्यात हे सभागृह भाड्याने दिले जाई. आता परिस्थितीनुसार त्यात वाढ झाली तरी तुलनेने ती कमी आहे. सार्वजनिक कार्याला उत्तेजन देणेची जाण चालकात आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांना तो मोठा दिलासा आहे. आज या जागेत सभा व्याख्यानाच्या कार्यक्रमाबरोबरच चित्र प्रदर्शन, संगीत चित्रपट, इ. कार्यक्रमही होतात. सातारकरांना प्रिय अशी ही वास्तु खरोखरीच साताराचे सांस्कृतिक वैभव व केन्द्र आहे.

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा !

## सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

### हरभट रोड, सांगली

[ स्थापना : १९३५ ]

**समृद्धीचा मार्ग सहकार**

आपल्या पैशाचे योग्य गुंतवणुकीसाठी व समृद्धीसाठी
आमच्या निरनिराळ्या आकर्षक ठेव योजना

▫ मुदत ठेव ▫ समृद्धी ठव ▫ रिकरिंग ठेव
▫ मासिक व्याज ठव ▫ बचत निधी ठेव

तसेच

▫ कर्ज पुरवठा योजना

व अन्य बँकिंग सेवेसाठी सदैव तत्पर.

: नजिकच्या कोणत्याही शाखेत आजच भेटा :

सांगली जिल्ह्यातील १५ शाखा, कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर व मराठवाड्यातील बीड व परभणी शाखाद्वारे जनतेची सेवा करीत आहोत.

ल. य लागू — कार्यकारी संचालक
म ह. गोडबोले — अध्यक्ष

# सार्वजनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन कसे आहे, कसे असावे ?

संजय वि. नाईक, ग्रंथपाल, सातारा.

सार्वजनिक ग्रंथालय हे ज्ञान वितरणाचे एक श्रेष्ठ माध्यम असून वाचनाचा आनंद वृद्धिंगत करणारे एक मानव निर्मित केंद्र होय. सार्वजनिक ग्रंथालयातूनच ज्ञानार्जन करून बौद्धिक जीवनाच्या कक्षा वाढवल्या जाऊन मानवाच्या जीवनात अंतर्बाह्य बदल करण्याची व श्रेष्ठ मानव निर्माण करण्याची शक्ती सार्वजनिक ग्रंथालयात असते; परंतु ज्यावेळेस पुस्तके, वाचक आणि ग्रंथालयाचे कर्मचारी हे तिन्ही घटक एका सारख्या विचाराने प्रेरित होऊन विशिष्ट हेतूने ज्ञानार्जनाचे कार्य करतील तेव्हाच वाचकांची बौद्धिक भूक खऱ्या अर्थाने शमविता येईल.

एखाद्या वाचकाने मागितलेला ग्रंथ सेवकाने काढून नोंदवून देणे म्हणजे ग्रंथालय सेवा करणे असे नव्हे तर ग्रंथ वाचनाविषयीची भूक वाढविणे, वाचकांच्या आवडी निवडीवर लक्ष ठेऊन त्याला योग्य वळण लावणे आणि हे सर्व करीत असताना वाचकांच्या वाचन स्वातंत्र्यावर आपले बंधन पडणार नाही हे सातत्याने बघणे आणि वाचकाने मागितलेला ग्रंथ देत असताना त्या ग्रंथ विषयास पूरक असणारी इतर ग्रंथांची माहिती त्यांना देणे आवश्यक आहे. हेच खऱ्या ग्रंथालय सेवकाचे कार्य होय.

आजच्या सार्वजनिक वाचनालयाचा ग्रंथपाल जर आपण बघितला तर तर तो स्वतः उत्साहाने कोणतेही काम करीत नाही असे खेदाने म्हणावे लागेल. काही ग्रंथालये आणि त्यांचे ग्रंथपाल यास अपवाद आहेत यात शंका नाही पण आज अस्तित्वात असणाऱ्या १३५० सार्वजनिक ग्रंथालयापैकी ५० टक्के ग्रंथालयाकडून पाहिजेतशी ग्रंथालय सेवा सेवकांकडून दिली जात नाही यास अनेक कारणे आहेत.

## सेवकांचे प्रशिक्षण :

सार्वजनिक ग्रंथालयातील प्रत्येक सेवकास ग्रंथालय सेवेसंबंधीची संपूर्ण माहिती देणारे प्रशिक्षण देण्याची सोय महाराष्ट्र शासनाने मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, बार्शी वगैरे ठिकाणी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाद्वारे केलेली आहे. त्या ऐवजी ती सोय जिल्हा ग्रंथालय संघामार्फत प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध करून द्यावी. आज असणाऱ्या मर्यादित शिक्षण केंद्रामुळे सेवकांना हे शिक्षण मिळविण्यासाठी अनेक अडचणी येतात. पुणे येथील केंद्रात एका वेळेस ८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येतो. याठिकाणी प्रवेशाचेवेळी जवळ जवळ ३०० उमेदवारांचे अर्ज येतात आणि त्यातून ८० उमेदवार निवडले जातात. म्हणजे २२० उमेदवारांना प्रवेश मिळतच नाही. तर ही सोय जर प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आली तर एकाच विभागावर एवढा बोजा न पडता अनेक सेवकांना प्रशिक्षण मिळू शकेल. आणि जर असा प्रशिक्षित वर्ग ग्रंथालयास मिळाला तर त्या ग्रंथालयात अनेक नवीन प्रयोग करून अनेक सुधारणा करून वाचकांचा बौद्धिक दर्जा वाढविण्यासाठी त्यास हवा असलेला ग्रंथ किंवा हवी असेल ती माहिती त्वरित उपलब्ध करून देता येईल. जेवढे सेवक प्रशिक्षित असतील त्या प्रमाणात ग्रंथालयाचे काही विभाग स्वतंत्र करून त्यांची जबाबदारी एकट्या ग्रंथपालावर न रहाता विभाग प्रमुखाकडे देण्यात येऊन त्या त्या विभागाचे सखोल ज्ञान संकलित करता येईल यात शंका नाही.

## सेवकांची वृत्ती :

आज सार्वजनिक ग्रंथालयात काम करणारा सेवक-वर्ग जर आपण पाहिला तर आपणास असे दिसून येईल की काम करणाऱ्या सेवकामध्ये ५० % सेवक आपल्या इतर सेवा जीवनातून निवृत्त झाल्यानंतर केवळ खुर्ची अडवायची म्हणून अत्यंत अल्प वेतनावर ग्रंथालय क्षेत्राकडे वळलेले दिसतील. तर यातीलच काहीवृद्ध सेवक केवळ सेवाभावे वृत्तीने आपले संपूर्ण जीवन या क्षेत्रात वाहणारे असे दिसतील परंतु अशी मंडळी बोटावर मोजण्या इतकीच. ३० % तरूण सेवक वर्ग महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपला 'पॉकेट मनी' बाहेर पडावा म्हणून अंशकालिनो ( पार्ट टाईम ) काम करणारा असा दिसेल. त्यास या क्षेत्रातील कामाबद्दल जिव्हाळा अजिबात नाही. येणाऱ्या वाचकाने मागितलेले पुस्तक कपाटात आहे किंवा नाही हे पाहून सांगणे या पलीकडे तो या क्षेत्रात रस घेताना दिसत नाही. तर राहिलेला २० % तरुण सेवक वर्ग या क्षेत्रात आपण काहीतरी नवीन करून दाखवावे म्हणून सतत प्रयत्नशील असलेला दिसतो; परंतु त्याच्या आसपास वावरणारी ही सेवक मंडळी त्यास कोणतेही प्रोत्साहन किंवा प्रतिसाद देत नाहीत किंवा त्यांचे साधे कौतुकही करीत नाहीत. त्यामुळे तो आपल्या कामात नाराज असतो तेव्हा आपण ह्या क्षेत्रात आज आहोत, उद्या नाही म्हणून कवा आपण करतो किंवा सांगतो हेच बरोबर आहे असे सांगणाऱ्या सेवक सहकाऱ्यांनी या २० % सेवकांना आपल्या तळमळीच्या सेवेपासून वंचित करता कामा नये तर त्यास सहकार्य करणे अगत्याचे आहे. त्याने सुचविलेल्या नवीन योजनामुळे आपले काम वाढेल म्हणून त्यास विरोध करणे हे योग्य नव्हे जर सर्व सेवक वर्ग या विचाराने प्रेरित होऊन काम करू लागला तर आज असणाऱ्या १३५० ग्रंथालय ना आदर्श ग्रंथालये म्हणून संबोधण्यास वेळ लागणार नाही. परंतु जेव्हा सेवक आपली मनोवृत्ती बदलतील तेव्हा अशी ग्रंथालये निर्माण होतात.

## सेवकांचे वेतन :

महाराष्ट्र-राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयीन सेवकांची वेतन श्रेणी पाहतांना आपणास असे दिसेल की सामान्यपणे कमित-कमी रु ४० ते जास्तीत जास्त रु. ३५० असा संपूर्ण एकत्रित पगार या सेवकांना मिळतो. आजच्या परिस्थितीत जीवन जगण्यासाठी प्रत्येक माणसाला सरासरी मासिक खर्च निदान रु. २०० तरी येतो ग्रंथालयातील सेवक आपले जीवन आपल्या एवढ्या अल्प वेतनावर चालवू

वाचनालयात आलं की मला नेहमीच माहेरी आल्यासारखं वाटतं. ओळखीची, आपली, प्रेमाची माणसं भेटल्याचा आनंद होतो. तोच आज परत झाला कधीही विसरणार नाही.

५–१०–७१ ज्योत्स्ना देवधर

शकत नाही. साहजिकच तो ग्रंथालय व्यवसाय जोडून काही अन्य उद्योग करीत असतो व असे करीत असताना सहाजिकच तो त्याच्या इतर व्यवसायात अधिक रस घेतो व ग्रंथालय क्षेत्राकडे त्याचे पूर्ण दुर्लक्ष होत जाते. तेव्हा सेवकांचे वेतन निश्चित स्वरूपात वाढवणे आवश्यक आहे.

**व्यवस्थापक मंडळ :**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाचक सभासदांमधून मतदानाद्वारे प्रत्येक वर्षी निवडणुका होऊन व्यवस्थापक मंडळ, निवडले जाते. काही वेळेस अनेक संस्थांमध्ये अशी परिस्थिती येते की तेथील व्यवस्थापक दरवर्षी बदलले जातात, तर काही व्यवस्थापक कायम निवडले जातात. आता व्यवस्थापक मंडळाचा म्हणजेच कार्यकारी मंडळाचा प्रभाव त्याच्या ग्रंथालयावर पडत असतो ग्रंथालय सेवकाने व्यवस्थापक मंडळाकडून आलेल्या आदेशाचे पालन करणे हेच त्याचे प्रमुख काम बनते. परंतु व्यवस्थापक जेव्हा ग्रंथालय सेवेत काही नवीन बदल सुचवत असतील तेव्हा तेथील ग्रंथपालाचा सल्ला कधीही घेत नाहीत. काही संस्था यास अपवाद आहेत यामुळे असे होते की व्यवस्थापक बदलले की तेथील पद्धती बदलल्या जातात व त्यामुळे वाचकांना व सेवकांना फार त्रास होतो. समजा या वर्षीच्या व्यवस्थापक मंडळाने ठरविले की आपल्या ग्रंथालयातील ग्रंथांचे वर्गीकरण दशांश वर्गीकरण पद्धतीने करावयाचे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविले तर यात एक वर्षाचा कालावधी सहज निघून जातो व पुढील वर्षी निवडून येणाऱ्या व्यवस्थापक मंडळाने जर वर्गीकरण द्विबिंदू पद्धतीने करा असा सल्ला दिला तर तेथील ग्रंथालय सेवक तरी काय करणार तो त्यांना विरोध करूच शकत नाही, का तर त्यास आपल्या नोकरीची शाश्वती नसते आणि त्यामुळे व्यवस्थापक जसे बदलत जातील तसे व्यवस्थापनही बदलत जाते यात शंका नाही.

**शासनाचे धोरण :**

महाराष्ट्र शासनाने सन १९६७ मध्ये ग्रंथालय कायदा संमत केला व त्याची कार्यवाही सन १९६८ पासून सुरू झाली. कायद्यानुसार ग्रंथालयाची वर्गवारी ठरविली जाऊन त्या त्या वर्गाच्या ग्रंथालयांना त्या प्रमाणात अनुदान मिळते. परंतु जेव्हा कायदा करण्यात आला तेव्हा ‘ अ ’ वर्ग ग्रंथालयास असणाऱ्या अटी म्हणजे स्वतःची इमारत, १५००० हून अधिक ग्रंथ, १५ वृत्तपत्रे, ५० नियतकालिके, बालविभाग आवश्यक, महिला विभाग आवश्यक, ग्रंथालय सात तास उघडे असले पाहिजे, सभासद संख्या किमान ३०० असावयास पाहिजे. सांस्कृतिक कार्यक्रम किमान १० केले पाहिजेत आणि स्वतंत्र संदर्भ विभाग पाहिजे. या अवस्थेत जेव्हा ग्रंथालय असेल तेव्हा त्यास ‘ अ ’ वर्ग मिळून रु. १५००० वार्षिक अनुदान शासन देते. आज आपण जर महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयातील ‘ अ ’ वर्ग ग्रंथालये पाहिली तर प्रत्येक ग्रंथालयात कमितकमी ३५००० ग्रंथ, २० दैनिके, ७५ नियतकालिके, १२ तास उघडे, १५०० सभासद, २० ते २५ सांस्कृतिक कार्यक्रम, स्वतःच्या इमारती वगैरे अनेक प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु शासनाने आपल्या अनुदानात काहीच वाढ केलेली नाही. त्यामुळे वाढता खर्च हा वाचकांच्या मिळणाऱ्या वर्गणीतूनच करावा लागतो. साहजिकच वर्गणीचे दर वारंवार वाढवावे लागतात. तरी शासनाने याचा विचार करून अनुदान त्वरित वाढविणे गरजेचे आहे.

**वाचकांकडून अपेक्षा :**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या वाचकांपैकी ८० टक्के वाचक प्रामुख्याने कथा कादंबऱ्या वाचतात असे आपणास आढळून येईल. तर २० टक्के वाचक हा इतर वाङ्मय वाचत असतो. त्यामुळे प्रत्येक वाचकाने मागितलेली कादंबरी किंवा कथासंग्रह त्यास वेळवर मिळत नाही. त्यामुळे तो ग्रंथालयातील व्यवस्थेवर नाखूश असतो. काही प्रयत्नानंतर त्या वाचकास हवी ती कादंबरी मिळते पण त्या कादंबरीची मागील पुढील पानेच गायब झालेली असतात. काही मजकूरावर रेघोट्या मारलेल्या असतात, काही वाचकांनी न मागता आपला अभिप्राय व्यक्त केलेला दिसतो. यामुळे ग्रंथांची खराबी तर होतेच परंतु तो ग्रंथ वाचकांना नीट वाचताही येत नाही. तेव्हा असे करणारे जे अनाहूत वाचक आहेत त्यांनी वाचावयास नेलेला ग्रंथ आपला स्वतःचा आहे असे मानून काळजीपूर्वक वाचला पाहिजे. तो घरातील लहान मुलांच्या हातात पडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तो नेताना व जमा करावयास आणताना मंडईच्या पिशवीत तेलाच्या बरणी सोबत त्यास न ठेवता तो नीट जपून आणला पाहिजे. हे सर्व वाचकांना केवळ बौद्धिक उपदेश करून भागणार नाही तर निरनिराळे प्रयोग करून उदा. ग्रंथ कसे हताळावेत या विषयाची छोटीशी रंगीत फिल्म दाखवून, ग्रंथप्रदर्शन करून वगैरे अनेक मार्गांनी वाचकांना शिक्षण देता येईल व ग्रंथांची होणारी दुर्दशा टाळता येईल.

वरील सर्व बाजूंचा साकल्याने विचार केला तर आदर्श ग्रंथालय निर्माण होण्यास व वाचकांची बौद्धिक भूक शमविण्यास ग्रंथालयेही कमी पडणार नाहीत असे म्हणावयास हरकत नसावी.

☆ ☆ ☆

[ श्री. नाईक हे आमच्या ‘ नगरवाचनालयाचे ’ ग्रंथपाल आहेत. सेवक म्हणून त्यांचे काम पाहून वाचनालयाने त्यांना ‘ग्रंथपालाच्या’ शिक्षणाकरिता वाचनालयाचे खर्चाने भरपगारी रजा देऊन पाठविले. व त्यानंतर त्यांची बढती ‘ग्रंथपाल’ म्हणून केली. श्री. नाईक हे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय कर्मचारी संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आहेत. ]

# वाचकांकडून ग्रंथालयाच्या अपेक्षा

श्री. म. म. वैद्य, ग्रंथालय सेवक.
नगर वाचनालय, सातारा

आजच्या ग्रंथालयातील वाचकांचा विचार करण्यापूर्वी वाचनालयाचे पूर्वीचे दृश्य कसे होते ते पाहू. पाच पन्नास म्हातारे वाचक वाचत आहेत, कोणी मासिके चाळत आहेत; मुलांना प्रवेश नाही. सगळीकडे टाचणी पडेल इतकी शांतता. आता परिस्थिति पार बदलून गेली आहे सरकारने मोफत वाचनालय केले आहे. विद्यार्थी वर्गाची व इतर वाचकांची बेसुमार गर्दी वाढत चालली आहे. त्याचप्रमाणे आज वाचकांची ही जबाबदारी वाढली आहे. सर्व वाचकांना पुस्तकांचा–मासिकांचा–वृत्तपत्रांचा उपयोग व्हावा म्हणून वाचकांनी खालील गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. पुस्तकातील पाने फाडणे, मासिके पळवून नेणे, त्यातील मजकूर फाडणे, पुस्तके गहाळ करणे, खराब करणे, यामुळे हजारो वाचकांचेच नुकसान होते. ग्रंथालयाचे वर्गणीदार झाल्यावर पुस्तके काळजीपूर्वक वापरली पाहिजेत व वेळेवर आणून दिली पाहिजेत. पुस्तक देवघेवी-बाबत सेवकांशी सहकार्याची भावना हवी. आपणाप्रमाणेच दुसऱ्याही वाचकांना पुस्तके पाहिजे असतात याची जाणीव प्रत्येक वाचकाने ठेवली पाहिजे कांही वाचक अभ्यासासाठी म्हणून पुस्तके नेतात व आणून देत नाहीत अगर गहाळ झाली म्हणून सांगून मोकळे होतात. त्यामुळे अन्य वाचकांचेच नुकसान होते. आता ग्रंथप्रसार इतका वाढला आहे की काय वाचावे, व काय नको असे होते. तसेच मासिकेही उदंड झाली आहेत. वाचकाना भरपूर वाचावयास मिळत आहे. वाचकांनीही आपली जबाबदारी ओळखून आपल्यामुळे कोणत्याही इतर वाचकांचे–पर्यायाने स्वतःचे नुकसान करु नये, हीच दक्षता सर्वांनी घ्यावी. नव्हे ते कर्तव्यच आहे, तरच वाचकांना पुढील भविष्यकाळात वृत्तपत्रे मासिके, पुस्तके भरपूर वाचावयास मिळतील.

दुसरे म्हणजे शासन आज मोफत वाचन, फर्निचर, पुस्तके–मासिके सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी प्रतिवर्षी अनुदान देते. परंतु सेवकांच्या वेतनश्रेणीसाठी भरपूर अनुदान देणेस अजून शासन तयार नाही. त्यामुळे सेवकांची आर्थिक स्थिति, त्यांचा दर्जा सुधारता येत नाही. ग्रंथालय प्रसाराचेच एक अंग म्हणून शासनाने सेवकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न त्वरित सोडवला पाहिजे, तसा तो सुटेल अशी आशा करुया.

☆ ☆ ☆

---

हार्दिक शुभेच्छा !

**श्री शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर**

शिखर शिंगणापूर यांचे शुभ आशीर्वादाने
क्षेत्रात शेतकरी एकत्र येऊन कारखानदारी उभी करतात व
निर्मितीसाठी जुनी मशिनरी चालवून
उभारू शकतात हे सहकार महर्षी मा. श्री. शं. ना. मोहिते-पाटील यांचे प्रेरणेने
साखर कारखान्याने सिद्ध करून दाखविले आहे

★ ★

बाळासाहेब घोरपडे
कार्यकारी संचालक

मु. भो. देशमुख
चेअरमन

साताऱ्यातील एक सांस्कृतिक केंद्र नगर वाचनालय : जागेच्या अभावी विस्तार खुंटणार काय ?

# कांही आठवणी

लेखक : प्रा. दि. मो. हातवळणे, पुणे.
नगर वाचनालय माजी अध्यक्ष.

एकेकाळी महाराष्ट्राची राजधानी असलेली टुमदार नगरी १९४८ साली ( विद्यापीठीय कामा निमित्त आलो असता ) प्रथम माझ्या नजरेस पडली व तिच्या भोवतालचा रम्य निसर्ग पाहून मी अक्षरशः भारावून गेलो. तेव्हापासूनच मी या नगरीच्या प्रेमांत पडलो ! योगायोग असा कीं नंतर पाच वर्षांनी सातारा ही ( १९५४ पासून ) माझी कर्मभूमि बनली व उणीपुरी वीस वर्षे या नगरीत मी व्यतीत केली, या कालखंडात नगर वाचनालय हा माझा प्रमुख विरंगुळा होता.

या संस्थेशी कालांतराने माझा घनिष्ठ संबंध जडून कित्येक वर्षे मी कार्यकारिणीत पदाधिकारी म्हणून कामहि पाहिले. तत्पूर्वी पुण्यांतील वाचनालयांत एक तपाची पदाधिकारी म्हणून केलेली सेवा मला साताऱ्यात उपयुक्त ठरली.

वाचनालय ब्रिटिश अमदानीत स्थापन झाल्यापासून त्याची हळूहळू प्रगति होत गेली व अलीकडे ते एक प्रमुख आकर्षण व सांस्कृतिक केंद्र बनले. या उत्कर्षाला हातभार लागला तो सर्वश्री, आचार्य, चाफेकर, सोवनी, बाळिंबे वेलणकर प्रभृति निरलस कार्यकर्त्यांचा व त्यांनी केलेल्या प्रदीर्घ सेवेचा, यात शंका नाही.

नगर वाचनालयात उत्साही तरुण कार्यकर्त्यांनी अलीकडे अनेक नवे उपक्रम आरंभिले ही समाधानाची बाब असून त्यामुळे वाचनालयाने सांस्कृतिक मूल्ये अनायासे जतन केली आहेत. विद्वानांची व्याख्याने, शारदीय महोत्सव, विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, निबंधादि स्पर्धा, पुस्तक-रांगोळी प्रदर्शन, ज्वलंत प्रश्नावर परिसंवाद अशा विविध उपक्रमांनी नागरिकांत उत्साह निर्माण करण्यात ही संस्था अग्रेसर ठरली आहे. अभ्यासिका-योजना पण क्रमशः यशस्वी होत आहे.

अलीकडे ग्रंथालय-चळवळीमुळे संस्थेला जिल्हा वाचनालय हा दर्जा मिळून शासकीय भरघोस अनुदानाने सांपत्तिक स्थिति थोडी सुधारली आहे. एरवी केवळ वर्गणीद्वारा वाढत्या किंमतीची पुस्तके नियतकालिके घेणे अशक्यप्राय झाले असते. आता अडचण आहे ती अधिक जागा उपलब्ध होण्याची. नवी इमारत बांधल्या खेरीज मुक्तद्वार वाचनालयामुळे निर्माण झालेल्या बिनवर्गणीदार वाचकांच्या लोंढ्याला तोंड देणे अशक्य होणार आहे.

या संस्थेला अनेक नामवंत अध्यक्ष लाभले व त्यामुळे संस्थेचे ध्येयधोरण सतत कार्यक्षम राहिले आहे. यापुढेहि उत्कृष्ट मार्गदर्शन करणारे पदाधिकारी लाभून संस्थेची झपाट्याने वाढ होईल व नवी वास्तू उभी राहून त्यात हे वाचनालय डौलाने प्रतिष्ठापित होईल अशी या प्रसंगी आशा करू या !

☆ ☆ ☆

पाठक भवनासमोर एकेकाळी भाजी बाजार भरायचा. कांही विक्रेते आपल्या मालाची जाहिरात व भाव जोरजोराने ओरडून करायचे. सभेस इतका त्रास व्हायचा की वक्त्यांचे व्याख्यान ऐकू येण्याऐवजी कांद्या बटाट्यांचे भाव ऐकू यायचे ते सांगूनही थांबेनात. शेवटी शेकडो श्रोत्यांच्या सह्यांचे एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पाठवून बाजार उठविण्याची विनंती केली. त्यांवर पोलिस अधीक्षक वस्तुस्थिती पहाणेसाठी आले. त्याची कुणकुण संबंधित विक्रेत्यांना आधीच लागली होती. साहेबांची गाडी येताच बाजारात अगदी स्मशान शांतता ! कांहीं आरडाओरड नाही. पण वस्तुस्थिती अधिकाऱ्यांना समजून चुकली व लौकरच तो बाजार दुसरीकडे हलवला गेला.



उत्पादक-
भिडे अँन्ड सन्स, प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## सातारा शहराची सन १९२५ ते सन १९७५ या ५० वर्षांच्या कालावधीतील

# नाटयसेवेचें सिंहावलोकन

श्री. का. रा. आपटे. सातारा

पूर्वी शहरात फक्त नाटक कंपन्याच नाटके करीत असत. त्या वेळच्या लोकांना संगीत व गद्य अशा दोन्हीं प्रकारची नाटके पाहण्याची आवड होती. परंतु नाटयकलेतील कलाकारांबाबत जनतेत आदर नसे. त्यावेळचे नट बहुतेक अशिक्षित, अविचारी तरुण, छंदी–फंदी तसेच व्यसनी मानले जात. त्यामुळे त्यांना जनतेत तितकासा मान मिळत नसे.

पुढें शहरात शाळा, कॉलेजेस्, निरनिराळया शिक्षण संस्था यांतून वार्षिक स्नेहसंमेलने करण्याची प्रथा राजमान्य होऊ लागली, व त्यांत इतर करमणुकीचे साधनांबरोबर प्रामुख्याने नाटके बसविण्यात येऊ लागली. त्यावेळी शिक्षण संस्थेतून माजी विद्यार्थ्यांना मराठी नाटक करण्याची व इयत्ता १०–११ वी यातील मुलांना चांगल्या-पैकी इंग्लिश व संस्कृत अशा नाटकातील एक एक अंक बसवून त्यांत भूमिका करण्यास संधि दिली जात असे.

यातूनच कलाकार, दिग्दर्शक, नाटयलेखक हळु–हळु उदयास येऊ लागले. त्याच सुमारास लोकमान्य टिळकांनी ठिकठिकाणी स्वातंत्र्य मिळविण्याबाबत जे बीजारोपण केले, त्याचा परिणाम म्हणून त्या काळात उत्कृष्ठ स्वरुपाची ऐतिहासिक नाटके लिहिली गेली.

सन १९४४ साली नाटयशताब्दी म्हणून जे वर्ष गाजले त्या सुमारास सातान्यातील नाटयलेखक, दिग्दर्शक व उत्कृष्ट नट, कै. शां. गो. गुप्ते, तसेच श्री. काशीनाथराव आपटे या दोघांनी शहरातील काही नाटयप्रेमी मंडळींच्या सहाय्याने अभिनव कला-मंदिर, सातारा या नावाची नवीन नाटयसंस्था ( स्वतंत्र रंगभूमी ) निर्माण केली.

या वेळपर्यंत नाटय प्रांतात कुलीन स्त्रिया पदार्पण करीत नव्हत्या. परंतु स्त्रियांची कामे स्त्रियांनीच करावी असा पायंडा पडल्याने सुरवातीस अडचणी येऊ लागल्या. परंतु कै. गुप्ते व श्री. काशिनाथराव आपटे यांनी आपल्या मुली नाटयप्रयोगात काम करण्यास तयार केल्या व त्यानंतर वरीलप्रमाणे कुलीन स्त्रिया कामे करू लागल्या. सर्व प्रथम श्री. प्रो. जी. टी. जोशी यांच्या पत्नींनी 'दख्खनच्या मोहऱ्यांत' संगीत भूमिका केली. हे त्यांचे त्या वेळचे धाडस कौतुकास्पद ठरले. त्याचवेळी संस्थेस सरकारी ग्रँटही मिळू लागली. सुदैवाने सातारा शहरात 'शाहू कला मंदिर' या नावाचे महाराष्ट्रातील पहिले खुले नाटयगृह बांधले गेले. त्यावेळी संस्थेने एकूण जिल्ह्यातील कलावंतांची मिळून ओळीने १८ नाटके केली. त्या उत्पन्नातून रंगभूमीकरिता पडदे, विंग्ज्, झालरी, बैठका, ही तजवीज झाली. त्यावेळी या संस्थेचे मूळचे चालक, कै. गुप्ते हे राहू शकले नाहीत व ही धुरा डॉ. पां. के. कोल्हटकर व त्यानंतर श्री. मनोहरपंत भागवत वकील यांनी पत्करून संस्थेस मार्गदर्शन केले. या सुमारास कै. शां. गो. गुप्ते व श्री. काशिनाथराव आपटे व अभिनव कलामंदिराचे त्यावेळचे चालक यांच्यामध्ये कांही मुद्यावर मतभिन्नता त्यामुळे वरील दोघांनी कलामंदिर, सातारा या नावची नवीन संस्था सातान्यात सुरू केली. या संस्थेस कै. बाबासाहेब पंडितराव व श्री. वसंत शंकर बेगमपुरे, वकील यांचे मार्गदर्शन लाभले. यानंतर दोन्ही संस्थांनी प्रादेशिक स्पर्धेतही प्रयोग करून दाखविले. 'कलामंदिर' ही नाटयसंस्था जे जे नाटयप्रयोग करील त्यातील उत्पन्नातून खर्चच वजा जाता जी शिल्लक राहील ती रक्कम सार्वजनिक संस्थांच्या हितासाठीच खर्च केली जावी या हेतूनेच चालू झाली. त्याप्रमाणे सदर संस्थेने निरनिराळी नाटके बसवून त्याचे प्रयोग सातारा जिल्ह्यात तालुक्याचे ठिकाणी करून रु. ४०,००० पर्यंत रक्कम जमा केली. त्या कामी श्री. बन्याबापू गोडबोले यांचे संस्थेस पुष्कळच सहाय्य झाले. या रकमेतून श्री. शिवाजी महाराज पुतळा, प्रतापगड, श्री. प्रतापसिंह महाराज पुतळा, सातारा दुष्काळ फंड, स्टेडियम, लक्ष्मीनारायण हायस्कूल खटाव, कृष्णक्रीडा मंडळ सातारा, शिवाजी उदय मंडळ सातारा, सरकारी हॉस्पिटल सातारा, यांना आर्थिक मदत करून संस्थेने आपल्या हेतूची पूर्तता केली.

सातारा शहरातील कै. विसुभाऊ भडकमकर, कै. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. चित्तरंजन कोल्हटकर, श्री. बाळ कोल्हटकर तसेच सोनोपंत भागवत व श्री. राजाभाऊ कात्रे या कलावंतांनी सातान्या-बाहेर राहून महाराष्ट्रात खूपच कीर्ती मिळविली. त्याचप्रमाणे श्री. बापुसाहेब पंत, औंध यांनी 'अमृतसिद्धी' या नाटकात मुख्य नायकाची संगीत भूमिका केली. वस्तुतः पार्श्वगायक व गायिका यांनी गाणी म्हटली. तरी पण जनतेस हा प्लेबॅक् आहे याची सुरवातीस जाणीव येऊ दिली नाही. ही त्यावेळची आठवणीत राहण्यासारखीच गोष्ट होती.

कै. श्री. शां. गो. गुप्ते यांनी आपल्या हयातीत, तसेच श्री. बंडोपंत तळवलकर यांनी संभाजी, व शिवाजी या भूमिका उत्कृष्ट करुन दाखविल्या हे निर्विवाद आहे. श्री. गुप्ते यांची ओजस्वी वाणी, आवाजाची फेक, अभिनय, तसेच स्टेजवरील हालचाली या गोष्टी ते अतिशय तन्मयतेनें करीत. त्यांची संभाजीची भूमिका ही खरोखरच दृष्ट लागेल इतकी सुंदर होत असे. त्यांच्या निधनाने नाटयकलेच्या सुवर्ण मुद्रिकेतील स्वयंप्रकाशित हिरा निखळून पडला व कोंदण भकास वाटू लागले. त्या वेळपासून जसे रुळावर खूप आगगाडीचे डबे ओळीने उभे असतात पण इंजीन नसल्यामुळें ते तसेच स्तब्ध राहतात अशी आमची कांही काळ गोंधळाची परिस्थिती झाली हे कोणीहि नाकारुं शकेल असे निदान मला तरी वाटत नाहीं. ही मरगळ आता विसरून, फिरुन जोमाने नाटयकला वृद्धिंगत होण्यासाठीं

आरंभीच्या काळातील ग्रंथसंग्रह हा येथील अमूल्य ठेव होय. तिचे विशेष आस्थेने संरक्षण होणे आवश्यक आहे. वाचनाबरोबरच श्रवण हेही ज्ञान प्रसाराचे एक महत्त्वाचे साधन होय. यादृष्टीने सुरु केलेल्या व्याख्यानमालांच्या उपक्रमाबद्दल मी कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

४-१०-७३ वि. भि. कोलते

मार्गदर्शन करणारी माणसे जिद्दीने उभी राहून त्यांनी या कलेंत यश संपादन करण्यासाठी प्राणपणाने लढत देऊन यशस्वी झाले पाहिजे.

या काळात कै. शां गो. गुप्ते यांना सरकारकडून अभिनयाचें प्रशंसापत्रक, तसेच त्यांनीं अस्पृशता उद्धारावर जे-उपेक्षित-हे नाटक लिहिले त्याबद्दल सरकारकडून त्यांना रुपये एक हजारचे बक्षिस मिळाले. तसेच कै. भालचंद्रराव डांगे व पेंटर श्री. पी. अनंत यांनाही सरकारकडून प्रशंसापत्रकें मिळाली. श्री. काशिनाथराव आपटे यांनीं केलेली मागील पुष्कळ वर्षांची नाटयसेवा सातारकरांनीं ध्यानीं घेऊन अभिनव कलामंदिराचे विद्यमाने त्यानीं श्री. काशिनाथराव यांच्या ६१ वी निमित्त '-रक्तरंगण-' या नाटकाचा प्रयोग करुन त्यांचा जाहीर सत्कार केला. त्याचप्रमाणे सरकारनेही त्यांची सेवा ध्यानी घेऊन त्यांना दरसाल रु. ३०० याप्रमाणे मानधनही सुरु केले.

आता दिवसेंदिवस नवोदित कलाकार पुढे येत असून श्री. राजाभाऊ बंड, तसेच सौ. बंड, श्री. सतीश आपटे वगैरे नाटयप्रेमी मंडळी नाटयप्रयोग करू लागली आहेत. त्यांनीं व इतर नवोदित कलाकारांनी फिरुन जोमाने नाटयकलेत कष्टाने उत्तरोत्तर प्रगती करावी., पूर्वीचे अनुभव ध्यानीं घ्यावेत. यातूनच कै. गुप्ते यांच्या-सारखा एखादा कोहिनूर फिरून निर्माण होईल.

वरील मंडळीपैकी जे कलाकार कैलासवासी झाले त्यांना माझी आदराची श्रद्धांजली.

वरील काळात ज्यांनी निरनिराळ्या नाटकात भूमिका केल्या त्यांचे टिपण माझ्या स्मरणाप्रमाणें सोबत दिले आहे. ज्या नटवर्गाची नांवे घालण्याचे विस्मरणाने वा नजरचुकीने राहीली असतील त्या मंडळींनी मला उदार अंतःकरणाने क्षमा करावी.

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा !

हिन्दुस्थान ॲन्टिबायोटिक्स लिमिटेड

-: प्रतिजैविक औषधांचे उत्पादनात भारतात सर्वप्रथम :-

( भारत सरकार निर्देशित राष्ट्रीय प्रकल्प )

पिंपरी-पुणे-४११ ०१८

# ग्रंथालयीन सेवा - कालची व आजची

मो. रा. वाळंबे

महाराष्ट्रातील ग्रंथालय संघटनेशी माझा संबंध गेल्या पंचवीस वर्षांहून अधिक आहे. तत्पूर्वी पंधरा वर्षे मी कोल्हापूर व सातारा येथील माझ्या शाळांच्या ग्रंथालय विभागांचा प्रमुख म्हणून काम पाहत असे. १९३७ साली मी प्रथम शिक्षक म्हणून काम करू लागलो. तेव्हा त्या शाळेच्या छोट्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालाचे कामही मलाच करावे लागले. त्यामुळे ग्रंथालये व ग्रंथालय सेवा यांच्याशी गेली चाळीस वर्षे माझा जवळचा संबंध आला आहे. तत्पूर्वी शाळा कॉलेजचे शिक्षण चालू असता त्यावेळची ग्रंथालयसेवा मी पाहत होतोच. १९२७ साली बेळगांव जिल्ह्यातील रामदुर्ग या संस्थानाच्या गावी शिकत असताना एका बाल वाचनालयाचा मी सेक्रेटरी होतो. म्हणजे १९२७ ते ७७ या पन्नास वर्षांत विविध ग्रंथालयांतील सेवेत कसकसा बदल होत गेला हे मी स्वतः पाहिले आहे, अनुभवले आहे.

आज ग्रंथालयशास्त्र किती प्रगत झाले आहे! ग्रंथालयासाठी मुद्दाम बांधलेल्या इमारती, तेथील फर्निचर व त्यांची मांडणी, ग्रंथांचे वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भसाह्य, ग्रंथालयीन सेवा वगैरे बाबतीत आज पुण्यातील कोणत्याही उत्कृष्ट ग्रंथालयात ज्या सुविधा आहेत त्या पाहिल्या की चाळीस पन्नास वर्षांपूर्वीच्या मी पाहिलेल्या शाळा कॉलेजच्या किंवा सार्वजनिक ग्रंथालयांतील देवघेवींची सहज आठवण होते.

आम्ही शाळेत विद्यार्थी असताना 'शालेय ग्रंथालय' असे काही त्यावेळी नव्हतेच, इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ग्रंथालय असते हे सांगूनही आम्हाला पटले नसते. आमच्या शाळेतील प्रमुखांच्या खोलीत म्हणजे एक दोन कपाटांनी केलेल्या आडोशाच्या जागेत कपाटात काही कोश, क्रमिक पुस्तके व काही अवांतर पुस्तके असत. शिक्षक कदाचित त्यांचा वापर करीत असावेत. शाळेतील मुलांसाठी शाळा काही पुस्तके विकत घेते व ती त्यांना घरी वाचायला देते याची आम्हाला मुळी कल्पनाच नव्हती. त्या गावात एक 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' होती. तेथे एका खोलीत टेबलावर दोन तीन वर्तमानपत्रे पडलेली असत, ती मात्र तेथे उभारून वाचायला मिळत. तेथील पुस्तके वर्गणीदार प्रौढांच्यासाठीच असत.

अशाही परिस्थितीत वाचनाची तहान मी थोडीफार भागवू शकलो त्याचे कारण वेगळेच होते. आमच्या शाळेचे प्रमुख हे 'ग्रामसेवक' नावाचे एक मासिक त्यावेळी चालवत. त्यासाठी त्यांनी एक छोटा छापखाना काढला होता. फावल्या वेळेत आम्हा काही विद्यार्थ्यांना ते छापखान्यातली कामे शिकवीत, व आमच्याकडून करून घेत. याच्या मोबदल्यात त्यांनी आपल्याकडील काही पुस्तके एका भिंतीतल्या कपाटात ठेवून त्याचे 'विद्यार्थी वाचनालय' बनविले होते. त्यातील पुस्तके ते आम्हांस वाचावयास देत. या छोट्या वाचनालयाचा मी 'सेक्रेटरी' होतो. विद्यार्थ्यांना आळीपाळीने यातील पुस्तके द्यायची व एका जुन्या डायरीत त्यांची नोंद करून ठेवायची हेच आमचे देवघेव रजिस्टर. पुस्तकांची नावे एका कागदावर सलग क्रमाने लिहून तो कागद त्या कपाटाच्या दाराच्या आतल्या भागावर चिकटवून ठेवला होता. हे आमचे 'तालिकीकरण'. सर्वच पुस्तके मुलांच्यासाठी गोष्टींची. त्यामुळे वर्गीकरणाची भानगडच नव्हती. ग्रंथालयाची वेळ ठरलेली नव्हती. मुले पुस्तके आणतील त्यावेळी स्वीकारायची व लगेच दुसरी द्यावयाची. या चिमुकल्या ग्रंथालयात वर्षाअखेर एकाही पुस्तकाची भर पडली नाही; व सर्वच मुले प्रामाणिक असल्यामुळे एकही पुस्तक गहाळ झाले नाही. ग्रंथालय-सेवेचा ओनामा आम्ही येथे गिरविला.

शिक्षणाच्या निमित्ताने काही वर्षे मला मुधोळ या संस्थानाच्या गावी जावे लागले. या गावातील सार्वजनिक वाचनालयातील पुस्तके केवळ प्रौढांना मिळत. पण तेथेही आमचा वशिला लागला तो ग्रंथपालाच्या कृपेमुळे. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल हे भिक्षुकीचा व्यवसाय करीत. हे ग्रंथालय सकाळ-संध्याकाळ उघडे असे. मात्र ग्रंथांची देवघेव फक्त सकाळी ८ ते १० या वेळेस चाले. हे ग्रंथपाल सोवळ्यानेच ग्रंथालयात येत. दारे उघडून अधून मधून ते पूजेसाठी अन्यत्र जाऊन येत. एखाद्या दिवशी श्राद्धपक्षाचे आमंत्रण असल्यास ते आम्हा विद्यार्थ्यांना तेथे बसायला सांगून जात. तेवढ्या वेळेत कोणी पुस्तक आणून दिले तर ते फक्त स्वीकारायचे. कोठेच नोंद करायची नाही. ही परत आलेली पुस्तके कोणाकडून आली त्याचे नाव एका चिठ्ठीवर लिहून ती चिठ्ठी पुस्तकात ठेवून देणे एवढेच आमचे काम. त्यांच्या अनुपस्थितीत पुस्तकांची फक्त 'घेव' चाले. 'देव' दुसऱ्यादिवशी, ते आल्यानंतर. वेळ संपण्यापूर्वी ते न आल्यास त्यांच्या खोलीला कुलूप लावून वाटेवरच असलेल्या त्यांच्या घरी ती टाकून जावयाचे. या स्वयंसेवकीबद्दल ते आम्हास एक पुस्तक मोफत वाचायला देत. यामुळे आम्ही काही थोडेफार वाचू शकलो. मॅट्रिक होईपर्यंत ग्रंथालयाशी जो आमचा संबंध आला तो अशा प्रकारचा. शाळेच्या ग्रंथालयाची एकदोन कपाटे होती; पण त्यांतील पुस्तके ही विद्यार्थ्यांसाठी नव्हतीच.

मॅट्रिक झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी मी १९३० साली कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात नाव दाखल केले. कॉलेजात गेल्यानंतर आम्हाला ग्रंथालयाचे महत्त्व पटू लागले. याचे कारण त्या वेळचे प्राध्यापक आम्हांला आपापल्या विषयांवरील चांगले ग्रंथ ग्रंथालयातून मिळवून वाचायला सांगत. शिवाय आणखी एक कारण असे घडले : १९३१-३२ च्या सुमारास कोल्हापूरच्या नगरवाचन-मंदिराचा हीरकमहोत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. त्यावेळी कै. तात्यासाहेब केळकरांचे 'ज्ञानाची सदावर्ते' या विषयावरील मी एक व्याख्यान ऐकले. या व्याख्यानाने मी इतका प्रभावित झालो की केवळ विरंगुळा म्हणून ग्रंथालयाकडे न पाहता ज्ञानार्जनाचे एक

कोणतेही राष्ट्र भौतिक दृष्टया वैभवशाली म्हणावयाचे म्हणजे त्या राष्ट्रांतील व्यक्तींच्या जीवनातील सर्व निदान मूलभूत गरजा भागल्या पाहिजेत. ती परिस्थिती आज आपल्या राष्ट्रात नाही. ही परिस्थिती निर्माण करण्यासाठी ग्रामीण विभागात आज शेकडोच नव्हे तर हजारो तरुणांच्या व्यक्त व मूक प्रयत्नांची जरूर आहे. हे तरुण विलोभनाला बळी व स्वार्थाला बळी न पडणारे, कणखर अंतःकरणाचे, चरित्र संपन्न तरुण पाहिजेत. त्यांना ज्वलंत जीवन व्यतीत करण्याची आकांक्षा पाहिजे. या वाचनालयात चालणाऱ्या प्रबोधनाने असे तरुण तयार करण्यात वाचनालय आपला वाटा उचलील अशी आशा वाटते.

वाचनालयाची वास्तू आता वाढविण्यात येणार आहे. ग्रंथ संग्रहाचीही वाढ होणार आहे, हे ऐकून आनंद झाला. वाचनालय व ग्रंथालय यांचा सतत विकास व्हावा व संघटकांना व कार्यकर्त्यांना त्यांच्या प्रयत्नात चांगले यश यावे हीच या प्रसंगी मनःपूर्वक शुभेच्छा.

५-१२-७८ गोदूताई परुळेकर.

प्रमुख साधन म्हणून त्याचा कसा उपयोग करावा हे मला प्रथम उमगले. आमच्या कॉलेजचे ग्रंथालय समृद्ध होते. पण त्याचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन अपुरे पडले. त्यावेळी या आमच्या ग्रंथालयात कार्ड, कॅबिनेट, मॅगॅझिन, रॅक्स असली काही ऐट नव्हती. पुस्कांच्या विषयावार छापील याद्या ग्रंथपालांच्या काउंटरवर असत. त्यांतून शोधून हव्या त्या पुस्तकाची मागणी एका चिठ्ठीवर करावयाची. प्रत्येक वर्गाला एक विशिष्ट दिवस देवघेवीचा ठरवून दिला होता. त्या वेळी आपण मागणी केलेला ग्रंथ असल्यास मिळे. नाहीपेक्षा वाचकांकडून आलेल्या पुस्तकांतून एखादा निवडून घेण्याची मुभा होती. त्यावेळचे आमचे कॉलजचे ग्रंथपाल कडक शिस्तीचे व थोडे रागीटच. विद्यार्थी मोठ्या आवाजात बोलला की त्याचे नाव ते नोंदवून ठेवत व काही दिवस त्याला ग्रंथालय वर्ज्य असे. त्यामुळे आम्ही त्यांना दबकूनच असू. पण ते मायाळू आहेत व केव्हा केव्हा कौतुक करीत याचा प्रत्ययही आम्हांला येई. एकदा मी ग्रंथालयातून गि. म. परांजपे यांची 'गोविंदाची गोष्ट' ही कादंबरी निवडली. ती देताना ते एवढेच म्हणाले, "चांगलं पुस्तक निवडलंस. अवश्य वाच." एवढ्याशा कौतुकामुळे मला ते पुस्तक वाचण्यास हुरूप आला. आम्ही मागितलेले पुस्तक नाही मिळाले तर त्याच विषयावरचे दुसरे एखादे चांगले पुस्तक असल्यास ते काढून ठेवीत व ते वाचावयाला सांगत; पण असे प्रसंग क्वचितच.

शिक्षण संपवून मी एक छोट्या शाळेत १९३७ साली रुजू झालो व मजकडे शाळेच्या छोट्या ग्रंथालयाचे काम सोपविण्यात आले. ग्रंथालय म्हणजे १०×१० ची खोली. भिंतीला लावलेली पाचसहा कपाटे व तेथेच माझी बसण्याची व्यवस्था. मी ग्रंथालय 'विषयवार' लावून घेतले व सर्व पुस्तकांची एक यादी तयार केली. मुलांना देण्याजोग्या पुस्तकांची मोठ्या कागदावर विषयवार यादी करून ती अवलोकनार्थ दारावरच ठेवली. इ. ८ ते ११ वी या चार वर्गांना आठवड्यातून प्रत्येकी एक दिवस वाटून दिलेला. पुस्तकांची देवघेव फक्त मधल्यासुटीत. मुलांनी वाचावीत अशी ५,०६० पुस्तके निवडून ती हारीने माझ्या टेबलावर ठेवीत असे. त्यावेळी प्रत्येक वर्गात २०-२५ विद्यार्थी असत. मुलांनी रांगेने येऊन टेबलावरील पुस्तकांतून हवे ते पुस्तक निवडावे. अशी ऐच्छिक पद्धत होती. मुळात निवडकच पुस्तके असल्यामुळे विद्यार्थी चटाचट पुस्तके घेत. नोंदवहीत आपल्या नावापुढे नोंदून पुस्तके नेण्याची व्यवस्था केली. प्रथम एक दोन वेळेलाच काय तो देवघेवीचा त्रास झाला. पुढेपुढे विद्यार्थी आपापसांत पुस्तकांची अदलाबदल करूनच मजकडे येत. यामुळे ग्रंथालयातील देवघेवीचे काम सुकर होई. विद्यार्थ्याला यांतील पुस्तके नको असतील तर, ग्रंथालयातील कपाटे उघडीच ठेवली होती. त्यांतील निवडायला मुभा होती. पण विद्यार्थ्यांचा ग्रंथपालावर एवढा विश्वास की त्याने निवडून दिलेल्या पुस्तकावरच उड्या पडत. त्यामुळे थोड्या पुस्तकांत ग्रंथालयाचे काम सुरळीत चाले.

पुढे १९४२ साली मी कोल्हापूर सोडून साताऱ्यास आलो; व १९४४ मध्ये नगरवाचनालयात निवडून आलो. शहरातील हे एकच सार्वजनिक वर्गणी ग्रंथालय. जवळजवळ नव्वद वर्षांचे जुने. येथे ग्रंथसंख्या अशी फार मोठी नव्हती. मात्र त्यांतील निम्मी कपाटे जुन्या पुस्तकांनी भरलेली, वर्षावर्षांत तिकडे कोणी फिरकत नसे. वाचकांची उडी ललित वाङ्मयावरच अधिक. शिवाय निम्मेअधिक वर्गणीदार केवळ वृत्तपत्रे व मासिके वाचण्यासाठी येत. अभ्यासक म्हणून या वाचनालयाचा फायदा घेणारे फार थोडे. लोकांचा कल जाणूनच तशा प्रकारची पुस्तके घेतली जात. येथेही छापील याद्या होत्या. नवीन घेतलेल्या ग्रंथांची शाईत नोंद केव्हातरी होई. क्लेमपद्धतीने देवघेव चाले. कपाटे बंदिस्त असत. प्रमुख ग्रंथपाल म्हणजे मुख्यतः कारकूनच. पुस्तकाच्या देवघेवीपेक्षा वर्गणी वसुली व त्यांच्या नोंदीतच त्याचा बहुतेक वेळ जाई. दुय्यम ग्रंथपाल मोठा हुशार होता. एखाद्या पुस्तकाची मागणी केली की तो केवळ नजर फिरवून पुस्तक आहे की नाही हे सांगे. पुस्तके त्याला पाठ होती. आकारावरून तो पुस्तके ओळखी. कोणाकडे पुस्तक गेले असेल हेही तो अचूक सांगे. कारण कोणत्या प्रकारचा ग्रंथ कोणता वाचक नेतो याचे त्याचे आडाखे ठरलेले. स्वारी खुशीत असली की ग्रंथ काढून मिळे. नाहीतर 'वाचायला गेला आहे, हरवला आहे, फाटला आहे, वा ग्रंथालयात नाही' अशा शब्दांत तो वाचकांची सहज बोळवण करी. तालिकीकरणाच्या छापील याद्यावरून ग्रंथाची मागणी केली तर ग्रंथ मिळण्याचा संभव कमीच. त्यामुळे वाचून परत आलेल्या ग्रंथांचा एक गठ्ठा ग्रंथपालाच्या टेबलावर असे. त्यातील ग्रंथ निवडून नेणे हेच सोयीचे वाटे. त्यामुळे काही ठराविक पुस्तकेच वाचली जात. इतर ग्रंथांना गिऱ्हाईक क्वचित भेटे. गठ्ठ्यातील चांगले पुस्तक तो आपणहून आम्हांला देई. यामुळे ग्रंथालयातील देवघेव बिनबोभाट चाले. शिस्त किंवा शास्त्र जरी यात नसले तरी वाचकांना खूष ठेवण्याचे कसब या ग्रंथपालाजवळ होते हे कबूल करावेच लागेल.

पुढे ग्रंथालयशास्त्राचे लोण इंग्रजीमधून हळूहळू मराठीत येऊ लागले. ग्रंथपालांच्यासाठी ग्रंथपालनवर्ग सुरू झाले. आमच्या ग्रंथपालांना हे शास्त्र अवगत व्हावे म्हणून आम्हीं ग्रंथालयचालक

ग्रंथपालांना या वर्गासाठी पाठवू लागले. ग्रंथपाल या झटपट विद्यालयातून सहा आठवडयात हे शास्त्र शिकून अर्ध्या हळकुंडाने पिवळे होऊन येत. पण ग्रंथालयकार्डे व कॅबिनेट्स यांचा अभाव, अपुरी जागा व फर्निचर, तोटके बजेट यामुळे या शास्त्राचे त्यांचे ज्ञान त्यांच्यापुरतेच राही; व ग्रंथालये पूर्ववत चालू राहत.

पुढे शासनाने या ग्रंथालय विस्ताराकडे लक्ष घातले. जिल्हा–तालुका–ग्राम ग्रंथालयांची साखळी निर्माण झाली. अपुरी का होईना ग्रंथालयांना अनुदाने मिळू लागली. ग्रंथालयात बसून मोफत वाचण्याची सोय झाली. वाचक वाढले, ग्रंथसंख्येत भर पडू लागली. ग्रंथपालांना एक विशिष्ट श्रेणी मिळू लागली. ग्रंथालयात कोणती पुस्तके किती प्रमाणात घ्यावी, पगार, खर्च यावर बंधने आली. त्यामुळे ग्रंथालयांना व ग्रंथपालांना चांगले दिवस येऊ लागले. हळूहळू कार्ड कॅटलॉग्ज, कॅबिनेट्स, वर्तमानपत्रे व मासिके यांच्यासाठी स्टँड्स, ग्रंथनाम–ग्रंथकार विषयवार सूच्या तयार होऊ लागल्या. अभ्यासकांसाठी व वाचकांसाठी सोयी उपलब्ध झाल्या, ग्रंथालय सेवेत शास्त्रशुद्धता व तत्परता आली. यामुळे ग्रंथालयात हळूहळू एक प्रकारची शिस्त, टापटीप, स्वच्छता, अद्ययावतपणा आढळू लागला आहे.

आज सर्वच ग्रंथालये या पद्धतीने सुधारली आहेत असे मला म्हणायचे नाही. निदान महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन ग्रंथालये, मोठी सार्वजनिक ग्रंथालये यात खूपच सुधारणा झाल्या आहेत. काही मोठ्या शाळांच्या ग्रंथालयांतही हे लोण पोचले आहे. आज शाळा शाळातून ग्रंथपेट्या, वर्ग ग्रंथालये तयार झालेली दिसत असली तरी सरकारी नियमांच्या दडपणाखाली कित्येक शाळांतून ग्रंथालये चालविल्याचे नाटक केले जाते. विद्यार्थ्यांना हवे ते मिळून त्याला ज्ञानार्जन स्वत: करायला ज्या दिवशी शिकविले जाईल त्या वेळी शाळा–कॉलेजची ग्रंथालये ही खरीखुरी ग्रंथमंदिरे झाली असे मी म्हणेन.

आज ग्रंथालय सेवेत एक प्रकारची शिस्त चालली आहे. आज ग्रंथखरेदीबाबत सूचना केल्यापासून तो ग्रंथ मिळवून त्यावर होणारे विविध संस्कार, व ग्रंथाची मागणी केल्यापासून तत्परतेने तो ग्रंथ मिळण्याबाबत होणारी अंमलबजावणी यात पद्धतशीरपणा येऊ लागला आहे. आज ग्रंथालये म्हणजे केवळ ग्रंथांची आलये राहिलेली नाहीत. 'ग्रंथ हेच खरे गुरू होत' या लो. टिळकांच्या उक्तीप्रमाणे त्यांच्यापासून आपण ज्ञान कसे मिळवावे याबाबतचे मार्गदर्शन ग्रंथपालांकडून मिळू लागले आहे; व ग्रंथालयातील ग्रंथांचा स्वत: अभ्यास व संशोधन करून ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावे याला महत्त्व प्राप्त होत आहे. ग्रंथालये हा एका अर्थाने मूक विद्यापीठेच आहेत. अद्यापही काही ग्रंथालयांत मागावे तेवढेच मिळत नाही, अशी जी परिस्थिती आढळते ती आता नाहीशी झाली पाहिजे व प्रत्येक ग्रंथालयातील ग्रंथपाल हा हवाहवासा मित्र व मार्गदर्शक वाटला पाहिजे. असा दिवस लवकरच यावा एवढीच इच्छा.

☆ ☆ ☆

## क्षण आला भाग्याचा !

महाराष्ट्राच्या थंड गोळयात चैतन्य निर्माण व्हावे म्हणून तत्कालीन समाजधुरीणांनी जे बहुविध उपक्रम सुरू केले त्यातील ही एक संस्था होय. शतकोत्तर रौप्यमहोत्सवाच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या या संस्थेने आपल्या वाटचालीत राष्ट्रजीवनातील नि समाज-जीवनातील कितीतरी स्थित्यंतरे पाहिली अन् अनुभवली असतील !

शतकोत्तर रौप्यमहोत्सवाच्या मंगल, नयनानंद-कारी दिवशी सनईच्या सुमधुर स्वरांनी आसमंत न्हाऊन निघेल. गुलाबपाण्याचे शिडकावे मनाला उल्हासित करतील. मधूनच कुठल्यातरी ग्रुपमधून उठलेली हास्याची लकेर सर्वांचे लक्ष वेधून घेईल. अशा वेळी माझे मन भूतकालाकडे धाव घेते आणि संमिश्र भावनांच्या लाटा मनामध्ये उसळतात. नगरवाचनालयासारख्या संस्था जगतात, वधिष्णु होतात त्या अखेर निरलस कार्य-कर्त्यांच्या तळमळीमुळे नि अपार कष्टामुळे होय. या संस्थेच्या उन्नतीसाठी ज्या लहान-थोर ज्ञात-अज्ञात यांचे हातभार लागले आहेत, त्यांची आठवण या मंगल-प्रसंगी पदोपदी प्रकर्षाने होत आहे इतकेच नव्हे तर या मंडळीना अभिवादन करीत असताना आज तुम्ही असावयास पाहिजे होते, अगदी खर तुम्ही असावयास पाहिजे होते !

४–१२–१९७८

राजाभाऊ पाठक. ७१९, शुक्रवार, पुणे २

हार्दिक शुभेच्छा !


फक्त ४१-०६ रु. गुंतवा आणि १००-०० रु. मिळवा

महाबँकेची—

कॅश सर्टिफिकेट्स्

* हाताशी असलेल्या छोटयाशा रकमेतही आपण ती खरेदी करू शकता.
* निरनिराळया मुदतींची आणि रु २५/– पासून रु. १,००,०००/– पर्यंतच्या दर्शनी किंमतीची कॅश सर्टिफिकेट्स् आमच्या कोणत्याही शाखेत मिळतात.

– आपल्या नजिकच्या आमच्या शाखेस भेट द्या –

बँक ऑफ महाराष्ट्र

मुख्य कचेरी : पुणे

* बँकिंग सेवा + व्यक्तिगत जिव्हाळा *

# सातारा जिल्ह्यातील साहित्यिक

— प्रा. द. ता. भोसले

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या सातारा शहराची कारकीर्द गेल्या शे–सव्वाशे वर्षांपासून आणि स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अशीच वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची झालेली आहे. या जिल्हयाने राजकारण, धर्मकारण, समाज आणि शिक्षण या क्षेत्रामध्ये प्रदीर्घ काळपर्यंत महाराष्ट्राच्या जीवनावर खोल ठसा उमटविला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीचा जिवंत झरा याच जिल्हयात उगम पावलेला होता. प्रति सरकार स्थापन करून इंग्रजी राजवटीला हादरे देण्याचे काम याच जिल्हयाने केले होते. राजकीय क्षेत्रातील अनेक धुरंधर नेते, विचारवंत, कायदेविषयक सल्लागार, पत्रकार, याच जिल्हयाने निर्माण केलेले आहेत. संस्कृत विद्येची उपासना आणि औद्योगिक क्षेत्राची पायाभरणी यातही हा जिल्हा अग्रेसर होता. कूपर, किर्लोस्कर आणि ओगले यांचे भरभराटीस आलेले कारखाने याच जिल्हयाचे औद्योगिक वैभव होते. समाजजीवनाच्या नानाविध अंगांना स्पर्श करून, त्यांचे निष्ठापूर्वक उत्थापन करून इतरांना आदर्श घालून देण्याची मौलिक कामगिरी या जिल्हयाने व इथल्या थोरांनी केलेली आहे. शिक्षण आणि साहित्य या दोन क्षेत्रांत देखील समर्थ रामदासापासून तो कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत अनेकांनी आपल्या लोकोत्तर आणि समर्पित सेवेने महाराष्ट्राला आदर्श घालून दिलेला आहे. एकेकाळी मराठी राज्याची राजधानी असलेल्या या शहराने आणि या जिल्हयाने जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची छाप पाडलेली कुणालाही मान्य करावी लागेल !

वरील क्षेत्राप्रमाणेच साहित्याच्या क्षेत्रातही या जिल्हयाने मोलाची भर घातलेली आहे आणि तीदेखील साहित्याच्या सर्वच प्रकारांमध्ये ! या जिल्हयातील प्राचीन, अर्वाचीन, जुन्या-नव्या सर्व साहित्यिकांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घ्यायचा म्हटला तर एक मोठा स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. संशोधक, पत्रकार, विचारवंत, व्युत्पन्न, पंडित, चित्रकार, आध्यात्मिक भाष्यकार, संपादक आणि ललित लेखक या नात्यांनी या जिल्हयातील अनेकांनी आपली साहित्यसेवा महाराष्ट्रशारदेच्या दरबारात रुजू केलेली आहे.

प्राचीन काळाकडे नजर टाकल्यास समाजप्रबोधन आणि अध्यात्मविचाराचा प्रचार या दोन्ही दृष्टीने समर्थ रामदासांनी केलेली साहित्य निर्मिती मराठी भाषिकाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनलेली आहे. समर्थांचा दासबोध म्हणजे प्रापंचिकांचा व्यवहारकोश आहे, साधकांचा ज्ञानदीप आहे आणि शिष्यांचा आधारस्तंभ आहे. महाराष्ट्राच्या धर्मविचाराला वेगळे वळण लावण्याचे आणि धर्म व जीवन यांची तत्कालिन परिस्थितीच्या संदर्भात वेगळे नाते प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य समर्थांच्या समर्थ साहित्यात आहे. तदनंतर झालेले वडगावचे जयरामस्वामी यांचे अध्यात्मपर वाङ्मय प्रसिद्ध आहे. मराठी लोककलेची लोकप्रियता व शाहिरी काव्याची उपासना करणारे कवी हैबती आणि पट्ठे बापुराव हे सातारा जिल्हयाचे लेणेच होय. पठ्ठे बापूरावांचे काव्य आजही शाहिरी वाङ्मयाला उन्मादकता आणणारे वाटते. हरिवरदा हा ग्रंथ लिहिणारे कोपर्डेकर हे मूळचे काशीळजवळ असलेल्या कोपर्डे गावचे. त्यांची भक्तीरसाने आणि करुणरसाने भिजून चिंब झालेली कविता जशी मोलाची वाटते; तशीच त्यामध्ये त्यांनी प्रकट केलेली आपल्या जीवनातील करूणरम्यता भावपूर्ण वाटते.

गेल्या शतकामध्ये पत्रसृष्टी, कलासृष्टी आणि शब्दसृष्टी यामध्ये मोलाची भर घालणारे थोर लेखक आणि कलावंत या मातीतून वरती येऊन त्यांनी केलेली साहित्यसेवा वैभवशाली अशीच आहे. केसरीचे पहिले संपादक आणि थोर समाजसुधारक आगरकर हे कराडजवळ असलेल्या टेंभू गावचे. त्यांनी हॅम्लेटचे केलेले भाषांतर आणि विविध सामाजिक विषयांवर केलेले आग्रही लेखन वाङ्मयीन गुणांनी नटलेले आहे. न. चिं. केळकर, सीतारामपंत देवधर आणि दत्तोपंत पारसनीस यांचे लेखन, संशोधन सातारकरांना भूषणावह वाटते. श्री. दा. सातवळेकर यांनी अशीच मोलाची साहित्यसेवा केलेली आहे. वेदवाङ्मयावरील त्यांचे संशोधन व त्यांचे संपादन त्यांच्या व्युत्पन्न पांडित्याची आणि अभिजात बुद्धीचे द्योतक आहे. खुपेरकर शास्त्री कामसूत्रे लिहून प्रसिद्धीस आले तरी त्यांचे संत वाङ्मयावरील व्यासंगी लेखन कुणालाच विसरता येणार नाही. हे खुपेरकर शास्त्री मूळचे सातारा शहरातीलच ! या संशोधनाच्या क्षेत्रातच शं. ना. जोशी, ग. ह. खरे, डॉ. कत्रे हे सातारा जिल्ह्यातलेच आहेत. संशोधनपर लेखनाला साहित्याच्या क्षेत्रामध्ये कितपत समाविष्ट करावे अशी शंका काहींच्या मनामध्ये येण्याची शक्यता आहे हे खरे; पण तेही व्यापक अर्थाने साहित्यच म्हणावे लागेल. अन् त्याची महती कमी लेखता येणार नाही. म्हणून वाईचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे धर्म, कला, वाङ्मय आणि वेद यांच्यावरील चिंतनपर व संशोधनपर लेखन कमी मानण्याचे कारण नाही. सद्यस्थितीचे भेदक आणि मार्मिक विश्लेषण करण्याची वेगळी दृष्टी त्यांच्या लेखनात जाणवते.

याच कालखंडात सातारा जिल्ह्यातील अनेक थोर–थोर साहित्यिक उदयास आले. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण व बालपण येथे सातारला गेलेले आहे. न्यायमूर्ती पी. बी. गजेंद्रगडकर, रा. ना. दांडेकर, ह. रा. महाजनी, डॉ. वा. वि. आठल्ये, आप्पासाहेब पंत ही सारी मंडळी तशी मूळची सातारची आणि सातारा जिल्हयातील ! या सर्वांचा तसा ललित लेखनाशी कमी संबंध असला तरी त्यांनी ज्ञानाच्या क्षेत्रात, वैचारिक साहित्याच्या क्षेत्रात केलेली कामगिरी अतिशय मोलाची आहे. वरील प्रत्येकांनी आपापल्या क्षेत्रात अत्युच्च शिखर गाठलेले होते– गाठलेले आहे. त्यांनी काही प्रसंगांच्या निमित्ताने केलेले स्फुट वैचारिक लेखन त्यांच्या सखोल व्यासंगाची साक्ष देते; मराठी विचारधनात मोलाची भर घालते. अलिकडच्या काळात श्री. यशवंतराव चव्हाण यांचे वैचारिक लेखन असेच सद्यकालीन समाजस्थितीचे सखोल व सर्वांगीण

आजच्या युगाची व लोकशाहीची सर्वात मोठी आवश्यकता म्हणजे लोकशिक्षण त्या कार्याला या वाचनालयाचे अभूतपूर्व योगदान होत आहे ही आनंदाची तसेच अभिमानाची गोष्ट आहे.

११-१२-७४ दत्ता ठेंगडी

विश्लेषण करणारे आहे. त्याचे राजकारण, समाजकारण, साहित्य, कला, नाट्य यावरील पुस्तकरुपाने ग्रथित झालेली भाषणे त्यांचा पिंड खराखुरा साहित्यिकाचा आहे याची प्रसन्न साक्ष देतात.

कोल्हटकर घराण्याचे महत्त्व सातारा जिल्ह्याच्या सर्व क्षेत्रात अनन्यसाधारण आहे. सामान्यपणे पूर्वीची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेले असून देखील पुणे विद्यापीठाने ज्यांच्या 'पातंजल योगदर्शन' ग्रंथाबद्दल डी. लिट्. ही पदवी दिली, ते कै. कृ. के. उर्फ बाबासाहेब कोल्हटकर यांचे सारेच जीवन साताऱ्यात गेले. शंभर वर्षांपूर्वी ॲथेलो नाटकाचे भाषांतर करणारे महादेवशास्त्री कोल्हटकर याच घराण्यातले. श्रेष्ठ नाटककार व पत्रकार अच्युत बळवंत कोल्हटकर याच घराण्यातले. चिंतामणराव कोल्हटकरांच्या बहुरुपी हा ग्रंथ म्हणजे एक आदर्श आत्मचरित्र ! त्याच घराण्यातले आजचे लोकप्रिय नाटककार बाळ कोल्हटकर हे मूळचे साताऱचे रहिवासी. त्यांच्या नाटकांनी मध्यमवर्गीयांच्या भावपूर्ण जीवनाचे, कौटुंबिक संबंधाचे आणि त्याहून प्रकट होणाऱ्या शाश्वत जीवनमूल्यांचे मराठी रसिकांना वेड लावले आहे. शां. गो. गुप्ते आणि गोवईकर हे देखील असेच प्रथितयश नाटककार होते, लेखक होते. त्या वेळच्या काळात त्यांच्या लेखनाने मराठी रंगभूमीला वैभव प्राप्त करून दिलेले होते. पद्माकर गोवईकर हे आज पुण्याला स्थायिक झालेले असले तरी तेही या सातारकरांचे सुपुत्र होत. नाट्य क्षेत्रात काही प्रयोग करून, नाविन्यपूर्ण नाट्यकृती लिहून त्यांनी रंगभूमीची आणि मराठी साहित्याची केलेली सेवा मोलाची म्हणावी लागेल.

न. चिं. केळकरांचा प्रारंभीचा काळ हा सातारलाच गेला त्यांना सातारा शहराविषयी अतीव जिव्हाळा होता. व्यापक अर्थाने ते सातारकरच. पण त्यापेक्षाही कमलाबाई देशपांडे या सर्वार्थाने साताऱच्या. मोजके परंतु मार्मिक असे ललित व ललितेतर लेखन करून त्यांनी मराठी साहित्यात महत्वाचे स्थान संपादन केले आहे. मराठी मासिकांतून पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी जे ललितलेखन केले; तत्कालिन नागर समाजाच्या विविध समस्या चित्रित केल्या, त्यामुळे त्यांचे नाव त्याकाळी कमालीचे गाजलेले होते. इतरांना लेखनात मदत व प्रोत्साहन करण्याची मोलाची कामगिरी कमलाबाईंनी केलेली आहे हे फार लोकांना ठाऊक नसेल !

साहित्यिक म्हणून ज्यांचा अभिमानाने व गौरवाने उल्लेख करावा अशी लेखक मंडळीही या जिल्ह्याने काही कमी दिलेली नाहीत ! वि. दा. हडप, ना. ह. आपटे, अ. ब. कोल्हटकर, यशवंत, गिरीश, श्री. म. माटे, पंडित सप्रे श्री. के. क्षीरसागर, कृ. पां. कुलकर्णी, बा. सी. मर्ढेकर ही चटकन आठवणारी काही नावे ! ना. ह. आपटे आणि हडप यांनी कादंबरीक्षेत्राला आपल्या लेखणीने संपन्न बनविले आहे. आपट्यांचे लेखन म्हणजे आदर्श जीवनमूल्यांचा कलात्मक पद्धतीने साधलेला हृद्य अविष्कारच; त्यांनी आपल्या कादंबरीने मराठी कादंबरीमध्ये काही नीतीमूल्यांची, काही आदर्श स्वप्नांची जी भर घातलेली आहे ती उपेक्षणीय नाही. सुखाचा मूलमंत्र, गृहसौख्य, उमज पडेल तर इ. त्यांच्या कादंबऱ्यांचे मराठी वाचकांनी विशेष रसिकतेने कौतुक केलेले आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यावर हिंदी-मराठी चित्रपटही निघाले होते. ऐतिहासिक कादंबऱ्यांचा परामर्श घेताना हडपांचा आणि आपट्यांचा देखील निर्देश केल्याखेरीज कोणाही अभ्यासकाला पुढेच जाता येणार नाही. हडपांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यामुळे कादंबरीचा हा प्रवाह पुष्ट तर झालाच; पण इतिहासाविषयी आमचे असणारे औदासीन्य कमी झाले. राष्ट्रीय भावना आणि अस्मिता उत्पन्न करण्यास यांच्या लेखनाचा फार मोठा उपयोग झाला. अ. ब. कोल्हटकरांचे सारेच लेखन हे एका श्रेष्ठ प्रतिभावंताच्या प्रतिभेचा मोहक व कमनीय विलास होता. त्यांनी लिहिलेले नारिंगी निशाण आणि वत्सला वहिनींची पत्रे आणि उत्पादक आणि लालित्यपूर्ण भाषेत लिहिलेले अग्रलेख नव्या पिढीला विशेष परिचित नसलेतरी गडकऱ्यांप्रमाणेच त्यांच्या लेखनावर त्यावेळचा तरुण बेहद्द खूष होता. यशवंतांची कविता, गिरीशांची खंडकाव्ये यांनी केशवसुतानंतरच्या कवितेला सामान्य माणसांपर्यंत नेले. जानपद गीतांनी; मधुर भावगीतांनी व उत्कृष्ठ सुनीतांनी मराठी काव्याचा प्रवाह विस्तारित असतानाच पुष्टही बनविला. यशवंतांची खंडकाव्येही अशीच आहेत. आजही त्यांच्या परिणतप्रज्ञेला चिंतनशील भावकाव्याची रसाळ फळे आलेली आपणास पाहवायसास मिळतात. उत्कट आत्मनिष्ठा; सामाजिक बांधिलकी, भावपूर्ण आणि लालित्यपूर्ण भाषा; गेयपूर्ण रचना या साऱ्यांचा मनोज्ञ मिलाफ यशवंत, गिरीशांच्या काव्यात झालेला आढळतो. 'बन्सीधरा आता कुठे रे जाशील ?" "माणुसकीचा गहिवर" आणि 'उपेक्षितांचे अंतरंग' यांचा परिचय घडविणारे माटे मास्तर तर खास सातारकरी ! तारळ्याच्या खोऱ्यातील पिऱ्या आणि 'शंभू शिखरीचा राजा' या त्यांच्या कथा साताऱच्या मातीबद्दल त्यांना असणारी ओढ चित्रित करणाऱ्या आहेत. श्री. म. माटे यांच्या ललित साहित्याने मराठी दलित साहित्याचे बीजारोपण केले म्हणावयास हरकत नसावी. नाट्यमयता अपार सहानुभूति आणि सजीव व्यक्तिचित्रण यांच्या जोडीला समाज प्रबोधनाचा रोकडा विचार या त्यांच्या साहित्यगुणामुळे माट्यांची कथा आजही तितकीच वाचनीय व रसिकमान्य ठरलेली आहे. मराठी वाङ्मयाला व समीक्षेला सर्वस्वी वेगळे वळण लावणारे बाळ सीताराम मर्ढेकर हे मूळचे मर्ढे या गावचे. म्हणजे सातारा तालुका आणि जिल्ह्याचे. मर्ढेकरांची कविता ही यंत्रयुगात सापडून दिशाहीन स्वरूपात फरफटणाऱ्या सामान्य माणसाच्या वेदनेचा व्याकूळ करणारा आविष्कार वाटतो. त्यांच्या काव्याने मराठी कवितेला एका वेगळ्या पर्वात नेले. ज्याला आपण नवकविता म्हणतो त्या कवितेचे आद्य जनक मर्ढेकर होत. कविते प्रमाणेच मर्ढेकरांची कादंबरी आणि समीक्षा साहित्याला श्रेष्ठ वरदान ठरलेली आहे. पंडित सप्रे आणि दत्तात्रय भिकाजी रणदिवे यांची काव्योपासना मराठी कवितेत प्रतिष्ठा पावलेली आहे. मिस्किल अन् मोहक विनोदाचा नाजूक शिडकावा करणारी सप्रे यांची कविता लक्षणीय वाटते.

श्री. के. क्षीरसागर हे सातारा जिल्ह्यातीलच खंडोबाच्या पालीचे. त्यांचे काही शिक्षण साताराला झालेले! अभिजात रसिकता; सौंदर्यवादी दृष्टिकोन, प्रगाढ व्यासंग; आणि नाविन्यपूर्ण चिंतन यांचा संगम असलेली त्यांची समीक्षा मराठीत दबदबा निर्माण करणारी आहे. श्री. के. क्षी. या तीन अक्षरांना आता समीक्षेच्या क्षेत्रात फार मोठे स्थान आहे. प्रा. कृ. पां. कुलकर्णी हेही कृष्णाकाठचे. सातारा जिल्ह्याविषयी त्यांना वाटणारे प्रेम त्यांनीं 'कृष्णाकाठची माती' असे आपल्या आत्मचरित्राला नाव देऊन सिद्ध केलेले आहेच. प्रा. कुलकर्णी यांचा भाषा शास्त्रावरील व्यासंग आज अनेक वर्षे विद्वानांमध्ये मान्य झालेला आहे! शि. गो. भावे, जावडेकर, द. न. गोखले, मनमोहन ही सारी मंडळी सातारा जिल्ह्याचे वाङ्मयीन भूषणच म्हणता येतील. भाव्यांचा नाटचविषयाच्या व्यासंग प्रसिद्ध असून द. न. गोखले हे आजच्या चरित्रलेखनामध्ये मानाचे स्थान संपादन करणारे शासनमान्य, रसिकमान्य लेखक आहेत. मनमोहनांची कविता आणि कादंबरी लेखन रसिकांच्या आदरास पात्र ठरलेली आहेत.

कराडचे प्रसिद्ध समाजसेवक बाबुराव गोखले यांचे लेखन, श्री. ग. माजगावकरांचे ग्रामायण, रा. ग. जाधवांची आजची समीक्षा पुस्तके, नाथ घाणेकरांचे वाङ्मय, बाबुराव घोरपडे यांचे संशोधनपर लेख, य. र. आगाशे याचे महाराष्ट्र सारस्वत हे पुस्तक, शांतिलाल भंडारी, पी. जी. पाटील यांनी लिहिलेले कर्मवीरांचे चरित्र व प्रासंगिक स्फुट लेखन, प्राचार्य शिवाजी भोसल्यांनी लिहिलेली चरित्रे या सातारा जिल्ह्यातील व सातारा शहरातील लेखकांनी आपल्या लेखनाने आदराचे स्थान निर्माण केलेले आहे. यातील काही लेखकांच्या लेखनाला वाचक, समीक्षक आणि शासन यांच्या पसंतीची पावती मिळालेली आहे. हे सारेच लेखक संख्येने कमी ग्रंथ लेखन करणारे असले तरी व्यासंग, रसिकता, संशोधन याबाबतीत कमी नाहीत. कोरेगावचे भंडारी यांचे लेखनही तसे विपुल स्वरुपाचे आहे!

अलीकडच्या काळात स. शि. भावे, शंकर सारडा, रा. ग. जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, हे. वि. इनामदार, दीपा गोवारीकर, शरश्चंद्र चिरमुले, वसंत स. जोशी, द. ता. भोसले, म. वि. कोल्हटकर, माधव पिटके, जयवंत गुजर, दा. सी. देसाई, बापू कुंभोजकर हे सातारा जिल्ह्यातील आणि शहरातील लेखक झपाटयाने पुढे आलेले आहेत-येत आहेत. श्रीनिवास कुलकर्णी, रा. ग. जाधव, इनामदार, चिरमुले, भावे यांनी तर आपापल्या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त केलेले आहे. त्यांच्या लेखनाला आता तसे वजन प्राप्त झालेले आहे. यांच्या जोडीलाच उषाताई कोल्हटकर, शशीकला उपाध्ये या स्त्री-लेखिकांनी देखील कथा-कादंबरीच्या क्षेत्रात आता वैशिष्टचपूर्ण स्थान संपादन केलेले आहे. इतर लेखकांचे लेखनही त्यांच्याविषयींच्या-अपेक्षा उंचावणारे आणि रसिकमान्य झालेले आहे. या लेखकांच्या लेखनानंतर आता नव्याने लिहू लागलेले प्रमोद कोपर्डे, श्याम मनोहर, दिलिप आंबेकर, कादंबरी देशमुख; विजय बाबर, संजय कोल्हटकर, जाई निंबकर, कु. प्रभुणे यांनी आपल्या लेखनाने फार मोठ्या अपेक्षा उंचावल्या आहेत. लवकरच त्यांचीही साहित्यसेवा आकार धारण करून प्रतिष्ठा व प्रसिद्धी यांच्या उत्तुंग शिखरावर विराजमान होईल असा विश्वास वाटतो.

> वाचनालयास आज दिवशी भेट दिली. तेथील उत्तम ग्रंथ व उत्साही माणसं पाहून आनंद झाला. या ग्रंथालयास मी यश चिंततो.
>
> २०-१-७२ — पु. भा. भावे

धावत्या स्वरूपात साहित्याच्या क्षेत्रातील मानकऱ्यांचा घतलेला हा आढावा! कमी अवधी आणि कमी साधनसामुग्री यांच्यामुळे अनेक मोठ्या व गुणी लेखकांचा नामोल्लेख व कार्य-निर्देश करण्याचे राहून गेले असेल! या लेखात त्यामुळे काही उणिवा व दोष राहून गेले असणार! या सर्व उणिवांबद्दल किंवा प्रमादांबद्दल वाचकांनी उदारबुद्धीने पहावे व जे काही उणे असेल ते कोणत्याही प्रकारे पुरस्सर घडलेले नाही, अनवधान, अज्ञान व सामर्थ्याचा अभाव याच गोष्टी त्याला कारणीभूत आहेत, एवढी प्रांजळ भावना त्याच्याबद्दल ठेवली जावी अशी नम्र प्रार्थना आहे. ज्या लेखकाचा नामानिर्देश करावयाचा राहून गेला असेल त्याचे लेखन गुणाने कमी म्हणून नव्हे; तर लेखकाच्या अज्ञानामुळे ते राहिले असण्याची शक्यता आहे एवढेच प्रांजळपणे सांगता येईल.

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा!

स्थापना : १९४४ — फोन नं. : कराड २२२८, उंब्रज २८

## शेती उत्पन्न बाजार समिती, कराड.

शेतकऱ्यांचा माल चांगल्या रीतीने विकला जावा यासाठी कराड येथे मुख्य बाजार आवार, उंब्रज व मसूर येथे दुय्यम बाजार-आवारे स्थापन केली आहेत. सुमारे ३० हजार शेतकरी या बाजार पेठांवर अंदाजे ४ कोटी रुपयांचा आपला शेतीमाल विकतात. विकलेल्या मालाचे ताबडतोब वजनमाप व्हावे व मालाची किंमत मालधन्यास ताबडतोब मिळावी आणि सहकारी संस्थांची कर्जवसुली संबंधित शेतकऱ्यांकडून करणे, या बाबींवर विशेष लक्ष दिले जाते.

केंद्र सरकारने बाजार पेठांच्या विकासासाठी आमच्या बाजार-समितीला रुपये ५ लाखाची देणगी दिली आहे.

❋❋❋

बा. नि. देसाई, सचिव — रा. गो. पाटील, उप-सभापती — आ. वि. गरुड, सभापती

शेती उत्पन्न बाजार समिती, कराड.

# ग्रंथालयाच्या समस्या

श्री श्री म. मराठे
कार्यवाह, नगर वाचनालय, सातारा.

सातारा नगर वाचनालयाचा शतकोत्तर रौप्य महोत्सव साजरा होत आहे. वाचनालये ही ज्ञानदानाचे काम सातत्याने करत असतात. आदर्श वाचनालये कशी असावीत यासंबंधी सर्वजण अनेक विचार मांडतात. याच स्मरणिकेतील बाबासाहेब पुरंदरे यांचा लेख वाचला म्हणजे आपल्याकडील वाचनालये किती खालच्या दर्जाची आहेत याची खंत वाटते. पण आदर्श वाचनालयाला वाचकही तसेच उत्तम दर्जाचे लाभावेत अशी वाचनालयाची अपेक्षा असते. पण आपल्या देशात तरी असे वाचक फारच थोडे मिळतील. ज्ञानाचे भांडार म्हणून वाचनालयाकडे न बघता फावला वेळ कसा घालवावा याचे एक साधन म्हणून वाचनालयाचा उपयोग माणसे करत असतात.

ग्रंथ हे वास्तविक लहान मुलाप्रमाणे सांभाळले पाहिजेत. ते वाचनालयात काय किंवा घरी काय, सर्वांनी आस्थेने जपून व पुढच्या वाचकाला उपयोग करता यावे या दृष्टीकोनातून वापरले पाहिजेत. अनुभव मात्र निराळा आहे. सुरळी करून, भाजीच्या पिशवीत घालून, किंवा पावसाळ्यात काखोटीस मारून भिजलेली पुस्तके परत येतात. चित्रे काढणे, अभिप्राय देणे, अधोरेखित करणे, पाने फाडून घेणे हे आपल्या वाचकांचे जन्मसिद्ध हक्क आहेत काय असे वाटते. हक्काबद्दल प्रत्येक वाचक जागरूक असतो पण त्या बरोबरच काही आपली ग्रंथाच्या संबंधी कर्तव्येही असतात ही जाणीव फार थोडी दिसते. वाचकांनी वाचनालयात पुस्तक वेळचेवेळी परत करून पुढ प्रतिक्षा करणाऱ्या वाचकांची सोय पाहणे कुणालाच जमत नाही. चांगले पुस्तक आपल्याच नात्यागोत्यात, मित्र मंडळीत फिरत राहते व पुढला वाचक वाचनालयाच्या व्यवस्थापन करणाऱ्या सेवकांना दोष देत राहतो. वेळचेवेळी वर्गणी देणे, आवश्यक तेव्हा नाव स्थगित ठेवण्याबाबत सूचना देणे, फार थोडया वाचकांना जमते. सार्वजनिक वाचनालयातून वास्तविक पुस्तकांची संख्या, विषयांची विविधता, अनेक भाषातील पुस्तके, संदर्भ ग्रंथ अभ्यासाला योग्य अशा पुस्तकांची वाण नसते. पण अभ्यासू, अनेक विषयांची पुस्तके वाचणारा वाचक सार्वजनिक वाचनालयाला क्वचित लाभतो. सामान्यपणे त्याची आवड निवड विविक्षित लेखकांची पुस्तके अगर ठराविक मासिके यात गुंतलेली असते. जेथे हजारांनी वर्गणीदार आहेत तेथे चार चार, पाच पाच प्रती घेऊनही या विशिष्ट पुस्तकांची मागणी पुरविणे कठीण होते. दुसरी चांगली पुस्तके देवू केली तरीही ती नको असतात. आणि विशिष्ठ पुस्तके मिळत नाहीत म्हणून तक्रारीवर तक्रारी येत असतात. सामान्यपणे असे म्हणता येईल की आपली वाचनाची निवड वाचकांनी फार संकुचित ठेवली आहे. अशा वर्गणीदार वाचकांना सातत्याने त्यांच्याच आवडीची पुस्तके पुरवणे कोणत्याही ग्रंथालयाला शक्य नाही.

महाराष्ट्रातल्या जिल्हा ग्रंथालयांना सरकारी अनुदान मिळते व त्यासाठी ग्रंथालयात मुक्तद्वार बसून वाचनाची सोय करावी लागते.

सभांना वेळेवर श्रोते उपस्थित राहाणे म्हणजे खरेच भाग्य! कांही वक्तेच असे असतात की त्यांचेसाठी श्रोते आधीपासून आपली जागा धरून तयार पण एरव्हीचा अनुभव म्हणजे सभेचे प्रास्ताविक वगैरे होवून वक्त्याचे भाषण सुरु झाले की मग श्रोत्यांनी हॉल भरायचा त्यामुळे कांही वेळा वक्तेही नियोजित वेळेपेक्षा उशीरा येत.

एकदा दोन परदेशी मिशनऱ्यांची पाठक भवनात सभा होती. श्रोते म्हणून नाथ घाणेकर व दोन तीन वृद्ध वेळेपूर्वी हजर. वक्त्यांनी घडयाळ पाहून बरोबर साडेसहा वाजता तीन, श्रोत्यांपुढे व्याख्यानास सुरुवात केली. नाथ चकित झाले. म्हणाले, यांच्या पासून आम्हा लोकांना अजून खूप शिकायचंय.

एकदा एका समारंभात कलेक्टर महाशयांना अर्धा तास उशीर झाल्याने सर्वांचा खोळंबा झाला. त्याबद्दल नाथांनी त्यांची सर्वासमक्ष हजेरी घेतल्याचे सुविख्यात आहे.

सभेला वेळेपूर्वी येणाऱ्या श्रोत्यात नाथ घाणेकर व डॉ. मामासाहेब आठल्ये निश्चित असत.

या विभागातील परिस्थिती तर फार वाईट असते. वर्तमानपत्रे ही अतिशय नीट वापरली पाहिजेत. पण सायंकाळपर्यंत सर्व गलित गात्र फाटलेली अशी असतात. वाचकांनी आपल्या आवडीचे फोटो, नोकरीची कात्रणे कापून नेलेली असतात. मासिके, साप्ताहिके कापलेली किंवा संपूर्णपण लांबवलेली असतात. दुसऱ्या वाचकांची आपण त्यामुळे किती गैरसोय करतो याची जाणीवही नसते. या जिल्हयातले वर्तमानपत्र आहे पण त्या जिल्हयाचे कां नाही, व अमूक वर्तमानपत्र मग ते दुसरे का नाही, म्हणून तक्रार असते. एकाने म्हणावे हे मासिक वाईट आहे तुम्ही ठेवू नका, दुसरा म्हणतो ते पाहिजेच. यातून तोडगा काढून समतोल राखणे तारेवरची कसरत असते.

वाचनालयाचा परिसर स्वच्छ असावा, प्रसन्न असावा असे कोणालाही वाटते, पण वाचनालय या संस्थेबद्दल सर्वांचीच नेहमी उदासिन वृत्ती दिसते. या संस्था वाढाव्यात, नीट जोपासल्या जाव्यात म्हणून त्यांना द्रव्यसहाय्य पाहिजे पण संस्थेला यासाठी सातत्याने झोळी पसरावी लागते. कार्यकर्ते विनावेतन काम करतात, सेवकवर्ग अल्प पगारावर कामे करतात, परंतु याची कोणाला जाणीव आहे असे दिसत नाही.

काही उदार देणगीदार वाचनालयांना पुस्तके देऊ इच्छितात. त्यांच्या घरची अडगळ त्यांना वाचनालयात आणून टाकावयाची

असते. नाही म्हणणे जड जाते व अशा ग्रंथांची भर पडल्यानें ती ठेवण्याचा प्रश्न सोडवणे कठीण असते.

एकूण असे वाटते की वाचनालयाची चळवळ नीटपणे चालण्यासाठी वाचकांचे फार मोठे सहकार्य, आस्था मिळणे जरूर आहे व त्यासाठी ज्ञान वाढवण्याची जोपासण्याची कळकळ वाचकामध्ये पाहिजे आहे. दुर्दैवाने ती दिसत नाही. परदेशच्या ग्रंथालयासंबंधी जी वर्णने वाचतो त्या दृष्टीने आपण फार फार अपुरे आहो हे उघडे सत्य आहे. ही परिस्थिती घालवावी म्हणून विशेष प्रयत्न करणे जरूर आहे, ते प्रयत्न चालू असतात, यश मिळेल तो सोन्याचा दिवस म्हणावा लागेल.

शहरातल्या वाचकांची जर ही अवस्था तर खेड्यापाड्यात याहूनही निराशाजनक चित्र आढळते. जिल्हा ग्रंथालयाना साखळीयोजनेत तालुका ग्रंथालयांना पुस्तके विनामूल्य पुरवावी अशी शासनाची योजना आहे. वाचनालयानें आस्थेने पुस्तके घ्यावी, त्याच्या टंकलिखित प्रति काढाव्या, त्या वाचनालयांना पुरवाव्या व ग्रंथाच्या मागणीची वाट पहात राहावे. पण फारच थोडी वाचनालये या योजनेचा फायदा घेताना दिसतात. त्यांचीही निवड कथा कादंबऱ्यापलिकडे नसते. शासनाचा तर साखळी योजनेबाबत अट्टाहास असतो. व आम्ही काम करावे अशी अपेक्षा असते. परंतु ग्रंथ जर मागितले गेलेच नाहीत तर जिल्हा वाचनालयांनी काय करावे या प्रश्नाचे उत्तर त्यांचेकडे नाही.

या वाचनालयांचे प्रश्न अनेक असतात. ग्रंथाच्या भरमसाठ किंमती असतात. सवलतीच्या योजनेत किंवा इतर मार्गाने जरी २५–३० टक्के कमिशन मिळाले तरी ती परवडत नाहीत आणि त्यालाही सामान्य वाचकांची पुस्तके खरेदी करून वाचण्याची नसलेली सवय आड येते. मागणी भरपूर असेल तर किंमती कमी होतील परंतु पुस्तक ही विकत घेऊन वाचण्याची आपल्याला सवयच नाही व त्यामुळे हे दुष्टचक्र नाहिसे होणार नाही, असो. शतकोत्तर रौप्यमहोत्सव प्रसंगी हे निवेदन थोडेसे अप्रासंगिक वाटेल. पण ही एक ग्रंथालयाची बाजू आहे व ती वाचून वाचकांचे कडून ग्रंथालयांचा वाढीला उपयोगी पडेल या सदिच्छेने हे निवेदन मांडले आहे.

☆ ☆ ☆

---

अनेक वर्षे वाचनालयाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असलेले श्री. वि सी. उर्फ बाळासाहेब सोहनी लिहितात,

मला वाचनाची व लेखनाची आवड असल्याने मी नगर वाचनालयाचा सभासद झालो मी १९४१ मध्मे प्रथम वाचनालयाच्या निवडणुकीस उभा राहिलो त्यानंतर बहुतेकवर्षी निवडणूक लढविली व मला पुष्कळदा यश मिळाले. १९७० मध्यें मी कार्यकारी मंडळातून निवृत्त झालो.

कार्यवाह कार्यकारी मंडळाचे सदस्य व अध्यक्ष, कार्याध्यक्षांनी मला चांगली वागणूक दिली. सरकारी अनुदानानंतर वाचनालयाच्या कार्यास निराळेंच पण चांगले वळण लागले. वाचकांची गर्दीही वाढली. जागा अपुरी पडू लागली. म्हणून आता जी इमारत वाढीची योजना आखली आहे ती योग्यच आहे असे मला वाटते.

वाचनालयाची नवी भव्य इमारत लवकरतयार होवो हीच प्रभू रामचंद्राजवळ प्रार्थना करतो.

☆ ☆ ☆


हार्दिक शुभेच्छा !

# राज ऑटोमोबाईल्स

भारत पेट्रोलियम डिलर्स

**पूना बंगलोर रोड, पोवई नाका**

★

## बढिये कन्सर्नस्

स्पेअर पार्टस व सर्व्हिसिंगची उत्तम सोय

सातारा ४१५ ००१

# सातारा जिल्ह्यातील ग्रंथालये

लेखक – श्री. बा. आचार्य

नगर वाचनालय सातारा ही संस्था सातारा शहरात १२५ वर्षे कार्य करीत आहे. जिल्ह्यातील कराड, वाई इत्यादि ठिकाणीही चांगली वाचनालये असून ग्रंथालय कायदा अमलात आल्यावर जिल्ह्यात बरीच नवीन ग्रंथालये निघाली आहेत. सध्या सातारा जिल्ह्यात खालीलप्रमाणे ग्रंथालये काम करीत आहेत.

## जिल्हा ग्रंथालय

नगर वाचनालय, सातारा

## तालुका ग्रंथालये

१ नगरपालिका नगर वाचनालय, कराड
२ लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय, वाई
३ श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, पाटण
४ श्री छत्रपती शिवाजी वाचनालय, फलटण
५ विद्यार्थी वाचनालय पांचगणी, ता. महाबळेश्वर
६ महात्मा गांधी वाचनालय, मेढा, ता. जावली
७ श्री भैरवनाथ मोफत वाचनालय, कोरेगांव
८ आझाद वाचनालय, दहिवडी

## अन्य शहर व ग्राम ग्रंथालये

(१) श्रीराम मोफत वाचनालय, लिंब. ता. सातारा (२) श्री रामदास मोफत वाचनालय ग्रामपंचायत, शिरवळ, ता. खंडाळा (३) ग्रामपंचायत मोफत वाचनालय, लोणंद (४) श्री शिवाजी मोफत वाचनालय, असवली, ता. खंडाळा (५) हिंद वाचनालय, रहिमतपूर, ता. कोरेगाव (६) नवयुग वाचनालय पाडळी (फाळके), ता. कोरेगाव (७) महात्मा गांधी वाचनालय, खटाव, (८) नेहरू वाचनालय, मायणी ता. खटाव (९) श्री शिवाजी वाचनालय, चितळी, (१०) सार्वजनिक वाचनालय, वडूज (११) हनुमान मोफत वाचनालय, कलेढोण (१२) बमनजी दिनशा पेटिट (नेटिव्ह) लायब्ररी, महाबळेश्वर, तालुका महाबळेश्वर, (१३) सुभाष वाचनालय, ग्रामपंचायत गुळुंब, ता. वाई, (१४) किसनवीर वाचनालय, ग्रामपंचायत, पसरणी, (१५) श्री शिवाजी वाचनालय, वाई, (१६) सुभाष वाचनालय, ग्रामपंचायत, बोपर्डी (१७) महात्मा गांधी वाचनालय ग्रामपंचायत, परखंदी, (१८) भैरवनाथ वाचनालय ग्रामपंचायत, बोरगाव, पो. चिखली (१९) लोकमान्य टिळक ग्रंथालय ग्रामपंचायत, वायगाव, (२०) भैरवनाथ वाचनालय ग्रामपंचायत, पांडे, (२१) जानुबाई वाचनालय ग्रामपंचायत, बोपेगाव (२२) श्री छत्रपती शिवाजी वाचनालय ग्रामपंचायत, बावधन (२३) जीवन विकास वाचनालय, ग्रामपंचायत ओझर्डे (२४) शिवाजी वाचनालय, ग्रामपंचायत, केंजळ (२५) चंद्रेश्वर वाचनालय, ग्रामपंचायत, चांदक (२६) भैरवनाथ वाचनालय ग्रामपंचायत, वेळे (२७) सुभाष वाचनालय ग्रामपंचायत, वहागाव (२८) छत्रपती शिवाजी वाचनालय, ग्रामपंचायत, सुरूर (२९) वीर वाचनालय, ग्रामपचायत, कवठे (३०) आझाद मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, भुईंज (३१) भैरवनाथ मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, किकली (३२) समर्थ मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, चिंधवली (३३) मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, पाचवड (३४) कोळेश्वर वाचनालय, ग्रामपंचायत उडतारे (३५) आझाद वाचनालय ग्रामपंचायत, कंळभे, पो. उडतारे (३६) वसंत मोफत वाचनालय, ग्रामपंचायत, विरमाडे पो. अनेवाडी (३७) नगर वाचनालय, म्हसवड, ता. माण (३८) नवजवान वाचनालय, मसूर ता. कराड (३९) अरुणोदय वाचनालय, ओगलेवाडी (४०) महात्मा गांधी वाचन मंदीर, ग्रामपंचायत, उंब्रज (४१) सार्वजनिक वाचनालय, ग्रामपंचायत, तांबवे (४२) नवयुग प्रवर्तक मंडळ वाचनालय, काले, (४३) सुरुचि महिला ग्रंथालय, कराड (४४) विद्यार्थी संघटना मोफत वाचनालय ओंड, (४५) श्रीसंत नामदेव ग्रंथालय ग्रामपंचायत, कोपर्डे (४६) कै. आनंदराव चव्हाण ग्रंथालय ग्रामपंचायत, मलकापूर (४७) सार्वजनिक ग्रामपंचायत वाचनालय, कार्वे (४८) सार्वजनिक ग्रामपंचायत वाचनालय, काळगाव, ता. पाटण (४९) श्री शिवाजी मोफत वाचनालय, कुंभारगाव, (५०) रामानंद शेतकरी मोफत वाचनालय, चाफळ, (५१) विकास वाचनालय, सायगाव, ता. जावली (५२) व्यंकटेश वाचनालय, साखरवाडी, ता. फलटण. वडूज, कलेढोण, लिंब, काले ही वाचनालये सध्या बंद स्थितीत आहेत.

जिल्ह्यातील काही प्रमुख वाचनालयांचा परिचय पुढीलप्रमाणे–

## कऱ्हाडचा ज्ञानदीप
## नगरपालिका नगर वाचनालय कराड

कऱ्हाड शहराची जी काही सांस्कृतिक आणि बौद्धिक भूषणे आहेत त्यापैकी नगरपालिकेचे नगरवाचनालय हे एक आहे. कऱ्हाड हे तालुक्याचे शहर असूनही तेथील वाचनालय मात्र जिल्हा ग्रंथालयाच्या तोडीचे आहे. हे महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीशी संबंधित असलेल्या सर्व जाणकारांनी मान्य केले आहे.

१८५७ साली ऐन इंग्रजी अमदानीत हे वाचनालय नेटिव्ह जनरल लायब्ररी म्हणून सुरू झाले. स्वातंत्र्य संग्रामाच्या आणि स्वदेशी पुरस्काराच्या आवेशात हे नाव अंतर्धान पावले आणि त्या वाचनालयाचे "सार्वजनिक वाचनालय" झाले. १८५७ साली नेटिव्ह जनरल लायब्ररी म्हणून स्थापन झालेल्या या ग्रंथालयाची सर्वतोपरी जबाबदारी १९५२ साली नगरपालिकेने आपणाकडे घेतली व खऱ्या अर्थाने नगरवासियांचे वाचनालय केले. हे वाचनालय नगरपालिकेचे वैशिष्ट्यपूर्ण दैनंदिन काम झाले आहे.

नगरपालिका कायद्यानुसार वाचनालयासाठी दहा नगरपालिका सभासदांची एक समिती नेमली जाते व समितीच्यामार्फत हा दैनंदिन कारभार चालविला जातो. आज या वाचनालयाचा ग्रंथसंग्रह महाराष्ट्रातील विख्यात ग्रंथालयाला शोभेल असा आहे. नगरपालिकेच्या अभिमानास्पद कार्यात या वाचनालयाने मोठीच भर घातली आहे. कोणालाही सहज भुरळ पडावी इतकी विविध विषया–

वरील ग्रंथसंपदा व नियतकालिके आहेत या ग्रंथालयात २१८२० मराठी, १४९३ हिंदी, ७८६३ इंग्रजी व १२८७ संस्कृत असे एकूण ३२४६३ ग्रंथ आहेत. याशिवाय इंग्रजी, मराठी, हिंदी व संस्कृत भाषेतील ३५३१ संदर्भग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ, जुन्या मासिकांचे बांधीव अंक गठ्ठे १६६७, दैनिके ३२, साप्ताहिके ६८, पाक्षिके २६, व मासिके १७४ वाचकांना उपलब्ध आहेत.

ग्रंथालयात २४०० चे वर वर्गणीदार असून रोज १००० ते १२०० पर्यंत ग्रंथांची देवघेव केली जाते. वर्गणीचा दर अत्यल्प म्हणजे अवघा ४० पैसे आहे. नगरपालिका या वाचनालयासाठी दरवर्षी जवळजवळ दीड लाख रुपये खर्च करते.

कराडचे हे ग्रंथालय अ वर्गातील तालुका ग्रंथालय असून ग्रंथालय शास्त्राप्रमाणे पुस्तकांची वर्गबारी, वर्गीकरण व तालिकीकरण केलेले जिल्ह्यातील पहिले ग्रंथालय आहे. श्री. विठ्ठलराव पाटील हे ग्रंथपाल असून अन्य सहकाऱ्यांचे सहकार्याने व प्रयत्नाने ग्रंथालयास आजचे आदर्श स्वरूप आले आहे. मा. नगराध्यक्ष श्री. पी. डी. पाटील हे गेली २२ वर्षे वाचनालयाचे आधारस्तंभ आहेत. ते उत्तम समतोल वाचक आहेतच पण त्यांच्या ज्ञानप्रसाराच्या तळमळीनेच वाचनालयास आजची सुदृढता प्राप्त झाली आहे. ग्रंथालय समितीचे चेअरमन म्हणून १९६४ ते ६७ पर्यंत श्री. र. पु. कुलकर्णी यानी या वाचनालयाचे सपन्नतेचा पाया घातला.

हे वाचनालय नवरात्रात ९ दिवस शारदीय व्याख्यानमाला गेली ४७ वर्षे करीत आहे. मार्चमध्ये तीन दिवस "यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला" ही व्याख्यानमाला केली जाते व ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली जाते. नोव्हेंबरमध्ये ३ दिवस साने गुरुजी कथामाला केली जाते. या शिवाय निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व दोन तीन ग्रंथप्रदर्शने नियमित केली जातात.

## वैशिष्ट्ये

ग्रंथालयासाठी १० लाख रुपये खर्च करून भव्य अशी अद्यावत इमारत नगरपालिकेने बांधली आहे. त्यात स्वतंत्र अभ्यासिका, बाल विभाग, महिला विभाग, वृत्तपत्र विभाग, मासिक विभाग यासाठी स्वतंत्र दालने बांधली आहेत. ग्रंथालय लवकरच या नवीन इमारतीत प्रवेश करील. वाचनालय सकाळी ७–३० ते १२ व दुपारी ४–३० ते ८–३० पर्यंत उघडे असते. शनिवारी दुपारी साप्ताहिक सुट्टी असते.

## लोकमान्य टिळक वाचनालय वाई

नेटिव्ह जनरल लायब्ररी, कॉरोनेशन लायब्ररी या वाचनालयाचे रूपांतर वाई ग्रंथसंग्रहात झाले. १९२७ साली वाई ग्रंथालयाचे रूपांतर "लोकमान्य टिळक स्मारक" संस्थेत झाले व आज त्याच नावाने "लोकमान्य टिळक मंदीर" या इमारतीत "लोकमान्य टिळक ग्रंथ संग्रहालय" काम करीत आहे. जानेवारी १९४९ पासून हे वाचनालय वाई तालुका वाचनालय म्हणून सरकार–मान्य झाले. संस्थेचा वार्षिक खर्च रु १५ हजार पर्यंत असून जमाही साधारण तेवढीच असते. संस्थेची स्वतःची इमारत आहे. या ग्रंथालयात १५००० ग्रंथ असून १०५० ग्रंथ सन १९०० च्या पूर्वीचे आहेत. ग्रंथालयात १५ दैनिके, ३० साप्ताहिके व पाक्षिके व ५० मासिके येतात. रोज ३०० चे वर वाचक असतात. श्री. वि. वैशंपायन अध्यक्ष असून डॉ. पा. ना. खरे व भा. ह. गोगटे विश्वस्त आहेत. श्री. भा. द. प्रभुणे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष असून रा. ना. चव्हाण, उपाध्यक्ष, अ. स. भट कार्यवाह व श्रीमती मैनाताई नित्सुरे सहकार्यवाह आहेत. १९१७ सालापासून चालणारी वसत व्याख्यानमाला ही संस्था वाचनालयाचे सांस्कृतिक कार्य म्हणून १९७७ पासून चालविण्यात येऊ लागली.

ब्राह्म समाजाचे विद्यमाने श्री शिवाजी वाचनालय हे सरकार-मान्य वाचनालय रविवार पेठ वाई येथे काम करीत आहेत. श्री. रा. कृ. बाबर हे कार्यवाह म्हणून काम पहातात. १९४४ नंतर श्री शिवाजी वाचनालय सुरू झाले. १ मार्च १९७४ श्री. रा. कृ. बाबर यानी हे वाचनालय नेटाने सुरू केले व त्यास सरकारी मान्यता मिळाली. या वाचनालयात वृत्तपत्रे, मासिके वाचावयास मिळतात. यास नगरपालिकेचे अनुदानही मिळते. हे वाचनालय सध्या क वर्गात असून ब वर्ग मिळावा अशा प्रयत्नात आहे.

ग्रामपंचायतीचे सहकार्याने वाई तालुक्यात अनेक ग्रंथालये सुरू झाली असून त्याना सरकारी मान्यता मिळाली आहे. वाई पंचायत-समिति ग्रंथालयांचे वाढीस सहाय्य करीत असल्याने सातारा जिल्ह्यात वाई तालुक्यात सर्वात जास्त वाचनालये कार्य करीत आहेत.

रामदास मोफत वाचनालय शिरवळ :–हे वाचनालय खंडाळा तालुक्यातील मोठे वाचनालय आहे. शिरवळ ग्रामपंचायत हे वाचनालय चालविते. या वाचनालयात ४२०७ ग्रंथ आहेत. ६५ सभासद असून ४०० वाचक ग्रंथालयाचा फायदा घेतात.

नवयुग वाचनालय पाडळी (फाळके) पो. सातारारोड:–१९५३ पासून सातारारोड येथे हे वाचनालय काम करीत आहे. १०० सभासद याचा लाभ घेत असून ग्रंथसंख्या ४८०० पर्यंत आहे. श्री. स. कृ. पाडळकर अध्यक्ष असून श्री. ज. सा. फाळके सेक्रेटरी आहेत.

जयजवान वाचनालय मसूर :–१९४२ पासून हे वाचनालय काम करीत आहे. ग्रंथसंख्या २८०० असून रोज १०० चे वर वाचक वाचनास येतात.

आझाद वाचनालय वहिवडी :–१९५५ पासून हे ग्रंथालय काम करीत आहे. वाचनालयाकडे ६००० ग्रंथ असून रोज ८० वाचक सरासरीने त्याचा लाभ घेतात.

नेहरू वाचनालय मायणी :–हे वाचनालय श्री.अ मु.येळगावकर हे उत्साही शिक्षक चांगल्या प्रकारे चालवीत आहेत. या वाचनाल–याचा चांगलाच फायदा नागरिक घेतात.

श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय पाटण :– हे तालुका वाचनालय. त्यास स्वतःची इमारत आहे. ग्रंथसंग्रह चांगला असून वाचकांची संख्याही चांगली असते.

सातारा जिल्ह्यातील ग्रंथालयाचा ग्रंथालय संघ असून तो जिल्ह्यात ग्रंथालय चळवळ वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. आमदार विठ्ठलराव जगताप हे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष असून प्रा. शिवाजीराव चव्हाण वाई उपाध्यक्ष आहेत. श्री. बा. आचार्य सातारा व वि. वि. पाटील कराड हे कार्यवाह असून बी. टी. वाडकर, खजिनदार आहेत. नगर वाचनालय सातारा येथे मुख्य कार्यालय असून नगर पालिका नगर वाचनालय कराड व प्रा. शिवाजीराव चव्हाण वाई येथे केंद्रे आहेत.

# वाचकांचे मनोगत

रवींद्र राजाराम शिवदे.

एकशे पंचवीस वर्षांची यशस्वी वाटचाल करून, शाहू नगरीतील आमच्या "नगर वाचनालयाने" शाहू नगरीच्या अभिमान परंपरेत आपलेही उल्लेखनीय स्थान विभूषित केले आहे, यात शंकाच नाही. विविध क्षेत्रातील काळाच्या पडद्याआड झालेल्या आणि वर्तमानात स्वविद्येच्या तेजावर चमकणाऱ्या कित्येक नामवंतांची विद्येची तहान समर्थपणे तृप्त याच संस्थेने केलेली आहे. त्यांच्या कृतज्ञतेच्या शब्दस्पर्शातून आज स्फूर्तिदायक आनंद आम्हांसही होत आहे.

अशा विद्याभांडाराशी बाल्यावस्थेपासूनच असणारा माझा संबंध, एक दिवसाचीही अनुपस्थिती सहन करू शकत नाही. कारण वाचकांशी नाते आहे, आपुलकीचे आपलेपणाचे ! या महोत्सवप्रसंगी नवनवीन योजनांचे तारे प्रकाशित होत असता, नवीन तारे शोधण्याचा हा माझा एक सुचनात्मक अल्पसा प्रयत्न मांडावासा वाटतो.

"दुर्मिळ ग्रंथ सम्राट" असणाऱ्या या वाचनालयातील कित्येक ग्रंथांचे कायम स्वरूपात पुनर्जीवन होणे आवश्यक आहे. अन् त्याचबरोबर असे ग्रंथराज व्यासंगी, संशोधक, वाचकांना अभ्यासूना सहजपणे उपलब्ध व्हावेत. निरनिराळ्या क्षेत्रातील जिज्ञासूंना ते ग्रंथ तेथेच पाहून, वाचनाबरोबरच लेखनाचाही आनंद मिळण्यास हवा. त्यासाठी नवीन प्रकल्पात अग्रहक्क मिळण्यास हवा. शांत व प्रशस्त वास्तुदालनास !

ग्रंथांची कपाटे स्वतंत्रपणे व सर्वसाधारण पाहून निवडता आली तर, वाचकांच्या निवड श्रेणीतही आनंदमय बदल घडेल.

त्याचबरोबर नवीन इमारतीचा उपयोग "मुक्त व्यासपीठ" योजनेतून वक्तृत्व संवर्धनासाठीही होवू शकेल. महिन्यातून एकदा मुक्तपणे अन् मुक्त विषयांची मतप्रदर्शने या संस्थेने घडवून आणावीत. धीटपणा अन् वाचनप्रभाव यांचे संगोपन आणि दिग्दर्शन त्यातून घडेल !

नवीन वास्तुदालनात "टी. व्ही." सारखे ज्ञानोपयोगी व व मनोरंजनात्मक साधन ठेवणे आवश्यक आहे. त्याद्वारे क्रीडा, नाट्य, वक्तृत्व, परिसंवाद, मुलाखती इत्यादीसारख्या गुणांचे दर्शन वाचनाबरोबरच दृष्टी सुखातही मौलिक भर पाडू शकेल, हे अगदी उघडच —

अशा या सुचना अन् त्याचबरोबर त्याच्या पूर्ततेसाठी सक्रिय शुभेच्छा !

☆ ☆ ☆

---

हार्दिक शुभेच्छा !

# दि यशवंत को-ऑप. प्रोसेसर्स लि.

## इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

स्थापना : १४ मार्च, १९६३.
तार : "यशवंत"

२०८१, २०८२
२०८३, २०८४

: सर्व प्रकारचे प्रोसेसिंगचे काम :

ब्लिचिंग, मर्सरायझिंग, डाईंग, कॅलेंडरिंग, प्रिंटींग.

श्री. मोहन दत्तात्रय वागवेकर बी. ए.
चेअरमन

श्री. तातोबा जोमाण्णा लोखंडे
व्हाईस चेअरमन

## ग्रंथालय शास्त्राचा आद्य उद्गाता

# संत रामदास

– समाजभूषण बाबुराव गोखले, कराड

ग्रंथालयाचा विकास वाचनालयांच्या गंगोत्रीतून झाला असून, पहिले ग्रंथकारांचे संमेलन १८७८ साली पुण्यास न्या. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली भरले व दुसरेही १८८५ साली पुण्यासच भरले असता, त्या संमेलनात दादोबा पांडुरंग यांच्या कन्या अहिल्याबाई तर्खडकर या एकमेव महिला हजर असल्याबद्दल गोपाळराव आगरकरानी एका स्वतंत्र ठरावाच्यारुपाने सर्व समाजाच्या लक्षात ती गोष्ट आणून दिली आहे. नंतर आगकरांच्या 'वाक्यमीमांसा' या पुस्तकाला इंदूरकर संस्थानिकांनी पारितोषिक देऊन गौरविले होते, त्यात सातारा जिल्ह्याचाच गौरव झाला. ही ग्रंथालय चळवळीच्या संदर्भात प्रथमारंभाचीच गौरवकथा ठरली आहे.

अशी ग्रंथकार संमेलने व ग्रंथगौरव ऐतिहासिकदृष्टया ग्रंथालय चळवळीच्या ग्रंथालय विस्ताराच्या शिलान्यासासारखे शोभताना दिसतात. त्यातून पाश्चिमात्य संस्कृतीतील ज्ञानप्रसाराच्या साधना म्हणून ज्या ज्या प्रथाप्रणाली ग्रंथालयशास्त्रात अंतर्भूत होऊन व्यवहारशुद्ध होऊन राहिल्या आहेत, त्यांच्या जीवनरसाचे सम्यग्दर्शन देणारा आद्य उद्गाता संत समर्थ रामदास होय. वनस्पतींना जीव व जीवन असते आणि त्या भावभावनाशी समरस होऊ शकतात. हे सिद्ध करणारा भारतीय जगदीशचंद्र बोस हा जसा पहिला, अगर "सर्वधर्मी समानत्व पाहणारा व कोणाही धर्मानुयायाबरोबर समरसतेने ईशप्रार्थना करण्यात धन्यता मानणारा पहिला भारतीय 'परमहंस' जसा स्वामी रामकृष्ण अथवा नावागावासह स्वतःची कसलीही माहिती चुकूनही न देणारा पण जनमनावर अनभिषिक्तपणे राज्य चालवणारा जसा पहिला भारतीय संत अक्कलकोटकर स्वामी समर्थ, तसाच ग्रंथालयशास्त्राचा लोकशिक्षणप्रेमी आद्य उद्गाता संत समर्थ रामदासच होय.

"जे जे काही आपणास ठावे । ते ते दुसऱ्यासी शिकवावे । शहाणे करुन सोडावे । सकल जन ॥" अशी व्यापक लोकशिक्षणाची समर्थांची प्रेरणा व कर्तव्यप्रेरक साधना होती.

पाश्चिमात्य संस्कृतीबरोबर मुद्रणकला व वाचनालये या व्यापक लोकशिक्षणसाधनांचा परिचय झाला. पण तत्पूर्वी भारतात व्यापक लोकशिक्षण श्रवणालयातून होत असे. पटांगणे, चव्हाटे, शाळा, गुरुकुले, मंदिरे व मठ यामधून पवाडे, प्रवचने, व्याख्याने, पुराणे, कीर्तने वगैरे चालत आणि वैयक्तिक व सामुदायिक लोकशिक्षण जाणकार करीत. 'नामूलमुच्यते किंचित् ॥' ही काळजी जाणीवेचे लोकशिक्षक घ्यावयास चुकत नसत. लोकशिक्षकांना "फेडावे नाना आक्षेप ।" हे पथ्य सांभाळणेच आवश्यक असल्याकारणाने, प्रतिपादन करावयाच्या विषयासंबंधीचा "ग्रंथमात्र धांडोळावा ।" लागे. समर्थांनी प्रत्येक अक्षरमित्र व्यक्तिलाही तो सल्ला दिला असून "प्रत्यय येईल तो घ्यावा । अर्थ मनी ॥" असा इशारतीचा कंदीलही दाखविला आहे. असे करावयाचे तर "अक्षरे गाळून" किंवा "पदरची घालून" ग्रंथ वाचण्याचा मूर्खपणा तर होता कामा नयेच, पण "समस्त ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण । तो दुरात्मा -दुरभिमान ।' ही कोणी होऊ नये, म्हणून ग्रंथमात्र धांडोळताना, लेखकाच्या शब्दाशब्दांच्या जुळणीतील प्रवाही रसास्वाद, त्यातून होणाऱ्या अर्थबोधाचे संदर्भानुसंधान आणि त्या दोहोतून मिळणारे सूचकध्वनी या तिहींच्या सुसंगतीने लेखकाच्या आशयाच्या वेधशक्तीवर आपली उदात्त मने केंद्रित करणारे वाचकच वाचनाचा अमृतानंद उपभोगतात. एवढेच नव्हे तर तसे वाचक जेव्हा हजारो माणसांच्या रांगारांगातून बसतात; उठतात, तेव्हा तेव्हा त्या हजारोंना धन्यताच वाटत असते, असे त्रिसुपर्णाने म्हटले आहे. अशा पात्रतासिद्धीचे वाचक, अभ्यासक, ग्रंथमर्मज्ञच व्यापक लोकशिक्षण देऊ शकतात. त्यांच्याच "अभ्यासेची प्रगट व्हावे । प्रगट होऊन नासावे । हे बरे नव्हे ॥" या निश्चयाने समाजाच्या मनाची परिवर्तने ठामपणे होऊन समाजस्वास्थ्य व सामाजिक सामर्थ्य दृढावते. "शहाणे करून सोडावे सकल जन ।" म्हणून "जे जे काही आपणासि ठावे । ते ते दुसऱ्यासि शिकवावे ।" असा व्यापक लोकशिक्षणाचा दंडक व्यक्तिमात्राला घालून देणारे समर्थ रामदास प्रत्येकाकडूनच "अभ्यासेची प्रगट व्हावे ।" अशीच अपेक्षा करतात. अर्थातच प्रत्येकजण आपापल्या विषयाचा वाचक-अभ्यासक होताना हर एक ग्रंथातील प्रतिपादनाच्या वेधशक्तीवर मन केंद्रित करणाराच हवा, हीच समर्थांची अपेक्षा असणार हे उघडच आहे.

ग्रंथमात्र धांडोळताना, त्याचे अथपासून इतिपर्यंत परिशीलन करणे, आरंभापासून शेवटपर्यंत ग्रंथ नजरेखालून घालणे, ग्रंथाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वर्तुळाच्या व्यासाप्रमाणे सरळ जाणे यालाच ग्रंथाचे पारायण म्हणतात. ते वैयक्तिक वा सामुदायिक होऊ शकते अशी पारायणे वरचेवर झाली तर "वाचिलेचि वाचावे पुनः पुनः ।" असे होऊन ग्रंथविषयाची पक्की ओळख तर होतेच पण पुष्कळ वेळा ग्रंथ विस्ताराच्याच नव्हे तर ग्रंथप्रतिपादनाच्याही मर्यादातून सीमोलंघन होऊन वाचकाची "नवनवोन्मेष शालिनी प्रतिभा ।" नवा प्रकाश पाहू शकते. त्याने काळावरही मात करणारे नवविचारोत्थान होऊन, जाणकार ते समाजाच्या तळापर्यंत पोहोचवू शकतात. हा अनुभव चोखंदळपणे जे घेऊ शकतात त्यांचेच खरे ग्रंथ-पारायण झाले हे सार्थकत्वाने म्हणता येते.

"वाचिलेचि वाचावे" या समर्थांच्या मार्गदर्शनात आणखीही एक अर्थ आहे. काही ग्रंथ कालबाह्य होतात तर काही काळाच्या करकोच्यानांही पुरून उरतात. असे जे उरतात, ते वाचलेले म्हणजे टिकलेले ग्रंथ पुनः पुनः अभ्यासावेत, कारण काळाला पुरुन उरण्यासारखे त्यातले वैशिष्ठ्य काय आहे ते उमगले तर वैचारिक सरितेचा सातत्यप्रवाह कसा राहू शकतो हे समजण्यातील गोडी तर अनुभवता येतेच, पण पुष्कळ वेळा काळाला पुरून उरणारी ग्रंथनिर्मिती साधनिकेसह उमगू शकते. "जुने ठेवणे मी पणे ते कळेना।" हे

याबाबतीत सर्वांसच उमगले पाहिजे. "वाचिलेचि वाचावे पुन: पुन:।" कारण बुद्धिला "विवर विवरोनी" अर्थ पहाण्याची सवय लागते आणि त्या सवयीने परिणामतः वेळप्रसंगी काहीच सुचेनासे होऊ लागले तर आडवूक – अडचणीतून मार्ग काढण्याचा उपाय सुचतो; "फड नासीचि नेदावा।" अशी युक्ती सुचते आणि "युक्तिने कार्य होतसे।" असा अनुभव येतो. लो. टिळक किंवा म. गांधी केव्हा "अवघड होउ पडली असता।" भगवत्गीतेकडे वळत किंवा श्रीयुत शंकररावजी देव दासबोधाकडे वळत आणि अनेकानेक वारकरी ज्ञानेश्वरीकडे वळत व वळतात, हे सुप्रसिद्धच आहे. "प्रसंगी अखंडित वाचीत जावे।" असे समर्थांनी मार्गदर्शन केले आहे. ते वरील स्फुरणासाठी जसे आहे तसेच प्रसंगी म्हणजे "कठीण समय येता कोण कामास येतो?" तर "वाचिलेचि वाचलेले येते" हे जसे त्यांना सुचवावयाचे आहे की कठीण समयी मनुष्य वाचन करीत क्षणामागून क्षण घालवू लागला तर कल्पनामागून कल्पना सुचतात, अनुभवामागून अनुभव समजतात किंवा आठवतात आणि "विवेके करावे कार्यसाधन।" एवढी तरी सावधानता येऊन "अचुक चुकेना कोठे।" अशी दक्षतेची वाटचाल करण्याची प्रवृत्ती होते. तसे काही होईपर्यंत अखंडित वाचन होत राहिले तर निदान कठीण समयाची भीषणता काही काळ विसरता येते व "सदा सर्वदा देव सन्निध आहे। कृपाळूपणे अल्प धारिष्ठ पाहे॥" तर अल्पधारिष्ठ साध्य करण्यासाठी तरी त्या अखंडित वाचनाचा उपयोग होतो.

जनसामान्याला एखादेवेळी काही कामच नसते किंवा काही काम सुचतही नाही. अशा वेळी रिकाम्या मेंदूत सैतानाला आपले दुकान थाटण्याची संधीच सापडू नये म्हणून खळ न पडता वाचन करण्याने वेळ सार्थकी लागल्याचा तरी श्वास सोडता येतोच! न जाणो, एखाद्यावेळी बडे बापके बेटयांच्या किंवा सामाजिक प्रश्नांच्या किंवा नको असलेल्या माणसांच्या संगतीत काळ काढण्याची आपत्ती ओढवते. अशा वेळी "मौन सर्वार्थसाधनम्।" धरणेही अवघड होऊन बसते. तेव्हा चांगल्या वाचनात अविरत मन घालून बसल्याने, एरवी उगाच येणारा वाईटपणाही टळतो व मनोबुद्धींना सत्वशुद्धी राखावयास वाचनाने सहाय्य होते. याउलट प्रखर तेजस्वीयांच्या सोबतीत काळ काढण्याचा मोका आल्यास, त्यांचे "कैसे बोलणे, कैसे चालणे" यांचा क्षणशः कणशः निरिक्षणाभ्यास म्हणजेच वाचन करण्याने, तसे करणाऱ्यांच्या विवेकदृष्टीचे उदात्तीकरण व उन्नती होण्यात अवकाशच लागत नाही. थोर लोकांचे बोलणेचालणे हा एक चालता बोलता ग्रंथच असतो व त्याचे अखंडित वाचन हे आत्मनिरिक्षणपूर्वक प्रगतोन्नतीला प्रेरकच ठरते.

अशा वा अन्य तऱ्हांनी अभ्यस्त वा अनुभवसिद्ध असे निकित्सक व चोखंदळ श्रोते आपणास लाभावेत, किंबहुना जमलेले श्रोते त्या पात्रता प्रतिष्ठेचेच आहेत, असे सन्मानून मंदिरादि श्रवणालयात पुराणिक प्रवचनकार, कीर्तनकार व लोकशिक्षक आपल्या प्रतिपादनाला सुरवात करीत. "मुकी बिचारी कुणी हाका" असे गतानुगतीक समाजाने होऊच नये तर उत्कट बुद्धीवादी होऊन स्वतंत्र विचाराचे व्हावे, अशी समर्थांची उत्कट इच्छा होती. म्हणूनच त्यांनी आपल्या दासबोध - ग्रंथाला प्रस्तावनावजा प्रारंभ करताना "श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिले जी येथ। श्रवण केलियाने प्राप्त काय आहे?।" अशी ओवि घातली आहे व अपेक्षा केली आहे की ग्रंथ, ग्रंथविषय, ग्रंथाच्या परिशिलनाने होणारे प्रत्यक्षाप्रत्यक्ष लाभ कोणते होतात हे लक्षात येईल अशा तऱ्हेने ग्रंथ समजावून घेण्याची गरज आहे; तशीच या सर्व गोष्टी वाचकाला सहज उमगतील अशा मनमोकळेपणानेच ग्रंथकारानेही आपला ग्रंथ तयार केलेला असला पाहिजे एवढेच काय? तर आपल्याला ग्रंथात जे प्रतिपादन करावयाचे आहे, ते आपल्याजवळ लोकांना काही सांगण्यासारखे आहे अशा आत्मविश्वासाने प्रतिपादले पाहिजे आणि तेही इतक्या सोज्वळ निर्मळ अंत:करणाने की जणू तसे करण्याची प्रेरणा आपणास परमेश्वराकडून झाली आहे. समर्थ म्हणतात, "अवघे करणे परमेश्वराचे। आणि कवित्व (शहाणपण) तेवढे मानवाचे। ऐशा अप्रमाण बोलण्याचे काय घ्यावे?।" ज्यात अध्यात्म नाही तो ग्रंथच नव्हे असे निकराचे उद्गारही समर्थांनी काढले आहेत. त्यातील अतिरेक विसरून उत्कटता लक्षात घेतली तर ग्रंथनिर्मिती ही "जनसेवा ती ईश्वरसेवा।" या पार्श्वभूमीवरच झाली पाहिजे, हे सर्वमान्य होण्यास काहीच हरकत नाही. "परोपकाराकारणे। कवित्व अगत्य करणे।" पण "देवाचेनि प्रसन्नपणे। जे जे घडे बोलणे। ते ते अत्यंत श्लाघ्यवाणे।" असेही समर्थांनी बजावले आहे. "कवित्व नसावे खटपट। कवित्व नसावे उद्धट।" फार काय "कवित्व नसावे वादांग। कवित्व नसावे रसभंग।" आणि? "कवित्व नसावे पाल्हाळ। कवित्व नसावे बाष्फळ। कवित्व नसावे कुटील। लक्षुनीया।" असेही समर्थांनी स्पष्ट बजावले आहे पुढेही त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की–

कवित्व असावे निर्मळ। कवित्व असावे सरळ।
कवित्व असावे प्रांजळ। अन्वयाचे ॥ १ ॥
कवित्व असावे भक्तीबळे। कवित्व असावे अर्थागळे।
कवित्व असावे वेगळे। अहंतेसी ॥ २ ॥
कवित्व असावे कीर्तीवाड। कवित्व असावे रम्य गोड।
कवित्व असावे जाड। प्रतापविषयी ॥ ३ ॥
कवित्व असावे सोपे। कवित्व असावे अल्परुपे।
कवित्व असावे सुल्लपे ॥ ४ ॥"

आणि? त्या कवित्वाने "शंका आशंका प्रश्नोत्तरे। नाना काव्ये शास्त्राधारे। तुटे संशयो निर्धारे। निर्धारिता॥" असे झाले पाहिजे असा इशाराही समर्थांनी केला आहे ग्रंथातील कवित्वाचा म्हणजे शहाणपणाचा कस, "जेणे लौकिक लाजे। जेणे ज्ञान उमजे।" नव्हे, तर "जेणे ज्ञान हे प्रबळे।" असा समर्थांनी निर्देशिला आहे आणि म्हटले आहे की–

"जो ऐकताच गर्वगळे। का ते भ्रांतीच मावळे।" आणि
'जेणे होय उपरती। अवगुण पालटती।
जेणे चुके अधोगती। त्या नाव ग्रंथ ॥ १ ॥
"जण धारिष्ट चढे। जेणे परोपकार घडे।"
जेणे विषयवासना मोडे। त्या नाव ग्रंथ ॥२॥

असे समर्थांनी मत दिले आहे. "विचार पाहेल तो पुरुष।" हे ग्रंथकाराने व त्या ग्रंथाच्या वाचकाभ्यासकांनीही वर्म समजले पाहिजे. कारण–

शास्त्रांचा बाजार भरला। मतामतांचा गलबला।
लोककामनेच्या व्रताला। झोंबोन पडती ॥१॥

म्हणोनिया ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥

घर टाक की लाव कागदाला, अशा वृत्तीचे ग्रंथकार समर्थांना आवडतच नसत.

" रेखेचे गुंडाळे केले । मातृकाक्षरी शब्द जाले ।
शब्द मेळवून चाले । श्लोक, गद्य, प्रबंध ॥१॥
नाना ऋषी नाना मते । पाहो जाता असंख्याते ।
भाषा, लिपी जेथे तेथे । काय उणे ॥२॥
ऐसे उदंड लोक असती । आपणास थोर म्हणती ।
परि ते विवेकी जाणती । सकळ काही ॥३॥
पुस्तक–ज्ञाने निश्चयोधरणे । तरी गुरु कासया करणे ? ।
या कारणे विवरणे । आपल्या प्रत्यये ॥ ४ ॥

हेच श्रेयस्कर.

"याकारणे समुदाय । झाला पाहिजे महोत्साह ।" म्हणून "बहुतांचे मनोगत हाती । घेतले पाहिजे ॥" यावर कोणाही ग्रंथकाराचे लक्ष राहणेच आवश्यक आहे." मनोगत राखता समस्त । बोढोन येती ॥" अर्थात् वाचकांच्या (श्रोत्यांच्या) मनात हळुवार–पणे शिरता शिरताच "जो कोणी विवेके विवरी तोचि श्रेष्ठ ॥' ग्रंथकार ठरतो.

अशा ग्रंथकारांच्या ग्रंथासंबंधीच समर्थ सांगून चुकले आहेत थांबा, थांबा, ऐका, ऐका । आधीच ग्रंथ सोडू नका । सांगितले ते ऐका सावधपणे ॥ काहण्या, कथा, गोष्टी, पवाड । नाना अवतार–चरित्रे वाड ।" आणि ? "करून अवघा तत्वझाडा । सारासाराचा निवाडा । सावधपणे ग्रंथ सोडा । सुखेनव ॥" वाचकाकडून ही अपेक्षा पुरी व्हायची तर स्वत: "लेखके कुल समजवावे ।" हेच योग्य होय.

वाचकांच्या अंत:करणापर्यंत सरळ जाऊन भिडणारा ग्रंथ लिहावयास लेखक उर्फ ग्रंथकारही मोठ्या व्यापक मनाचाच व्हावा "व्यापकपण सोडू नये । काही केल्या ॥" अशा वृत्तीप्रवृत्तींचा लेखक आपला ग्रंथ लिहावयास बसतो तेव्हा त्यास लेखनसामुग्रीमध्ये सर्वप्रथम (आता विज्ञानयुगात आहेत तशी अनेक ढंगी साधने नसल्याने) शाई लागे. समर्थांनी मूळ मायेचे रूपक करून शाईचे वर्णन केले आहे की–

पीतापासून कृष्ण झाले । भूमंडळा विस्तारिले ।
तेणेंवीण उमजले । हे तो घडेना ॥१॥
आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्रांची तेथ साठवण ।
अधम आणि उत्तम गुण । तेथेचि असती ॥२॥
महीसुत सरसावला । सरसावूनी द्विधा केला ।
उभयता मिळून चालला । कार्यभाग ॥३॥
श्वेताश्वेतास गाठी पडता । मध्ये कृष्ण मिश्रित होता ।
इहलोक सार्थकता । होत आहे ॥४॥"

म्हणजे, पिवळ्या रंगाच्या हिरड्यापासून काजळ किंवा शाई होते आणि त्या शाईचा ग्रंथरूपाने सर्व जगभर विस्तार होतो. ग्रंथरूपाने शाई नसती तर मनुष्यास ज्ञान झाले नसते. शाई ही एक साधी वस्तु परंतु तीमध्ये सर्व ज्ञान एकत्रित झाले आहे. चांगल्या किंवा वाईट गुणांची वर्तने शाईनेच अमर केली आहेत. पृथ्वीच्या पोटातून सहज वर येणारा बोरू हा पुढे आला व मध्येच छेद पाऊन त्याची लेखणी झाली. लेखणी शाईच्या सहकार–समन्वयाने कारभार सुरू झाला. तो पांढरा कागद व बोरू या दोघांची गाठ पडून मध्ये काळी शाई उठू लागली व मनुष्याच्या इहलोकीचे लेखन, वाचन, हिशोबी अर्थबोधासह सर्व व्यवहार सुरळीत झाले. म्हणून व्यापकच व्यापक मनाच्या ग्रंथकाराने म्हणजेच

ब्राह्मणे बाळबोध अक्षर । घडसून करावे सुंदर ।
जे देखताच चतुर । समाधान पावती ॥१॥
वाटोळे, सरळे, मोकळे । ओतले मसीचे काळे ।
कुळकुळीत ओळी चालल्या ढाळे । मुक्तामाळा जैशा ॥२॥
अक्षर मात्र तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याही नीट । आर्कुली वेलांटया ॥३॥
पहिले अक्षर जे काढीले । ग्रंथ संपेतो पाहात गेले ।
एका टाकेचि लिहिले । ऐसे वाटे ॥४॥
अक्षराचे काळेपण । टाकाचे ठोसरपण ।
तैसेचि वळण वाकण । सारखेचि ॥५॥
ओळीस ओळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ।
खालचे ओळीस लागेना । अथवा लंबाक्षर ॥६॥
पान शिशाने रेखाटावे । त्यावरी नेमकेचि लिहावे ।
दूरी, जवळी न व्हावे । अंतर ओळीचे ॥७॥
कोठे शोधासी आडेना । चुकी प हुता सापडेना ।
गरज केली हे घडेना । लेखकापासोनी ॥८॥
भोवते स्थळ सोडोनी द्यावे । अन् मध्येच चमचमीत लिहावे ।
कागद झडताचि झडावे । न लगेचि अक्षर ॥ ९ ॥
ऐसा ग्रंथ जपोनि लिहावा । प्राणीमात्रास उपजे हेवा ।
ऐसा पुरुष तो पहावा । म्हणती लोक ॥ १० ॥ "

असे मार्गदर्शन आपल्या काळच्या ग्रंथकारांना समर्थांनी केले आहे. ज्यांना जमेल त्यांनी "नाना जिनसी टाकतोडणी । नाना प्रकारी रेखाटणी । चित्रविचित्र करणी । शिसे–लोळच्या ॥" उप–योगात आणण्याचाही सल्ला समर्थांनी दिला आहे. शेवटी "तगटी इतिश्च्या कराव्या । बंदरी फळ्या घोटाव्या । नाना चित्री चिता–राव्या । उंच चित्रें ॥" असे सांगून तयार झालेल्या ग्रंथाच्या जप–णुकीसाठी समर्थ सांगतात– "नाना गोफ नाना बासने । मेणकापडे सिंदुरवर्णे । पेट्या नि कुलुपे जपणे । पुस्तकाकारणे ॥"

समर्थांच्या काळी पाश्चिमात्य लोक पोटभरू म्हणून आले होते व येताना त्यांनी आपली संस्कृतीही बरोबर आणली होती. तरी त्यांची विज्ञान संशोधित मुद्रणकला समर्थांच्या काळी भारतात उतरली नव्हती. आता मुद्रणकलेच्या तारीख तागायत सुधारणाही टंक–लेखनादि अनुषंगिक साधनिकासह भारतात संचार करू लागलेल्या पाहून समर्थांनी सांगितलेली ग्रंथांची लेखन–क्रिया काही मंडळींना कालबाह्य वाटण्याचा संभव आहे. पण सूक्ष्म निरीक्षकाच्या हे लक्षात आल्याशिवाय राहणार नाही की अत्याधुनिक साधनिकांचा उपयोग करूनही ग्रंथाची मुद्रण प्रत तयार करणाऱ्या ग्रंथकाराने समर्थांनी सांगितलेली लेखन क्रिया अवलंबिली तर मुद्रा राक्षसांच्या चाळचांना पायबंदच बसेल. तेव्हा टंकलेखनासाठी वा मुद्रणासाठी आपली ग्रंथ–प्रत तयार करताना समर्थांनी निर्देशलेली लेखन क्रियाही ग्रंथकाराला आजही उपयुक्त आहे. ग्रंथ सांभाळण्यास समर्थांनी सांगितलेली साधने आता अगदीच कालबाह्य नसली तरी तोटकी आहेत व ती चिमुकल्या वैयक्तिक ग्रंथ संग्रहाला बेतानेच उपयोगी पडतील. ज्यावेळी पुस्तक बांधणीची कला येथे अज्ञात होती त्या समर्थांच्या काळखंडात ती सयुक्तीकच होती. पण बाधने; कुलूपे, पेट्या, कपाटे यांचाच विकास म्हणजे आजकालची विषयवार सूची करून नेमकेपणाने नेमके पुस्तक हात घालताच सापडावे अशी व्यवस्था, हे लक्षात आल्यावर ग्रंथ सांभाळून तो हवा तेव्हा मिळण्याची व्यवस्था समर्थांच्या डोळ्यासमोर होती हे प्रांजळपणे कबूल केले पाहिजे.

ग्रंथालय-शास्त्राचा आजचा प्रगल्भ विकास व विलास पाहिला म्हणजे माणसाची ज्ञानलालसा तृप्त होऊन "बहाणे करून सोडावे सकळजन।" एवढे व्यापक लोकशिक्षण सुसाध्यसे वाटते हे खरे; पण व्यापक लोकशिक्षणाची स्पष्ट कल्पना मनापुढे ठेवून वाचक, वाचन ग्रंथकार, ग्रंथलेखन, ग्रंथसंरक्षण व ग्रंथवितरणाने ज्ञानवृद्धी यांच्या व्यवहार्य साधनिका एका परमार्थमार्गीयाने साडेतीनशे वर्षापूर्वी सांगाव्या व अल्प प्रमाणात का होईना अमलात आणाव्या याबद्दल विचारवंतांचा माथा नम्र झाल्याविना रहात नाही. हरएक संप्रदायाच्या मठामठातून व मंदिरामंदिरातून सांप्रदायिक ग्रंथालये मुक्तद्वार निर्माण व्हावी व "बहाणे करावे सकळजन।" म्हणून ग्रंथसेवा घडावी तरच समर्थासारख्या लोकशिक्षक संताच्या आत्म्याला समाधान लाभेल व समाजाकडून त्यांची कृतज्ञ पूजा घडेल.

* * *


हार्दिक शुभेच्छा !

विश्वस्त निधी जनकल्याणासाठी

सर्व तऱ्हेचे ट्रस्टस्

महाराष्ट्रातील एकमेव संस्था

सार्वजनिक व कौटुंबिक यांच्या जंगम मिळकतीचे

ट्रस्टस् ट्रस्टी या नात्याने स्विकारते

२५ वर्षांपेक्षा जास्त वर्षे कार्य करणारी व

व्यवस्था पाहणारी संस्था.

दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अॅण्ड एक्झिक्यूटर कंपनी लि.,

स्थापना १९४६ | मुख्य कार्यालय विश्वस्त भवन, सातारा. | रा. ना. गोडबोले. अध्यक्ष.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. ची संलग्न संस्था.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पाच व्यावहारिक बचत योजना

आवर्तक ठेव योजना<br>रिकरींग डिपॉझीट

मासीक ठेव<br>जमा योजना

पुनर्गुंतवणूक ठेव योजना<br>एम्. एम्. डी. सी.

निश्चित मुदतीच्या ठेवी<br>फिकस्ड डिपॉझीट

घरगुती बचत खाते<br>होम सेव्हिंग्ज खाते

वरील योजनासह आपल्या सेवेस सज्ज

सेंट्रल बँक ऑफ इंडिया

१४८, सदाशिव पेठ, सातारा शाखा

जागोजागी जनतेकडे जाणारी बँक

# काल व उद्या

—विश्वास दांडेकर.

माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला आपण जास्त महत्व देतो. संस्थाच्या बाबतीत हेच म्हणता येईल. पण एका मर्यादेनंतर हे फारसे खरे रहात नाही. कार्य करत नसलेली संस्था फार दिवस टिकणे कठीण. त्यातून आमचा स्वाभाविक कल जोडण्यापेक्षा मोडण्याकडे जास्त. सर्व ग्रंथप्रेमिकांना अभिमानाचीच नव्हे तर अंतर्मुख करणारी, विचाराला उद्युक्त करणारी, नगरवाचनालयाचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव ही घटना.

पुस्तकाच्या जगात जगणाऱ्याला जुन्या पुस्तकांचे अतीव आकर्षण असते. कालचक्रात मागे डोकावून पहाण्याची संधी जुने ग्रंथ देतात. मुंबईच्या रॉयल एशियाटिक ग्रंथालयातील जुन्या पुस्तकांची, हस्तलिखितांची हेळसांड हा कायम बातमीचा विषय. नगरवाचनालयात काही जुन्या ग्रंथांची मागणी केली असता 'नाहीत', 'गहाळ', 'नाशात काढले' अशा बातम्या होत्याच. त्यामुळे १२५ व्या जन्मदिना निमित्ताने इ. स. १९०० च्या अगोदरचे ग्रंथराज संग्रहात किती आहेत, कसे व कोणते आहेत असा विचार करताना फार आशा नव्हती. चौकशी करताच एक स्वतंत्र सूची मला देण्यात आली. चाळून पाहता ओळखीचे, अनोळखीचे असे चेहरे त्यांत दिसले.

त्या काळात इंग्रजी ग्रंथ जास्त संख्येत विक्रीला असल्यामुळे साहजिकच इंग्रजी पुस्तकांचा भरणा जास्त आहे. इतिहास व चरित्र आत्मचरित्र हा भाग त्यात मोठा, राज्य इंग्रजांचे तेव्हा ब्रिटिश इतिहास युरोप या विषयाची पुस्तके विपुल आहेत. पण 'जिप्सीज् ऑफ इंडिया सारखे मानववंश शास्त्राचे पुस्तक सुखद धक्का देणारे. इजिप्त, अॅबिसीनिया, चीन, इराण, अरेबिया, स्पेन, नेदरलॅन्ड, पोर्तुगाल, माओरी, (आफ्रिका) रशिया या देशांचे इतिहास १८४० ते १८६० या कालखंडात प्रसिद्ध झालेले येथे आहेत. ए लेडीज डायरी ऑफ दी एज ऑफ लखनौ हे १८५८ साली प्रकाशित झालेले पुस्तक आज फार मनोरंजक वाटेल. आजचा इटली आपल्यासमोर आहे. पण १८३२ चे 'हिस्टरी ऑफ दी इटालियन रीपब्लीक्स' हे पुस्तक निराळ्या युगाची कहाणी सांगणारे आहे. आर्चीबाल्ड ॲलिसनचे 'हिस्टरी ऑफ युरोप' हे २० खंडात असलेले पुस्तक (१८४८) व रॉलिनचे ६ खंडात इजिप्तचा इतिहास सांगणारे पुस्तक (१८५०) इंग्रजांच्या इतिहास प्रेमाची साक्ष देणारी आहेत विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरचे (१८९६) श्री. रमेशचंद्र दत्तांचे एनशंट इंडिया २००० बी. सी., ८०० ए. डी. हे पुस्तक श्री. दत्त इतिहासाच्या साधनांच्या शोधात सातारला आले होते या घटनेची आठवण करून देईल. मराठी राज्य संपवणारा म्हणून आपल्याला माऊंट स्टूअर्ट एलफिस्टन माहित आहे. त्याचे 'अॅन अकाऊंट ऑफ किंगड्म ऑफ काबूल' हे दोन खंडातले (१८९९) ग्रंथ येथे आहेत. या इतिहास ग्रंथामध्ये एड्वर्ड गिबन चे 'डिक्लाइन अॅण्ड फॉल ऑफ दी रोमन एंपायर' नाही याचे आश्चर्य वाटते. गिबन कदाचित नाशात निघाला असावा.

जॉर्ज रॉलिन्सनचे ४ खंडात्मक 'फाईव्ह ग्रेट मोनारकीज ऑफ दी एनशंट वर्ल्ड' (१८६२) व एडवर्ड क्रिसीचे फिफ्टीन डिसीसीव्ह बॅट्ल्स ऑफ दी वर्ल्ड (१८७२) ही पुस्तके आजही आपल्या ज्ञानात भर टाकतील.

भारतात बँकिंग व्यवसाय मूळ धरत होता त्या वेळचे हाऊ टू डील वुईथ युवर बॅकर्स (१९००) हे कदाचित आजही उपयोगी पडेल. दक्षिण आफ्रिकेची आर्थिक नाकेबंदी करा वगैरे आज आपण ऐकतो. शत्रूराष्ट्राची रसद तोडणे या स्वरूपात आपल्याला हा खेळ नवा नाही. याचे परिणाम फक्त सैन्यावर होत नाहीत, ते सामान्य नागरिकाला भोगावे लागतात. 'ब्लॉकेड अॅन्ड दी सीव्हिलियन पॉप्युलेशन' आपल्याला कहाणी सांगते. 'लॅन्ड नॅशनलायझेशन, इटस् नेसेसिटी अॅन्ड इटस् अेमस्' हे अल्फ्रेड रसेल वॅलेस यांचे १८९६ सालचे पुस्तक. रशिया तेव्हा झारच्याच अंमलाखाली होता.

चरित्र आत्मचरित्र विभागात ड्यूक् ऑफ वेलींग्टन, हेन्री हॅवलॉक लॉर्ड वेलस्ली, विल्यम पिट अशी ओळखीची नावे आढळतात.

क्रिकेटवरचे १८६५ सालचे, पत्यावरचे १८६५ सालचे व बुद्धीबळावरचे १८४९ चे ग्रंथ इंग्रजांचे क्रीडाप्रेम सांगणारे आहेत.

रस्तेबांधणी (१८५०), औषधोपचार (१८६७), हिरे व मूल्यवान खडे (१८६०), रेल्वे प्राथमिक (१८५०), जहाज बांधणी व नौकानयन (१८५०), सिमेंट (१८५०), वजने उचलणाऱ्या यान्त्रा (१८४९), सांडपाण्याची व्यवस्था (१८५०), कमानीदार व लोखंडी पूल (१८४९), गणिती उपकरणे (१८४९), समुद्रापासून जमिनीची धूप व प्रतिकार (१८५२), तोफा व बंदूका (१८५४), शास्त्रीय व आर्थिक पहाणोसाठी प्रवास (१८५५) ही व अशी अनेक पुस्तके आपल्या मध्ययुगाचा अंत घडवण्यास उपकारक ठरली आहेत. इंग्रजीत पण नवीन शास्त्र आपणास १२५ वर्षांपूर्वीपासून शिकवणारी आहेत. आज आपण ज्या प्रगतीच्या टप्प्यावर आहोत त्याचा पाया या व अशा पुस्तकांनी घातला आहे.

विल्यम शेक्सपीयर, बायरन, ब्राऊनिंग, मिल्टन, होमर, स्कॉट वगैरे महाकवी आहेतच. १८१९ सालचे जेम्स फर्ग्युसन चे ब्रिटिश अॅसिस्ट हे ४३ खंडात असलेले तर १८६४ सालचे दी जेस्ट बुक हे विनोदावरील व थ्री सेन्चूरीज ऑफ इंग्लिश लिटरेचर इत्यादी इंग्रजी भाषेची संपदा सांगणारी पुस्तके आहेत.

मराठी भाषेतील 'गुन्हा व त्याची कारणे' (१८९७) व पाश्चात्य देशातील ग्रामसंस्था (१९२३) ही समाजशास्त्राला उपयोगी असणारी आहेत त्या काळातल्या मराठीची चुणुक 'आल्फ्रिद धि ग्रेत ह्याचे चरित्र (१८८२) बोनापार्त दयूक आफ वेलिंग्तन (१८७८) या नावावरून मिळते. शास्त्र विभागात बीजगणितावरील एक पुस्तक १८४८ सालचे आहे. लेखक जॉर्ज जॉविस. भूगोलशास्त्र, गणित

(१८३६) लेखक बाळशास्त्री जांभेकर (दर्पण कर्ते) श्री. भाऊकेश व गांगनाईक यांनी १८९२ साली घर व त्या भोवतालची बाग व पाश्चिमात्य पाकशास्त्र ही होम सायन्सवरील पुस्तके लिहिली आहेत. नाटक महाराष्ट्राचा प्राण. पण संग्रहात फारशी नाटके नाहीत. तरी १८५९ सालचे 'प्रसन्नराघव' नाटक व १८६८ चे गोपीचंद राजाचे नाटक उल्लेखनीय.

शालोपयोगी पुस्तकांत १८४० चे गणित, वाचण्याकरिता मराठी (१८४८) वगैरे. पण पद्य विभागात जवळजवळ संपूर्ण मोरोपंत आहेत. परशुरामपंत गोडबोल्याचे 'नवनीत', त्यांचेच मराठ्यांच्या इतिहासावर सोपी कविता (१८६४) काव्य रत्नावली अंक १ ते १२ गंमत म्हणजे 'अकबर बादशहा' अशी मराठी कविता.

मराठी इतिहासात राजवाडे नाहीत. गुजराथ देशाचा इतिहास मराठीत आहे. लेखक आर्चिबाल्ड मॅक्डीनाल्ड. १८३५ सालचे इजिप्तच्या इतिहासावरील पुस्तक आहे. १८४४ सालची बाबाजींची बखर आहे. १८५१ चा रोम बादशहाचा वृत्तांत आहे. श्री. सी. रा. गायकवाड यांचा आशीरिया हा ग्रंथ शिक्षण पारंपारीक मिरासदारी फोडून बाहेर येत असल्याची चाहूल देणारा आहे. १८६४ सालचा नवा करार व १८९१ सालचा जुना करार दोन्ही पवित्र शास्त्र प्रसारक मंडळ मुंबई यांची प्रकाशने धर्मप्रसारकांच्या प्रयत्नांची ओझरती जाणीव करून देतात. श्री. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या विधवा विवाह पुस्तकाची मराठी आवृत्ती १८६५ सालची आहे. १८४८ सालचे मेजर क्यांडीसाहेब यांचे नीतीज्ञानाची परिभाषा आहे. संस्कृत विभागात उल्लेख करावा असा ग्रंथ या संग्रहात नाही.

मराठी भाषाशास्त्र १३, भूगोल ४, धार्मिक १७, मराठी इतिहास २७, पद्य ४९, शालोपयोगी २६, नाटके २१, शास्त्र १९, चरित्र १८ राजनिती इ. १०, संस्कृत ३२ असे एकूण २३५ ग्रंथ.

इंग्रजीत इतिहास २९२, अर्थशास्त्र राजनीती ३६, चरित्र- आत्म- चरित्र ८२, शास्त्र ४३, काव्य ५२, निबंध इ. २२५ असे ७२५ ग्रंथ आहेत. मराठी, इंग्रजी व संस्कृत मिळून १९०० च्या अगोदरचे ९६० ग्रंथ होतात.

ही संपत्ती दुर्मिळ आहे. आपल्या कोमल भावनांप्रमाणे ती जपावी लागेल. इ. स. १९०० नंतर प्रसिद्ध झालेली पण दुर्मिळ असलेली पुस्तके निवडून ती वरील संग्रहात घालावी. सतत जागरूक राहून कुठले पुस्तक दुर्मिळ होत आहे ते लक्ष ठेवून पहात रहायला हवे. असे जुने नवे दुर्मिळ ग्रंथ निराळया विभागात ठेवून ते वाचनालयाच्या जागेबाहेर देऊ नयेत. वाचकांची अशा दुर्मिळ ग्रंथवाचनाची सोय वाचनालयातच करावी.

नव्या जुन्या सर्वच पुस्तकांची निगा राखणे हे स्वतंत्र प्रकरण हे शास्त्र आहे व ते आपण माहित करून घ्यायला हवे. बाईंडींग वेळच्यावेळी करणे, धूळ साचू न देणे, जंतूनाशके वापरणे, पुस्तकांना आपल्यासारखाच प्राणवायू लागतो म्हणून रोज काही वेळ कपाटे उघडी ठेवणे हे नित्याचे प्रयोग. साताऱ्याचे हवामान, नेहमीचा पाऊस व वाळवीचे पीक यावर शास्त्रीय उपाय त्यातील तत्वांच्या मार्ग- दर्शनाखाली ग्रंथ टिकविण्यासाठी केला म्हणजे दुर्मिळ पुस्तके नाशात काढण्याचे प्रमाण शून्यावर आणता येईल.

नगरवाचनालयाचा आजचा प्रमुख वाचकवर्ग कथा कादंबऱ्यांचा आहे. रंजनाची गरज समाजाला नेहमीच भासते व ती पुरवावी या बद्दल दुमत होण्याचे कारण नाही. पण ती डोळसपणे पुरवावी लागते. कथा, कादंबऱ्या, काव्य, साहित्यसमीक्षा, इतिहास, तत्वज्ञान इ. अनेक विभागात अशी बरीच पुस्तके आहेत जी कपाटातून हलत नाहीत. निरनिराळया विषयांचे वाचक हेरून त्यांना पुस्तके सुचवत रहाणे हे उत्तम ग्रंथपाल व ग्रंथविक्रेत्याचे प्रमुख लक्षण आपण समजतो. या दृष्टीकोनातून आपल्याला मजल मारायची आहे.

यासाठी काही पाऊले आपल्याला लगेच उचलता येतील. सध्या ग्रंथालयाची 'सूची' कुठल्याही शास्त्रीय पद्धतीवर नाही. ती नवीन करून इन्डेक्स कार्ड पद्धतीवर आणावी लागेल. आपल्याकडे ज्यांचे ग्रंथ आहेत अशा लेखकांच्या जन्मतारखा मिळवून त्यांच्या वाढदिवशी त्यांची पुस्तके सर्वांच्या नजरेस आणता येतील व आपल्या संग्रही नसलेली त्यांची पुस्तके लक्षात येतील. छत्रपती शिवाजी विश्व- विद्यालयाची ग्रंथालय शाखा साताऱ्याला आहे व ती समृद्ध आहे. त्याचा फायदा आपल्या वाचकांना मिळवता येईल. खरे म्हणजे सातारा नगरवाचनालय व विश्वविद्यालय ग्रंथशाखा यांचा ग्रंथसंग्रह हा परस्पर पूरक करण्यासाठी पाऊले उचलली तर आज पैशाअभावी जाणवणाऱ्या अडचणी कमी होतील.

हे सर्व प्रयोजन आपल्या वाचकांसाठी आहे. ते ग्रथालय चळ- वळीचे केंद्र, वाचकवर्गाचे सहकार्य सर्वच संस्थांना वाढत्या प्रमाणात अपेक्षित असते. वाचनालय तर रोज आपल्या सदस्यांच्या संपर्कात असते. वाचकांपासून अपेक्षा म्हणजे पुस्तके खूप व विविध विषयांवरती वाचावी, नीट हाताळावी, नवनवीन पुस्तके सुचवावी, आपल्या मित्र मंडळातून वाचकांची संख्या वाढवावी पण प्रमुख म्हणजे ग्रंथ हे उमलत्या कळीप्रमाणे जपावे. वाचकांच्याही अपेक्षा आहेतच. नवीन खरेदी केलेली पुस्तके लवकर वाचण्यास मिळावी, गंभीर विषयांवरील पुस्तके कपाटातून निवडता यावी, पुस्तके सुचविण्यासाठी एक सूचना पुस्तक कायम असावे इ.

१२५ व्या वाढदिवसानिमित्ताने एका उपक्रमाचा विचार व्हावा. महत्वाच्या विषयांवरील आपल्या संग्रहातील एक एक प्रमुख पुस्तक निवडून त्याचे सार २/३ पानात लिहून घ्यावे. त्याच्या शेवटी त्या विषयांवरील आपल्या संग्रही असलेल्या इतर पुस्तकांची यादी द्यावी काही वाचक, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यातून सहकार्य मिळवून हे जमण्यासारखे आहे.

सातारा नगरवाचनालय हे या भागातील ग्रंथालय चळवळीचे केंद्र. महाराष्ट्र सरकार खेडोपाडी ग्रंथ व नियतकालिकांचा प्रसार व्हावा म्हणून एक योजना राबवते. त्यात रु. ७५ मानधन देण्याचीही व्यवस्था आहे. या योजनेचा प्रसार व लाभ आपल्या भागात वाढत्या प्रमाणात व्हावा म्हणून आपण प्रयत्न करायला हवे. जुने व प्रमुख ग्रंथालय या नात्याने बदलत्या काळात ते आपले कर्तव्य आहे.

साताऱ्यासारख्या लहान शहरामध्ये गावातल्या संस्थांविषयी एक जिव्हाळा असतो. लहान गावातून सहसा न आढळणारे नवीन प्रवाह जाणीवपूर्वक वळवून या जिव्हाळयाचा संगम केला तर सातारा भागातील सांस्कृतीक चळवळीचे केन्द्र हे स्थान आपल्याला कायम ठेवता येईल. यातूनच सुसंस्कृत, सुजाण व प्रबुद्ध नागरीक तयार होतील. ही काळाची गरज आहेच व ग्रंथालय चळवळीचा तो उद्देशही आहे.

'साप्ताहिक महाराष्ट्रमित्र' सातारा यांच्या सौजन्याने

# साताऱ्याची वृत्तपत्रसृष्टी

**संजय कोल्हटकर,**
संपादक, साप्ताहिक ' महाराष्ट्रमित्र '.

१७५७ साली प्लासीची लढाई झाली. त्याचबरोबर इंग्रजी सत्ता इंग्रजी शिक्षण व इंग्रजी संस्कृती भारतीय जनमानसात शिरकाव करू लागली. ब्रिटीशांनी ज्या अनेक बऱ्यावाईट गोष्टी भारतात आणल्या त्यातली आजतागायत टिकून राहिलेली व अनंत काळपर्यंत टिकून राहणारी गोष्ट अगर समाजात ज्याचा नवनिर्मितीसाठी शिक्षणाचे साधन म्हणून जे महत्वपूर्ण साधन भारतीयांचे हाती गवसले ते म्हणजे वृत्तपत्र होय.

१७८० साली हिकीज बेंगॉल गॅझेटने भारतीय वृत्तपत्र सृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. आणि उण्यापुऱ्या ८० वर्षांच्या कालावधीत वृत्तपत्र या साधनाचे महत्व व उपयोगीता सर्वदूर पसरली. अर्थातच त्या काळी मराठी राज्याची राजधानी असलेल्या सातारा शहरास अपवाद ठरणे शक्यच नव्हते. म्हणुनच १८५८ साली सातारा शहरात पहिले वृत्तपत्र प्रकाशित झाले. ' शुभसूचक ' या नावाने. शुभसूचकचे संपादक होते रामचंद्र आप्पाजी चितळे.

कोणास कदाचित ही गोष्ट अचंब्याची वाटण्याची शक्यता आहे. की शिक्षणाचा अत्यल्प प्रसार असलेल्या सातारा शहरात त्या काळात वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली जाण्यामागे कारण काय असावे ?

१८५७ ला जरी इंग्रजी सत्तेचा अंमल भारतात निर्माण झाला असला तरी या राज्यबदलाने दुखावल्या गेलेल्या राज्यभक्तांची संख्या मराठ्यांच्या राजधानीत भरपूर होती. कोकणातून देशावर उतरण्याचे जे ३ प्रमुख मार्ग त्यातील महाबळेश्वरमार्गे सातारा हा एक महत्वाचा मार्ग होता. त्यामुळे कोकणातील विद्वत्ता प्रारंभी साताऱ्यात स्थिरावत होती. त्यामुळे इंग्रजी अंमलाच्या प्रारंभी सातारा हे राजकीय जागृतीचे प्रमुख केन्द्र होते. त्याची चाहूल वृत्तपत्राच्या माध्यमातून न लागती तरच नवल.

या जाणीवेतूनच १० डिसेंबर १८५८ ला शुभसूचकच्या निमित्ताने सुरवात झाली. आणि त्या काळात शुभसूचक हे सातारा, सांगली या भागातून निघणारे पहिले वृत्तपत्र ठरले.

पाठोपाठ कै. गणेश नारायण कोल्हटकर यांनी १८६७ च्या दसऱ्यास 'महाराष्ट्रमित्र' हे साप्ताहिक साताऱ्यातूनच सुरू केले. कोल्हटकरी लेखणीचा हा प्रारंभिक नमुना होता. उपलब्ध असलेल्या अंकातून महाराष्ट्रमित्राचे स्वरूप पाहिल्यास उपरोध, उघड विरोध व कुचेष्टा हे तीनही वृत्तपत्रीय अलंकार संपादकांनी अगदी सहजपणे वापरले होते. कोल्हापूरचे बर्वे प्रकरणात महाराष्ट्रमित्रास माफी मागावी लागली व ती माफी देखील नवा खटला भरण्यास योग्य होती असा अभिप्राय प्रा. य. दि. फडके यांनी ' शोध बाळगोपाळांचा ' या पुस्तकात दिला आहे. रँड खुनाच्या तपासात उघडपणे विक्षेप या वृत्तपत्राने केलेला दिसतो. दुर्दैवाने १८९७ चे प्लेगमध्ये कोल्हटकर घराण्यातील सर्व कर्ते कोल्हटकर भक्षस्थानी पडल्याने हे वृत्तपत्र बंद पडले.

या नंतर तत्कालीन नेत्यांनी आपल्या मतप्रचारार्थ वृत्तपत्रे काढली. त्यात कशाळकर मुंडल्यांचा प्रतोद, फणसळकरांचा प्रेक्षक व भाऊसाहेब सोमण यांचा प्रकाश यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. पाठोपाठ असहकार चळवळीत विनायक शंकर वैद्य यांनी 'समर्थ' साप्ताहिक चालू केले. आणि प्रागतिक पक्षाच्या प्रचारार्थ वाग्भट देशपांडे यांनी ऐक्य हे साप्ताहिक चालू केले.

या खेरीज बोधसुधाकर, श्री शाहू, प्रेक्षक, प्रतोद, हंस ही काही उल्लेखनीय वृत्तपत्रे साताऱ्यात निघत होती. अर्थात या सर्वांना वृत्तपत्रे (news paper) म्हणण्याऐवजी मतपत्रे अगर (Views Paper) म्हणणे अधिक योग्य ठरेल.

याखेरीज वाई येथून मोदवृत्त, वृत्तसार, कऱ्हाडहून विदुषक, चित्रगुप्त, सुमंत व कैवारी ही पत्रे निघत. सातारा जिल्ह्याच्या वृत्तपत्रसृष्टीचा हा त्रोटक इतिहास आहे.

आज घडीला सातारा येथून दैनिक ऐक्य, ग्रामोद्धार ही दैनिके प्रकाशित होतात. ज्यात दैनिक ऐक्याने सातारा जिल्ह्याचे मुखपत्र हे स्थान प्राप्त केले आहे.

साप्ताहिकात समर्थ हे नेमस्त व विकासवादी साप्ताहिक, जिव्हाळा हे साप्ताहिक, महाराष्ट्रमित्र हे आक्रमक साप्ताहिक अशी तीन साप्ताहिके प्रकाशित होतात.

याखेरीज फलटण येथून संक्रमण, जनसेवा, हितगुज, आक्रोश ही साप्ताहिके, कऱ्हाड येथून कराड टाईम्स व प्रीतीसंगम ही पाक्षिके प्रकाशित होतात.

जिल्हापत्र म्हणून या वृत्तपत्रांचा विचार करता 'समर्थ' चा अपवाद सोडता सर्वच वृत्तपत्रांचा भर राजकारणावर अधिक असतो. या बरोबरीने जिल्हापत्रे विकत घेऊन वाचण्याची सवय नसल्याने जाहिरातदारांच्या तालावर नाचणारी वृत्तपत्रे असेच येथील वृत्तपत्र सृष्टीचे बहुतांश स्वरूप आहे.

वृत्तपत्र सृष्टीला जी माननीय व्यक्तीमत्वे साताऱ्याने दिली त्यात संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर, कै. ह. रा. महाजनी, सुधारकचे संपादक कै. सि. ग. देवधर, केसरीचे न. चिं. केळकर, स. वि. बापट कृ. पां. सामक, महाराष्ट्र टाईम्सचे वा. य. गाडगीळ यांचा प्राधान्याने उल्लेख केला पाहिजे.

आजच्या वृत्तपत्रसृष्टीच्या भरधाव वेगाशी सांधा जुळविणे साताऱ्च्या वृत्तपत्र विश्वाला अवघड जात असले तरी जनसंवादाच्या (mass commanication) to entertain, to educate and to inform म्हणजे ज्ञानसंवर्धन, करमणूक व माहिती या त्रीसूत्रीशी सातारची वृत्तपत्रसृष्टी इमान राखून आहे.

# सिद्धार्थाचं अर्थपूर्ण जीवन जगणारा :

# कृष्णाकाठचा नटसम्राट

— जयवंत गुजर

कृष्णाकाठच्या सुपीक मातीमध्ये समृद्धी भरलेली आहे. यामध्ये विचार, संस्कृति व कलात्मता याचाहि समावेश आहे, म्हणूनच सातारा जिल्ह्यातील कृष्णा काठच्या विचारवंतांची नामावळी प्रदीर्घ होईल, यात शंका नाही. नाट्य क्षेत्राचा विचार करताना नाट्यकलावंत व नाटककार म्हणून चिंतामणराव कोल्हटकर ते बाळ कोल्हटकर या नामावलीमध्ये वाईच्या वि ग. तथा बाबूराव देशपांडे यांचा नामनिर्देश करावाच लागेल. गरिबांचा कळवळा असलेला व गरिबांच्या हितासाठी केवळ चोऱ्याच नव्हे तर दरोडे घालणारे अनेक गब्बारसिंग आज हिंदी चित्रपटात सर्रास पहावयास मिळतात. तथापि या साऱ्या नायकांचा पिता म्हणून रॉबीनहूड ओळखला जात असला तरी त्याचा पितामह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उमाची नाईका या प्रभावी व्यक्तीवर एक तडाखेबंद नाटक बाबूराव देशपांड्यांनी लिहिलें. १९३३ च्या सुमारास हे नाटक मराठी रंगभूमीवर आले, खूप गाजले आणि त्यामुळे नूतन महाराष्ट्र मंडळीचे दैन्य दारिद्र्य संपले. या एकाच नाटकाने उभा महाराष्ट्र गाजला होता.

बालगंधर्व, केशवराव दाते, नानासाहेब फाटक, चिंतामणराव कोल्हटकर, माधवराव टिपणीस आदि नाट्यश्रेष्ठी विषयींच्या अनेकविध रसाळ आठवणी ते खुलवून सांगतात. नाट्यसृष्टीचा तो धगधगता इतिहास पहाणारा प्रसन्न चेहऱ्याचा नाटककार मराठी माणसाने नीटसा समजून घेतला नाही. बालगंधर्वांच्या अखेरच्या निराशपर्वात बाबूराव केवळ एकच प्यालामधील सुधाकराची भूमिका वठवीत होते असे नाही. त्या काळामध्ये गंधर्व कंपनीचे व्यवस्थापकही होते १९३० नंतरचा काळ मराठी नाटकाच्या इतिहासामध्ये आणीबाणीचा ओळखला जातो. महाराष्ट्र नाटक मंडळीत फाटाफूट होऊन त्यातील काही मंडळींनी नूतन महाराष्ट्र मंडळी म्हणून संस्था काढली व सातारा जिल्ह्यातील एक नामवंत नाटककार शां. गो. गुप्ते लिखित संधीसंग्राम हे पौराणिक नाटक रंगभूमीवर आणले. त्यामध्ये दुर्योधनाचे काम माधवराव टिपणीस करीत व बाबूराव देशपांडे श्रीकृष्णाच्या भुमिकेत रंग भरीत. नंतर गौतमबुद्धाच्या पूर्व चरित्रावर श्री. बाबूराव देशपांडे लिखित त्यागसम्राट हे नाटक नूतन महाराष्ट्राने रंगभूमीवर आणले. रंगभूमीच्या रागरंगावर या नाटकाच्या संदर्भात लिहिताना मौज साप्ताहिकाने आपल्या एका अंकात म्हटले होते— गौतमबुद्ध सिद्ध पुरुष होण्यापूर्वी तो कुमार सिद्धार्थ म्हणून ओळखला जात होता त्या वेळच्या काळाचे कथानक या नाटकामध्ये घेण्यात आले आहे. आपल्या अतुलनीय त्यागाने व अहिंसा परमोधर्म या परमोच्च तत्वाने आपले नांव जगाच्या इतिहासामध्ये अजरामर करणारा बुद्ध तशा तऱ्हेचा लोकोत्तर पुरुष का बनला याचे रहस्य या नाटकामध्ये उत्तम तऱ्हेने विशद केले आहे. नरमेधाचा निषेध करून त्याच्या प्रतिकारासाठी स्वतःचे सर्वस्व अर्पण करणाऱ्या व अहिंसा व्रताचे एकनिष्ठपणे आचरण करणाऱ्या विश्वामित्र नांवाच्या ऋषि पुरुषाच्या तालमीत बुद्ध तयार झाला होता. त्याची शिकवण त्याने आपल्या पुढील आचरणात आणून अहिंसा धर्माचा पुरस्कार करणाऱ्या बुद्धधर्माची प्राणप्रतिष्ठा केली असेच पर्यायाने या नाटकामध्ये लेखकाने सूचित केले आहे. हिंसा व अहिंसा यांच्यामधील द्वंद्वाचे विवरण लेखकाने नाटकामध्ये कुशलतेने केले आहे. तसेच कथानकाची गुंफण व प्रसंगाची मांडणी त्याने इतक्या सुंदररितीने केली आहे की प्रत्येक प्रवेशागणिक नाटकामध्ये जास्त रंग भरत जातो व प्रेक्षकांची उत्कंठा समुद्राला येणाऱ्या भरतीप्रमाणे वाढत जाते.

त्यागसम्राट या नाटकामध्ये सिद्धार्थाची भूमिका वठवीत असताना जसा वेळ मिळत जाई तसतसे उमाजी नाईक हे नाटक बाबूराव लिहित असत. चेहऱ्यावर सिद्धार्थाचा भाव आणि त्याचवेळी लेखणीमधून मात्र उमाजी नाईकाची भावपूर्ण व्यक्तीरेखा रंगविणारा हा कलावंत वैशिष्टयपूर्ण म्हणून ओळखावा लागेल. नाटकातील काम करीत करीत, कंपनीच्या भ्रमंतीमध्ये केवळ एकवीस दिवसामध्ये त्यानी उमाजी नाईक हातावेगळे केले, विविध नाटके पहायची, नाटकात काम करायचे व नाटकं लिहिणे एवढाच वेदान्त घेऊन जन्माला आलेल्या या त्याग सम्राट (!) बाबूराव देशपांडे यांचे जीवन हे देखील एक नाटक होते. ऐन तारूण्यात अर्थपूर्ण नाटकं लिहिणारा हा नाटककार आज अर्थहीन परिस्थितीत रूणाईत आहे. शरीरानं थकला असला तरी मनाची उभारी मात्र भक्कम आहे. पंचेचाळीस वर्षापूर्वी त्याग सम्राटमध्ये सिद्धार्थ म्हणून वावरणाऱ्या या अभिजात कलावंताला आजही नटसम्राट नाटकात नटसम्राटची भूमिका करावयाची जिद्द आहे. वाईत प्रतिक थिएटर्सच्या सहकार्याने तशी जुळवाजुळवही केली होती पण काही जमलं नाही.

आज मराठी रंगभूमीवर अनेकविध ऐतिहासिक नाटक गाजत आहेत. तथापि चाळीस पंचेचाळीस वर्षापूर्वी उमाजी नाईक हे नाटक मराठी रंगभूमीवर विलक्षण गाजले. ऐतिहासिक घटनावर कल्पनेची लेणी चढविण्यात आजचे नाटककार कितीही तरबेज असले तरी उमाजी नाईकाची सर कुठल्याही नाटकाला येणार नाही. मराठी रंगभूमीवर जेंव्हा अगबाई नाटकांचा धुमाकूळ चालला होता तेंव्हा अंधारात विजेची मशाल हाताला लागावी तसे उमाजी नाईकाचे दर्शन झाले. त्या नाटकाची तब्येत उमाजी नाईकासारखीच भक्कम व चिरेबंद होती. संवाद प्रभावी होते व प्रसंग नाट्यपूर्ण होते. शृंगार वीर, करूण, हास्य या विविध रसानी न्हालेली ही कलाकृति जबरदस्त होती. मराठी रंगभूमीवरील एकमेव अस्सल मराठमोळा ऐतिहासिक नाटक म्हणूनच उमाजी नाईक आजही ओळखले जाते.

गेल्या वर्षी सरकारी नाट्य संस्थेने उमाजी नाईक सादर केला होता. चाळीस पंचेचाळीस वर्षापूर्वीचे हे नाटक आजहि

तेवढेच टवटवीत वाटतै. अजूनही जनमनाची चांगली पकड घेते. याच उमाजी नाईकमध्ये एक वाक्य आहे. उमाजी पारतंत्र्यात जन्माला आला म्हणून बंडखोर बनला. रणधुमाळीची पुर्व जन्मीची अतृप्त इच्छा पूर्ण व्हावी म्हणून तो जन्माला आला. माशा मारीत स्वस्थ बसण्यासाठी, निर्जीव अप्रिय नोकरी करुन आयुष्य कंठण्याकरिता उमाजी जन्माला आला नाही, त्याग सम्राट व उमाजी नाईक यासारखी देखणी नाटके लिहिणारा हा महान नाटककार आपल्या जीवनाच्या तिसऱ्या अंकामध्ये एस. टी. मध्ये कारकूनी करीत होता, हा नियतीने उगवलेला सूडच म्हणावयाचा कां ? इटालीचा महान सेनापति गॅरीबाल्डीच्या पराभवानंतर त्याच्यावर मेणबत्त्या करून विकण्याची पाळी आली होती. महान तमासगीर मन्याला अखेरीस पानपट्टीचे दुकान काढून ग्राहकांची तोंडे लाल करावयाची पाळी आली होती. रंगदेवतेचा निरोप घेऊन परतीच्या वाटेवर वाईला येऊन नाटकाच्या आठवणीवर जगणारा मराठी रंगभूमीवरील हा वटवृक्ष शरीरानं थकला असला तरी अजून मनाची उभारी मात्र भक्कम आहे. मराठी माणसाला मात्र या महान कलावंताची ओळख नाही. शासनाकडून या माणसाचा गौरव झाला नाही. आयुष्यभर रंगदेवतेची पूजा बांधणारा हा एक भाग्यवान कलावंत व महान नाटककार आयुष्याच्या संध्याकाळी काहीसं उपेक्षित म्हणून जगत आहे. आज बाबूराव देशपांडे मुंबईला रुग्णाईत म्हणून अंथरूणावर खिळून आहेत. तथापि त्यांच्या हाडांमाशी अजूनहि तो उमाजी नाईक आहे. मराठी रंगभूमीवरील हा रॉबिनहूड उमाजीच्या रूपाने एकच इच्छा बाळगून आहे. नटसम्राट नाटकात तीच एक भूमिका करायची, जी आयुष्यभर एकनिष्ठेने वठविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला उमाजी नाईकांची नव्हे तर बाबूराव देशपांडे यांची कुलदैवताही मल्हारी म्हाळसा आहे तिनं आपल्या या लाडक्या सिद्धार्थाला एवढी ताकद द्यावी, आम्हाला आता त्यांचं कै. मॅकिंटॉशचं काम पहायला मिळणार नाही तरी पण त्यांचा नटसम्राट पहायला मिळावा. कृष्णाकाठच्या या महान नाटककाराला दीर्घायुष्य लाभावं हीच इच्छा.

☆ ☆ ☆



# नगर वाचनालय सातारा

## इमारतनिधीचे देणगीदार

| | नांव | रु. |
|---|---|---|
| १) | रोटरी क्लब सातारा | ५०००० |
| २) | श्री. गोपाळ मारुती पालेकर सातारा | २००१ |
| ३) | मराठी साहित्य संमेलन अधिवेशन ४४ वे सातारा | ११०० |
| ४) | कै. रामकृष्ण सा. पवार यांचे स्मरणार्थ | १००१ |
| ५) | श्री. मनोहर गंगाधर भागवत सातारा<br>कै. गंगाधरपंत भागवत यांचे स्मरणार्थ | १००१ |
| ६) | युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा | १००० |
| ७) | श्रीमती प्रमिलाबाई गाडगीळ | १००० |
| ८) | श्री. गौरीशंकर बासुदेव मुतालीक | १००० |
| ९) | लायन्स क्लब सातारा | १००१ |
| १०) | मे. व्ही एन. चिपळूणकर सातारा | १००० |
| ११) | श्री. विसुभाऊ करंदीकर | १००१ |
| १२) | श्री. शामण्णा शानभाग सातारा | १००१ |
| १३) | श्री. पो. जी. भागवत मुंबई | १००१ |
| १४) | श्री. चंद्रकांत देवी सातारा<br>कै. पुरुषोत्तमदास विठ्ठलदास देवी यांचें स्मरणार्थं | १००० |
| १४) | श्री. व्ही. जी. जोशी, जनरल ट्रस्ट पुणे.<br>( ग्रंथ रु. १५०० व लोखंडी कपाट रु. १००० ) | १००१ |
| १६) | श्री. गोपाळकृष्ण विनायक चिरमुले मुंबई | १००१ |
| १७) | श्री. दाभोळकर बंधू सातारा<br>कै. अच्युतराव लक्ष्मणराव दाभोळकर यांचे स्मरणार्थं | १००१ |
| १८) | श्री. हिराचंद घनाजीभाई शहा सातारा | १००१ |
| १९) | वेलणकर सुवर्णतुला दाननिधी ट्रस्ट<br>कै. उद्योगरत्न धनी वेलणकर यांचे स्मरणार्थं | १००१ |
| २०) | मेसर्स बाळाराम परशुराम मिणीयार<br>स्व. परशुराम बाळाराम मिणीयार यांचे स्मरणार्थं | १००१ |
| २१) | डॉ. शरद वा. आठल्ये व सौ. प्रमिलाताई आठल्यें | १००१ |
| २२) | कै. डॉ. रामकृष्ण कोंडो पेंढारकर<br>यांचे स्मृतिप्रित्यर्थं हस्तें डॉ. वि. रा- पेंढारकर व<br>डॉ. मा. रा. पेंढारकर | १००१ |
| २३) | किसनदास लक्ष्मणदास देवी सातारा<br>कै. सौ. यमुनाबाई किसनदास देवी स्मृति प्रित्यर्थं | १००१ |
| २४) | श्रीमती मालतीबाई बळवंत गोडबोले सातारा<br>कै. बळवंत विनायक गोडबोले यांचे स्मरणार्थं | १००१ |
| २५) | गजानन कृष्ण दिवाकर | १००१ |
| २६) | शिवाजीराव लक्ष्मणराव बागल | १००१ |
| २७) | रघुनाथराव पाटील लोककल्याण ट्रस्ट कराड | १००१ |
| २८) | श्रीमती सुशिला गोपाळ कान्हेरे<br>कै. गोपाळ लक्ष्मण कान्हेरे याचे स्मरणार्थं | १००१ |
| २९) | आपटे बंधू सातारा कै. व्यंकटेश गोविंद आपटे<br>यांचे स्मरणार्थं | १००१ |
| ३०) | शिवाजी वर्क्स लि. सोलापूर | १००० |

महाराष्ट्रातील अत्यंत जुन्या वाचनालयापैकी हे एक आहे. ग्रंथ संग्रह चांगला आहे. वाचनाची गोडी वाढत जाणार आहे, शिवाय ग्रंथालय आणि वाचनालय ही लोकशिक्षणाची, त्याच प्रमाणे सुसंस्काराची केंद्र आहेत. त्यादृष्टीने वाचनालयाची वाढ होईल आणि भरभराट होईल याची मला खात्री वाटते.

१०–४–७८ श्री. ग. मुणगेकर

नगर वाचनालयाचे वाढते कार्य पाहून फार आनंद झाला त्यांना सुयश चिंततो.

२१–१०–७४ अनंत काणेकर

वाचनालयाची प्रगती आणि सुव्यवस्था पाहून फार आनंद वाटला.

२–९–९७२ ग. त्र्यं. माडखोलकर

वाचनालयातील पुस्तक संख्या, दररोज वाचण्यास जाणारी पुस्तक संख्या, सभासद संख्या, सर्व समाधानकारक आहे सुयश चिंतितो.

२०–५–७८ रा. सु. गवई

वाचनालय जुने आहे व त्याचे कार्य व्यवस्थितपणे चालले आहे हे पाहून अत्यंत आनंद झाला. वाचनालयाची उत्तरोत्तर प्रगती होत राहील अशी मला आशा आहे.

१२–४–७७ मधु लिमये


WITH BEST COMPLIMENTS FROM :—

**Save for the Prosperity**
**Prosper With**

# The Sangli Bank Ltd.,

Regd. Office

**Rajawada Chowk,**
**SANGLI.**

Branches spread over in Maharashtra, Karnatak, Gujarat, Tamilnadu and Goa ( Territory ).

**M. R. Randive**
Chairman


## कृतज्ञता :

नगर वाचनालयाच्या गेल्या १२५ वर्षांत वाचनालयाचे कार्यास ज्यांचे हातभार लागले त्यापैकी जे हयात नाहीत त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन त्यांना विनम्र अभिवादन करीत आहो. जे हयात आहेत पण साताराचे बाहेर आहेत त्यांचेबद्दल कार्यकारी मंडळ कृतज्ञता व्यक्त करीत आहे. त्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच वाचनालयास आजची सुस्थिती प्राप्त झाली आहे. ज्यांची नावे रेकॉर्डवरुन उपलब्ध झाली आहेत, त्यांचा अंतर्भाव स्मरणिकेमध्ये केला आहेच. पण चुकून कोणाचे नाव घालायचे राहिले असेल तर त्यांनी उदार अंतःकरणाने क्षमा करावी ही विनंती.

स्मरणिकेसाठी आमचे विनंतीप्रमाणे समाजभूषण पद्मश्री पु. पां. उर्फ बाबूराव गोखले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. देवदत्त दाभोळकर माजी कुलगुरू पुणे विद्यापीठ, बॅ. पी. जी. पाटील, बाबासाहेब पुरंदरे, प्रा. द. ता. भोसले आदि सर्व लेखकांचे आभारी आहो. प्रकृती बरी नसतानांही राजकवी यशवंत यांनी कविता पाठविली याबद्दल कसे आभार मानावेत हेच समजत नाही. स्मरणिकेत प्रसिद्धीसाठी ज्यांनी जाहिराती पाठविल्या त्या सर्व कारखानदारांचे व व्यापाऱ्यांचे आम्ही ऋणी आहो. स्मरणिकेसाठी जाहिराती मिळविण्याचे कामी सहाय्य केल्याबद्दल श्री. वि. श्री. उर्फ बाबासाहेब दामले, श्री. बापूसाहेब मिरजकर, पी. जी. भागवत, रा. ना. गोडबोले, म. गं. भागवत, विलासराव पाटील आदिंचे आम्ही मनःपूर्वक आभार मानीत आहो. स्मरणिकेची सुबक छपाई केल्याबद्दल विमा मुद्रक आणि प्रकाशक लि. सातारा यांचे व्यवस्थापक व अन्य कामगार, ब्लॉक्स तयार केल्याबद्दल मावळा चित्रमुद्रा, किर्लोस्कर प्रेस, सातारा जिल्हा प्रसिद्धी अधिकारी यांनी फोटो उपलब्ध करुन दिले, किर्लोस्कर प्रेस पुणे यांनी सुरेख मुखपृष्ठ छापून दिले व काही फोटो उपलब्ध करून दिले, तरुण भारतने काही फोटो पुरवले, आनंद प्रेस, व महाराष्ट्र मित्र मुद्रणालय यानी छपाईचे कामी सहाय्य केले त्याबद्दल श्री. अनंतराव कुलकर्णी, व त्यांचे सहकारी, संजय कोल्हटकर ऐक्य प्रेसचे संपादक सुरेश पळणिटकर आदींचे आम्ही मनःपूर्वक आभार मानीत आहो. इमारतीचे बांधकामाचे परवानगीचे कामी सहाय्य केल्याबद्दल ना. उत्तमराव पाटील, ना. हशू अडवानी व ना. प्रतापराव भोसले, नगरपालिकेचे अध्यक्ष, चीफ ऑफीसर व सर्व नगरसेवक यांचेंही आम्ही मनःपूर्वक आभार मानीत आहो.

वाचनालयाचे इमारतनिधीसाठी ज्यांनी देणग्या दिल्या त्या सातारा जिल्हा परिषद, रोटरी क्लब, व अन्य लहान मोठे सर्व देणगीदार यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानीत आहो. ज्यानी देणग्यांची आश्वासने दिली आहेत तेही लवकरच आपल्या देणग्या देतील व योजलेले इमारत वाढीचे काम पूर्ण होईल असा विश्वास वाटतो.

☆ ☆ ☆